कांड २

प्रपाठक - १.

१ आपल्याला ऐश्वर्य प्राप्त व्हावे, अशी ज्याला इच्छा असेल त्या यजमानाने वायुदेवतेला उद्देशून श्वेत म्हणजे पांढऱ्या रंगाच्या पशूचे आलभन म्हणजे हनन करावे. अर्थात् त्या पशूच्या 'वपा' इत्यादि अंगांचा वायुदेवतेसाठी 'याग' करावा. श्वेतवर्णाचा पशू वायुदेवतेला अत्यंत प्रिय आहे. 'वायु' हा अत्यंत शीघ्रगामी म्हणजे अतिशय त्वरेने गमन करणारा देव आहे. त्याच्या उद्देशाने पशुयाग केला असता स्वकीय म्हणजे वायुदेवाला आपलासा वाटणाऱ्या हविर्भागासह यजमानाने वायुदेवतेच्या सन्निध जाऊन यजनरूप पूजा केल्याप्रमाणे होते, आणि त्या पूजेने संतुष्ट झालेला तो वायुदेव त्या यजमानाला ऐश्वर्याला चढवितो. अर्थात् वायुदेवाच्या अनुग्रहाने तो यजमान खात्रीने ऐश्वर्यसंपन्न होतो. कोणी विद्वान असे म्हणतात की, वायू ही देवता अत्यंत जलदीने गमन करणारी असल्यामुळे स्वभावतः उग्र अशी आहे, आणि म्हणून ती यजमानाला अग्नीच्याद्वारा दग्ध करण्यास समर्थ असल्यामुळे उग्र स्वभावाच्या वायुदेवतेला उद्देशून 'पशुयाग' करू नये. वारा जोराने वाहू लागला आणि त्याचा आघात पेटलेल्या अग्नीवर झाला म्हणजे तो भडकून घरे जाळीत असल्याचे दृष्टीस पडतेच. परंतु या विद्वान लोकांनी घेतलेल्या आक्षेपाचा परिहार असा की, 'नियुतवत्' असे विशेषण असलेल्या अर्थात् 'वायुर्नियुत्वान्' संज्ञक वायुदेवतेसाठी पशूचे हनन करावे. वायूच्या रथाला निरंतर जोडल्या जाणाऱ्या घोड्यांना 'नियुत्' अशी संज्ञा आहे. 'नियुत्' नांवाची घोडयाची जात वायूचे धारण करणारी म्हणजे वायूच्या अत्यंत शीघ्र व स्वैरगतीला थोपवून धरणारी आहे. नियुत् नांवाचे घोडे जोडलेल्या रथात बसून 'वायू' जाऊ लागला म्हणजे अत्यंत शीघ्र अशा स्वैरगतीने गमन करण्यास समर्थ होत नाही. रथाला जोडलेल्या अश्वांच्या गतीस अनुसरूनच त्याला जाणे भाग पडते व त्यामुळेच त्याची उग्रताही कमी होते. सारांश 'नियुत्' नांवाचे घोडे जोडलेल्या रथात बसलेल्या 'वायुर्नियुत्वान्' संज्ञक वायूला पशुरूपी हविर्द्रव्याचे दान केल्याच्या योगाने अग्निद्वारा वायूकडून होणाऱ्या दाहापासून यजमान बचावला जाऊन ऐश्वर्याला प्राप्त होतो. व त्याचे ते ऐश्वर्य त्याच्या मनाचा कोणत्याही कारणाने संतापरूपी दाह न होण्याला कारणभूत होते. तात्पर्य नियुत्वान् अशा वायुदेवाच्या अनुग्रहाने यजमान धैर्ययुक्त होऊन स्वकीय पुरुषांचे नियंत्रण करण्यास पुरेशा

द्रव्याचे पालन करण्यास समर्थ होत असल्यामुळे त्याच्या मनाचा संतापरूप दाह होण्याचे कारणच उरत नाही. अर्थात् तो सर्व प्रकारच्या ऐश्वर्याने संपन्न होतो. २ आपल्याला एक 'गांव' मिळावा, एका गांवाचे आपण अधिपती व्हावे, अशी इच्छा करणाऱ्या यजमानाने 'वायुर्नियुत्वान्' म्हणजे नियुत्वत् संज्ञेने युक्त अशा वायुदेवतेच्या उद्देशाने पशूचे हनन करून त्याच्या अंगाचा याग करावा. बैलांच्या नाकात वेसण घालून शेतकरी जसे बैलांना सुखाने म्हणजे आपल्या मर्जीनुरूप वागवितात त्याचप्रमाणे वायू हा गावात वस्ती करून राहत असलेल्या सर्व प्रजा आपल्या आधीन करून त्यांना वागवीत असतो. यास्तव 'नियुत्वत्' अशा वायूच्या उद्देशाने पशुयाग केला असता, यजमानाने 'नियुत्वत्'गुणविशिष्ट अशा वायुदेवतेच्या सन्निध त्याला प्रिय असलेला हविर्भाव घेऊन जाऊन त्याचे पूजन केल्याप्रमाणे होते. अर्थात् पशुयागाने संतुष्ट झालेला तो 'नियुत्वान्' वायू सर्व प्रजा यजमानाच्या आधीन करतो. व त्यामुळे वेसण घातलेल्या बैलाप्रमाणे सर्व प्रजांना आपल्या तंत्राप्रमाणे वागविण्यास यजमान समर्थ होऊन निश्चयाने गावाचा अधिपती होतो. शिवाय यजमानाने केलेला पशुयाग ज्याअर्थी 'नियुत्वान्' अशा विशेषणाने युक्त वायुदेवाला संतुष्ट करण्यास कारण होतो, त्याअर्थी तो वायुदेव त्या यजमानाच्या गावात राहणाऱ्या सर्व प्रजा त्याच्यावर अनुरक्त होतील असे करतो. आणि त्यामुळे त्या प्रजा यजमानाला केव्हाही सोडून जात नाहीत. ३ आपणास प्रजेचा लाभ व्हावा, असे इच्छिणाऱ्या यजमानाने 'वायुर्नियुत्वान्' या देवतेला उद्देशून पशुयाग करावा. मुखातून-नाकपुड्यांच्या द्वारा-बाहेर संचार करणारा तो 'प्राण' व मुखाच्या खाली उदरात संचार करणारा तो 'अपान' होय. वायू हा प्राणरूप असून नियुत् (संज्ञक वायू) हा अपान होय. जो पुरुष प्रजोत्पत्ती करण्याला समर्थ आहे, अनुकूल अशा स्त्रीने युक्त आहे, तरुण आहे, परंतु त्याला अपत्य होत नाही, त्या पुरुषाचे प्राण व अपान हे दोन्ही वायू त्याला जणू सोडूनच गेलेले असतात. म्हणजे प्राण व अपानरूप असलेला वायू त्याच्यावर रागावलेला असतो. त्याने आपल्या स्त्रीच्या गर्भाशयात रेताचे सिंचन केले तरी त्या रेताचे ठिकाणी वायूचा अनुग्रह नसल्यामुळे प्राणापानयुक्त म्हणजे श्वासोच्छ्वासाने युक्त असा दुसरा जीव प्रविष्ट होत नाही. सारांश, प्रजोत्पत्तीला योग्य असताना देखील वायूचे आनुकूल्य नसल्यामुळे ज्याला प्रजा होत नाही अशा यजमानाने 'वायुर्नियुत्वान्' देवतेच्या उद्देशाने पशुयाग

केला असता त्या यजमानाने नियुत्वान् वायूला प्रिय असा हविर्भाग घेऊन त्याच्या सन्निध गेल्यासारखे व त्या हविर्भागाने त्याची पूजा केल्यासारखे होते. व त्या योगाने संतुष्ट झालेला तो नियुत्वान् वायुदेव त्या यजमानाने स्त्रीच्या गर्भाशयात सिंचित केलेल्या रेताचे ठिकाणी प्राण व अपान या दोन्ही वायूंनी युक्त अशा जीवाचा प्रवेश करवितो. व मग यजमानाला पुत्राचा लाभ होतो. सारांश, 'वायुर्नियुत्वान्' देवतेच्या अनुग्रहाने यजमान प्रजोत्पादन करण्यास समर्थ होऊन आपल्या इच्छेनुरूप प्रजेचे संपादन करतो. ४ दीर्घकाळ मुरलेल्या रोगाने पछाडलेल्या यजमानाने आपल्या रोगमुक्तीसाठी 'वायुर्नियुत्वान्' देवतेला उद्देशून पशुयाग करावा. 'वायू' हा प्राणरूप असून 'नियुत्' हा अपानरूप आहे. ज्याला दीर्घकालीन रोगाने पछाडलेले असते, त्याचे प्राण व अपान हे दोन वायू खरोखर त्याला सोडून जाण्यास उद्युक्त झालेले असतात. यास्तव 'वायुर्नियुत्वान्' देवासाठी पशुयाग केला असता त्या यजनाने वायुदेवतेला प्रिय असा हविर्भाग घेऊन त्याच्या जवळ गेल्यासारखे व त्या हविर्भागाने त्याचे पूजन केल्यासारखे होते. व त्या योगे संतुष्ट झालेला तो 'वायुर्नियुत्वान्' देव त्या यजमानाचे प्राण व अपान हे दोन्ही वायू त्याच्या ठिकाणी व्यवस्थित रीतीने स्थापन करतो. इतकेच नव्हे तर 'नियुत्वत्' विशेषणाने युक्त अशा वायुदेवाचा अनुग्रह झालेला यजमान दोन घटका किंवा प्रहरभर गतप्राण झाला असला तरी देखील तो पुन्हा जिवंत होतो. ५ आज दिसत असलेली ही सृष्टी उत्पन्न होण्यापूर्वी 'प्रजापती' हा एकटाच काय तो होता. बाकी दुसरे काहीही नव्हते. त्याला आपण प्रजा व पशू उत्पन्न करावे, अशी इच्छा उत्पन्न झाली. तेव्हा त्याने प्रजा व पशू उत्पन्न करण्याचे साधन म्हणून आपल्या उदरात असलेली तलम वस्त्रासारखी दिसणारी त्वग्रूप 'वपा' उदरातून उखडून बाहेर काढली व ती अग्नीवर टाकली. म्हणजे त्या वपेची त्याने अग्नीला आहुती दिली. अग्नीमध्ये वपा दग्ध होताच तिच्यामधून एक शिंगे नसलेला भुंडा 'अज' म्हणजे बोकड उत्पन्न झाला. तेव्हा स्वात्मरूप देवतेला उद्देशून त्याने त्या बोकडाचे हनन केले व त्याच्या अंगरूपी हविर्द्रव्यांनी स्वात्मरूपी देवतेचा 'याग' म्हणजे पूजा केली. ह्या यजनरूप कर्मप्रभावाने प्रजापतीने प्रजा व पशू निर्माण केले. व्यवहारदृष्टीने प्रजापती आपल्याच उदरातील 'वपा' कशी काढू शकला? व 'वपा' काढल्यावर जगला तरी कसा? अशी शंका उत्पन्न होणे स्वाभाविक आहे. तथापि, प्रजापती म्हणजे

दुसरा कोणी नसून कर्तुमकर्तुम् अशा प्रकारची अलौकिक शक्ती असलेला परमात्म्याचा अंश होय, हे लक्षात घेतल्यास संकल्प करताक्षणीच कोणतेही कार्य करण्याचे सामर्थ्य असणाऱ्या प्रजापतीला कोणती गोष्ट अशक्य आहे?, असा विवेक उत्पन्न होऊन शंकेचे आपोआपच निरसन होते. सारांश, ज्या कोणाला आपल्या ठिकाणी प्रजा व पशू उत्पन्न व्हावेत अशी इच्छा असेल त्याने प्रजापतिदेवतेच्या उद्देशाने शृंगरहित अशा बोकडाचे हनन करून त्याच्या अंगांनी प्रजापतिदेवतेचे यजन करावे. अशा प्रकारे 'पशुयाग' केला असता प्रजापतीला स्वकीय असा वाटणारा हविर्भाग घेऊन यजमानाने त्याच्याजवळ धावत गेल्यासारखे व पश्वंगरूपी हविर्द्रव्याने त्याचे पूजन केल्यासारखे होते. आणि मग पशुयागाने संतुष्ट झालेला तो प्रजापती यजमानासाठी प्रजा व पशू उत्पन्न करतो. प्रजापतीच्या उद्देशाने ज्या पशूचे हनन केले जाते, त्या पशूला असलेल्या 'मिशा' हे त्याच्या ठिकाणी असलेले पुरुषाचे रूप किंवा चिन्ह होय. त्या पशूचे जे शृंगरहितत्व ते त्याच्या ठिकाणी असलेले अश्वाचे अर्थात् घोड्याचे चिन्ह किंवा रूप असून त्याच्या मुखामध्ये फक्त खालच्याच बाजूस दांत असणे हे त्याच्या ठिकाणी असलेले गोरूपत्वाचे अर्थात् गाईच्या स्वरूपाचे चिन्ह होय. त्याच्या पायांना मेंढ्यांप्रमाणे जे खूर असतात ते त्याच्या ठिकाणचे मेढ्यांच्या स्वरूपाचे चिन्ह होय. शिवाय त्याचे जे स्वाभाविक असे अजत्व (बोकडाचे स्वरूप) असते ते सर्व अजांचे स्वरूपचिन्ह समजावे. पुरुष, घोडा, गाय, मेंढा व बोकड या पांच जातीचे प्राणी हेच मुख्यत: 'ग्राम्य' म्हणजे गावांत राहणारे पशू होत. सारांश, पांचही ग्राम्य पशूंच्या स्वरूपाने युक्त असलेल्या पशूचा याग केल्याच्या योगाने यजमानाने जणू काय पांचही प्रकारच्या ग्राम्य पशूंना आपल्या आधीन केल्यासारखे होते.
६ पशूंची प्राप्ती व्हावी अशी इच्छा असेल त्याने 'सोम' व 'पूषा' या दोन देवतांच्या उद्देशाने ज्या शेळीला तीन बोकड झालेले असतील त्यांपैकी एका पशूचे हनन करून त्याच्या अंगांनी याग करावा. शेळीला दोन स्तन असतात. तिला झालेल्या तीन अपत्यांपैकीं दोघेजण अनुक्रमे एकाएका स्तनांचे पान करण्यासाठीच जणू उत्पन्न झालेले असतात. व तिसरा बोकड आपल्या मातेच्या ठिकाणी असलेले विशेष वीर्य व विशेष पुष्टी व्यक्त करण्यासाठीच निर्माण झालेला असतो, असे समजावे. असो ! आता सांगितल्याप्रमाणे 'पशुयाग' केला असता यजमानाने जणू काय 'सोम व पूषा' यांच्या स्वकीय

अशा हविर्भागासह त्यांच्याजवळ जाऊन त्यांचे यजन केल्याप्रमाणे होते. यजमानाने केलेल्या यजनाने संतुष्ट झालेले ते सोम व पूषा हे दोघे देवच त्या यजमानासाठी पशूंची निर्मिती करतात. यजमानाच्या घरी असलेल्या स्त्री पशूच्या ठिकाणी 'सोमदेव' रेताचे धारण करतो. व 'पूषा' देव त्या रेतापासून पशूंची उत्पत्ती करतो. तात्पर्य, सोम व पूषा देवाच्या कृपेने यजमान पशुसंपत्तीने युक्त होतो. या पशुयागामध्ये 'यूप' म्हणजे पशूला बांधून ठेवण्याचा खांब उंबराच्या वृक्षाचा असावा. कारण उदुंबर वृक्ष हा रसरूप आहे व पशू हे देखील रसरूप आहेत. यास्तव उंबराच्या वृक्षाचा यूप आपल्या ठिकाणच्या रसशक्तीने यजमानासाठी रसरूपी पशूंना उत्पन्न करतो. (अनुवाक १).

प्रजापतीने ज्या प्रजा निर्माण केल्या त्या त्याच्याकडे पाठ फिरवून अर्थात् प्रजापतीच्या सान्निध्यात राहणे त्यांना न आवडल्यामुळे त्याला सोडून निघाल्या आणि वरुणाजवळ जाऊन त्याच्या आश्रयाने राहिल्या. प्रजांच्या मागोमागच प्रजापती वरुणाकडे गेला आणि 'माझ्या प्रजा मला पुन्हा परत दे' अशी त्याने वरुणाजवळ याचना केली. पण वरुणाने त्या प्रजा प्रजापतीला परत दिल्या नाहीत. तेव्हा प्रजापती त्याला म्हणाला, हे वरुणा, या माझ्या प्रजांमध्ये मानव, गाय, मेंढा आणि बकरा असे पांच प्रकारचे पशू आहेत. यांपैकी तुला जो अत्यंत श्रेष्ठ असा पशू दिसेल, तो एक पशू तू आपला म्हणून ठेवून घे. आणि बाकीच्या पशुरूपी सर्व प्रजा माझ्या मला परत दे. तेव्हा वरुणाने स्वतःच्या इच्छेनुरूप अत्यंत श्रेष्ठ म्हणून जो एक पशू पसंत केला तो सर्वांगांनी काळ्या वर्णाचा पण एकच पाय पांढऱ्या रंगाचा असलेला 'अज' म्हणजे बकरा (बोकड) होता. सारांश, सर्व शरीराने काळा, पण एक पाय पांढरा असलेला अज जातीचा पशू हा वरुण देवाला अत्यंत प्रिय आहे.

१ यास्तव जो वरुणाकडून घेरला गेला असेल, म्हणजे जो कोणी यजमान वरुणकोपामुळे उत्पन्न झालेल्या जलोदर नामक महाव्याधीने पीडित झाला असेल, त्याने आपल्या रोगमुकतेसाठी 'वरुण' देवतेला उद्देशून पूर्वोक्त काळ्या रंगाच्या, एक पाय पांढरा असलेल्या पशूचे यजन करावे. असे केल्याच्या योगाने यजमानाने जणू काय वरुणाला स्वकीय वाटणारा असा हविर्भाग घेऊनच त्याच्याजवळ जाऊन त्याला अर्पण केल्याप्रमाणे होते. आणि मग संतुष्ट झालेला तो वरुणदेव त्या यजमानाला आपल्या जलोदररोगरूपी

पाशापासून मुक्त करतो. एवं च, कृष्णवर्ण व शितिपात् म्हणजे एक पाय पांढरा असा जो पशू असतो, तो वरुणदेवतात्मक अर्थात् त्याला प्रिय असलेला पशू होय. हा पशू वरुणदेवतेकडून यजमानाला समृध्दी प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो.

पृथ्वीचे रूप धारण केलेल्या व अंधकाराचा जणू पुंजच अशा कृष्णवर्णाच्या सुवर्भानु नामक असुराने आपल्या अंधकाराने सूर्याला आच्छादित करून, सर्व जगाला आंधळे करून टाकले. सुवर्भानूच्या त्या अंधकाराचा परिहार करण्याचे देवांनी ठरविले. प्रकाशरूप असणाऱ्या मणी इत्यादि वस्तूंच्या साधनांचा तीन वेळ उपयोग करून देवांनी सुवर्भानूचा अंधकार अनुक्रमे तीन चतुर्थांश नाहीसा केला. पहिल्या खेपेत अंधकाराचा जो एक अंश देवांनी दूर केला त्यापासून एक काळ्या रंगाची मेंढी उत्पन्न झाली. दुसऱ्या खेपेस जो अंधकार नाहीसा केला, त्यापासून रक्तासारख्या लाल रंगाची एक मेंढी उत्पन्न झाली. देवांनी तिसऱ्या खेपेस सुवर्भानूच्या अंधकाराचा जो भाग नष्ट केला, त्यापासून एक 'बलक्षी' म्हणजे पांढऱ्या रंगाची मेंढी उत्पन्न झाली. चौथ्या खेपेला कोणाच्यातरी मृत देहाच्या जळत्या अस्थीच्या उजेडाने देवांनी जो अंधकार दूर केला त्यापासून एक व्रांझ अशी मेंढी उत्पन्न झाली. तेव्हा देव आपआपसात असे म्हणू लागले की, प्रकाशाने देदीप्यमान अशा अस्थीपासूनच पर्यायाने उत्पन्न झाल्यामुळे हा वांझ मेंढीरूपी 'पशू' म्हणजे अत्यंत उत्कृष्ट असा देवपशूच आहे. यास्तव अवश्य अशा एखाद्या कार्याच्या निमित्ताने या पशूचे आलभन (हनन) करून आपण देवांचे यजन करू. त्यांचा हा विचार कायम झाल्यानंतर काही काळाने आपल्या वस्तीच्या मानाने जमीनीच्या विस्ताराचा अपुरेपणा व तिच्या ठिकाणी ओषधी वनस्पतींच्या उत्पत्तीचा अभाव या दोन उणीवांकडे देवांचे लक्ष गेले. आणि त्यांचा परिहार करणे, ही एकच कामना मनात धरून तिच्या पूर्णतेसाठी आदित्य देवांना प्रसन्न करून घेण्याकरिता त्या वांझ मेंढीचे हनन करून तिच्या अंगांच्या योगाने देवांनी आदित्यांचे यजन केले. त्यामुळे आदित्य त्यांना प्रसन्न झाले. व त्यांच्या अनुग्रहाने देवांच्या जमिनीचा विस्तार झाला व तिच्यावर ओषधी वनस्पतीही उत्पन्न होऊ लागल्या. २ जो कोणी यजमान पशूंच्या समृध्दीने आपण युक्त व्हावे, त्याचप्रमाणे पुत्रकन्यादिरूप प्रजेच्या योगानेही उत्कृष्टसंपन्न असावे अशी इच्छा करीत असेल, त्याने त्या इच्छेच्या पूर्णतेसाठी ह्या आता वर्णन केलेल्या

काळ्या रंगाची मान असलेल्या शेळीचे हनन करावे. ग्रीष्म ऋतूमधील योग्य दिवशी मध्यान्हकाळी 'वपायाग' होईल अशा रीतीने अनुष्ठानाचा आरंभ करून 'इंद्र' देवतेसाठी काळे, पांढरे पट्टे असलेल्या शेळीचे आलभन म्हणजे हनन करावे. शरद ऋतूतील एखाद्या दिवशी अपराण्हकाळी वपेचा होम होईल, अशा प्रकारे अनुष्ठान सुरु करून बृहस्पतिदेवतेच्या उद्देशाने स्वच्छ पांढऱ्या रंगाच्या शेळीचे हनन करावे. आदित्याच्या अर्थात् भगवान् सूर्याच्या तेजाचे तीन प्रकार आहेत. वर्षा ऋतूप्रमाणे पावसाळी ढग व हेमंत शिशिर ऋतूप्रमाणे धुकेही पडत नसल्यामुळे वसंत ऋतूतील सकाळच्या वेळी सूर्याचे तेज स्पष्टपणे प्रकाशत असते. ग्रीष्मऋतूतील मध्यान्हकाळी सूर्याचे तेज अधिक तीव्र होऊन प्रकाशत असते. आणि शरदऋतूतील अपराण्हकाळी पडणारे सूर्याचे तेज सेवनीय असे असते. यास्तव आताच सांगितल्याप्रमाणे वसंतादि तीन ऋतूंतील तीन विशिष्ट काळांत अनुक्रमे तीन शेळ्यांचे हनन केल्याच्या योगाने सूर्याच्या तेजाला तीनही प्रकारे यजमानाने आपणास अनुकूल असे करून घेतल्याप्रमाणे होते. अर्थात् तो यजमान सूर्याच्या तिन्ही प्रकारच्या तेजाने युक्त होतो. एकाच संवत्सरामध्ये पूर्वोक्त तीन ऋतूंत पूर्वोक्त तीन पशूंचे याग त्या त्या काळी अनुक्रमाने करावेत. अनुष्ठानाचा आरंभ केल्यापासून सवंत्सरसमाप्ती होईपर्यंत यजमानाने ब्रह्मचर्यादि नियमांचे निरंतर परिपालन करावे. संवत्सर हा 'ब्रह्मवर्चस्' संज्ञक तेज म्हणजे वेदाध्ययनजन्य व संध्यावंदनादिआचारजन्य अशी शरीरकांती देणारा आहे. उपनयन झालेल्या ब्रह्मचारी मुलांचे संध्यावंदनादि आचारविषयक शिक्षण एका संवत्सरात उत्तम प्रकारे पूर्ण होत असते. सारांश, पूर्वोक्त पशुयागाचे अनुष्ठान करणाऱ्या यजमानाने प्रारंभदिनापासून एक संवत्सर पूर्ण होईपर्यंत ब्रह्मचर्यादिव्रत नियमाने पालन केले असता संवत्सराचा अभिमानी देव त्या यजमानाला 'ब्रह्मवर्चस्' संज्ञक तेज देतो. आणि तो यजमान 'ब्रह्मवर्चसी' म्हणजे 'ब्रह्मवर्चस्' संज्ञक तेजाने संपन्न होतो. आता सांगितलेल्या पशुयागसंबंधी ज्या तीन शेळ्यांचे हनन करण्यास सांगितले त्या तिन्ही शेळ्या गर्भिणी म्हणजे गाभण्या असाव्यात. कारण गर्भ हा इंद्रियरूप आहे. व तो यजमानाच्या ठिकाणी इंद्रियसमुदाय धारण करतो. म्हणजे त्या यजमानाच्या ठिकाणचा सर्व इंद्रियसमुदाय स्वकार्यक्षम होतो. ४ वेदशास्त्राच्या अभ्यासपाटवामुळे आपल्या ओघवती वाणीने सभेमध्ये कोणत्याही विषयावर वक्तृत्व करण्याची पात्रता असूनही सभाधीटपणाच्या अभावामुळे अथवा अन्य कारणामुळे जो सभेत

वक्तृत्व करू शकत नाही, त्या यजमानाने सरस्वतीदेवतेप्रीत्यर्थ एका मेंढीचे हनन करून 'यजन' करावे. वाणी ही सरस्वतीदेवतारूप आहे. यास्तव तिच्यासाठी यजन केले असता यजमानाने जणू काय प्रत्यक्ष सरस्वती देवीच्या सन्निध जाऊन तिला स्वकीय वाटणाऱ्या मेंढीच्या अंगरूपी द्रव्याच्या योगाने तिला तृप्त केल्यासारखे होते. आणि त्यामुळेच प्रसन्न झालेली ती सरस्वतीदेवी यजमानाच्या ठिकाणी अस्खलित अशा वाणीचे स्थापन करते. अर्थात् सरस्वती देवीची कृपा संपादन केलेला तो यजमान आपल्या अस्खलित वाणीने सभेमध्ये उत्कृष्ट प्रकारे कोणत्याही विषयावर वक्तृत्व करणारा होतो. मात्र सरस्वतीला अर्पण करण्यात येणारी ही मेंढी 'अपन्नदती' म्हणजे दांत न पडलेली अशी असावी. सर्व दांत कायम असलेली माणसेच स्पष्ट व अस्खलित भाषण करू शकतात, हे आपण पाहतोच.

५ अग्निदेवतेप्रीत्यर्थ मानेशी काळा रंग असलेला व सोमदेवतेच्या संतोषासाठी 'पिंगल' वर्णाचा असे अनुक्रमे दोन पशू मारून त्यांच्या अंगांचे यजन करावे व त्या योगे अग्नी व सोम या दोन देवतांना संतुष्ट करावे. दीर्घकालीन रोगामुळे जो ग्रासला गेलेला असतो, त्या माणसाचे शरीर अग्नीच्या ताब्यात जात असते. म्हणजे त्याच्या शरीरातील मांस अग्नीने शुष्क करून टाकलेले असते. त्याचप्रमाणे अशाप्रकारच्या रोग्याने सेवन केलेल्या अन्नाचा प्राणपोषक रस सोमदेवतेच्या आधीन झालेला असतो, म्हणजे सोमदेवतेच्या अवकृपेमुळे त्याने खाल्लेल्या अन्नाचा रस सर्व शरीरात प्रवेशच करीत नाही. यास्तव ज्याला दीर्घकालीन रोगाने ग्रासले असेल त्या यजमानाने अग्नी व सोम यांच्या अनुग्रहापासून आपली रोगमुक्तता व्हावी म्हणून पूर्वोक्त दोन पशूंचा अनुक्रमे दोन्ही देवतांच्यासाठी याग करावा. असे केल्याच्या योगाने त्या यजमानाने अग्नीपासून आपले शरीर आणि सोमापासून खाल्लेल्या अन्नाचा प्राणपोषक रसच जणू विकत घेतल्याप्रमाणे होऊन तो यजमान रोगमुक्त होतो. इतकेच नव्हे तर त्या रोगामुळे काही वेळ गतप्राण झाला तरी देखील तो पुन्हा जिवंत आणि आरोग्यसंपन्न होतो.

६ आपल्याला 'प्रजा' प्राप्त व्हावी अशी ज्याची इच्छा असेल त्याने सोमदेवतेच्या उद्देशाने 'पिंगल' वर्ण व अग्निदेवतेसाठी मानेच्या ठिकाणी काळा वर्ण असलेल्या पशूचे हनन करून त्याच्या अंगांनी 'याग' करावा. सोम

हा रेताचे धारण करणारा असून अग्नी हा प्रजांची उत्पत्ती करणारा आहे. यास्तव आता सांगितल्याप्रमाणे याग केला असता सोम व अग्नी हे दोन्ही देव यजमानावर प्रसन्न होतात. सोमदेव त्या यजमानाच्या ठिकाणी प्रजोत्पत्तीसमर्थ असे 'रेत' स्थापन करतो. व अग्नी त्या रेतापासून यजमानासाठी प्रजा निर्माण करतो. अर्थात् यजमान आपल्या इच्छेनुसार प्रजा संपादन करतो.

७ जो ब्राह्मण उत्कृष्ट प्रकारची विद्या अवगत केलेला असून अप्रस्तुत किंवा कठोर भाषण करण्याच्या खोडीमुळे सभेत असलेल्या श्रोतृवर्गाला रुचत नाही, अर्थात् अप्रिय होतो, त्याने सभासदांची प्रीती संपादन करण्याकरिता अग्निदेवतेसाठी काळ्या मानेचा व सोमदेवतेसाठी पिंगल वर्णाचा पशू हनन करून याग करावा. अग्नीला जो पशू अर्पण केला जातो, तो आपल्या ठिकाणी असलेल्या अग्निदेवतात्मकत्वामुळे यजमानाच्या ठिकाणी वकृत्वाच्या कामी श्रोत्यांच्यावर छाप पडेल अशा प्रकारचे तेज धारण करतो. आणि सोमदेवतेला जो पशू अर्पण केला जातो तो आपल्या ठिकाणी असलेल्या सोमदेवतात्मकत्वाच्या योगाने यजमानाच्या ठिकाणी वेदशास्त्रवचनांच्या आधारे प्रसंगानुरूप व सर्वांना रुचेल असे भाषण करण्याविषयी स्फूर्तिरूप असे 'ब्रह्मवर्चस्' संज्ञक तेज स्थापन करतो. फक्त मानेच्याच ठिकाणी काळा (व इतर सर्व शरीरावर पांढरा) रंग असलेला पशू अग्नीला अर्पण केला जातो. त्या योगाने संतुष्ट झालेला अग्नी यजमानाच्या ठिकाणी असलेला बुध्दिमांद्यरूपी अंधकार दूर करतो. अग्नीला अर्पण केलेला पशू मानेखेरीज इतर शरीराने पांढऱ्या रंगाचा असतो. त्या योगाने खूष झालेला अग्नी यजमानाच्या ठिकाणी सभासदांचे अनुरंजन करण्यास पात्र होईल अशा प्रकारची प्रभा उत्पन्न करतो. पिंगल वर्णाचा जो पशू सोमदेवतेला अर्पण केलेला असतो. त्याचा स्वीकार करून संतुष्ट झालेला सोमदेव यजमानाच्या ठिकाणी सभासदांचे प्रेम जडेल अशा प्रकारची 'ब्रह्मवर्चस्' संज्ञक शरीरकांती निर्माण करतो.

८ राजाचे पौरोहित्य मिळविण्याचे कामी इतरांच्याशी स्पर्धा करीत असलेल्या यजमानाने अग्निदेवतेला उद्देशून 'कृष्णग्रीव' म्हणजे सर्व शरीर पांढरे, परंतु मानेच्या ठिकाणी काळा वर्ण असलेला, सोमदेवतेसाठी पिंगल वर्ण, आणि पुन्हा अग्निदेवतेकरिता पूर्वोक्त कृष्णग्रीव अशा पशूंचे हनन करून अनुक्रमे यजन करावे. प्रजापतीच्या मुखापासून अग्नीच्या बरोबरच उत्पन्न झाला

असल्यामुळे ब्राह्मण हा अग्निरूप असल्याचे प्रसिध्दच आहे. त्याचप्रमाणे 'सोम राजन्' इत्यादि मंत्रांच्या द्वारा 'सोम' हा राजन्य म्हणजे क्षत्रियवर्णाचा राजा असल्याचेही स्पष्टच आहे. यासाठी सोमदेवतेसाठी केल्या जाणाऱ्या यजनापूर्वी आणि नंतर असे दोन याग अग्निदेवतेला उद्देशून केले जातात. अर्थात् देवांमधील क्षत्रिय राजा असलेल्या सोमाच्या मागे व पुढे अशा दोन्ही बाजूंनी देवांमधील ब्राह्मण असलेल्या अग्नीचे यजन केले जाते. व अशाप्रकारे यजन करणारा यजमान आपल्या ठिकाणच्या ब्रह्मतेजाने, अर्थात् राजपौरोहित्याला आवश्यक अशा आपल्या अंगच्या गुणाने सर्व राष्ट्राला दोन्ही बाजूंनी वश करू शकतो. आणि मग एका क्षणातच आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्यावर मात करून तो उत्कृष्ट प्रकारे विजय संपादन करतो. अर्थात् अशा योग्य ब्राह्मणाला राजा व प्रधानमंडळातील अधिकारी पुरुष सर्व कार्यांत पुढारी करतात. म्हणजे राजाच्या पुरोहिताच्या जागी त्याला नियोजित करतात. (अनुवाक २).

त्रैलोक्याच्या आधिपत्याच्या इच्छेने देव व असुर यांच्यामध्ये स्पर्धा लागली होती. दोन्ही पक्ष आपआपले ध्येय साधण्यासाठी परस्परांशी जिवावर उदार होऊन लढत होते. सर्व देवांत प्रमुख अशा विष्णुदेवाने सर्व असुरांचा पराभव करून देवांना विजय मिळविता यावा या हेतूने पूर्व कल्पातील विष्णुदेवाला प्रसन्न करून घेण्यासाठी 'पशुयाग' करण्याचे सर्वानुमते ठरविले आणि एक ठेंगणासा पशू पसंत करून आपली इष्ट देवता जी विष्णू तिच्यासाठी त्याचे त्याने हनन केले. आणि त्याच्या वपादि अंगांचे यजन केले. त्याच्या प्रभावाने अखिल देवांचा प्रमुख होऊन भगवान् विष्णूने असुरांच्यापासून पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तिन्ही लोक जिंकून घेतले. वास्तव घर, जमीन इत्यादि विषयांत विरुध्द पक्षाशी झगडत असलेल्या यजमानाने प्रतिस्पर्ध्यांवर जय मिळविण्याचे साधन म्हणून विष्णू देवतेच्या उद्देशाने एका ठेंगण्या पशूचे यजन करावे. त्या योगाने भगवान् विष्णू संतुष्ट होऊन त्या यजमानावर अनुग्रह करतो व त्याच्या प्रभावाने यजमान त्याच्याशी झगडत असलेल्या सर्व प्रतिपक्षीयांच्यावर विजय मिळवितो. या पशुयागात पशूचे हनन व त्याच्या अंगांचे यजन हे ज्या स्थलाची रुंदी आरंभापासून शेवटपर्यंत उत्तरोत्तर अधिकाधिक आहे, अशा विषम स्थलाचे ठिकाणी करावे. कारण पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक विस्ताराने अथवा भोगसंपत्तीच्या प्रभूतत्वाने विषम म्हणजे एकापेक्षा एक मोठे आहेत. अर्थात् विषम स्थलाच्या ठिकाणी केलेले यजन यजमानाला

हे तीनही लोक जिंकण्याला, अर्थात् तीनही लोकांतील विरोधकांच्या पराभवाला कारणभूत होऊन सर्व प्रकारची समृध्दी यजमानाला प्राप्त करून देण्यालाही कारणभूत होते.

शत्रुसैन्याशी लढण्याकरता आपल्या सैन्यासह रणांगणावर येऊन पोचलेल्या राजाने शत्रूविषयी अत्यंत कोपिष्ट व धैर्याचा मूर्तिमंत पुतळाच अशा इंद्रदेवाच्या अनुग्रहासाठी, ज्याच्या कपाळावर चंदनाच्या शुभ्र टिळ्याप्रमाणे पांढऱ्या शुभ्र केसांचा टिळा आहे, आणि ज्याची शिंगे त्याच्या मुखाकडे वळलेली आहेत अशा पशूचे आलभन करून त्याच्या अंगांचे यजन करावे. म्हणजे, इंद्राच्या अनुग्रहाने तो यजमान राजा आपल्या ठिकाणच्या शरीरबळाने व शत्रूविषयी अत्यंत क्रोधाने भडकलेल्या व धैर्यशाली अशा मनाने युद्धामध्ये आपल्या शत्रूला जिंकतो. एवं च, आता सांगितल्याप्रमाणे पशुयाग केला असता, त्या यजमानाने जणू काय प्रत्यक्ष इंद्रदेवाच्या जवळ धाव घेऊन त्याला स्वकीय असणाऱ्या पशूच्या अंगांनी त्याचे यजन केल्याप्रमाणे होते व त्या योगाने संतुष्ट झालेला इंद्र त्या यजमानाच्या ठिकाणी इंद्रियशक्ती, शत्रूविषयी अत्यंत क्रोध व अतिशय धाडसी मन यांचे धारण करतो. अर्थात् तो यजमान त्या युद्धात निश्चयाने जय संपादन करतो.

आपल्याला एक गांव मिळावा अशी इच्छा असणाऱ्या यजमानाने मरुद्गणांसह असणाऱ्या इंद्रासाठीं, ज्याच्या मांड्या पांढऱ्या रंगाच्या आहेत अशा पशूचा याग करावा. म्हणजे त्या योगाने यजमानाने जणू काय 'मरुत्वान्' अशा इंद्र देवाजवळ जाऊन त्याला त्याचा हविर्भाग देऊन तृप्त केल्यासारखे होते. आणि मग तो इंद्र त्या यजमानाला सख्खे भाऊ आणि त्याच्या सहवासात राहण्याला योग्य असे नोकर, चाकर प्राप्त करून देतो व तो यजमान गांव संपादन करणारा होतो. मात्र मरुत्वान् इंद्रासाठी जो पशू हनन करावयाचा तो अज जातीचा नसून एक चांगला बैल असावा. इंद्र जसा सेचनसमर्थ असतो, तसाच ऋषभही असतो. या साम्यामुळे वृषभ म्हणजे बैल हा इंद्रसंबद्ध आहे. त्याच्या मांड्यांवर जो पांढरा वर्ण असतो तो 'मरुत्' संज्ञक वायूंना प्रिय असल्यामुळे अशा प्रकारचा वृषभ मरुत्संबध्द असतो. सारांश, इंद्र व 'मरुत्' संज्ञक वायू यांना प्रिय असलेल्या वृषभाचे हनन करून केलेला पशुयाग यजमानाच्या समृद्धीला कारणभूत होतो. ह्या वृषभाच्या मांड्यांवर

पांढरा वर्ण असावयाचा तो मागल्या बाजूच्या दोन मांड्यांवर असावा. म्हणजे तो ग्रामाधिपती झालेल्या यजमानाला, त्याच्या मनाप्रमाणे वर्तन करणाऱ्या प्रजा संपादन करून देतो.

भरपूर अन्न मिळावे अशी इच्छा असेल, त्याने सोम देवतेच्या उद्देशाने बभ्रु म्हणजे पिंगल वर्णाच्या पशूचे हनन करून याग करावा. ओषधींचा सोम हा राजा असल्यामुळे व ओषधीपासूनच अन्न निर्माण होत असल्याने अन्न सोमदेवतात्मक आहे. यास्तव सोमदेवतेसाठी पशुयाग केला असता, यजमानाने जणू काय सोमदेवतेजवळ जाऊन त्याला आवडत असलेला हविर्भाग देऊन त्याचे पूजन केल्यासारखे होते. आणि मग यजमानावर प्रसन्न झालेला तो सोमदेव त्याला भरपूर अन्न देतो. अर्थात् यजमान व्याधिरहित, अर्थात् प्रदीप्त अशा जठराग्नीने युक्त होऊन सेवनीय असे अन्न भक्षण करणारा होतो. बभ्रु म्हणजे पिंगल अर्थात् पिवळसर वर्ण हा जणू अन्नाचेच स्वरूप आहे. हरभऱ्याची डाळ वगैरे अन्नाचा रंग पिवळसर असल्याचे आपण पाहतोच. यास्तव अन्नाशी स्वरूपसादृश्य असलेल्या पिंगलवर्ण पशूचे हनन यजमानाच्या अन्नसमृद्धीला कारणभूत होते.

जो राजाचा वडील मुलगा असून शौर्यादि गुणांनी संपन्न, अर्थात् राज्य चालविण्यास सर्वथैव पात्र आहे, परंतु ज्याला राज्य मिळत नाही, अशा यजमानाने सोमदेवतेला संतुष्ट करण्यासाठी पिंगलवर्णी पशूचे हनन करून याग करावा. राज्य हे सोमदेवतात्मक असते. यास्तव सोमदेवतेसाठी पशुयाग केला असता यजमानाने जणू काय, सोमदेवतेसन्निध जाऊन त्याला स्वकीय वाटेल अशा हविर्भागाने त्याचे यजन करून त्याला सुप्रसन्न केल्याप्रमाणे होते. आणि मग तो सोमदेव त्या यजमानाला राज्य मिळवून देतो. राज्य त्या यजमानाजवळ जणू चालूनच येते. सोमदेवतेला अर्पण करण्यात येणारा पशू पिंगलवर्णी असावा. सोमाचे म्हणजे चंद्रमंडलाचे स्वरूपही पिंगलवर्णीच असते. यास्तव सोमाच्या स्वरूपाशी समत्व असलेला तो पशू यजमानाच्या समृद्धीला कारणभूत होतो.

शत्रूंच्या उपद्रवामुळे ज्याची संपत्ती नष्ट झाली आहे व त्यामुळेच ज्याच्या प्रतिष्ठेला म्हणजे मानमान्यतेला कमीपणा आला आहे, अशा यजमानाने आपली संपत्ती व मानमान्यता आपणास पुन्हा मिळवावयाच्या इच्छेने 'वृत्रतुर' म्हणजे

शत्रुनाशक अशा इंद्रदेवतेसाठी ज्याच्या कपाळावर चंदनाच्या टिळ्याप्रमाणे पांढऱ्या केसांच्या टिळ्याचे चिन्ह आहे व ज्याची शिंगे त्याच्या मुखाकडे वळलेली आहेत अशा पशूचे हनन करून याग करावा. म्हणजे तो यजमान शत्रुनाशक अशा इंद्रदेवाच्या कृपेने नरकप्रद अशा पातकाप्रमाणे पीडा देणाऱ्या शत्रूंचा नि:पात करतो आणि संपत्ती संपादन करून सर्व लोकांत प्रतिष्ठेला प्राप्त होतो.

गोवधारख्या पातकाने जो धरला गेला असेल, त्या यजमानाने आपल्या मुक्तीसाठी 'अभिमातिघ्न' म्हणजे शत्रूंचा नाश करणाऱ्या इंद्रदेवतेच्या उद्देशाने कपाळावर पांढऱ्या टिळ्यांचे चिन्ह असलेल्या व ज्याची शिंगे त्याच्या मुखाकडे वळलेली आहेत अशा पशूचे हनन करून याग करावा. कारण पातक हा मोठाच शत्रू आहे. यास्तव, आता सांगितल्याप्रमाणे पशुयाग केला असता, यजमानाने जणू काय शत्रूंचा नाश करणाऱ्या इंद्राजवळ धावत जाऊन त्याला स्वकीयसा वाटेल अशा हविर्भागाने त्याला तृप्त केल्यासारखे होते. आणि मग, यजमानावर प्रसन्न झालेला तो इंद्र त्याच्यापासून पातकरूपी शत्रूला पूर्णपणे दूर घालवून देतो.

राज्य करण्याला पात्र असून ज्याला राज्य मिळत नाही अशा यजमानाने राज्य प्राप्तीच्या इच्छेने वज्रधारी इंद्राच्या संतोषासाठी कपाळावर पांढऱ्या रंगाच्या टिळ्यासारखे चिन्ह असलेला व दोन्ही शिंगे मुखाकडे वळलेली असलेला पशू हनन करून याग करावा म्हणजे यजमानाने जणू काय वज्रधारी अशा इंद्रदेवाच्या सन्निध जाऊन, त्याच्या स्वकीय अशा हविर्भागाने त्याला तृप्त केल्यासारखे होते. मग तो इंद्र यजमानाला वज्रासारखे प्रहरणक्षम असे एखादे शस्त्र देतो. आणि ते वज्रसदृश शस्त्र, तो यजमान आपल्या वैऱ्याचा नाश करून ऐश्वर्यप्राप्तीला पात्र होईल अशाप्रकारे त्याला प्रज्वलित म्हणजे उत्तेजित करते. आणि मग आपोआपच राज्य त्याच्याकडे चालून येते. कपाळावर पांढऱ्या रंगाच्या टिळ्याचे चिन्ह असलेला व मुखाकडे शिंगे वळलेला पशू हे जणू वज्राचेच रूप आहे. अर्थात् वज्रस्वरूप अशा पशूचा याग त्याला समृध्दी प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. (अनुवाक ३).

आकाशात दिसत असणारा हा आदित्य एकदा विशेष रीतीने प्रकाशत नाहीसा झाला. त्याची प्रभा कमी झाली. तेव्हा त्याच्या प्रकाशामध्ये उत्पन्न झालेल्या उणीवेचा परिहार करण्याच्या इच्छेने देवांनी आदित्याच्या संतोषासाठी दशर्षभ म्हणजे दहा बैलांची दावण मारून पशुयाग करण्याचे ठरविले आणि त्याप्रमाणे दहा बैलांचे हनन करून त्यांच्या अंगांचे यजन केले. दहा बैलांच्या त्या दावणीच्या प्रभावाने म्हणजे दहा बैलांचे हनन करून केलेल्या पशुयागाच्या प्रभावाने देवांनी आदित्याच्या ठिकाणी उत्कृष्ट प्रकारची प्रभा स्थापन केली. यास्तव,

१ ज्याला ब्रह्मवर्चस् म्हणजे वेदाध्ययनजन्य तेज प्राप्त व्हावे अशी इच्छा असेल त्याने ह्या दहा बैलांच्या दावणीचे हनन करावे. म्हणजे आदित्यदेवाच्या प्रसन्नतेसाठी दहा बैल मारून त्यांच्या अंगांचे यजन करावे. असे केले असता यजमानाने जणू काय आकाशस्थ अशा ह्या आदित्यदेवाच्या सन्निध जाऊन त्याला स्वकीय वाटणाऱ्या हविर्भागाच्या योगाने त्याला तृप्त केल्याप्रमाणे होते. आणि मग तो आदित्य यजमानाच्या ठिकाणी ब्रह्मवर्चस्संज्ञक तेज धारण करतो. अर्थात् आदित्याच्या अनुग्रहाने तो यजमान ब्रह्मवर्चस्संज्ञक तेजाने संपन्न होतो. आता सांगितलेल्या दहा बैलांचे हनन एकाच वेळी करावयाचे नाही. वसंत ऋतूतील एखाद्या दिवशी प्रातःकाली ज्यांच्या कपाळांवर पांढऱ्या रंगाच्या टिळ्याप्रमाणे चिन्ह असेल असे तीन बैल हनन करावेत. ग्रीष्म ऋतूतील एखाद्या दिवशी भर मध्यान्हकाळी ज्यांच्या पाठीचा रंग पांढरा व इतर शरीराचा दुसरा काही रंग असेल असे तीन बैल मारावेत. आणि शरदृतूतील एखाद्या दिवशी अपराण्हकाळी ज्यांच्या सर्व अंगावरचे केस पांढरे आहेत अशा तीन बैलांचे हनन करावे. आदित्याची तीन तेजे आहेत, म्हणजे त्याच्या तेजाचे तीन प्रकार आहेत. वसंत ऋतूतील प्रातःकाली पडणाऱ्या सूर्यतेजाचा प्रकाश स्पष्ट असतो. ग्रीष्मऋतूतील मध्यान्हकाळचे सूर्यतेज अत्यंत प्रखर असून, शरदृतूतील अपराण्हकालचे सूर्यतेज सेवनीय अर्थात् निर्दोष असते. वसंत, ग्रीष्म व शरद या तीन ऋतूंत अनुक्रमे तीन तीन पूर्वोक्त पशूंचे हनन करावे. म्हणजे ते यजमानाच्या ठिकाणी पूर्वसदृश अर्थात सर्व ऋतूंत सारखेच असणारे तेज धारण करते. अनुष्ठानास प्रारंभ केल्यापासून एक वर्षपर्यंत यजमानाने ब्रह्मचर्यव्रताचे निरंतर पालन करावे. कारण संवत्सर हा ब्रह्मवर्चस् नामक तेज देणारा आहे. यास्तव संवत्सरपर्यंत ब्रह्मचर्यव्रताचे

पालन करणाराला तो संवत्सररूप कालच ब्रह्मवर्चस्संज्ञक तेज देतो व त्यायोगे यजमान ब्रह्मवर्चसी म्हणजे ब्रह्मवर्चस्संज्ञक तेजाने संपन्न होतो. संवत्सर समाप्त झाल्यावर प्रजापती देवतेच्या उद्देशाने 'कद्रु' म्हणजे पिवळसर रंगाच्या पशूचे यजन करावे. देवतेच्या दृष्टीने पुरुष हा सोमदेवतात्मक असून पशू हे पूषादेवतात्मक देवतांच्या ठिकाणी प्रतिष्ठित करतो.

रोज अत्यंत कंड सुटू लागल्यामुळे आपल्या शरीराच्या कातडीत दोष उत्पन्न झाला आहे, व त्यामुळे लौकरच कुष्ठरोगी होईन, अशा प्रकारची भीती ज्यास उत्पन्न झाली आहे, त्या यजमानाने सोम व पूषा ह्या दोन देवतांच्या उद्देशाने मिळून एक श्यामवर्ण पशू हनन करून त्याच्या अंगांचे यजन करावे. देवतेच्या दृष्टीने पुरुष हा सोमदेवतात्मक असून पशू हे पूषादेवतात्मक आहेत. यास्तव आता सांगितल्याप्रमाणे पशुयाग करणाऱ्या यजमानाला त्याच्यावर प्रसन्न झालेले सर्व देव व यम यांच्यामध्ये या भूलोकाच्या स्वामित्वाबद्दल स्पर्धा उत्पन्न झाली. व ते परस्परांशी भांडू लागले. त्या यमाने देवांचे इंद्रियसामर्थ्य त्यांच्यापासून हिरावून घेतले. पूर्वी यमाचे नांव 'यव' असे होते. परंतु देवांचे इंद्रियसामर्थ्य त्याने हिरावून घेतल्यामुळे वर्णव्यत्यय होऊन त्याला 'यम' असे नांव पडले. देवांची इंद्रियशक्ती हरण करणे हेच यमाचे 'यमत्व' होय. असो. देवांनी आपआपसात असा विचार केला की, पूर्वी या भूलोकाचे आम्हीच आधिपत्य संपादन केले होते. आता यम भूलोकाचा अधिपती होऊन. बसला आहे. यास्तव आपले पूर्वीचे भूलोकाचे आधिपत्य आपणास पुन्हा मिळविले पाहिजे. नंतर सर्व देव प्रजापतीकडे गेले. प्रजापतीने आपल्या शरीरापासून एक बैल व एक वांझ गाय असे दोन पशू उत्पन्न केले. आणि ते देवांना दिले. मग देवांनी विष्णू व वरुण या दोन देवतांना उद्देशून वांझ गाय व इंद्र देवतेसाठी बैल अशा अनुक्रमे दोन पशूंचे हनन करून उद्दिष्ट देवतांच्यासाठी त्यांच्या अंगांचे यजन केले आणि त्या देवता प्रसन्न करून घेतल्या. नंतर वरुणाकडून यमाला फासाने बांधून यज्ञरूपी विष्णूच्या मदतीने त्यास भूलोकाबाहेर देवांनी हांकून लावले व इंद्राच्या प्रसादाने त्यांनी यमाचे इंद्रियसामर्थ्य नष्ट केले.

जो कोणी भाऊबंदांच्या किंवा इतर शत्रूंच्या पीडेने ग्रासला असेल व आपल्या भाऊबंदांशी किंवा इतर शत्रूंशी स्पर्धा करीत असेल, त्या यजमानाने आपल्याला जय मिळावा म्हणून विष्णू व वरुण या दोन देवांच्यासाठी मिळून

एक वांझ गाय व इंद्र देवतेच्या उद्देशाने एक बैल हनन करून याग करावा. आणि ते देव प्रसन्न करून घ्यावेत. मग तो यजमान आपल्याशी स्पर्धा करणाऱ्या शत्रूला वरुणाच्या अनुग्रहाने पाशबद्ध करतो. यज्ञरूपी विष्णूच्या कृपेने त्या शत्रूला हांकून लावतो. आणि इंद्राच्या प्रसादाने त्या शत्रूच्या इंद्रियसामर्थ्याचा नाश करतो. अर्थात् आपल्या स्वतःच्या प्रभावाने तो उन्नतीला प्राप्त होतो. व त्याचा शत्रू पराभव पावतो.

इंद्राने वृत्रासुराला मारले. मृत अशा त्या वृत्रासुराच्या शरीरापासून क्रोधाविष्ट व सर्पाकार अशी सोळा शरीरे उत्पन्न झाली आणि त्यांनी इंद्राला जखडून बांधून टाकले. नंतर वृत्रासुराच्या प्राणरहित अशा त्या शरीराच्या मस्तकापासून काही विशिष्ट प्रकारचे शरीर धारण केलेल्या गाई उत्पन्न झाल्या. त्या गाईंच्या पृष्ठभागी एक बैल चालत येऊ लागला. त्या बैलाला उद्देशून इंद्र स्वतःच्या मनात खूष झाला व म्हणाला कीं, आता माझे कार्य झाले ! जो कोणी या बैलाचे हनन करून देवतोद्देशाने यजन करील तो बंधनरूपी पातकापासून मुक्त होईल. नंतर इंद्राने अग्नीदेवतेच्या उद्देशाने काळ्या रंगाची फक्त मान व इतर शरीराचा रंग वेगळा अशा प्रकारच्या पशूचे व तसेच पूर्वकल्पातील इंद्रदेवतेच्या उद्देशाने बैलाचे हनन करून अग्नी व पूर्वकल्पातील इंद्र अशा दोन्ही देवतांचे यजन केले. इंद्राकडून मिळालेल्या स्वकीय हविर्भागाने संतुष्ट झालेल्या अग्नीने इंद्राच्या शरीराला जखडून राहिलेली वृत्रासुराची सर्पाकार सोळा शरीरे जाळून दग्ध केली आणि पूर्वकल्पातील इंद्रासाठी केलेल्या यजनाच्या प्रभावाने इंद्राने आपली इंद्रियशक्ती आपल्या ठिकाणी स्थापित केली.

यास्तव, जो कोणी पापाने ग्रासला गेला असेल त्याने अग्नीच्या उद्देशाने मानेच्या ठिकाणीच फक्त काळा रंग असलेला पशू (बोकड) व इंद्रदेवतेच्या उद्देशाने वृषभरूप पशू हनन करून याग करावा. स्वतःचा हविर्भाग मिळाल्यामुळे संतुष्ट झालेला अग्नी त्या यजमानाचे पाप दग्ध करतो. इंद्राच्या अनुग्रहाने तो यजमान स्वतःची इंद्रियशक्ती स्वतःच्या ठिकाणी स्थापन करतो. एवं च, अशाप्रकारे याग करणारा यजमान पापापासून निश्चयाने मुक्त होतो. 'ज्योगपरुध्द' म्हणजे स्वराज्यापासून चिरकाळ भ्रष्ट झालेला जो असेल त्या राजाने पृथ्वी व द्युलोक या दोन देवतांच्या उद्देशाने एका धेनूचे हनन करून तिच्या अंगांचे यजन करावे. कारण प्रजापालन नीट करता न आल्यामुळे ह्या पृथ्वीचे

व ते सर्व जणू जमिनीमध्ये पोखरून तयार केलेल्या एका विस्तृत विवरात दडवून ठेवले. आणि त्या विवराच्या तोंडाशी एक मोठा धोंडा बसवून ते विवर बंद करून टाकले. ही बातमी कर्णोपकर्णी इंद्राला समजली. लागलीच इंद्र त्या वलासुराने बंद केलेल्या विवराजवळ आला आणि त्याने त्या विवराच्या तोंडाशी बसविलेला धोंडा उखडून काढला व त्या विवराचे तोंड खुले केले. त्या विवरात हजारो पशू इंद्राला दिसले. परंतु त्या सर्वांमध्ये उत्कृष्ट असा जो पशू त्याला दिसला त्याच्या पाठीची कातडी चिमटीत धरून इंद्राने त्या पशूला वर उचलले. तो पशू सर्व पशुसंघाचा अधिपती असल्यामुळे इंद्राकडून वर उचलला गेल्याबरोबर त्याचे अनुयायी असलेले हजार पशू उचलले गेले. म्हणजे उठून उभे राहिले. आपल्या पुढाऱ्यासाठी कावरेबावरे झाले ! अगोदरच इंद्राने उचललेला पशू इतर पशूंचा अधिपती असल्यामुळे श्रेष्ठ होताच. परंतु इंद्राने पसंत करून त्याला मोठ्या आवडीने वर उचलल्यापासून तो अधिकच उन्नत म्हणजे श्रेष्ठ ठरला.

ज्याला पशुप्राप्तीची इच्छा असेल, त्या यजमानाने आता सांगितलेल्या उन्नत, अर्थात् श्रेष्ठ म्हणजे कळपाचा पुढारी असलेला पशू इंद्रदेवतेच्या उद्देशाने हनन करून याग करावा. असे केले असता, यजमानाने जणू काय इंद्रदेवाच्या सन्निध जाऊन त्याला स्वकीय असलेल्या हविर्भागाने त्याचे यजन करून त्याला संतुष्ट केल्यासारखे होते. आणि मग तो इंद्र यजमानाला पशू प्राप्त करून देतो. अर्थात् तो यजमान पशुसंपत्तीने युक्त होतो. इंद्रासाठी हनन केला जाणारा पशू उन्नत म्हणजे शरीराने उंच व कळपाच्या पुढारीपणामुळे श्रेष्ठ असावा हे सांगितलेच आहे. असा उन्नत पशू म्हणजे सहस्रसंख्येने युक्त अशी जणू लक्ष्मी म्हणजे (पशुरूप) संपत्तीच होय. यास्तव उन्नत अशा पशूचा इंद्राप्रीत्यर्थ याग करणारा यजमान सहस्रसंख्येने युक्त अशी लक्ष्मी म्हणजे हजाराने मोजली जाणारी पशुसंपत्ती संपादन करून घेतो.

आता सांगितल्याप्रमाणे 'उन्नत' पशूचा याग केल्यानंतर त्या यागाचे फल म्हणून त्या यजमानाला जेव्हा हजार पशू प्राप्त होतील, त्यावेळी त्याने विष्णुदेवतेला संतुष्ट करण्याकरिता एका ठेंगण्या पशूचे हनन करून त्याच्या अंगांचा याग करावा. या ठेंगण्या पशूच्या ठिकाणी उन्नत अशा हजार पशूंचा संघ लीलेने आरोहण करीत असल्याने हजार पशूंना प्रिय होणारा तो ठेंगणा

पशू भगवान विष्णूला उत्तम प्रकारे अपेक्षितच असतो. सारांश ठेंगण्या पशूच्या यागाने पूर्वी प्राप्त झालेल्या हजार पशूंच्या सुखसोयीसाठी तृणोदकाने पूर्ण असे निवासस्थलच जणू यजमानाने तयार केल्याप्रमाणे होते.

कोणी विद्वान असे म्हणतात की, चोरादिकांच्या विघ्नांतून बचावून हजार पशू संपादन करणारा कोण भाग्यवान पुरुष असणार? यास्तव हजार पशूंची प्राप्ती होण्याची वाट न पाहतां पूर्वोक्त उन्नत पशूचा याग केल्यानंतर त्या यजमानाने हजार अहोरात्रे म्हणजे हजार दिवस संपादन करावेत म्हणजे उलटू द्यावेत आणि मग आता सांगितल्याप्रमाणे ठेंगण्या पशूचा याग करावा. अहोरात्रे ही पशुरूपच आहेत. यास्तव हजार अहोरात्रे पूर्ण झाल्यावर ठेंगण्या पशूचा याग केला असतां त्या यजमानाने तितक्या मुदतीत प्राप्त झाले असतील तेवढ्याच पशूंची प्रतिष्ठा म्हणजे सुस्थिती संपादन केल्यासारखे होते.

'प्रजाकाम' म्हणजे प्रजेची प्राप्ती होण्याची इच्छा असलेल्या यजमानाने ओषधी देवतांच्या संतोषासाठी जिच्या गर्भाचा नाश झाला आहे अशा गर्भस्राव झालेल्या गाईचे हनन करून याग करावा. कारण प्रजोत्पादनाला समर्थ असूनही ज्याला प्रजा प्राप्त होत नाही, अशा यजमानाला त्याच्या ठिकाणी प्रजोत्पतीला प्रतिबंधक होईल अशाप्रकारे ओषधिदेवताच सर्वतोपरी पीडा उत्पन्न करीत असतात. गर्भस्राव होणाऱ्या गाईचा गर्भ सुद्धा कुपित झालेल्या ओषधिदेवताच नष्ट करीत असतात. यास्तव ओषधिदेवतांची कृपा संपादन करण्यासाठी जी गर्भस्राव झालेली गाय असेल तिचे हनन करून याग केल्याच्या योगाने यजमानाने जणू काय ओषधिदेवतांच्या सन्निध जाऊन त्यांना स्वकीय अशा हविर्भागाच्या योगाने त्यांचे पूजन केल्याप्रमाणे होते. मग त्या ओषधिदेवता यजमानाचे ठिकाणी त्याच्या स्वतःच्या वीर्यापासूनच उत्पन्न होणारी प्रजा निर्माण करतात. अर्थात् ओषधिदेवतांच्या अनुग्रहाने यजमान प्रजेचे संपादन करतो. ओषधी ह्या उदकांपासून उत्पन्न होत असल्याने उदकरूपच आहेत. 'पुरुष' म्हणजे यजमानाच्या ठिकाणी उत्पन्न होणार असलेला पुत्र उत्पत्ती होण्यापूर्वी आपल्या उत्पत्तीला कारणभूत अशा रेतावस्थेत असल्यामुळे तो अव्यक्त असा असतो, आणि म्हणून त्याला 'असत्' असे म्हटले जाते. यावरून असे दिसून येते की उदकरूपाने असणाऱ्या ओषधीच यजमानाला ज्याचा शरीराचा आकार 'असत्' म्हणजे अव्यक्त अर्थात् नजरेस न येणारा आहे, अशा

रेतापासूनच 'सत्' म्हणजे ज्याचा शरीराचा आकार व्यक्त दिसणारा आहे असा पुत्र देत असतात. मात्र असे असल्यामुळे अभिज्ञ व अनभिज्ञ अशा दोन प्रकारच्या लोकांत मतभेद आहे. अभिज्ञ आहेत ते असे म्हणतात की, ऐश्वर्य संपादन करण्याला योग्य असूनही जो ऐश्वर्याला प्राप्त होत नाही, असा मनुष्य उत्पन्न झालेला असूनही न झाल्यासारखाच असतो, त्याचा जन्म फुकट गेलेला असतो; यास्तव आपल्याला ऐश्वर्य प्राप्त व्हावे अशी ज्याला इच्छा होईल, त्या यजमानाने 'ऐंद्री' म्हणजे इंद्रदेवतात्मक अशा 'सूतवशा' म्हणजे एक वेळ वत्साला जन्म दिल्यावर जी वांझ झालेली असते, अशा गाईचे हनन करून याग करावा. ही सूतवशासंज्ञक गाय प्रथम इंद्रासारख्या वत्साला उत्पन्न करून नंतर वांझ झाली आहे. यास्तव आता सांगितल्याप्रमाणे याग केला असता यजमानाने जणू काय इंद्राला स्वकीय वाटणारा असा हविर्भाग बरोबर घेऊनच इंद्रदेवाजवळ जाऊन त्याचे यजन केल्यासारखे होते. आणि त्या यजनाने संतुष्ट झालेला इंद्रदेव त्या यजमानाला ऐश्वर्याला चढवितो. अर्थात् इंद्रदेवाच्या कृपेने तो यजमान निश्चयाने ऐश्वर्यसंपन्न होतो. ज्याला जन्म दिल्यावर त्याची माता वांझ होते तो वत्स इंद्रासमान असतो. कारण इंद्र जन्मल्यावर त्याची माता वांझ झाली. अर्थात् वत्स व इंद्र यांच्यामध्ये समानत्व आहे. शिवाय वत्स हा जणू काय, मूर्तिमंत इंद्रियच म्हणजे इंद्रियशक्तिप्रद आहे. यास्तव अशा प्रकारच्या वत्साचे हनन करून याग केला असता, तो यजमानाला साक्षात् इंद्रियशक्तीच प्राप्त करून देतो.

जो कोणी आपला पितामह, पिता व स्वतः अशा प्रकारे तीन पिढ्यांमध्ये यज्ञ करून सोमपान न केलेला असेल त्याचा सोमपीथ विच्छिन्न झालेला असतो. म्हणजे त्याचा सोमपान करण्याचा अधिकार तुटलेला असतो. यास्तव आपला सोमपानाचा अधिकार पुन्हा जोडला जावा, अर्थात् सोमपानाचे आपण पुनः अधिकारी व्हावे अशी ज्याची इच्छा असेल, त्या यजमानाने इंद्र व अग्नी या दोन देवतांच्या संतुष्टतेसाठी 'पुनरुत्सृष्ट' म्हणजे ज्याचे अंड नष्ट केले असून शिवाय जो म्हातारा झाल्यामुळे नांगराला किंवा वाहनाला जोडला जात नाही असा बैल मारून त्याच्या अंगांचा याग करावा. जो ब्राह्मण असून देखील तीन पिढयांत यज्ञ करून ज्याने सोमपान केलेले नाही, त्याने अशाप्रकारे 'पुनरुत्सृष्ट' अशा वृषभरूपी पशूचा याग केला असता, त्याने जणू काय इंद्र व अग्नी ह्या दोन देवांजवळ त्यांना स्वकीय म्हणजे

प्रिय असा हविर्भाग घेऊन जाऊन त्यांना समर्पण केल्याप्रमाणे होते व त्या योगाने संतुष्ट झालेले इंद्र व अग्नी त्या यजमानाला सोमपान करण्याचा अधिकार देतात. अर्थात् तो यजमान सोमपान करण्याचा अधिकारी होऊन सोमपान करतो. आता सांगितलेल्या पशुयागात हनन केला जाणार, जो बैल असतो, तो ऐंद्र म्हणजे इंद्रदेवात्मक असतो. इंद्रियशक्तीची वाढ करणारे असल्यामुळे सोमपान हे इंद्रियरूप आहे. यास्तव इंद्रदेवतात्मक अशा पूर्वोक्त पशूचा याग यजमानाला इंद्रियशक्ती व तद्वारा सोमपान करण्याचा अधिकार प्राप्त करून देतो. शिवाय तो पशू आग्नेय म्हणजे अग्निदेवतात्मकही असतो. प्रजापतीपासून अग्नीबरोबरच ब्राह्मणाचा जन्म झालेला असल्यामुळे ब्राह्मण हाही आग्नेय असाच असतो. आणि म्हणूनच अग्निदेवतात्मक अशा पशूचा याग करणारा यजमान स्वकीय अशा अग्निदेवतेला अनुसरूनच जणू काय पशुयागाचा सम्यक् अधिकार प्राप्त करून घेतो.

आताच्या पशुयागात हनन केला जाणारा पशू जसा 'पुनरुत्सृष्ट' असतो तसाच तो याग करणारा यजमानही 'पुनरुत्सृष्ट' म्हणजे पुन्हा पुन्हा सोमपानाचा अर्थात् सोमपानाच्या अधिकाराचा त्याग केलेला असतो. यास्तव स्वरूपसाम्य असलेल्या पशूचा यजमानाने केलेला त्याग त्याला सोमपानाची समृध्दी प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो.

अभिचार करण्याची म्हणजे यागाच्या प्रभावाने आपल्या शत्रूला ठार मारण्याची ज्याला इच्छा असेल, त्या यजमानाने ब्रह्मणस्पति-देवतेच्या उद्देशाने 'तूपर' म्हणजे शृंगरहित अशा पशूचा याग करावा. असे केल्याच्या योगाने यजमानाने जणू काय ब्रह्मणस्पतिदेवाजवळ जाऊन त्याच्या स्वकीय अशा हविर्भागाने त्याला तृप्त केल्यासारखे होते. व त्यामुळे संतुष्ट झालेला तो ब्रह्मणस्पतिदेव यजमानाची इच्छा तृप्त करण्याकरिता त्याच्या शत्रूला सर्वतोपरी जखमी करतो व त्यामुळे तो तात्काळ मरतो. या यागात हनन केला जाणारा पशू तूपर म्हणजे शृंगरहित असतो. असा 'तूपर' पशू म्हणजे जणू काय वस्तऱ्याप्रमाणे धार असलेल्या वज्रासारखी शत्रुमारक असलेली मूर्तिमंत लक्ष्मीच होय. कारण 'तूपर' असलेला पशू शृंगरहित असला तरी तो प्रतिस्पर्ध्याशी लढू लागला म्हणजे त्याला टक्कर देऊन ठार करीत असल्यामुळे तो वज्ररूपच होय. अशा पशूचा याग यजमानाच्या समृद्धीला कारणभूत होतो. या पशुयागामध्ये

'यूप' म्हणजे हवनीय पशू बांधावयाचा खांब 'स्फ्य' प्रमाणे, अर्थात् तलवारीसारख्या आकाराचा व्हावा. 'स्फ्य' म्हणजे मूर्तिमंत वज्र अर्थात् तलवारच होय. यास्तव, अशाप्रकारचा यूपस्तंभ केला असता यजमानाने आपल्या शत्रूवर जणू काय वज्राचा प्रहारच केल्यासारखे होते. शिवाय या पशुयागामध्ये वेदीमध्ये जे बर्ही आंथरावयाचे ते शरमय म्हणजे 'शर' नांवाच्या तृणाचे असावेत. 'शर' नामक तृणाची उत्पत्ती इंद्राच्या वज्राच्या अंशापासून झालेली असल्यामुळे ते वज्ररूपच आहे. अर्थात् शरमय असे बर्ही यजमानाच्या शत्रूला निश्चयाने मारतात. या पशुयागामध्ये उपयोगात आणला जाणारा 'इध्म' बैभीतक म्हणजे बेहड्याचे वृक्षाचा असावा. म्हणजे तो यजमानाच्या शत्रूचे मस्तक निश्चयाने ठेचतो. (अनुवाक ५).

मी एका गावाचा अधिपती व्हावे, व इतर ग्रामाधिपतींच्याहून आपण पृष्ठभागाप्रमाणे सर्वप्रकारे उच्च असावे, अशी जो इच्छा करीत असेल त्याने 'बृहस्पति' देवतेच्या उद्देशाने, सर्व शरीराचा रंग वेगळा असून फक्त पाठीचा रंग पांढरा असलेल्या पशूचे हनन करून याग करावा. म्हणजे त्या योगाने यजमानाने जणू काय बृहस्पतीचा स्वकीय असा हविर्भाग बरोबर घेऊनच बृहस्पती देवाजवळ जाऊन त्याचे यजन केल्याप्रमाणे होते. आणि त्या यजनाने संतुष्ट झालेला बृहस्पतीदेव त्या यजमानाला इतर ग्रामाधिपतींमध्ये पृष्ठभागाप्रमाणे उच्च स्थितीला प्राप्त करतो. अर्थात् तो यजमान श्रेष्ठ असा ग्रामाधिकारी होतो. सारांश, बृहस्पतीदेवात्मक असा पांढऱ्या पाठीचा हा पशू आपल्या देवतेच्या द्वारा यजमानाच्या समृद्धीला कारणभूत होतो.

अन्नप्राप्तीची इच्छा असेल त्याने पूषा देवतेच्या उद्देशाने श्यामवर्ण अशा पशूचे हनन करून त्याच्या अंगांचा याग करावा. अन्न हे सर्वांचे पोषक असल्यामुळे पूषादेवतारूपच आहे. यास्तव पूषा देवतेसाठी श्यामवर्ण पशूचा याग केला असता, यजमानाने जणू काय पूषा देवतेचा स्वकीय असा हविर्भाग बरोबर घेऊनच त्याच्या जवळ गेल्यासारखे आणि त्याचे यजन केल्यासारखे होते. आणि त्या योगाने संतुष्ट झालेला पूषादेव त्या यजमानाला अन्न देतो व तो यजमान अन्नाचे सेवन करणारा होतो. श्यामवर्ण असा पशू म्हणजे अन्नाचेच स्वरूप होय. कारण पालेभाजी वगैरे अन्नाचा वर्ण श्यामच असतो. सारांश अन्नाशी स्वरुपसादृश्य असलेला तो पशू यजमानाला भरपूर अन्नाची

समृध्दी प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो.

आपल्या कुटुंबास खावयासाठी भरपूर अन्न मिळावे अशी जो इच्छा करीत असेल, त्याने 'श्वेत' म्हणजे शुभ्र वर्णाचा पशू हनन करून याग करावा. 'मरुत्' देवांमधील अन्न संपादन करणारे वैश्य असल्यामुळे अन्नरूपच होत. यास्तव त्यांच्यासाठी पूर्वोक्त पशूचा याग केला असता यजमानाने जणू काय, मरुतांना स्वकीयत्वामुळे प्रिय असलेला हविर्भाग घेऊनच त्यांच्या सन्निध गेल्यासारखे व त्यांचे यजन केल्यासारखे होते. आणि त्या यजनाने संतुष्ट झालेले ते मरुत्संज्ञक देव यागकर्त्या यजमानाला भरपूर अन्न देतात. अर्थात् मरुतांच्या प्रसादाने तो यजमान यथेच्छ अन्न सेवन करणारा होतो. श्वेतवर्ण असा पशू, हे जणू अन्नाचेच रूप आहे. साळीच्या तांदुळाचा भात इत्यादि अन्नाचा रंग म्हणजे रूप श्वेतवर्णच असते. यास्तव अन्नसदृश वर्ण असलेल्या पशूचा याग यजमानाच्या अन्नसमृध्दीला कारणभूत होतो.

आपल्या इंद्रियांच्या ठिकाणी स्वकार्यक्षम अशी शक्ती असावी, अशी जो इच्छा करीत असेल त्याने 'इंद्र' देवतेच्या उद्देशाने 'अरुण' सदृश अशा तांबूस वर्णाच्या पशूचे हनन करून याग करावा. म्हणजे यजमानाने इंद्राचा स्वकीय असलेला पशुरूपी भाग घेऊनच जणू काय इंद्राजवळ जाऊन त्याचे यजन केल्यासारखे होते. आणि त्या यजनाने संतुष्ट झालेला तो इन्द्र यजमानाच्या ठिकाणी इंद्रियशक्ती धारण करतो. अर्थात् तो यजमान इंद्रियशक्तिसंपन्न होतो. हा अरुणवर्ण पशू मोठाल्या भिवयांचा असावा. मोठाल्या भिवयांचा पशू हे जणू इंद्राचेच स्वरूप आहे. इंद्र हजार नेत्रांनी युक्त असल्यामुळे त्याच्या ठिकाणी असलेल्या भिवयांचीही संख्या मोठीच असते. सारांश, पर्यायाने इंद्राशी रूपसादृश्य असलेल्या पशूचा याग यजमानाच्या समृद्धीला कारणभूत होतो.

एखाद्या धनिकाने आपणास धनदान करावे असे ज्याला वाटत असेल, त्याने 'सविता' देवतेच्या उद्देशाने 'उपध्वस्त' म्हणजे अनेक प्रकारच्या वर्णांची मिसळ असलेल्या पशूचे हनन करून याग करावा. सविता हा सर्वप्रकारच्या प्रेरणांचे नियंत्रण करणारा आहे. म्हणजे सर्वप्रकारच्या प्रेरणांच्यावर सविता देवाचे स्वामित्व आहे. यास्तव त्याच्या संतोषासाठी पशुयाग केला असता यजमानाने जणू काय सविता देवाजवळ जाऊन त्याच्या स्वकीय अशा हविर्भागाने

त्याचे यजन केल्यासारखे होते. आणि त्यायोगे संतुष्ट झालेला सविता देव त्या यजमानाला दानरूपाने धन देण्याची दात्यांना प्रेरणा करतो. अर्थात् सविता देवाच्या अनुग्रहामुळे त्या यजमानाला धनदान देण्याची इच्छा करणारे धनिक लोक निर्माण होतात. 'उपध्वस्त' म्हणजे अनेक वर्णांचे मिश्रण असलेला पशू म्हणजे सवितादेवरूपच होय. हा पशू आपल्या देवतेच्या द्वारा यजमानाच्या समृध्दीला कारणभूत होतो.

अन्नप्राप्तीची इच्छा करणाराने विश्वेदेवसंज्ञक देवांच्या उद्देशाने 'बहुरूप' म्हणजे ज्याच्या शरीरावर निरनिराळ्या प्रकारच्या अनेक रंगांचे भाग स्पष्ट दिसत असतात असा पशू हनन करून त्याच्या अंगांचा याग करावा. अन्न हे अनेक प्रकारचे व अनेक वर्णांनी युक्त असल्यामुळे विश्वेदेवरूपच आहे. यास्तव पूर्वोक्त 'बहुरूप' अर्थात् नानावर्णयुक्त अशा पशूचा याग केला असता यजमानाने जणू काय विश्वेदेवांचा स्वकीय असा हविर्भाग बरोबर घेऊनच त्यांच्याजवळ जाऊन त्यांना समर्पण केल्यासारखे होते. व त्या योगाने संतुष्ट झालेले ते विश्वेदेवच त्या यजमानाला भरपूर अन्न संपादन करून देतात आणि तो यजमान यथेच्छ अन्न सेवन करणारा होतो. विश्वेदेवांच्यासाठी हनन केला जाणारा पशू जसा बहुरूप असतो, त्याचप्रमाणे अन्नदेखील भक्ष्य, भोज्य, लेह्य, पेय इत्यादि भेदांमुळे बहुरूप असते. अर्थात् अन्नाशी स्वरुपसादृश्य असलेल्या पशूचा याग यजमानाच्या समृध्दीला कारण होतो.

आपणास गांव मिळावा आणि त्या योगाने आपण गांवाचा अधिपती व्हावे अशी ज्याला इच्छा होईल, त्याने 'विश्वेदेव' देवांच्या उद्देशाने 'बहुरूप' अशा पशूचे हनन करून याग करावा. सजातीय असे भाऊबंद व नोकर चाकर हे बहुत्वाच्या दृष्टीने विश्वेदेवांच्याशी साम्यरूप असल्यामुळे ते विश्वेदेवसंबध्दच होत. यास्तव विश्वेदेवांना उद्देशून पूर्वोक्त पशुयाग केला असता, त्या यजमानाने जणू काय, त्यांच्या स्वकीय अशा हविर्भागासह त्यांच्या जवळ जाऊन त्यांचे पूजन केल्यासारखे होते. आणि त्यामुळे संतुष्ट झालेले विश्वेदेव त्या यजमानाला सजातीय असे भाऊबंद व नोकर चाकर यांचे आनुकूल्य संपादन करून देतात. अर्थात् विश्वेदेवांच्या कृपेने तो यजमान ग्रामाधिपत्य मिळवितो.

या पशुयागात हनन केला जाणारा पशू 'बहुरूप' असून त्याच्या ठिकाणी विश्वेदेवांचे आधिपत्य असल्यामुळे तो बहुदेवतात्मक असतो. अर्थात् विश्वेदेवांच्याशी

स्वरूपसाम्य असणारा हा पशू यजमानाच्या समृद्धीला कारणभूत होतो.

शरीर क्षीण होत आहे, शक्ती कमी होत आहे, परंतु रोग कोणता आहे याची लक्षणे स्पष्ट दिसत नाहीत, अशा अज्ञात रोगाने दीर्घकाळ पछाडलेला जो असेल, त्याने आपल्या रोगमुक्तीसाठी 'प्रजापति' देवतेच्या उद्देशाने 'तूपर' अर्थात् शृंगरहित असा पशू हनन करून याग करावा. रोग झालेला पुरुष, म्हणजे यजमान हा प्रजापतीनेच उत्पन्न केलेला असल्यामुळे प्रजापतीदेवतात्मक आहे. आणि त्याला दीर्घकाळ जडलेला रोग कोणता आहे, हे खरोखर प्रजापतीच जाणत असतो. यास्तव पूर्वोक्त पशुयाग केला असता यजमानाने जणू काय प्रजापतीचा स्वकीय असा हविर्भाग बरोबर घेऊनच प्रजापतीजवळ जाऊन त्याला समर्पण केल्याप्रमाणे होते. अर्थात् संतुष्ट झालेला प्रजापतिदेव त्या यजमानाला त्याला झालेल्या अज्ञात अशा दीर्घकालीन रोगापासून मुक्त करतो. या यागात हनन केला जाणारा पशू हा शृंगहीन व प्रजापतिदेवतात्मक असतो. व तो आपल्या प्रजापतिदेवतेकडून यजमानाला समृध्दी प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. (अनुवाक ६).

''वौ षट् '' या मंत्राचा अधिष्ठाता असलेल्या 'वषट्कार' संज्ञक देवाने गायत्रीचे मस्तक छाटले, धडापासून वेगळे केले. तेव्हा तिच्या त्या विच्छिन्न झालेल्या मस्तकापासून पाणी आणि रक्त यांच्या रूपाने रस गळू लागला. प्रथम जो रस गळाला, तो बृहस्पतीने आपल्याजवळ उचलून घेतला. त्या रसापासून जी वांझ गाय उत्पन्न झाली ती 'शितिपृष्ठा' म्हणजे इतर शरीराचा वर्ण वेगळा परंतु फक्त पाठीचा वर्ण पांढरा असलेली होती. दुसऱ्या खेपेस जो रस गळाला, तो मित्र व वरुण या दोघा देवांनी उचलून घेतला. त्या रसापासून जी वांझ गाय उत्पन्न झाली ती 'द्विरूपा' म्हणजे दुरंगी होती. तिसऱ्या खेपेस जो रस गळला तो विश्वेदेवांनी उचलून घेतला व तो 'बहुरुपा' म्हणजे अनेक रंगांनी युक्त अशा वांझ गाईच्या रूपाने उत्पन्न झाला. चौथ्या खेपेस जो रस भूमीवर गळला तो व्यर्थ जाऊ नये म्हणून बृहस्पतीने झटकन् टिपून घेतला. हा रस उचलून घेतला तेव्हा बृहस्पतीच्या मनात असा अभिप्राय होता की, हा रस माझ्या उपभोगास उपयोगी पडो. त्या रसापासून 'उक्षवश' म्हणजे ज्याचे वीर्य प्रजोत्पत्तीच्या दृष्टीने व्यर्थ गेले आहे अर्थात् जो वांझ झाला आहे असा अंड बडविलेला एक बैल

उत्पन्न झाला. शेवटी केवळ रक्तरूपाने जो रस गळला, त्यापासून रुद्रदेवतात्मक अशी 'रोहिणी' नांवाची वांझ गाय उत्पन्न झाली.

आपल्याला ब्रह्मवर्चस्‌संज्ञक तेज प्राप्त व्हावे, अशी ज्याची इच्छा असेल त्याने बृहस्पतिदेवतेच्या उद्देशाने 'शितिपृष्ठा' म्हणजे पाठीवर पांढरा रंग असलेली वांझ गाय हनन करून याग करावा. असे केले असता, त्या यजमानाने जणू काय बृहस्पतीच्या जवळ जाऊन त्याला स्वकीय अशा हविर्भागाने त्याचे यजन केल्यासारखे होते. आणि त्या यजमानाने संतुष्ट झालेला तो बृहस्पती देव त्या यजमानाच्या शरीराच्या ठिकाणी 'ब्रह्मवर्चस्' संज्ञक तेज स्थापन करतो. अर्थात् बृहस्पती देवाच्या अनुग्रहाने तो यजमान ब्रह्मवर्चस्‌संज्ञक तेजाने संपन्न होतो. वांझ गाय जी असते, तो छंदांचा सारभूत असा रसच होय आणि इहपरलोकी पूज्यत्व प्राप्त करून देणारे ब्रह्मवर्चस् संज्ञक तेज हेही आयुःक्रमातील इतिकर्तव्यतेचा जणू सारभूत रसच आहे. अर्थात् छंदांच्या सारभूत रसरूपाने असणाऱ्या वांझ गाईच्या द्वारा यजमान सारभूत रसरूप असे 'ब्रह्मवर्चस्' संज्ञक तेज प्राप्त करून घेतो.

पर्जन्यवृष्टी व्हावी अशी इच्छा करणाऱ्या यजमानाने मित्र व वरुण ह्या दोन देवतांच्या उद्देशाने 'द्विरूपा' म्हणजे दुरंगी गाईचे हनन करून याग करावा. दिवस हा मित्र म्हणजे सूर्यदेवतात्मक असून रात्र ही वरुणदेवतात्मक असते. दिवस आणि रात्र यांच्या योगानेच खरोखर पर्जन्यवृष्टी होत असते. यास्तव मित्रावरुणांच्या उद्देशाने याग केला असता, त्यांना स्वकीय असलेला हविर्भाग बरोबर घेऊन यजमानाने जणू काय त्यांच्याजवळ जाऊन त्यांचे यजन केल्यासारखे होते. आणि मग, त्या यजनाने संतुष्ट झालेले ते मित्रावरुण देव त्या यजमानाच्या इच्छेनुसार अहोरात्रांच्या द्वारा पर्जन्यवृष्टी करतात. वांझ गाय ही छंदांचा सारभूत रस आहे, त्याचप्रमाणे पर्जन्यवृष्टिरूपाने भूमीवर पडणारे उदक हेही धान्यांची उत्पत्ती करणारे असल्यामुळे सारभूत असा रसच आहे. अर्थात् छंदांच्या सारभूत रसाच्या रूपाने असणाऱ्या वांझ गाईच्या यागाने सारभूत असलेल्या उदकाचा स्राव करणारी पर्जन्यवृष्टी संपादन करतो.

प्रजा प्राप्त व्हावी अशी इच्छा करणाऱ्या यजमानानेही मित्र व वरुण या दोन देवतांच्या उद्देशाने 'द्विरूपा' अशा वांझ गाईचे हनन करून याग करावा. दिवस हा मित्रदेवतात्मक व रात्र वरुणदेवतात्मक आहे. अहोरात्रांच्या

योगानेच खरोखर प्रजा उत्पन्न होतात. यास्तव मित्रावरुणांच्या उद्देशाने द्विरूपा अशा वांझ गाईचा याग केला असतां, त्या यजमानाने मित्रावरुणांचा स्वकीय असा हविर्भाग घेऊन त्यांच्याजवळ गेल्यासारखे व त्यांचे यजन केल्यासारखे होते. आणि त्या यजनाने संतुष्ट झालेले मित्रावरुणदेव त्या यजमानाला अहोरात्रांच्या द्वारा प्रजा देतात. म्हणजे त्याच्या ठिकाणी प्रजा निर्माण करतात. वशा म्हणजे वांझ गाय ही छंदांचा रस आहे व प्रजाही रेतरूप रसापासून उत्पन्न होत असल्याने रसरूपच आहे. अर्थात् छंदांच्या सारभूत रसरूपाने असणाऱ्या वांझ गाईच्या द्वारा म्हणजे तिचा याग करून यजमान सारभूत अशा रसरूपाने असणारी प्रजा प्राप्त करून घेतो.

भरपूर अन्न प्राप्त व्हावे अशी इच्छा असेल त्या यजमानाने विश्वेदेव संज्ञक देवांच्या उद्देशाने बहुरूपा म्हणजे अनेक वर्णांनी युक्त असे शरीर असलेल्या वांझ गाईचे हनन करून याग करावा. सर्व देवांना सेवनीय असल्यामुळे अन्न हे वैश्वदेव म्हणजे विश्वेदेवरूपच आहे. अर्थात् अन्नाशी स्वरूपसादृश्य असलेल्या बहुरूपा म्हणजे बहुरंगी अशा वांझ गाईचा याग केला असता, यजमानाने जणू काय विश्वेदेवांच्या सन्निध जाऊन त्यांना स्वकीय असलेल्या हविर्भागाने त्यांचे यजन केल्याप्रमाणे होते आणि त्या योगाने संतुष्ट झालेले ते विश्वेदेव त्या यजमानाला भरपूर अन्न मिळवून देतात. अर्थात् तो यजमान यथेच्छ अशा अन्नाचा उपभोग घेणारा होतो. वांझ गाय ही जणू काय छंदांचा सारभूत रस आहे. त्याचप्रमाणे जीवनाला कारणभूत असल्यामुळे अन्न हे देखील सारभूत असा रसच आहे. अर्थात् अन्नाशी स्वरूपसाम्य असलेल्या वांझ गाईच्या द्वारा यजमान रसरूप असे अन्न संपादन करतो.

ग्रामणी असा गाव मिळावा व त्या गावाचे आपण अधिपती व्हावे, अशी ज्याला इच्छा उत्पन्न होईल, त्याने विश्वेदेवांच्या उद्देशाने बहुरूपा अशा वांझ गाईचे हनन करून याग करावा. सजात म्हणजे स्वकीय भाऊबंद व नोकर चाकर हे बहुत्वाच्या दृष्टीने बहुत्वाने असलेल्या विश्वेदेवांच्याच स्वरूपाने युक्त होत. यास्तव, पूर्वोक्त याग केला असता यजमानाने विश्वेदेवांच्या सन्निध त्यांचा स्वकीय असा हविर्भाग बरोबर घेऊन जाऊनच जणू काय त्यांचे यजन केल्यासारखे होते. मग त्या यजनाने संतुष्ट झालेले ते विश्वेदेव त्या यजमानाला त्याच्या जातीचे भाऊबंद व नोकर चाकर अनुकूल करून देतात

व त्यांच्या साहाय्याने तो यजमान गांव मिळवितो आणि त्या गावाचा अधिपती होतो. वांझ गाय ही छंदांचा रस असून सजातीय असे भाऊबंद इत्यादि लोकही उपकारित्वाच्या दृष्टीने रसरूपच आहेत. अर्थात् छंदांच्या सारभूत रसरूपाने असलेल्या वांझ गाईच्या यागाच्या योगाने यजमान रसरूप अशा सजातीय भाऊबंदादिकांचे आनुकूल्य संपादन करून घेतो.

'ब्रह्मवर्चस्' प्राप्तीची इच्छा असेल त्याने बृहस्पती देवतेच्या उद्देशाने 'उक्षवश' म्हणजे अंड बडविलेला अर्थात् प्रजोत्पत्तीच्या दृष्टीने वांझ झालेला बैल हनन करून याग करावा. त्या योगाने यजमानाने बृहस्पतीच्या जवळ त्याचा स्वकीय भाग घेऊन जाऊन त्याचे यजन केल्यासारखे होते. आणि त्या यजनाने संतुष्ट झालेला तो बृहस्पती देव यजमानाच्या ठिकाणी ब्रह्मवर्चस्संज्ञक तेज निर्माण करतो. अर्थात् तो यजमान 'ब्रह्मवर्चस्' तेजाने युक्त असा होतो.

'उक्षवश' संज्ञक बैल गाईंना 'वश' होऊन त्यांच्या बरोबरच रानात चरावयास जातो व परत येतो. इंद्रियांसहवर्तमान मनाचा संयम केल्याने ब्रह्मवर्चस्संज्ञक तेजही संयमी पुरुषाला वश म्हणजे स्वाधीन होत असते. यास्तव ब्रह्मवर्चस् तेजाशी सरूप असलेल्या गाईंना वश होणाऱ्या 'उक्षवश' बैलाच्या यजनाने संयमी पुरुषाला वश होणारे 'ब्रह्मवर्चस्' तेज यजमान स्वतःला प्राप्त करून घेतो. आपल्या शत्रूला पशुयागाच्या प्रभावाने ठार मारावे अशा प्रकारचा अभिचार करण्याची ज्याला इच्छा होईल, त्याने रुद्र देवतेच्या उद्देशाने रोहिणी संज्ञक वांझ गाईचे हनन करून याग करावा. त्या योगाने यजमानाने जणू काय रुद्रदेवतेचा स्वकीय असा हविर्भाग बरोबर घेऊन रुद्रदेवतेजवळ गेल्यासारखे, अर्थात् त्या देवतेचे यजन केल्यासारखे होते. आणि मग त्या यजनाने संतुष्ट झालेला रुद्रदेव त्या यजमानाच्या शत्रूला अनेक ठिकाणी जखमी करतो व त्यामुळे तो तात्काळ मरतो. या यागात हनन केली जाणारी 'रोहिणी' संज्ञक वांझ गाय असते, ती आपल्या देवतेच्या द्वारा यजमानाच्या समृध्दीला कारणभूत होते. या पशुयागात 'स्फ्य' सारख्या आकाराचा यूप-स्तंभ करावा. कारण 'स्फ्य' हा वज्ररूप आहे. यास्तव, स्फ्यच्या आकाराचा यूप केल्याच्या योगाने यजमानाने आपल्या शत्रूवर वज्रप्रहारच केल्याप्रमाणे होते. वेदीत बर्हिसंज्ञक दर्भ आंथरावयाचे ते शरमय म्हणजे 'शर' नांवाच्या तृणाचे असावेत. त्याचप्रमाणे 'इध्म' बेहड्याचे वृक्षाचा असावा. म्हणजे तो

यजमानाच्या शत्रूच्या शरीराला ठेचून मारतो. (अनुवाक ७).

आकाशात दिसत असणारा हा आदित्य विशेषत्वाने प्रकाशेनासा झाला. त्याची दीप्ती कमी झाली. तेव्हा त्याच्या ठिकाणी उत्पन्न झालेली प्रकाशाची उणीव दूर व्हावी म्हणून सर्व देवांनी सूर्यदेवतेच्या उद्देशाने 'श्वेत' म्हणजे शुभ्रवर्ण अशा वांझ गाईचे हनन करून याग केला आणि त्या यागाच्या प्रभावाने त्यांनी आदित्याच्या ठिकाणी पूर्ववत् भरपूर प्रकाश धारण केला.

ज्याला 'ब्रह्मवर्चस्' संज्ञक तेज आपल्याला प्राप्त व्हावे, अशी इच्छा असेल त्याने आताच वर्णिल्याप्रमाणे 'सूर्य' देवतेच्या उद्देशाने शुभ्रवर्ण अशा वांझ गाईचे हनन करून याग करावा. असे केले असता यजमानाने जणू काय, आकाशात उदित होणाऱ्या ह्या आदित्याजवळ अर्थात् भगवान् सूर्यनारायणाच्या सन्निध जाऊन त्याच्या स्वकीय अशा हविर्द्रव्याने त्याला तृप्त केल्यासारखे होते. आणि मग तो भगवान् सूर्य त्या यजमानाच्या ठिकाणी 'ब्रह्मवर्चस्' संज्ञक तेज निर्माण करतो. अर्थात् तो यजमान सूर्याच्या अनुग्रहाने ब्रह्मवर्चसी म्हणजे ब्रह्मवर्चस् तेजाने संपन्न होतो. या यागात बेलाच्या वृक्षाचा 'यूप' करावा. कारण, हा आदित्य जेथून उत्पन्न झाला आहे, तेथूनच बेलाचा वृक्ष उत्पन्न झाला आहे. आणि त्यामुळे बेलाच्या वृक्षाचा यूप केला असता यजमान त्या यूपाशी सहोदरत्वाचे नाते असलेल्या 'ब्रह्मवर्चस्' नामक तेजाचे संपादन करून घेतो.

'अभिचार' करण्याची म्हणजे पशुयागाच्या प्रभावाने शत्रूला ठार मारण्याची ज्याला इच्छा असेल, त्याने ब्रह्मणस्पती देवतेच्या उद्देशाने 'बभ्रुकर्णी' म्हणजे पिंगलवर्णाचे कान असलेल्या गाईचे आलभन करून याग करावा. मात्र त्यापूर्वी वरुणाच्या उद्देशाने दहा कपालांच्या समूहावर पुरोडाश भाजून तयार करावा. आणि त्या पुरोडाशाने वरुणाचे यजन करावे. असे केले असता यजमानाने जणू काय वरुणाकडून आपल्या शत्रूला प्रथम जलोदरासारख्या रोगाने घेरून टाकल्याप्रमाणे होऊन, नंतर ब्रह्मणस्पतिदेवतेकडून त्या शत्रूला ठार मारल्याप्रमाणे होते. हनन करण्यात येणारी व पिंगलवर्णाचे कान असलेली गाय म्हणजे ब्रह्मणस्पतिदेवतेचे जणू रूप होय. अर्थात् अशा प्रकारची गाय यजनाच्या द्वारे यजमानाला समृद्धी प्राप्त होण्याला कारणभूत होते. या यागात 'स्फ्य' सारखाच आकार असलेला यूप करावा. कारण 'स्फ्य' हा वज्ररूप आहे.

यास्तव 'स्फ्य' सारखा यूप केल्याने यजमानाने जणू काय आपल्या शत्रूवर स्फ्यरूपी वज्राचाच जणू प्रहार केल्यासारखे होते. 'शरमय' म्हणजे 'शर' नामक तृणाचेच बर्ही या यागाचे प्रसंगी वेदीत आंथरावेत व 'इध्म' बैभीतक म्हणजे शत्रूला विविध ठिकाणी छिन्नविछिन्न करणाऱ्या बेहेड्याच्या वृक्षाच्या समिधांचा करावा. म्हणजे तो आपल्या सामर्थ्याने यजमानाच्या शत्रूला ठेंचून मारतो.

ज्याच्याजवळ यज्ञ येत नाही, म्हणजे ज्याच्या हातून यज्ञ घडत नाही, अशा यजमानाने विष्णुदेवतेच्या उद्देशाने ठेंगणा असलेला पशू हनन करून याग करावा. विष्णू हा यज्ञरूप आहे. यास्तव ठेंगण्या पशूचा याग केला असता त्या यजमानाने जणू काय भगवान् विष्णूच्या सन्निध जाऊन त्याच्या स्वकीय अशा हविर्भागाने त्याचे यजन केल्यासारखे होते. आणि मग त्या यजनाने संतुष्ट झालेला तो भगवान् विष्णू त्या यजमानाला यज्ञ प्राप्त करून देतो.

अर्थात् यज्ञ त्या यजमानाजवळ चालून येतो. या पशूयागात हनन केला जाणारा ठेंगणा पशू विष्णुदेवतात्मक असल्यामुळे तो आपल्या देवतेच्या द्वारा यजमानाच्या समृद्धीला कारण होतो.

एखाद्या पुरुषाचे स्तन स्त्रियांच्या स्तनासारखे मोठे असतात. असा पुरुष त्याला मिशा फुटण्यापुर्वी लोकांच्या दृष्टीला तो स्त्री असल्याचा भ्रम होतो. त्याचप्रमाणे घोड्यांमध्ये एखादा घोडा त्याच्या शरीराच्या विशिष्ट ठेवणीमुळे इतर घोड्यांना 'ही घोडीच आहे' असा भास उत्पन्न करतो. इतकेच नव्हे तर वस्तुत: तो पुरुष असतांना त्याच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या स्त्रीत्वाच्या आभासामुळे कामुक झालेले घोडे मैथुनाच्या इच्छेने त्याच्यावर चढतात. अशा प्रकारच्या घोड्याला 'वडव' अशी संज्ञा असून तो त्वष्टा देवतेला अत्यंत प्रिय असतो. त्वष्टा देव हा पशुजातीतील स्त्रीपुरुषांच्या जोडप्यांना उत्पन्न करणारा आहे. यास्तव पशुप्राप्तीची ज्याला इच्छा असेल, त्याने त्वष्ट्रदेवतेला प्रिय असलेल्या 'वडव' संज्ञक अश्वाचे हनन करावे, आणि वरुणदेवतेप्रीत्यर्थ त्याच्या वपादि अंगांचा याग करावा. म्हणजे यजमानाने वरुणाचा स्वकीय असा हविर्भाग घेऊन त्याच्याजवळ गेल्याप्रमाणे व तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. मग त्या हविर्भागाने संतुष्ट झालेला तो वरुणदेव त्या यजमानासाठी

पशुजातीतील स्त्रीपुरुषांच्या जोड्या निर्माण करतो व त्याला मिळवून देतो. ह्या 'वडव' संज्ञक अश्वाच्या ठिकाणी प्रजा व पशू हे जेव्हा प्रवेश करीत असतात, तेव्हाच तो स्वत: पुरुष असूनही स्त्रीनामधारी अशा 'वडव' संज्ञेला पात्र होत असतो. अपत्याच्या उत्पत्तीसाठी एखादा उत्तम जातीचा घोडा आणून तो त्याच्यावर चढवावा अशी मन:प्रवृत्ती होणे हा त्या 'वडव' संज्ञक अश्वाचे ठिकाणी होणारा प्रजांचा प्रवेश असून उत्तम जातीच्या घोड्याने त्याला घोडी समजून त्याच्यावर आरोहण करणे, हा त्याच्या ठिकाणी होणारा पशूंचा प्रवेश होय. सारांश, 'वडव' संज्ञक अश्वाचे हनन करून पूर्वोक्त याग केला असता, तो यजमान लौकरच प्रजा व पशू यांच्या समृध्दीला प्राप्त होतो.

शत्रूशी लढण्यास प्रारंभ झाल्यावर त्याच्या प्रबलतेमुळे त्याच्याशी 'तह' घडून यावा असे ज्याला वाटत असेल, त्या राजाने मित्रदेवतात्मक अशा श्वेतवर्णाऱ्या पशूचे हनन करून याग करावा. म्हणजे त्याने जणू काय मित्र देवाचा स्वकीय असा हविर्भाव घेऊन त्याच्या सन्निध गेल्यासारखे व त्याला तो समर्पण केल्यासारखे होते. आणि त्यामुळे संतुष्ट झालेला तो मित्रदेव त्या राजाला त्याचे इच्छित कार्य साधून देणाऱ्या मित्राशी त्याचा स्नेह करून देतो. किंवा शत्रूच्याच ठिकाणी मित्रभावना उत्पन्न करून त्याच्याशी यागकर्त्या राजाची मैत्री करून देतो. प्रकृतिभूत पशुयागात यजमानाच्या उंची इतकाच उंच असलेला यूपस्तंभ असावा लागतो. परंतु या पशुयागात यजमानाच्या उंचीपेक्षा अधिक उंचीचा यूप नियुक्त करावा. अशा प्रकारचा यूप यागकर्त्या राजाला आपला शत्रू असलेल्या राजाशी तह घडून येऊन तो आपला मित्र होणारच अशा प्रकारच्या निश्चित बुध्दीने युक्त करतो.

पर्जन्य पडून सुबत्ता व्हावी अशी ज्याला इच्छा होईल, त्या यजमानाने प्रजापतिदेवतात्मक अशा कृष्णवर्ण पशूचे आलभन करून त्याच्या अंगांचा याग करावा. प्रजापती हाच पर्जन्यवृष्टीचा अधिपती आहे. यास्तव प्रजापती देवाप्रीत्यर्थ आता सांगितल्याप्रमाणे पशुयाग केला असतां, यजमानाने जणू काय प्रजापतीचा स्वकीय असा हविर्भाग घेऊनच त्याच्याजवळ गेल्यासारखे व तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. हनन करण्यात येणारा पशू कृष्णवर्ण म्हणजे काळ्या रंगाचा असावा. कारण पर्जन्यवृष्टीचे स्वरूप कृष्णवर्णच असते, अर्थात् वृष्टीशी समानरूप असलेला तो पशू यजमानासाठी पर्जन्यवृष्टीचे संपादन

करतो. पर्जन्यवृष्टीचा म्हणजे पर्जन्यवृष्टीच्या वेळच्या वातावरणाचा रंग जरी काळा असतो, तरी त्यामध्ये पांढऱ्या रंगाची वीज चमकत असते. यास्तव या यागात हनन केला जाणारा पशू जरी सामान्यत: काळ्या रंगाचा असला तरी त्याच्या पोटाकडील काही भाग पांढरा असावा. म्हणजे तो पशू यजमानासाठी वीज उत्पन्न करून पर्जन्यवृष्टी करतो. ज्याची दोन्ही शिंगे कानांच्या जवळूनच खाली वाकलेली आहेत असा तो पशू असावा. म्हणजे तो यजमानासाठी पर्जन्यवृष्टी आकाशातून धारांच्या रूपाने खाली पाडतो. (अनुवाक ८).

सोमयाग केल्यानन्तर, अर्थात् सोमवल्लीचा अभिषेक करून म्हणजे ती कुटून काढलेल्या रसाचे यजन केल्यावर सेवनीय असे अन्न वरुणाला मिळेनासे झाले. तेव्हा याग करणाऱ्या त्याने ही वरुणदेवतात्मक अशी काळ्या रंगाची वांझ गाय पाहिली. आणि आपल्या स्वकीय देवतेप्रीत्यर्थ तिचे हनन करून तिच्या वपादि अंगांचा याग केला. तेव्हा त्या यागाच्या प्रभावाने त्याला सेवनीय असे अन्न प्राप्त झाले. यास्तव, सेवनीय अशा अन्नाच्या प्राप्तीला योग्य असूनही तसे अन्न ज्याला प्राप्त होत नाही, त्याने ह्या वरुणदेवतात्मक कृष्णवर्णी वांझ गाईचे आलभन म्हणजे हनन करून तिच्या अंगांचा याग करावा. असे केले असता यजमानाने जणू काय त्याचा स्वकीय असा हविर्भाग घेऊनच त्याच्या सन्निध गेल्याप्रमाणे व तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. आणि मग त्या हविर्भागाने संतुष्ट झालेला वरुणदेव त्या यजमानाला अन्न मिळवून देतो व तो यजमान आपल्या इच्छेनुसार अन्न भक्षण करणारा होतो. हनन करण्यात येणारी गाय कृष्णवर्ण अशी असावी. कारण पर्जन्याच्या द्वारा प्रकाशाचे आच्छादन करून हा आपल्या स्वरूपाचे आविष्करण करीत असतो म्हणजे अंधार पाडतो. अर्थात् वांझ गाईचे व वरुणाचे स्वरूप सारखेच असते, अर्थात् तिची वरुण ही देवता असल्यामुळे 'वारुणी' अशी तिला संज्ञा आहे. वारुणी ही आपल्या देवतेकडून यजमानावर अनुग्रह करवून त्याच्या समृध्दीला कारणभूत होते. आपल्याला अन्न प्राप्त व्हावे अशी ज्याची इच्छा असेल, त्याने मित्र व वरुण या दोन देवतांच्यासाठी अनुक्रमे पांढरा व काळा बोकड, नदी व शेतजमीन यांच्या मधल्या स्थळात हनन करून त्यांच्या अंगांचा याग करावा. कारण ओषधी म्हणजे धान्य हे मित्रदेवतात्मक असून उदके ही वरुणदेवतात्मक आहेत. उदके व धान्य यांच्या सारभूत रसावरच आपणा सर्वांचे जीवन अवलंबून आहे. यास्तव मित्र व वरुण

यांच्या प्रीत्यर्थ आता सांगितल्याप्रमाणे पांढऱ्या व काळ्या पशूचा याग केला असतां, यजमानाने मित्र व वरुण यांचा स्वकीय हविर्भाग घेऊनच त्यांच्याजवळ गेल्याप्रमाणे व तो त्यांना समर्पण केल्यासारखे होते. मग ते मित्रावरुण त्या यजमानाला अन्न देतात. आणि तो यजमान निश्चितपणे अन्न सेवन करणारा होतो. नदीची उदके व शेतातील धान्य यांच्या संधीत असलेल्या जागी पशूचे हनन केले जाते. ते मित्र व वरुण या दोघांचाही अनुग्रह प्राप्त होण्याला कारणभूत होते. ज्याच्या अग्रभागी दुबेळके आहे म्हणजे दोन शाखा फुटलेल्या आहेत अशा प्रकारचा यूपस्तंभ ह्या पशुयागात नियोजित करावा. म्हणजे तो मित्र व वरुण या दोन्ही देवतांच्या संतोषास आणि तद्द्वारा यजमानाच्या समृध्दीला कारणभूत होतो.

फार दिवसांच्या रोगाने पीडित असा जो असेल त्याने आपल्या रोग-मुक्ततेसाठी मित्रदेवतात्मक पांढरा व वरुणदेवतात्मक काळा पशू (बोकड) हनन करून त्या पशूंच्या अंगांचे अनुक्रमे यजन करावे. मित्रदेवतेप्रीत्यर्थ जो याग केला जातो, तो आपल्या प्रभावाने मित्रदेवतेकडून क्रूर अशा वरुणाला शांत करतो. आणि वरुणदेवतेप्रीत्यर्थ जो याग केला जातो, त्या योगाने संतुष्ट झालेला वरुणदेवच प्रत्यक्ष आपल्या रोगरूपी पाशापासून यजमानाला मुक्त करतो.

प्रजा व पशू यांची जी समृध्दी तिला पुष्टी असे म्हणतात . देवांना पुष्टी प्राप्त झाली नाही. तेव्हा अशा प्रकारची पुष्टी मिळण्याला स्त्रीपुरुषात्मक असे मानवी एक जोडपे व पशूंचेही तसेच एक जोडपे, अशी दोन जोडपी संपादन करणे हेच एक साधन आहे, असे त्यांना दिसून आले. परंतु अशा प्रकारच्या जोडप्यांची ही जोडी ते संपादन करू शकले नाहीत. तेव्हा अश्विनीकुमार त्यांना म्हणाले, हे देवहो, पुष्टीचे साधन असलेली मनुष्य व पशू यांच्या जोडप्यांची जोडी ही आमच्या स्वामित्वाखाली असते. यास्तव आम्हाला संतुष्ट केल्याशिवाय ती तुम्हाला प्राप्त होण्याविषयी तुम्ही बोलूच नका. अश्विनीकुमारांचे हे म्हणणे बरोबरच होते. मनुष्य व पशू यांच्या जोडप्यांच्या साधनाने मिळणारी पुष्टी ही अश्विनीकुमारांच्याच हातातील झाली होती.

पुष्टीची प्राप्ती व्हावी, अशी इच्छा करणारा जो असेल त्याने ही आश्विनी म्हणजे अश्विनौदेवतात्मक अशी जुळ्यामध्ये जन्मलेली वांझ गाय मारून तिच्या

अंगांचे यजन करावे. अश्विनीकुमार हे जुळे भाऊ असल्यामुळे त्यांच्यासाठी हनन करण्यात येणारी वांझ गाय जुळ्यामध्ये उत्पन्न झालेली असणे युक्तच होय. यास्तव अशा प्रकारच्या वांझ गाईचे हनन करून तिच्या अंगांचा याग केला असता, अश्विनीकुमारांचा स्वकीय असा हविर्भागच बरोबर घेऊन यजमानाने त्यांच्याजवळ गेल्यासारखे व तो त्यांना समर्पण केल्यासारखे होते. आणि मग त्या हविर्भागाने संतुष्ट झालेले ते अश्विनीकुमार त्या यजमानाच्या ठिकाणी पुष्टीचे धारण करतात. अर्थात् तो यजमान प्रजा व पशू यांच्या योगाने पुष्ट होतो. (अनुवाक ९).

ज्याच्या तीन पिढ्यांत वेदाध्ययन व अग्निहोत्र यांचा विच्छेद झाला असेल अशा ब्राह्मणास 'दुर्ब्राह्मण' अशी संज्ञा आहे. दुर्ब्राह्मण असेल त्याला सोमपान करण्याचा अधिकार नाही. यास्तव ज्या दुर्ब्राह्मणास सोमपान करण्याची श्रध्दापूर्वक इच्छा उत्पन्न होईल त्याने आपल्या दुर्ब्राह्मणत्वाचा परिहार होण्यासाठी उभयता अश्विनीकुमारांच्या सुप्रसन्नतेसाठी ज्याच्या कपाळावर गंधाच्या टिळ्याप्रमाणे पांढऱ्या केसाच्या टिळ्याचे चिन्ह आहे अशा धुरकट म्हणजे मळकट पांढऱ्या रंगाच्या एका पशूचे हनन करून याग करावा. देवांच्या समुदायामध्ये उभयता अश्विनीकुमार सोमपानाचे अधिकारी नव्हते. त्यांनी देवांच्याकडून मागाहून सोमपानाचा अधिकार मिळविला. जो दुर्ब्राह्मण सोमपानाची इच्छा करीत असेल, त्याची उभयता अश्विनीकुमार हीच इष्टदेवता होय. यास्तव आपल्या दुर्ब्राह्मणत्वाचा परिहार करून सोमपान करण्याचा अधिकारी होण्याची इच्छा करणाऱ्या यजमानाने पूर्वोक्त पशुयाग केला असता, त्याने जणू काय अश्विनीकुमारांच्या सन्निध धाव घेऊन त्यांना स्वकीय अशा पश्वंगरूपी हविर्भागाच्या अर्पणाने त्यांची पूजा केल्याप्रमाणे होते. आणि त्यायोगे संतुष्ट झालेले ते अश्विनीकुमार त्या यजमानाचे दौर्ब्राह्मण्य दूर करून त्याला सोमपान करण्याचा अधिकार प्राप्त करून देतात. अश्विनीकुमारांच्या अनुग्रहाने सोमपानाचा अधिकार त्यांच्याजवळ जणू हात जोडून उभा असतो. हनन केलेल्या पशूच्या ठिकाणी धुराप्रमाणे मळकट पांढरा रंग असतो. तो यजमानाच्या ठिकाणचा धूम्रिमा म्हणजे दौर्ब्राह्मण्यरूपी मळकटपणा नाहीसा करतो. व त्याच्या कपाळावर टिळ्यासारखे असलेले पांढरे चिन्ह त्या यजमानाच्या मुखावर 'ब्रह्मवर्चस्' संज्ञक तेज स्थापन करतो.

बैलाच्या वीर्यापासून हरिणीच्या ठिकाणी उत्पन्न झालेला जो हरिण

त्यास 'गोमृग' अशी संज्ञा आहे. ज्याने ब्राह्मण मारलेला नाही, तथापि, 'हा ब्रह्महत्या केलेला मनुष्य आहे,' असा खोटाच अपवाद ज्याच्यावर असेल, त्याने आपला अपवाद निरसन होऊन आपली अब्रू साफ होण्याकरता वायुदेवतेच्या उद्देशाने 'गोमृग'संज्ञक पशूचे हनन करून याग करावा. ब्रह्महत्या केली नसून ती केल्याबद्दल ज्याच्यावर लोकापवाद आलेला असतो त्याला ब्रह्महत्येबद्दल नरकवास भोगावा लागत नसला तरी लोकांच्या तोंडून अपकीर्तिरूप अर्थात् निंदात्मक भाषणे ऐकण्याचा दुष्प्रसंग भोगावाच लागतो. शिवाय अशाप्रकारे अपकीर्तिकारक लोकापवादाने मनुष्याला गावामध्ये चार लोकात उजळ माथ्याने राहता येत नाही व गांव सोडूनही जाता येत नाही, अशी अर्धवट स्थिती होऊन जाते. यास्तव अशा मनुष्याने पूर्वोक्त पशुयाग करणे अवश्य आहे. बैलासारख्या ग्राम्य पशूच्या वीर्यापासून गर्भसंभव झालेला असला तरी आरण्य पशू असलेल्या हरिणीच्या ठिकाणी उत्पन्न झाल्यामुळे 'गोमृग' पशू धड ग्राम्य पशूही ठरत नाही व धड आरण्य पशूही ठरत नाही. धड ग्रामवासी नव्हे व धड अरण्यवासीही नव्हे अशाप्रकारे अपवादरूप मनुष्याचे व गोमृगाचे स्वरूपसाम्य असल्यामुळे अपवाद आलेल्या मनुष्याने 'गोमृग' संज्ञक पशूचा याग करणे उचित होय. वायू ही देवता सर्व देवांत अत्यंत पवित्र आहे. अर्थात् लोकांकडून ब्रह्महत्येचा अपवाद आलेल्या यजमानाने पूर्वोक्त गोमृग पशूचा याग केला असता, त्याने जणू काय वायुदेवतेकडे धाव घेऊन तिला स्वकीय अशा हविर्भागाने तृप्त केल्यासारखे होते. आणि मग संतुष्ट झालेला तो वायुदेव त्या यजमानावर आलेला अपवाद दूर करून त्याला पवित्र करतो. अर्थात् तो यजमान त्याच्यावर झालेला अपवाद खोटा ठरल्यामुळे चार चौघात उजळ माथ्याने वावरू लागतो.

'शस्त्र' म्हणजे विशिष्ट अशा देवतेच्या स्तुतीने युक्त असा, विशिष्ट पद्धतीने, होता, मैत्रावरुण, ब्राह्मणाच्छंसी व अच्छावाक या चार ऋत्विजांकडून पठण केला जाणारा ऋक्समुदाय होय. ज्या यजमानाच्या 'अतिरात्र' नामक सोमयज्ञात 'रात्रिपर्याय' संज्ञक 'शस्त्राचे' पठण झाल्यानन्तर होत्याकडून 'आश्विन' संज्ञक शस्त्राचे पठण केले जात असतांना मेघादिकांचे आवरण आड न येता स्पष्टपणाने सूर्योदय न होईल तर त्या यजमानावर ती रात्र नाखुष व पाठमोरी होऊन प्रभात कालाला प्राप्त होते. आणि असे झाल्यामुळे प्रकाशविरुध्द, अर्थात् स्वर्गलोकाला विरोधक अशा पापरूपी अंधकारात तो प्रविष्ट होतो.

यासाठी अशा यजमानाने अनेक रंगांनी युक्त असलेल्या पशूचे सूर्यदेवतेप्रीत्यर्थ हनन करून याग करावा. असे केल्याच्या योगाने जणू काय त्या यजमानाने आकाशात उदित होणाऱ्या ह्या भगवान् आदित्याच्या सन्निध जाऊन त्याच्या स्वकीय हविर्भागाने त्याला तृप्त केल्यासारखे होते. आणि त्या योगाने संतुष्ट झालेला तो भगवान् आदित्य (सूर्यनारायण) यजमानाच्या स्वर्गलोकप्राप्तीला प्रतिबंधक अशा पापरूपी अंधकाराला यजमानापासून दूर करतो. आणि मग ती रात्र यजमानावर संतुष्ट व त्याच्याकडे मुख करून येणारी होऊन प्रभातकाळाला प्राप्त झाल्यासारखी होते. अर्थात् पूर्वोक्त पशुयागाच्या प्रभावाने यजमान स्वर्गलोक-प्रतिबंधक अशा पापरूपी अंधकाराला दूर करतो. (अनुवाक १०).

१ हे ऋत्विज आणि यजमान हो तुमच्या पुत्रपौत्रादि जनांच्या कार्यसिध्दीसाठी सर्व जगाच्यावर उत्कृष्टत्वाने स्थित असणाऱ्या इंद्रदेवाला आम्ही बोलावीत आहोत. तो इंद्र इतरांच्याहून आम्हालाच अधिक प्रिय मानणारा असो. २ अग्निचयनाचे अनुष्ठान करणारे यजमान अग्न्यादि देवांच्याबरोबर अर्ध्या हविर्भागाचे धारण करण्याकरिता इंद्राला बोलावीत असतात. ज्या अर्थी विटांची विशेष रीतीने मांडणी करून त्यांवर स्थापित केलेल्या अग्नीचे ठिकाणी अग्निष्टोमादि सोमयागाचे अनुष्ठान पार पाडण्यास समर्थ असलेले यजमान तद्विषयक अशा आपल्या बुध्दी एकत्र करतात त्या अर्थी त्यांनी इतर देवांच्याबरोबर अर्धा हविर्भाग सेवन करण्याकरिता इंद्राला बोलाविणे साहजिकच आहे. हे इंद्रा, तू शूर, मनुष्यांना धनं देणारा व आमच्या बलाचे संवर्धन करणारा होऊन आम्हाला गाई, म्हशी, बैल इत्यादि पशूंनी गजबजलेल्या संघाच्या ठिकाणी प्रामुख्याने स्थापन कर. ३ हे मरुद्गणहो ज्या अर्थी आम्ही सुखाची इच्छा करून द्युलोकापासून तुम्हाला येथे बोलावीत आहोत त्या अर्थी तुम्ही अगत्याने आमच्याजवळ या. ४ हे मरुद्गणहो, तुमचे भजन करणाऱ्याला देण्यासाठी तुम्ही जी सुखे संपादन करून ठेवली आहेत, ती त्रैलोक्यातील सर्व सुखे, तुम्हाला हविद्रव्ये अर्पण करणाऱ्याला तुम्ही त्याच्या अपेक्षेपेक्षा अधिक देता. यास्तव ती सर्व सुखे आम्हाला द्या. त्याचप्रमाणे आम्हाला धन आणि पराक्रमी पुत्र द्या. ५ हविर्द्रव्यांचे संपादन करीत असताना देवांना हविर्भाग देण्यासाठी व यजमानाच्या कल्याणाकरिता मी सुखाने बोलाविता येणारा, पापापासून मुक्त करणारा, उत्कृष्ट हितकारक, द्युलोकात उत्पन्न झालेला व पर्जन्यवृष्टिद्वारा धान्यांचे उत्पादन करणारा जो इंद्र त्याला बोलावीत आहे. तसेच अग्नी,

मित्र, वरुण, भग, द्यावापृथिवी आणि मरुत् या देवांनाही बोलावीत आहे. ६ सर्वबाजूंनी हविर्द्रव्यांचे भक्षण करणारा अग्निदेव आम्हाला आनंदित करो. एका एका दिवसाला मागे टाकणारा भगवान् सूर्य आम्हाला आनंदित करो. वायुदेव व वृष्टिकारक पर्जन्य आम्हाला आनंदित करो. हे इंद्रदेवा आणि हे पर्वतराजा, हिमवता, तुम्ही दोघे आमच्या अनेक प्रकारच्या पातकांचा क्षय करा. आम्ही समर्पण केलेल्या हविर्द्रव्याने संतुष्ट झालेले सर्व देव आम्ही त्यांची सेवा करीत असताना आम्हाकडे कृपादृष्टीने अवलोकन करोत. ७ हे मरुद्गणहो, ज्याअर्थी तुम्ही तृप्तीची इच्छा करणारे आहात, त्याअर्थी उपासकाने समर्पिलेले हविर्भाग त्वरेने स्वीकारणाऱ्या तुम्हाला प्रिय असलेल्या नांवाचा उच्चार करून मी तुम्हाला बोलावितो. ८ ते 'मरुत्' पूर्वदिशेकडील वाऱ्यांच्या रूपाने वाहू लागतात आणि सर्व प्राण्यांनी वृष्ट्युदकाचे सेवन करावे म्हणून प्रकाशमान अशा सूर्यकिरणांच्या सह भूमीला पर्जन्यवृष्ट्युदकाने उत्तम रीतीने सिंचित करण्याची इच्छा करितात. त्या मरुतांनी याज्यापुरोनुवाक्यारूपी स्तुतिवाक्यांनी ऋत्विजांकडून त्यांचे स्तवन केले गेल्यावर उत्कृष्ट अशा हविर्द्रव्यांचे भक्षण केले आहे. ते मरुत् उत्साहाच्या भरात अनेक प्रकारे शब्दघोष करीत करीत स्वगृहाकडे चालले आहेत व भयरहित अशा त्या मरुतांना अत्यंत प्रिय असे विशिष्ट स्थान त्यांनी मिळविले आहे. ९ आठ वसूंच्या सह अग्नी म्हणजे पहिल्या संघाचा अधिपती आमचे रक्षण करो. अकरा रुद्रांच्या सह सोम स्वत: आपण होऊन प्रेमपूर्वक रक्षण करो. मरुतांच्या सह इंद्र आम्हाला त्याच्या ऋतूत उचित असे भोग धारण करणारे करो. आदित्यांच्या सह वरुण आम्हाला उत्तम प्रकारे अनुष्ठान करण्याचे आम्ही जणू व्रतच धारण केले आहे, असे करो. १० वसूंच्या सह असणारा अग्निदेव आम्हाला उत्तम प्रकारचे अनुष्ठान कसे असते, हे समजाऊन देवो. रुद्रसंबंधी असलेल्या तनूंच्या सह सोम आम्हाला उत्कृष्ट अनुष्ठान कसे करावे हे शिकवो. यज्ञयोग्य अशा मरुतांच्या सह इंद्र आम्हाला चांगले अनुष्ठान करण्याचे ज्ञान देवो. आदित्यांच्या सह वरुण आम्हाला उत्कृष्ट अनुष्ठान करण्याचे शिक्षण देवो. ११ ज्याप्रमाणे आदित्य हे वसूंच्याशी प्रेम करणारे झाले, जसे इंद्राच्या संघातील मरुतांच्याशी रुद्र सहमत होऊन इंद्राच्या श्रेष्ठपणाला सर्वतोपरी मान्यता देण्यास तयार झाले, त्याचप्रमाणे गार्हपत्यादि तीन नांवे धारण करणाऱ्या हे अग्निदेवा, सर्वच देव आपणांपैकी कोणाही व्यक्तीचा शत्रूंकडून अपहार

न होईल अशाप्रकारे एकमेकांच्याशी समानचित्त होवोत. १२ ज्या स्विष्टकृत् देवाची संगती झाली असता कोणत्याही मनुष्याच्या घरी कोणतीही मनुष्ये परस्परांच्याशी एकोप्याने रममाण होतात, आणि ज्या स्विष्टकृत् देवाला भजतात व त्याला आहुती देण्याकरता अग्नी प्रज्वलित करतात, त्याचप्रमाणे यजमान आपल्या कर्माचे उत्कृष्ट फल निर्माण करतात, तो स्विष्टकृत् नामक देव आम्हाला प्रसन्न होवो. १३ ज्याअर्थी आम्ही इच्छा करीत असलेल्या अन्नांचा आम्ही उपभोग घेत आहो, मनुष्यांना देण्यासाठी हवनयोग्य अशा वस्तू आम्ही उत्तम प्रकारे संपादीत आहोत, शिवाय चमकणारे धन, शरीरबल आणि यज्ञ यांच्या उत्कर्षरूपी प्रकाशकिरणांचा ज्याअर्थी आम्ही स्वीकार करीत आहोत, त्या अर्थी आम्हांवर अनुग्रह करणाऱ्या स्विष्टकृत् संज्ञक अग्निदेवाला आम्ही भजत आहोत. १४ हा यज्ञ देवांना सुख देण्याकरता त्यांच्या जवळ जातो. हे आदित्यहो, तुम्ही आम्हाला सुख देणारे व्हा. तुमची अनुग्रहबुद्धी आम्हा नवीनांच्यावर अनुग्रह करण्याला प्रवृत्त होऊन आम्हाकडे वळो. जी तुमची अनुग्रहबुद्धी आमच्या पातकांचा नाश करते, ती आमच्याकडून होणारी तुमची सेवा चांगल्या प्रकारे जाणणारी होवो. १५ तृण, धान्य इत्यादि सर्व उपभोग्य वस्तूंचा संग्रह करणारा, कोणाकडूनही तिरस्काराला पात्र न झालेला, वयोवृध्द आणि पराक्रमी पुत्र असलेला हा यजमान शुचिर्भूत होऊन ज्याचे अनुष्ठान आता करावयाचे आहे, त्या कर्माजवळ येतो. आदित्यांना देण्यासाठी हविर्द्रव्य घेऊन अग्नीजवळ ज्यामध्ये जावे लागते, अशा यज्ञकर्मात जो यजमान प्रवृत्त होतो, त्याला कोणीही शत्रू जवळ येऊन मारीत नाही. आणि दुरूनही मारीत नाही. १६ राज्यापासून भ्रष्ट झालेल्या राजाला पुन्हा त्याच्यावर स्थापन करणारे, सर्वजणांवर अनुग्रह करण्याकरता जागजागी उपस्थित असणारे, प्रकाशवन्त, विश्वाचे पालनकर्ते, दीर्घबुद्धीचे, राक्षसांप्रमाणे उपद्रव देणारांचे निवारणाकरता कराव्या लागणाऱ्या कर्माचे रक्षण करणारे, दिलेले वचन सत्य करणारे, यजमानाला स्वराज्यभ्रष्ट करणाऱ्या वैऱ्याला दरिद्रावस्थेला नेऊन त्यांच्यावर ऋणांचा भार करून ठेवणारे असे आदित्य आमच्या इच्छेप्रमाणे सर्व गोष्टी सफल करोत. १७ हे अर्यमन्, हे वरुण, हे मित्र आणि अशाच प्रकारच्या नांवांनी उपलक्षित होणाऱ्या हे आदित्यहो, तुमचे जे माहात्म्य आहे ते सुंदर आणि फार मोठे आहे. कसे म्हणाल तर, स्वर्ग, मृत्यू व पातालरूप तीन भूमी धारण करून, शिवाय सूर्य, चन्द्र व अग्निरूपी तीन प्रकाशही तुम्ही धारण केले

आहेत. त्याचप्रमाणे तुमच्यासाठी यज्ञ करणाऱ्या यजमानांच्या यज्ञांत जी अंतर्भूत होणारी कायिक, वाचिक आणि मानसिक अशी विविध व्रते असतात, ती सर्व त्या यजमानांच्या कडून सत्यपणाने धारण करविली आहेत. १८ आम्ही देवांच्यासाठी आरंभिलेल्या कर्माची सिद्धी होण्यासाठी क्षत्रियांप्रमाणे प्रबल व आम्हाला उत्तम प्रकारे सुखविणाऱ्या त्या आदित्यांनाच आमचे रक्षण व्हावयासाठी आम्ही प्रार्थीत आहोत. १९ हे वसू हो, आणि आदित्यहो, वैऱ्याने घेरल्यामुळे मी व्यामूढचित्त झालो असल्यामुळे एखाद्या अपरिपक्व बुद्धीच्या बालाप्रमाणे किंवा गलितधैर्य बालाप्रमाणे कसलाही विचार करण्यास असमर्थ झालो आहे. दक्षिणदिशा कोणती हे कळत नाही, उत्तर कोणती हे समजत नाही, पूर्व कोणीकडे आहे हे कळत नाही, आणि पश्चिम कोठे आहे, हेही समजत नाही, अशी माझी स्थिती झाली आहे. यास्तव तुमच्याकडून मी माझ्या प्रजाजनास सुखरूप पोचविला जाऊन शत्रुभयरहित होईन आणि मग काहीतरी इष्ट असा विचार सुचण्याच्या स्थितीला मी प्राप्त होईन. २० आम्ही यज्ञकर्ते यजमान आदित्यांकडून नवीनच मिळविलेल्या संरक्षणाने युक्त झालो असल्यामुळे सर्वोपद्रवरहित अशा सुखाने स्वकर्तव्यामध्ये सक्त होऊ. हे आदित्य देव, निष्पाप असे जे आम्ही त्या आमच्या निरपराधित्वाकडे आणि आमच्या कर्मानुष्ठानाच्या अखंडित्वाकडे पाहून आम्ही केलेली स्तुती श्रवण करणारे होऊन सत्वर येथे येवोत आणि आमच्या ह्या यज्ञाला धारण करोत. २१ हे वरुणदेवा, माझे हे आह्वान म्हणजे निमंत्रण तू ऐक आणि आज आम्हाला सुखी कर. तुझ्याकडून माझ्या पालनाची इच्छा धारण करणारा मी तुझी गोड शब्दांनी दीर्घकाळ प्रार्थना करीत आहे. २२ हे वरुणदेवा, मला अपेक्षित असे ते रक्षण तुजकडून मिळण्याकरता मंत्रपूर्वक नमस्कार करीतच मी तुझ्या सन्निध येत आहे. हा यजमान हविर्द्रव्याने तुझे आराधन करून अवश्य ते रक्षण मिळण्याकरता तुजजवळ याचना करीत आहे. हे वरुणदेवा क्रोधरहित होऊन तू या यज्ञामध्ये आम्ही करीत असलेली विज्ञापना नीट लक्षात घे. पुष्कळांच्याकडून स्तविल्या जाणाऱ्या हे वरुणदेवा, आमचे आयुष्य कमी करु नको. (अनुवाक ११).

प्रपाठक २

सृष्टिकर्त्या प्रजापतीने प्रजा निर्माण केल्या परंतु प्रजापतीने निर्माण

केलेल्या त्या प्रजा इंद्राग्नींनी म्हणजे इंद्र व अग्नी या दोघांनी आच्छादित म्हणजे अदृश्य करून टाकल्या ! प्रजापतीने ह्याबद्दल आपल्या मनाशी विचार केला. तेव्हा इंद्राग्नींनी आपण उत्पन्न केलेल्या प्रजा अदृश्य केल्या आहेत असे त्याला दिसून आले. तेव्हा इंद्राग्नींच्या संतोषासाठी अकरा कपालांच्या गटावर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचा याग करावा, असे त्याच्या विवेकदृष्टीला दिसले आणि त्याप्रमाणे त्याने इंद्राग्नींच्या उद्देशाने एकादशकपालात्मक पुरोडाश तयार करून तो इंद्राग्नींना समर्पण केला. त्या योगाने संतुष्ट झालेल्या इंद्राग्नींनी त्या प्रजापतीच्या प्रजा दृश्य केल्या. सारांश, प्रजापतीच्या प्रजा अदृश्य करणारे इंद्राग्नी हे दोन देव होत. यास्तव, प्रजोत्पत्तीला समर्थ असूनही ज्याला प्रजा प्राप्त होत नाही, अशा प्रजाकाम, अर्थात् प्रजा प्राप्त होण्याची इच्छा असलेल्या यजमानाने इंद्राग्नींच्या उद्देशाने अकरा कपालांच्या गटावर पुरोडाश भाजून तयार करावा आणि त्याचे यजन करावे. म्हणजे इंद्राग्नींना स्वकीय वाटणारा हविर्भाग घेऊनच जणू काय यजमानाने त्यांच्या सन्निध जाऊन तो त्यांना अर्पण केल्यासारखे होते व त्या योगाने संतुष्ट झालेले ते इंद्राग्नी त्या यजमानासाठी प्रजा प्रकट करतात. अर्थात् इंद्राग्नींच्या अनुग्रहाने तो यजमान प्रजा संपादन करतो.

एखाद्या स्थलाविषयी अथवा आपल्या बरोबरीचे भाऊबंद किंवा नोकरलोक यांविषयी ज्याला स्पर्धा उत्पन्न झाली असेल अशा यजमानाने इंद्राग्नींच्यासाठी एकादशकपालात्मक पुरोडाशाचे निर्वपण करावे. म्हणजे अकरा कपालांच्या गटावर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचे यजन करावे. म्हणजे त्या यजमानाने इंद्राग्नींचा स्वकीय असा हविर्भाग घेऊन त्यांच्या जवळ धावत गेल्या सारखे व त्यांना तो समर्पण केल्यासारखे होते. त्या योगाने संतुष्ट झालेल्या त्या इंद्राग्नींच्या कडून क्षेत्राविषयी उपद्रव देणाऱ्या माणसाचे अथवा अन्य कारणाने पीडा देणाऱ्या भाऊबंदांचे किंवा नोकर लोकांचे इंद्रिय व तज्जन्य सामर्थ्य नष्ट केले जाते व आपल्या वैऱ्याशी झगडत असलेला तो यजमान जय मिळवितो.

आपल्या शत्रूशी लढण्याकरिता जो कोणी रणमैदानावर जातो, त्याच्या पासून त्याची इंद्रियगत शक्ती दूर जात असते. यास्तव, ज्या कोणा यजमानाला आपल्या शत्रूशी लढावयास जावयाचे असेल, त्याने रणांगणावर जातांना इंद्राग्नींच्या उद्देशाने अकरा कपालांवर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचे यजन करावे.

म्हणजे त्याने जणू काय इंद्राग्नींचा स्वकीय असा हविर्भाग बरोबर घेऊनच त्यांच्या जवळ गेल्यासारखे व त्यांना तो समर्पण केल्यासारखे होते. या योगाने संतुष्ट झालेले ते इंद्राग्नी त्या यजमानाच्या ठिकाणी त्याची इंद्रियगत शक्ती स्थापन करतात. अर्थात् आपल्या इंद्रियगत शक्तीने युक्त झालेला तो यजमान रणांगणावर जातो व ती लढाई जिंकतो.

जो संग्राम जिंकतो म्हणजे शत्रूशी लढण्यात विजयी होतो तो युद्धजन्य परिश्रमाच्या योगाने इंद्रियगत सामर्थ्याने रहित होत असतो. यास्तव, लढाई जिंकल्यानंतर त्या यजमानाने इंद्राग्नींना समर्पण करण्याकरता, एकादश कपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करावा. अर्थात्, अकरा कपालांवर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचे यजन करावे. म्हणजे त्या यजमानाने इंद्राग्नींना स्वकीय म्हणजे आपलासा वाटणारा हविर्भाग घेऊन त्यांच्या जवळ गेल्यासारखे व त्यांना तो समर्पण केल्यासारखे होते. आणि त्या योगाने संतुष्ट झालेले ते इंद्राग्नी त्या यजमानाच्या ठिकाणी त्याचे इंद्रियगत सामर्थ्य पुन: धारण करतात, अर्थात् तो इंद्रियसामर्थ्याने रहित असा होत नाही.

जो कोणी विद्वान दुसऱ्या विद्वानांना वादविवादात जिंकण्याच्या अथवा स्वत:ची विद्या प्रकट करण्याच्या इच्छेने जनतेमध्ये, अर्थात् विद्वत्सभेमध्ये जातो, त्या विद्वानाची इंद्रियगत शक्ती, अर्थात् मनोधैर्य प्रसंगवशात भ्रष्ट होत असते. यास्तव, अशा प्रकारच्या यजमानाने विद्वत्सभेत जातांना इंद्राग्नींच्या उद्देशाने एकादशकपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करून, त्या पुरोडाशाचा याग करावा. असे केले असतां त्या यजमानाने जणू काय इंद्राग्नींच्या स्वकीय अशा हविर्भागासह त्याच्या जवळ जाऊन त्यांना तो समर्पण केल्या सारखे होते. आणि त्या योगाने संतुष्ट झालेले ते इंद्राग्नी त्या यजमानाच्या ठिकाणी इंद्रियगत शक्ती म्हणजे मनोधैर्य स्थापित करतात. मग साहजिकच तो यजमान अवश्य अशा मनोधैर्यासह विद्वत्सभेत प्रवेश करतो व आपल्या अपेक्षेप्रमाणे वादविवादात जय मिळवितो अथवा आपली विद्या उत्कृष्ट प्रकारे विद्वज्ज्नसभेत प्रकट करू शकतो.

आता सांगितल्याप्रमाणे इंद्राग्नींच्या उद्देशाने एकादशकपालात्मक पुरोडाशाचा याग केल्यावर त्याच्या मागोमागच 'पूषा' देवतेसाठी चरूचा निर्वाप करावा, आणि तो शिजल्यावर 'पूषा' देवतेसाठी त्याचे यजन करावे. कारण इंद्राग्नींच्या

मागोमाग 'पूषा' हा देखील इंद्रियसामर्थ्य अर्थात् मनोधैर्य देणारा देव आहे. यास्तव, त्याचे यजन केले असतां यजमानाने जणू काय पूषा देवाला स्वकीय किंवा प्रिय अशा हविर्भागासह त्याचे जवळ जाऊन त्याला तो समर्पण केल्याप्रमाणे होते. व त्यायोगाने संतुष्ट झालेला 'पूषा' देव त्या यजमानाला इंद्राग्नींच्या प्रमाणेच इंद्रियसामर्थ्य देतो.

जनतेमध्ये आपण प्रतिष्ठेला प्राप्त व्हावे असे ज्याला वाटत असेल त्या यजमानाने जनतेमध्ये अर्थात् विद्वत्सभेत येऊन पोचताच क्षेत्रपतिदेवतेच्या उद्देशाने 'चरू' शिजवून त्याचा याग करावा. क्षेत्रे ही भूमीचाच भाग असल्यामुळे ही भूमी म्हणजेच क्षेत्रपती अर्थात् क्षेत्रपालक अशी देवता होय. यास्तव, आता सांगितल्याप्रमाणे यजन केले असता तो यजमान या भूमीच्या ठिकाणी अर्थात् भूभागापैकी कोणत्याही क्षेत्रात असलेल्या जनतेमध्ये प्रतिष्ठित होतो.

आपण वीर्यवान् व्हावे अशी इच्छा असेल त्या यजमानाने क्षेत्रपती देवतेसाठी चरूचे यजन केल्यानंतर इंद्राग्नींच्या साठी एकादशकपालात्मक पुरोडाशाचे निर्वपण करून त्याचा याग करावा. म्हणजे तो यजमान या भूमीवर प्रतिष्ठा पावल्यावर आपल्या आत्म्याच्या ठिकाणी इंद्रियजन्य सामर्थ्य धारण करतो. (अनुवाक १).

अमावास्या व पौर्णमासी किंवा पूर्णिमा या दोन दिवसांना 'पर्व' अशी संज्ञा आहे. प्रत्येक पर्वदिवशी 'अन्वाधान' संज्ञक काही कर्म करावयाचे असून दुसऱ्या म्हणजे प्रतिपदेच्या दिवशी त्या त्या पर्वदिनानिमित्त इष्टी करावयाची असते. अमावास्यानिमित्तक इष्टीला अमावास्येष्टी, 'दर्श' किंवा 'दर्शेष्टी' हे नांव असून पूर्णिमानिमित्तक इष्टीला 'पूर्णमास', पौर्णमासी किंवा 'पौर्णमासेष्टी' अशी नांवे आहेत. इष्टी, याग व यजन हे तिन्ही शब्द समानार्थक आहेत. प्रत्येक अग्निहोत्र्याला दर्श व पूर्णमास या नांवाच्या दोन इष्टी कराव्या लागतात अर्थात् ह्या दोन्ही इष्टी किंवा याग नियमाने करणाऱ्या अग्निहोत्र्यास 'दर्शपूर्णमासयाजी' अशी संज्ञा आहे.

जो कोणी 'दर्शपूर्णमासयाजी' असून अमावास्येष्टी किंवा पौर्णमासेष्टी अंतरील म्हणजे वक्तशीर करणार नाही त्याने आपले कर्तव्य चुकविल्याच्या अपराधाचे प्रायश्चित म्हणून 'अग्निः पथिकृत्' देवतेला उद्देशून आठ कपालांवर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचा याग करावा. प्रत्येक पर्वानिमित्त न चुकविता

अगदी नियमाने इष्टी करणे हा सरळ मार्ग असून कसल्याही प्रकारच्या प्रमादाने कोणतीही पर्वनिमित्तक इष्टी न करणें हा 'अपथ' म्हणजे आडमार्ग होय. अर्थात् जो कोणी दर्शपूर्णमासयाजी असून अमावास्येष्टी, अर्थात् दर्शेष्टी किंवा पौर्णमासेष्टी अंतरील म्हणजे वक्तशीर करण्याचे चुकेल त्याने जणू काय सरळ मार्गाने जावयाचे सोडून आडमार्गाने गेल्यासारखे होते. यास्तव, अशा यजमानाने आपल्या हातून घडलेल्या अपराधाचे प्रायश्चित म्हणून पूर्वी सांगितल्याप्रमाणे 'अग्निः पथिकृत्' देवतेसाठी अष्टकपालात्मक पुरोडाशाचा याग करावा. म्हणजे त्या यजमानाने जणू काय 'अग्निः पथिकृत्' देवतेला प्रिय असा हविर्भाग घेऊन तिच्या जवळ गेल्यासारखे व तो भाग तिला अर्पण केल्यासारखे होते. त्या योगाने संतुष्ट झालेला तो 'अग्निः पथिकृत्' नामक देव त्या यजमानाला आडमार्गावरून काढून सरळ मार्गाने घेऊन जातो. या यागाच्या सांगतेसाठी एक ओझे वाहणारा बैल दक्षिणा म्हणून द्यावा. दक्षिणा म्हणून दिला जाणारा हा बैल यजमानाच्या समृध्दीला कारणभूत होतो.

गार्हपत्यादि तीन अग्नी जो धारण करतो, म्हणजे बाळगतो त्याला आहिताग्नी असे म्हणतात . जो आहिताग्नी असून अव्रत्यासारखे वर्तन करील, म्हणजे सत्यभाषण, शुचिर्भूतपणा इत्यादि व्रतांचे किंवा नियमांचे पालन न करता स्वैरपणाने वागेल, त्याने आपल्या हातून घडलेल्या स्वैरपणाने वागण्याच्या अपराधाच्या प्रायश्चितार्थ अग्निर्व्रतपतिः अर्थात् व्रताचे पालन करणाऱ्या अग्निदेवाच्या उद्देशाने अष्टकपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करावा. म्हणजे आठ कपालांच्या समूहावर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचा याग करावा. असे केले असता त्या आहिताग्नीने जणू काय 'अग्निर्व्रतपतिः' देवाचा स्वकीय असा हविर्भाव घेऊन त्याच्याजवळ गेल्यासारखे व त्याला तो हविर्भाव समर्पण केल्यासारखे होते. आणि त्या हविर्भागाने संतुष्ट झालेला 'अग्निर्व्रतपतिः' हा देव त्या आहिताग्नीला व्रताला म्हणजे व्रतानुसारी आचरणाला प्राप्त करवितो. अर्थात् तो 'व्रत्य' म्हणजे योग्य असे व्रताचरण करणारा होतो.

ज्याला राक्षस बाधा करीत असतील त्याने 'अग्नी रक्षोहा' म्हणजे राक्षसांना मारणाऱ्या अग्नीच्या उद्देशाने अष्टकपालात्मक पुरोडाशाचा याग करावा. म्हणजे त्या यजमानाने 'अग्नी रक्षोहा' देवतेचा स्वकीय भाग घेऊन त्याच्याजवळ गेल्याप्रमाणे व त्याला तो भाग समर्पण केल्याप्रमाणे होते. आणि मग तो

संतुष्ट झालेला 'अग्नी रक्षोहा' त्या यजमानापासून त्या राक्षसांना दूर नेऊन मारतो. या यागानिमित्त पुरोडाशाचा निर्वाप करून त्याचा याग करावयाचा तो मध्यरात्री करावा. कारण मध्यरात्री राक्षस संचार करीत असतात. यास्तव, त्यावेळी निर्वापपूर्वक याग केल्याच्या योगाने राक्षस संचार करू लागताक्षणीच त्यांचा नाश केला जातो.

राक्षसांचा यज्ञभूमीत संचार होऊ नये म्हणून पडदा लावून बंदिस्त केलेल्या यज्ञभूमीमध्ये याग करावा. राक्षसांचा नाश व्हावा म्हणून यागाचे वेळी होत्याने 'रक्षोहणं वाजिनं' व 'वि ज्योतिषा' या 'रक्षोघ्नी' म्हणजे राक्षसांचा नाश करणाऱ्या 'याज्यानुवाक्या' पठण कराव्यात.

शत्रूला मारण्याची इच्छा करणाऱ्या यजमानाने 'अग्नी रुद्रवान्' देवाच्यासाठी आठ कपालांवर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचा याग करावा. रुद्र ही अग्नीची भयानक अशी तनूच आहे. यास्तव, 'अग्नी रुद्रवान्' म्हणजे भयानक असे शरीर धारण करणाऱ्या अग्निदेवाला संतुष्ट केला असता यजमानाने जणू काय त्या शत्रूला सर्व बाजूंनी जखमी करून अग्नी रुद्रवान् देवतेच्या स्वाधीन केल्यासारखे होते, व तो शत्रू तात्काळ संकटग्रस्त होतो.

सुरभी म्हणजे सुगंध सुगंधाने युक्त असणारा तो सुरभिमान् ज्याच्या गाई किंवा घरातील व्यक्ती मरत असतील अथवा अपमृत्यूपासून ज्याला भीती उत्पन्न झाली आहे, अशा यजमानाने 'अग्निः सुरभिमान्' अर्थात् सुंगधयुक्त अशा अग्निदेवाला संतुष्ट करण्यासाठी अष्टकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचा याग करावा. कारण अग्नीचे सुगंधयुक्त शरीर म्हणजे जणू काय मूर्तिमंत औषधीच होय. यास्तव, पूर्वोक्त यागाने संतुष्ट झालेला तो अग्नी आपल्या सुंगधयुक्त व ओषधीरूप अशा शरीराने त्या यजमानाला जणू काय औषधोपचार करतो. अर्थात् अशा प्रकारचा औषधोपचार यजमानाच्या शरीराला येत असलेली प्रेतासारखी दुर्गंधी दूर करून त्याचे शरीर सुगंधयुक्त अर्थात् आरोग्ययुक्त करण्याला कारणभूत होतो.

क्षामवान् म्हणजे क्षुधायुक्त. क्षुधायुक्त असा जो अग्नी तो 'अग्नि: क्षामवान्'. युध्दासाठी रणांगणावर प्राप्त झाल्यावर विजयेच्छू अशा यजमानाने 'अग्नि:क्षामवान्' या देवाच्या उद्देशाने अष्टकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचा याग करावा. त्या योगाने उचित असा हविर्भाग देऊन त्या अग्नीला

शांत केल्यावर यजमानाने जणू काय शत्रूंना अग्नीने त्यांना मारावे म्हणून त्याच्या समोर उभे करून त्याला प्रदर्शित केल्यासारखे होते. आणि असे झाले म्हणजे स्वकीय सैन्यातील ज्या पुरुषावर शत्रू घाला घालील तो जिवंत राहील आणि शत्रूसैन्यातील ज्या पुरुषावर यजमानाच्या सैन्यातील वीर घाला घालतील तो मरेल. अर्थात् यजमान युध्दात जय मिळवील.

ज्या भावांमध्ये थोर व लहान असे भाऊ, ओळीने मरतील अशा प्रसंगी क्षामवान् अर्थात् क्षुधेने व्याकुल झालेल्या अग्नीनेच त्याच्यावर नजर ठेऊन त्यांच्यावर झडप घातली असे समजावे. कारण पुरुषरूपी आहुती ह्या अग्नीला अत्यंत आवडत असते. यासाठी ज्याचे लहान थोर भाऊ ओळीने मृत्यू पावतील त्या यजमानाने 'अग्नि:क्षामवान्' देवाच्या संतोषासाठी आठ कपालांवर पुरोडाश भाजून त्याचा याग करावा. म्हणजे त्या यजमानाने क्षामवान् अग्नीला शांत केल्यासारखे होते. आणि मग यजमानाच्या त्या बंधूपैकी जो ज्येष्ठ असेल त्याच्या देखत कोणताही कनिष्ठबंधू आयुष्य पूर्ण होण्यापूर्वी अपमृत्यूने केव्हाही मरत नाही.

ज्याची घरे आग लागून जळतात त्या मनुष्याच्या घरावर क्षामवान् अग्नीने डोळा ठेवून त्यावर झडप घातली असे समजावे. यास्तव, ज्याच्या घरांना अग्नी दग्ध करील म्हणजे आग लागेल त्या यजमानाने 'अग्नि:क्षामवान्' देवाच्या उद्देशाने अष्टकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचा याग करावा म्हणजे त्या यजमानाने क्षामवान् अग्नीला उचित असा भाग देऊन शांत केल्यासारखे होते. मग त्या यजमानाच्या घरांना अग्नी पुन्हा केव्हाही दग्ध करीत नाही. (अनुवाक २).

मनात चिंतिलेले कार्य सफल होत नाही, अशा यजमानाने 'अग्नि: काम:' अर्थात् इच्छिलेले कार्य सफळ करून देणारा जो देव, त्याच्या उद्देशाने आठ कपालांवर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचा याग करावा.म्हणजे त्या यजमानाने इच्छित कार्य सफल करणाऱ्या अग्निदेवाच्या स्वकीय अशा हविर्भागासह त्याच्या जवळ जाऊन तो त्याला अर्पण केल्यासारखे होते, व त्या योगाने संतुष्ट झालेला तो अग्नी त्या यजमानाला त्याने चिंतिलेल्या कार्याच्या सफलतेने समृध्द करतो. अर्थात् यजमान जो जो मनोरथ करील तो तो सफलतेला प्राप्त होतो.

एखाद्या जमीनी: ाने एखाद्या माणसाविषयी किंवा आपल्याशी वैर करणाऱ्या भाऊबंदाच्या विषयी ज्याच्या मनात स्पर्धा उत्पन्न झाली आहे, अशा यजमानाने ' अग्निर्यविष्ठः' म्हणजे अत्यंत वियोग करणाऱ्या अशा अग्निदेवाला उद्देशून अष्टकपालात्मक पुरोडाशाचा याग करावा. म्हणजे त्या यजमानाने 'अग्निर्यविष्ठः' नामक देवाला प्रिय अशा हविर्भागासह त्याच्याजवळ जाऊन तो त्याला समर्पण केल्या प्रमाणे होते. व त्यामुळे संतुष्ट झालेल्या त्या अग्निदेवाच्या अनुग्रहानेच आपल्या शत्रूचे इंद्रियगत सामर्थ्य त्याच्या पासून वियुक्त म्हणजे दूर करतो, व स्वत:ही त्या वैऱ्याशी वियुक्त होऊन त्या वैऱ्याला स्पर्धेमध्ये जिंकतो.

एखादा आपला वैरी आपल्यावर 'अभिचार' म्हणजे मारणप्रयोग करीत आहे, असे ज्याला समजून येईल, त्या यजमानाने 'अग्निर्यविष्ठ:' देवाच्या तृप्ततेसाठी आंठ कपालांवर पुरोडाश भाजून त्याचा याग करावा. म्हणजे त्या योगाने त्या देवाला प्रिय असलेल्या हविर्भागासह यजमानाने त्याच्याजवळ जाऊन तो त्याला अर्पण केल्यासारखे होते. व त्या योगाने संतुष्ट झालेला तो 'अग्निर्यविष्ठ:' देव वैऱ्याने केलेल्या मारणप्रयोगामुळे त्या यजमानाला मारावयास येणाऱ्या राक्षसांना त्याच्या पासून अत्यंत दूर करतो, अर्थात् वैरी मारणप्रयोग करीत असतांना देखील पूर्वोक्त याग करणाऱ्या यजमानाला मारू शकत नाही.

संपूर्ण अशा आयुष्याच्या अंतिम मर्यादेपर्यंत आपण जगावे अशी ज्याला इच्छा असेल त्याने 'अग्निरायुष्मान्' म्हणजे आयुष्यप्रद अशा अग्नीकरता अष्टकपालात्मक म्हणजे आठ कपालांवर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचे यजन करावे. असे केले असता यजमानाने जणू काय 'अग्निरायुष्मान्' देवाला स्वकीय वाटणारा हविर्भाग घेऊन त्याच्या जवळ गेल्यासारखे आणि त्याला अर्पण केल्यासारखे होते. त्या योगाने संतुष्ट झालेला तो आयुष्प्रद अग्नी त्या यजमानाच्या ठिकाणी आयुष्य धारण करतो व तो यजमान संपूर्ण अशा आयुर्मर्यादेपर्यंत जगतो.

आपल्याला आयुष्य प्राप्त व्हावे, अशी इच्छा असेल त्या यजमानाने 'अग्निर्जातवेदा:' या देवाला उद्देशून अष्टकपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करून त्याचा याग करावा. म्हणजे त्या योगाने यजमानाने जणू काय 'अग्निर्जातवेदा:' या देवाचा स्वकीय हविर्भाग घेऊन त्याच्या जवळ गेल्याप्रमाणे व तो भाग

त्याला अर्पण केल्याप्रमाणे होते. आणि त्यामुळ संतुष्ट झालेला, धनासहच उत्पन्न झालेला तो अग्निदेव त्या यजमानाला ऐश्वर्याला नेऊन पोचवितो. अर्थात्, तो ऐश्वर्याला निश्चितपणे प्राप्त होतो.

आपण उत्कृष्ट अशा शरीरकांतीने युक्त व्हावे अशी इच्छा असेल, त्या यजमानाने 'अग्नि रूक्मत्' नामक कांतिमान् देवाच्या संतोषासाठी अष्टकपालात्मक पुरोडाशाचे निर्वपन करून त्याचा याग करावा. म्हणजे त्या यजमानाने 'अग्नि रुक्मत्' या देवाचा स्वकीय अशा हविर्भागासह त्याच्या सन्निध जाऊन तो त्याला अर्पण केल्यासारखे होते. आणि मग संतुष्ट झालेला तो कांतिमान् अग्निदेव त्या यजमानाच्या ठिकाणी कांती धारण करतो. अर्थात् तो यजमान उत्कृष्ट शरीरकांतीने युक्त होतो.

तेजस्वी होण्याची इच्छा करणाऱ्या यजमानाने 'अग्निस्तेजस्वत्' म्हणजे तेजःसंपन्न अशा अग्निदेवासाठी अष्टकपालात्मक पुरोडाशाचा याग करावा. असे केले असता यजमानाने स्वकीय अशा हविर्भागासह तेजःसंपन्न अशा अग्निदेवाजवळ जाऊन तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. व त्यामुळे संतुष्ट झालेला तो तेजस्वी अग्निदेव त्या यजमानाच्या शरीराचे ठिकाणी तेज उत्पन्न करून ठेवतो. अर्थात् तो तेजस्वी होतोच होतो.

आपल्या वैऱ्याचा पराभव करण्याची इच्छा असेल त्या यजमानाने 'अग्निःसाहंत्यः' म्हणजे वैऱ्यांचा पराभव करणारा जो अग्निदेव, त्याच्या संतोषासाठी अष्टकपालात्मक पुरोडाचे निर्वपण करून त्याचा याग करावा. म्हणजे यजमानाने जणू काय वैऱ्यांचा पराभव करणाऱ्या त्या अग्निदेवाच्या स्वकीय अशा हविर्भागासह त्याच्या जवळ जाऊन तो त्याला समर्पण केल्या सारखे होते. आणि त्या योगाने संतुष्ट झालेल्या त्या अग्निदेवाच्या अनुग्रहाने तो यजमान ज्या वैऱ्याचा पराभव इच्छित असेल त्या वैऱ्याचा निश्चित पराभव करतो. (अनुवाक ३).

मी भरपूर अशा अन्नाने संपन्न व्हावे अशी इच्छा करणाऱ्या यजमानाने 'अग्निरन्नवान्' अर्थात् बहुत अन्नाने युक्त असा जो अग्निदेव त्याच्या संतोषासाठी अष्टकपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करून त्याचा याग करावा. असे केले म्हणजे यजमानाने जणू काय स्वकीय अशा हविर्भागासह अन्नवान् अशा अग्निदेवाजवळ जाऊन तो त्याला अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या हविर्भागाने संतुष्ट झालेला तो अन्नवान् अग्निदेव त्या यजमानाला भरपूर अशा अन्नाने

युक्त करतो. अर्थात् तो भरपूर अन्नाने संपन्न होतो.

आपण सेवनीय असे अन्न भक्षण करणारा व्हावे अशी इच्छा करणाऱ्या यजमानाने 'अग्निरन्नाद:' म्हणजे बह्वन्नभक्षक अशा अग्निदेवाला उद्देशून अष्टकपालात्मक पुरोडाशाचे यजन करावे. म्हणजे यजमानाने जणू काय बह्वन्नभषक अशा अग्निदेवाचा स्वकीय भाग बरोबर घेऊनच त्याच्याजवळ गेल्या सारखे व तो भाग त्याला समर्पण केल्यासारखे होते. आणि त्या हविर्भागाने संतुष्ट झालेला तो अग्निदेव त्या यजमानाला सेवनीय अशा अन्नाचे भक्षण करणारा बनवितो. व तो निश्चयाने तसा होतो.

मी अन्नाचा पालक व्हावे अशी जो इच्छा करील त्याने 'अग्निरन्नपति:' म्हणजे अन्नपालक अशा अग्निदेवासाठी अष्टकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचा याग करावा. म्हणजे त्या यजमानाने अन्नपती अशा अग्निदेवाचा स्वकीय असा हविर्भाग घेऊन त्याच्या जवळ गेल्यासारखे व तो भाग त्याला समर्पण केल्यासारखे होते. मग, त्या हविर्भागाने संतुष्ट झालेला तो अन्नपती अग्निदेव त्या यजमानाला अन्नाचा पालक करतो. अर्थात् तो अन्नपालक होतो.

दीर्घकालीन रोगाने ग्रस्त झालेल्या यजमानाने रोगमुक्ततेसाठी 'अग्नि:पवमान्' 'अग्नि:पावक:', व 'अग्नि:शुचि:' या तीन अग्निदेवांच्यासाठी प्रत्येकी अष्टकपालात्मक पुरोडाश तयार करून त्यांचा याग करावा. पवमान अग्नीसाठी जो पुरोडाश तयार केला जातो, त्या यागाच्या योगाने पापांचे शोधन करणारा तो अग्निदेव त्या यजमानाच्या ठिकाणी प्राण धारण करतो, पावक म्हणजे पापांच्यापासून होणाऱ्या दोषांची शुध्दी करणाऱ्या अग्निदेवतेसाठी जो पुरोडाश केला जातो, त्या योगाने संतुष्ट झालेला तो अग्निदेव त्या यजमानाचे ठिकाणी वाणीचे धारण करतो. आणि शुची म्हणजे उज्वलता प्राप्त करून देणाऱ्या अग्निदेवासाठी जो पुरोडाश याग केला जातो, त्याच्या योगाने तृप्त झालेला तो अग्निदेव त्या यजमानाचे ठिकाणी आयुष्य धारण करतो. सारांश, अशा प्रकारचा याग केल्याने गतप्राण झालेला यजमान देखील जिवंत होईल. मग जिवंत असलेला यजमान पूर्वोक्त यागाने दीर्घकालीन रोगातून मुक्त होऊन निरोगी होईल यात काय संशय?

डोळ्यांना झालेली व्याधी दूर होऊन आपल्या डोळ्यांना उत्तम दिसू लागावे अशी इच्छा असलेल्या यजमानाने आताच सांगितल्याप्रमाणे तीन अग्निदेवांना

उद्देशून तोच याग म्हणजे इष्टी करावी. 'पवमान' संज्ञक अग्नीला उद्देशून जे यजन केले जाते त्या यागाने संतुष्ट झालेला तो अग्निदेव इष्टिकर्त्या यजमानाच्या ठिकाणी प्राण धारण करतो, 'पावक' नांवाच्या अग्नीला उद्देशून जे यजन केले जाते, त्या योगाने संतुष्ट झालेला तो अग्निदेव त्या यजमानाच्या ठिकाणी वाणीचे धारण करतो. आणि शुची संज्ञक अग्नीकरता जी इष्टी केली जाते, तिच्या योगाने संतुष्ट झालेला तो अग्निदेव त्या इष्टिकर्त्या यजमानाच्या डोळ्यांचे ठिकाणी उत्कृष्ट अवलोकनशक्तीचे धारण करतो. सारांश, अशा प्रकारे याग करणारा यजमान नेत्ररोगाने अंध झाला असला तरी देखील तो पुन्हा उत्कृष्ट अशा दृष्टीने युक्त होऊन सर्व वस्तूंना स्वच्छ पाहू शकतो.

ज्याला पुत्रपौत्रादिक प्रजा प्राप्त व्हावी अशी इच्छा असेल त्या यजमानाने 'अग्निः पुत्रवान्' नामक देवाला उद्देशून अष्टकपालात्मक आणि 'इंद्रः पुत्री' देवाला उद्देशून एकादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्यांचा अनुक्रमे याग करावा. त्या योगाने संतुष्ट झालेला अग्नी त्या यजमानाच्या ठिकाणी पुत्रपौत्रादिक प्रजा निर्माण करतो आणि इंद्र पुत्रपौत्रादिक परंपरेने वाढणारी प्रजा त्या यजमानाला प्राप्त करून देतो.

क्षीरदध्यादि, म्हणजे दूध, दही इत्यादि रसांनी आपण संपन्न व्हावे अशी इच्छा करणाऱ्या यजमानाने 'अग्निः रसवान्' म्हणजे क्षीरादिरससंपन्न अशा अग्निदेवाच्या उद्देशाने शेळीच्या दुधात तांदुळाचा चरू शिजवून त्याचे यजन करावे. म्हणजे यजमानाने जणू काय रससंपन्न अशा अग्निदेवाला स्वकीय म्हणजे प्रिय वाटणारा हविर्भाग घेऊन त्याच्या सन्निध गेल्यासारखे व त्याला तो भाग समर्पण केल्यासारखे होते व त्या योगाने संतुष्ट झालेला रससंपन्न असा तो अग्निदेव त्या यजमानाला आपल्या अनुग्रहाने रससंपन्न करतो. अर्थात्, तो दुग्धदध्यादि रसाने संपन्न होतो. या यागामध्ये म्हणजे इष्टीमध्ये शेळीच्या दुधात चरू शिजवावा म्हणून सांगितले याचे कारण, अग्नी जसा प्रजापतीच्या मुखापासून उत्पन्न झाला आहे तशीच 'अजा' म्हणजे शेळीही झालेली आहे. अर्थात्, तिचे अग्नीशी सहोदरत्वाचे नाते असल्यामुळे तीही 'आग्नेयी' म्हणजे अग्निसंबध्द अशीच आहे. यास्तव तिच्या दुधात चरू शिजविला असता त्याच्या प्रभावाने यजमान सत्वर रस संपादन करू शकतो.

आपण धनसंपन्न व्हावे अशी इच्छा करणाऱ्या यजमानाने 'अग्निर्वसुमान्'

म्हणजे धनाने युक्त असा जो अग्निदेव, त्याला उद्देशून आठ कपालांवर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचा याग करावा. तसे केले असता यजमानाने जणू काय धनवान् अशा अग्निदेवाचा स्वकीय हविर्भाग घेऊन त्याच्या सन्निध गेल्याप्रमाणे, व तो त्याला समर्पण केल्याप्रमाणे होते. आणि त्या हविर्भागाने संतुष्ट झालेला तो धनवान् अग्निदेव आपल्या प्रमाणेच यजमानाला धनसंपन्न करतो. अर्थात्, तो निश्चयाने धनसंपन्न होतो.

जो कोणी आपल्या शत्रूशी युद्ध करण्यास प्रवृत्त झालेला असतो, तो जय मिळविल्यानंतर शत्रुपक्षाकडे जेवढे म्हणून अन्न असेल ते सर्व आपणास मिळावे अशी इच्छा करीत असतो. यास्तव, आपल्या शत्रूशी चाललेले युध्द जिंकावे अशी ज्याची इच्छा असेल त्याने 'अग्निर्वाजसृत्' म्हणजे अन्नाची प्राप्ती करून देणाऱ्या अग्निदेवाच्या संतोषासाठी आठ कपालांवर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाची इष्टी करावी. कारण अग्नी हाच देवांना अन्न प्राप्त करून देणारा आहे. म्हणून त्याच्यासाठी इष्टी केली असता, त्या यजमानाने जणू काय अन्न प्राप्त करून देणाऱ्या अग्निदेवाचा स्वकीय भाग बरोबर घेऊनच त्याच्या सन्निध गेल्यासारखे व तो त्याला अर्पण केल्यासारखे होते. आणि मग तो, त्या अग्निदेवाच्या अनुग्रहाने शत्रूला ठार करतो. अर्थात्, युद्ध जिंकतो व त्याचे सर्व अन्न मिळवितो. शिवाय, अग्नीप्रमाणेच तो कोणाकडूनही तिरस्कार करण्याला पात्र होत नाही.

गार्हपत्याग्नीमधून थोडा अग्नी काढून आहवनीयाचे कुंडात ठेवण्यात येत असून त्यावर अग्निहोत्र होम दिला जातो. ज्या यजमानाच्या संबंधी मनुष्यांकडून म्हणजे होमासाठी नियोजित केलेल्या मनुष्यांकडून आहवनीयाच्या कुंडात एकदा गार्हपत्यातील अग्नी नेऊन स्थापित केला असतांना विस्मरणामुळे त्या अग्नीमध्येच पुन्हा आणखी गार्हपत्यातील अग्नी आणून घातला गेला तर त्या यजमानाने 'अग्निरग्निवान्' नामक देवाला उद्देशून अष्टकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचा याग करावा. कारण, आहवनीयाचे आयतनात म्हणजे कुंडात जे दोन अग्नी घातले गेलेले असतात, त्यांपैकी प्रथम घातला गेलेला जो अग्नी तोच खरोखर निर्दिष्टभाग म्हणजे हविर्भाग देण्यासाठी नियोजित केलेला असून मागाहून घातलेला अग्नी हा वस्तुतः 'अग्निरनिर्दिष्टभागः' म्हणजे हविर्भाग देण्यासाठी नियोजित केलेला नसतो. सारांश हे परस्परांमध्ये मिश्रित

झालेले दोन्ही अग्नी यजमानावर करडी नजर ठेवून त्याला भक्षण करण्यास प्रवृत्त होत असतात. आणि त्यामुळे तो यजमान विनाशाला प्राप्त होत असतो. यास्तव, अशा यजमानाने जर 'अग्निरग्निवान्' म्हणजे अग्नियुक्त अशा अग्निदेवासाठी पूर्वोक्त पुरोडाशाचे निर्वपण करून यजन केले तर त्या यजमानाने 'निर्दिष्टभाग' व 'अनिर्दिष्टभाग' अशा दोन्ही अग्नींना हविर्भाग देऊन शांत केल्यासारखे होते. आणि त्यामुळे तो यजमान विनाशरूप संकटाने त्रस्त होण्याला पात्र होत नाही.

ज्या यजमानाचा अग्निहोत्र होम करण्याकरिता गार्हपत्याग्नीतून काढून आहवनीयाचे कुंडात आणून ठेवलेला अग्नी जर होम करण्यापूर्वी विझून गेला तर त्या यजमानाने 'अपर' म्हणजे पश्चिम बाजूस असलेला गार्हपत्य चांगला प्रदीप्त करावा. आणि पूर्वीप्रमाणेच त्यातला अग्नी काढून आहवनीयाचे कुंडात नेऊन स्थापन करावा आणि नंतर अंग्निहोत्र होम व प्रायश्चित्तार्थ पूर्वोक्त इष्टी म्हणजे याग करावा, असे एक मत आहे. पण सिध्दान्तवादी म्हणतात की, तसे करू नये. कारण अग्निहोत्रहोमासंबंधी जो हविर्भाग देण्याला अनुलक्षून आहवनीयाचे कुंडात पूर्वी जर एकदा अग्नी स्थापन केला गेला आहे, तर तोच हविर्भाग देण्याला अनुलक्षून दुसरा अग्नी काय म्हणून उद्धृत करावा? म्हणजे गार्हपत्यातून पुन्हा अग्नी काढून आहवनीयाचे कुंडात काय म्हणून स्थापन करावा? असे करणे अनुचित आहे. यास्तव, आहवनीयाचे कुंडातील विझलेल्या अग्नीची जी काष्ठे असतील ती खाली पसरून त्यावर अरणी ठेवाव्यात आणि त्यांचे मंथन करून अग्नी निर्माण करावा. आणि तो आहवनीयाचे कुंडात ठेवून त्यावर होमादि पुढची कार्ये करावीत. अरणीचे मंथन करतांना ''या काष्ठांतूनच प्रथम अग्नी उत्पन्न म्हणजे प्रज्वलित झालेला होता, आताही तो उपजत ज्ञानी अग्नी गायत्र्यादि छंदांनी अनुगृहीत होऊन स्वत:चे जन्मस्थानच अशा या काष्ठांपासून पुन्हा उत्पन्न होवो, आणि त्या त्या देवांना जाणून त्यांना यजमानाने दिलेले हविर्द्रव्य वाहून नेवो'', या अर्थाचा 'इत: प्रथमं' हा मंत्र म्हणावा. असे केल्याने यजमानाने जणू काय गायत्र्यादि छंदांच्या अनुग्रहाने त्याच्या स्वकीय अशा जन्मस्थानांतून त्या अग्नीला उत्पन्न केल्याप्रमाणे होते. अहो, गार्हपत्यातून पुन्हा काढून आणलेला अग्नी जसा आहवनीयाचे कुंडात प्रथम आणून ठेवलेल्या अग्नीहून भिन्न म्हणजे दुसराच व्हावयाचा तसाच आता मंथनोत्पादित अग्नी पूर्वस्थापित अग्नीहून

भिन्न अर्थात् दुसराच होणार ना.? अशी यावर कोणी शंका घेईल. परंतु बाह्य दृष्टीला जरी हा मंथनोत्पादित अग्नी भिन्न भासत असला तरी, तत्त्वदृष्ट्या तो विझलेल्या काष्ठरूपी स्वकीय जन्मस्थानातूनच जणू काय उत्पन्न झाला असल्यामुळे तो भिन्न नसून पूर्वी स्थापन केला होता तोच आहे, असे म्हणून सिद्धांतवादी शंकेचे समाधान करतात. यावर पुन्हा काही विद्वान् अशी शंका घेतात की, मंथनोत्पादित अग्नी जर भिन्न नसून पहिलाच आहे, तर मग प्रायश्चित्तार्थ इष्टी कशा करता करावयाची? पण या शंकेचे समाधान असे की, आहवनीयाचे कुंडात प्रथम स्थापित अशा अग्नीचे ज्वालेच्या योगाने व्यक्त होणारे प्रकाशरूपच केवळ नष्ट झालेले असते, अग्नी नष्ट झालेला नसतो. तो तत्त्वदृष्ट्या कायमच असतो. यासाठी 'ज्योतिष्मान्' अग्नीला उद्देशून पूर्वी सांगितल्याप्रमाणे जर यजमान इष्टी करील, तर त्या अग्नीचे जे प्रकाशात्मक स्वरूप नष्ट झालेले असते, ते त्याला पुन्हा संपादन करून दिल्याप्रमाणे होते.

एखादे पातक केल्याचा आरोप येऊन दूषित झाला असेल त्याने 'वैश्वानर' देवतेसाठी द्वादशकपालावर भाजलेला पुरोडाश, वरुण देवतेसाठी तांदुळाचा शिजविलेला चरू व 'दधिक्रावन्' देवतेसाठीही शिजविलेला चरू या हर्विद्रव्यांचे अनुक्रमे यजन करावे. संवत्सराचा अभिमानी असलेला अग्नी म्हणजेच वैश्वानर होय. म्हणून वैश्वानर देवतेच्या उद्देशाने जो द्वादशकपालात्मक पुरोडाशाचा याग केला जातो, त्या योगाने जणू काय यजमान संवत्सराभिमानी असलेल्या अग्नीकडून पातकाचा आळ आलेल्या स्वतःच्या आत्म्याला तो आपल्या बंधुजनांना प्रिय होईल असा करतो. अर्थात्, पातकाच्या आरोपामुळे त्या यजमानाविषयी त्याच्या बांधवांमध्ये जी अप्रियता उत्पन्न झालेली असते, ती दूर करतो. ते पातक नष्ट करतो. वरुणदेवतेसाठी जो चरुभाग केला जातो, त्या योगाने यजमान जणू काय पातकी माणसाला बांधून नेण्याकरता पसरलेला जो वरुणपाश असतो, त्या पाशातून स्वतःच्या आत्म्याला मुक्त करतो आणि 'दधिक्रावन्' देवतेसाठी चरूचा जो याग केला जातो, त्या योगाने यजमान जणू काय स्वतःच्या आत्म्याला पवित्र करतो. या यागाच्या सांगतेसाठी सुवर्ण दक्षिणा म्हणून द्यावे. म्हणजे ते त्या याग कर्त्याला पवित्र करते व त्याला सेवनीय असे अन्न मिळण्याला कारणभूत होते.

आपणास प्रजा प्राप्त व्हावी अशी इच्छा असेल, त्या यजमानाने

आता सांगितलेली हीच इष्टी म्हणजे याग करावा. जो कोणी प्रजोत्पत्तीला समर्थ असूनही त्याला प्रजा प्राप्त होत नाही त्या पुरुषाचे प्रजोत्पत्तिस्थान अर्थात् त्याच्या स्त्रीचे गर्भधारणस्थान आणि गाई म्हशी इत्यादि पशुस्त्रियांचे गर्भधारणस्थान, अशांत असलेला 'संवत्सर' पूर्णपणे जाळून टाकीत असतो असे समजावे. संवत्सर म्हणजेच वैश्वानरसंज्ञक अग्नी होय. यास्तव, वैश्वानर देवतेच्या उद्देशाने जो द्वादशकपालात्मक पुरोडाशाचा याग केला जातो त्या योगाने यजमानाने जणू काय संवत्सररूप वैश्वानराग्नीलाच त्याला उचित असा हविर्भाग देऊन शांत केल्यासारखे होते. मग शांत झालेला तो वैश्वानरदेव त्या यागकर्त्या यजमानाला प्रसन्न होतो, आणि मग त्या वैश्वानरदेवाच्या अनुग्रहाने तो यजमान स्वकीय स्त्रीच्या प्रजोत्पादनाला योग्य झालेल्या गर्भधारणस्थानापासून प्रजा उत्पन्न करतो. तसेच वरुणासाठी केलेल्या चरुच्या यजनप्रभावाने वरुणपाशापासून स्वतःला मुक्त करतो. या यागाच्या म्हणजे इष्टीच्या सांगतार्थ सुवर्णच दक्षिणा म्हणून द्यावे. कारण सुवर्ण हे पवित्र आहे. ते त्याला पवित्रच करते आणि तो यजमान प्रजा संपादन करतो.

ज्याला पुत्र होईल त्याने 'वैश्वानर' देवतेच्या उद्देशाने द्वादशकपालात्मक पुरोडाशाचे निर्वपण करून त्याचा याग करावा. बारा कपालांमध्ये आठ कपालांचा जो अंश असतो तो गायत्री छंदाशी समानरूप असतो. कारण गायत्री छंदाचा प्रत्येक चरण आठ अक्षरांचा असतो. गायत्रीछंद हा ब्रह्मवर्चस्‌रूप असा आहे. अर्थात् गायत्री छंदाशी स्वरूप साम्य असलेला तो आठ कपालांचा अंश नवीनच जन्मलेल्या त्या पुत्राला ब्रह्मवर्चसाने म्हणजे वेदाध्ययनजन्य तेजाने पवित्र करतो. तीन ऋचांचा जो एक समूह किंवा गट असतो त्याच्या तीन आवृत्ती केल्या म्हणजे 'त्रिवृत्' नांवाचा 'स्तोम' तयार होतो. तात्पर्य, त्रिवृत् स्तोमामध्ये नऊ या संख्येचा अंतर्भाव होत असतो. बारा कपालांच्या समूहामध्ये नवकपालात्मक अर्थात् नऊ कपालांचा जो अंश किंवा विभाग अंतर्भूत झालेला असतो, तो संख्यासाम्यतेच्या दृष्टीने 'त्रिवृत्' स्तोमाशी समानरूप झालेला असतो. अर्थात् तो नवकपालात्मक विभाग त्या पुत्राच्या ठिकाणी तेज धारण करतो. दहा कपालांचा जो अंश किंवा विभाग असतो, तो चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने 'विराट्' छंदाशी समत्व पावलेला असतो. अर्थात्, विराट्छंदरूप असा तो दशकपालात्मक हविर्भाग त्या पुत्राच्या ठिकाणी सेवनीय असे अन्न धारण करतो. अकरा कपालांचा जो अंश असतो, तो चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने

त्रिष्टुप् छंदाशी स्वरूपसाम्य प्राप्त झालेला असतो. अर्थात् तो एकादशकपालात्मक अंश त्या नवप्रसूत पुत्राच्या ठिकाणी इंद्रियसामर्थ्य धारण करतो. बारा कपालांचा जो समूह असतो, तो चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने जगती छंदाशी साम्य पावलेला असतो. म्हणजे जगतीरूपच तो असतो. अर्थात् तो पुत्राच्या ठिकाणी पशूंचे धारण करतो. सारांश, ज्या पुत्राच्या जन्मासंबंधी ही इष्टी केली जाते, तो पुत्र अत्यंत तेजस्वी, पवित्र, सेवनीय असे अन्न खाणारा, इंद्रिय सामर्थ्याने संपन्न व पशुसंपत्तीने युक्त असा होतोच होतो.

जो दर्शपूर्णमासयाजी असूनही अमावास्येची किंवा पूर्णिमेची इष्टी करण्याचे अंतरील तो स्वर्गलोकापासून तुटला जातो. म्हणजे त्याला स्वर्गलोकाची प्राप्ती होत नाही. आणि दर्शपूर्णमाससंज्ञक दोन इष्टी तर स्वर्गलोकाच्या प्राप्तीसाठीच करावयाच्या असतात. यास्तव, दर्श किंवा पौर्णमास यांपैकी कोणतीही इष्टी करण्यास जो चुकेल त्याने वैश्वानर देवतेच्या संतोषासाठी द्वादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याची इष्टी करावी. संवत्सर हाच वैश्वानर अग्नी होय. यास्तव आता सांगितलेली इष्टी केली असता, त्या यजमानाने संवत्सररूप अशा वैश्वानराग्नीलाच जणू संतुष्ट केल्यासारखे होते. व तो वैश्वानर देव त्या यजमानासाठी संवत्सरच विच्छेदरहित करतो. अशा प्रकारे सर्वच संवत्सर जेथे विच्छेदरहित केला जातो तेथे संवत्सराचे अवयवभूत असलेल्या दर्श किंवा पूर्णिमा निमित्तक दोन दिवसांच्या अनुष्ठानाच्या विच्छेदाची कथा काय? त्यांचा विच्छेद अर्थातच होत नाही. शिवाय, संवत्सर संतुष्ट झाला म्हणजे सर्व देवता संतुष्ट होत असतात. एवं च, इष्टिकर्ता यजमान सर्व देवतांचा आश्रय करतो व त्यांच्या अनुग्रहाने स्वर्गलोकाला प्राप्त होतो.

जो अग्नीचे उद्वासन करतो, तो देवांचा वीर असलेल्या अग्नीची जणू हत्याच करतो. प्राचीनकाळी सत्याची चाड बाळगणारे ब्राह्मण, अशा प्रकारच्या वीरहत्या करणाराच्या घरचे अन्न खात नसत. यासाठी, ज्याला अग्नीचे उद्वासन करावयाचे असेल त्याने अग्निदेवतेसाठी द्वादशकपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करून इष्टी करावी. या इष्टीमध्ये अष्टकपालात्मक जो पुरोडाश होत असतो तो चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने गायत्रीछंदस्वरूपच असतो, कारण गायत्री छंदाच्या प्रत्येक चरणात आठ अक्षरे असतात. अग्नी हा गायत्री छंदाचा सहोदर असल्याने गायत्र म्हणजे गायत्रीछंदस्वरूपच आहे.

सारांश, गायत्रीछंदरूप अशा अष्टकपालात्मक पुरोडाशाचा अग्नीच्या उद्देशाने याग केला असता जेवढा अग्नी आहे तेवढ्याचे यजमानाने आतिथ्य केल्याप्रमाणे होते. शिवाय, ज्याप्रमाणे दूर देशात राहणारा आप्त त्या गावाला जाऊ लागला असता क्षुधेपासून त्याचे संरक्षण व्हावयासाठी त्याला जसे 'पाथेय' म्हणजे काहीतरी फराळाचे करून देतात त्याचप्रमाणे दूर जाणाऱ्या अग्नीला हे पुरोडाशरूप पाथेयच दिल्यासारखे होत असते. वैश्वानर देवतेला उद्देशून जो पुरोडाश केला जातो, तो द्वादशकपालात्मक असतो. संवत्सराचे महिने बाराच असतात व संवत्सर हाच खरोखर अग्नीचे जन्मस्थान आहे. अर्थात् बारा महिन्यांच्याशी संख्यासाम्य असलेल्या कपालसमूहावर तयार केलेल्या संवत्सरस्वरूप अशा पुरोडाशाच्या योगाने संतुष्ट झालेला तो वैश्वानर अग्नी इष्टिकर्त्या यजमानाला संवत्सरस्वरूप अशा स्वकीय जन्मस्थानीच नेऊन पोचवितो. अग्नीच्या अनुग्रहाने त्या यजमानाचे अन्न सर्वांना सेवनीय असे होते.

आपल्याला गांव मिळावा अशी इच्छा असलेल्या यजमानाने वैश्वानर देवतेसाठी द्वादशकपालात्मक व मरुत् नामक देवतेसाठी सप्तकपालात्मक अर्थात् सात कपालांच्या गटावर पुरोडाश तयार करून त्याची इष्टी करावी. वैश्वानर देवतेसाठी जो पुरोडाश तयार करावयाचा त्याचे पीठ आहवनीयाग्नीवर ठेवलेल्या पात्रीतच भाजावे व त्याच अग्नीच्या कुंडामध्ये किंवा बाहेर कपाले मांडून त्यावर पुरोडाश भाजावा. ग्रामप्राप्तीला प्रतिबंधक अशा अत्यंत अधिक पातकाचे निवारण व्हावयासाठी मरुत् नांवाच्या देवाकरता करावयाच्या पुरोडाशाचे पीठ गार्हपत्याग्नीवरच पात्री ठेऊन भाजावे व त्याच अग्नीच्या कुंडात अगर बाहेर जसा परिपाठ असेल त्याप्रमाणे कपाले मांडून त्यावर तो पुरोडाश भाजावा. वैश्वानर हा द्वादशकपालात्मक पुरोडाशरूप हविर्द्रव्याचे सेवन करणारा आहे. संवत्सर हा देखील द्वादशकपालात्मकच असतो. सारांश संख्यासाम्यतेच्या दृष्टीने संवत्सराशी एकरूप असलेल्या कपालसमूहावर तयार केलेल्या पुरोडाशाच्या योगाने संतुष्ट झालेला वैश्वानर देव एका संवत्सरानेच त्या यजमानाच्या पुढे त्याच्या बरोबरीच्या मनुष्यांना नम्रत्वाने वागावयास लावतो.

या इष्टीमध्ये मरुतांच्यासाठी पुरोडाशाचे यजन केले जात असते. 'मरुत्' देवांमधील वैश्य होत. अर्थात् ते यजन त्या देवांमधील वैश्यांच्या म्हणजे मरुतांच्या अनुग्रहानेच त्या यजमानाला मनुष्यामधील वैश्यसमुदायाची

समृध्दी प्राप्त करून देते. मरुतांच्यासाठी केलेला पुरोडाश सात कपालांच्या गटावर भाजलेला असतो. 'मरुत्' हे देखील सप्तगणात्मकच आहेत. म्हणजे मरुतांचे सात समुदाय आहेत. अर्थात् सात कपालांच्या गटावर भाजलेल्या पुरोडाशाचा याग त्या यजमानाला मरुतांच्या अनुग्रहाने अनेक मनुष्यसमुदायांचे अनुकूलच असे संपादन करून देतो.

वैश्वानरसंबंधी असलेल्या पुरोडाशाचे आसादन करणे ते नेहमीप्रमाणे होत्याने सामिधेनीसंज्ञक ऋचा पठण करण्यापूर्वी करावे. परंतु मरुतांच्यासाठी केलेल्या पुरोडाशाचे आसादन मात्र होता सामिधेनीचे पठण करीत असतांना करावे. अशा प्रकारचे केले जाणारे आसादन सर्व मानवी प्रजा त्या यजमानाला अनुसरून वागणारी होईल असे करते. (अनुवाक ५).

आपल्या शत्रूशी युध्द करण्यासाठी जो रणमैदानावर निघाला असेल त्या यजमानाने अदिती देवतेला उद्देशून चरू शिजवावा आणि त्याची इष्टी करावी. ही भूमी म्हणजेच अदिती देवता होय. या इष्टीच्या प्रभावाने पूर्वकाळचे योध्दे युद्ध जिंकल्यावर या भूमीवरच प्रतिष्ठित होत असत. त्याचप्रमाणे हाही यजमान प्रतिष्ठित होतो.

ज्या रणभूमीवर युद्ध व्हावयाचे असेल, त्या ठिकाणी जाऊन पोचल्यावर त्या यजमानाने आपल्याला जय मिळावा म्हणून वैश्वानर देवतेच्या उद्देशाने द्वादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचे यजन म्हणजे इष्टी करावी. संवत्सर हाच खरोखर 'वैश्वानर' संज्ञक अग्निदेव होय. संवत्सराची अभिमानिनी असलेल्या देवतेकडेच भूमिगत बलाचे स्वामित्व असल्यामुळे तिने पालित केलेला भूप्रदेश हेच देवांचे विजयस्थान होय. ह्या संवत्सर देवतेने पालित अशा स्थानापासूनच देवांनी असुरांना जिंकले. यास्तव, 'वैश्वानर' देवतेसाठी पूर्वोक्त इष्टी केली असता यजमानाने जणू काय देवांनी जय संपादन केलेल्या स्थानामध्येच लढून शत्रूंना जिंकण्याचा प्रयत्न केल्यासारखे होते व तो युद्ध जिंकतो.

एकमेकांस मारण्याचे पाप करण्यास प्रवृत्त झालेल्या अर्थात् परस्परांचे वैरी असलेल्या पुरुषांचे जो अन्न खातो त्याच्या ठिकाणी ते परस्परद्वेष्टे पुरुष आपल्या पापाचा लेप करीत असतात. यास्तव, अशाप्रकारे परस्परांस मारण्याचे पाप करण्यास प्रवृत्त झालेल्या पुरुषांचे ज्याने अन्न भक्षण केले

असेल, त्याने 'वैश्वानर' देवतेच्या उद्देशाने बारा कपालांच्या गटावर पुरोडाश भाजून तयार करावा आणि त्याची इष्टी करावी. 'संवत्सर' हाच वैश्वानरसंज्ञक अग्नी होय. यास्तव, संवत्सरस्वरूप अशा 'वैश्वानर' देवतेसाठी इष्टी केली असता, संवत्सरस्वरूप अशा देवतेनेच निर्दोष केलेले अन्न यजमानाने भक्षण केल्यासारखे होते. अर्थात्, ते परस्परद्वेष करणारे पुरूष त्या यजमानाला आपल्या पापाचा लेप करू शकत नाहीत.

कोणत्याही कार्यासंबंधी दोघे पुरुष जेव्हा एकमेकांशी शपथ करतात, तेव्हा ते जणू काय संवत्सररूप देवाला साक्षी ठेवूनच शपथ करीत असतात. शपथ करणाऱ्या दोघांपैकी जो कोणी प्रथम शपथ मोडतो अर्थात् ज्याच्याशी शपथ केली त्याचा द्रोह करतो, त्याला 'वरुण' घेरतो म्हणजे त्याला रोगाने पछाडतो. यास्तव, अशाप्रकारे शपथ करणाऱ्या दोघांपैकी ज्याने प्रथम शपथ मोडून दुसऱ्याशी द्रोह केला असेल, त्या यजमानाने 'वैश्वानर' देवतेला संतुष्ट करण्यासाठी द्वादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याची इष्टी करावी. 'संवत्सर' हाच वैश्वानरसंज्ञक अग्नी होय. यास्तव, त्याच्या प्रीत्यर्थ इष्टी केली असता यजमानाने जणू काय रोगनिवारक अशा 'संवत्सर' देवाजवळच प्रथम जाऊन नंतर त्याच्या बलाने युक्त झाल्यावरच शपथ मोडून दुसऱ्याशी द्रोह केल्यासारखे होते. आणि त्यामुळे त्या यजमानाला वरुण घेरीत नाही. अर्थात् तो रोगाने पछाडला जात नाही.

'अवी' म्हणजे मेंढी. जो मेंढीचा प्रतिग्रह करतो, म्हणजे मेंढीचे दान घेतो त्याने जणू काय पापच घेतल्यासारखे होते. यास्तव, मेंढीचा प्रतिग्रह केलेल्या यजमानाने 'वैश्वानर' देवतेसाठी द्वादशकपालात्मक पुरोडाशाची इष्टी करावी. 'संवत्सर' हाच 'वैश्वानर' अग्नी होय. अर्थात, त्याच्या प्रीत्यर्थ इष्टी केली असता संवत्सररूप वैश्वानर देवाने निर्दोष केलेल्या मेंढीचाच यजमानाने प्रतिग्रह केल्यासारखे होते. अर्थातच त्याने पापाचा प्रतिग्रह केल्यासारखे होत नाही.

ज्याच्या तोंडामध्ये खालच्या व वरच्या अशा दोन्ही बाजूला दात असतात अशा अश्वाचा किंवा मनुष्याचा जो प्रतिग्रह करील म्हणजे दान घेईल तो आत्महत्येच्या दोषाला प्राप्त होत असतो. यास्तव, अश्वाचा किंवा मनुष्याचा दानरूपाने ज्याने प्रतिग्रह केला असेल त्या यजमानाने 'वैश्वानर'

देवतेच्या संतोषासाठी द्वादशकपालात्मक पुरोडाशाची इष्टी म्हणजे यजन करावे. संवत्सर हाच वैश्वानर नामक देव होय. अर्थात्, संवत्सररूप अशा वैश्वानर देवाप्रीत्यर्थ इष्टी केली असता त्या संवत्सररूप वैश्वानर देवाने निर्दोष केलेल्या अश्वाचा किंवा पुरुषाचा यजमानाने प्रतिग्रह केल्यासारखे होते. आणि तो आत्महत्येच्या दोषाला प्राप्त होत नाही.

कोणीही धन मिळवू इच्छिणारा याचक जेव्हा खरोखर एक वर्षभर दानशील अशा लोकसमुदायात याचना करीत फिरतो, तेव्हाच तो धनसमृध्द होतो. यास्तव, धनाचा लाभ होण्याच्या हेतूने जो कोणी याचना करण्यास निघेल त्या यजमानाने 'वैश्वानर' देवतेच्या उद्देशाने द्वादशकपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करून त्याची इष्टी करावी. संवत्सर म्हणजे संवत्सरात्मक काल हाच खरोखर 'वैश्वानर' नामक अग्निदेव होय. या देवाच्या प्रीत्यर्थ इष्टी केली असता त्या यजमानाला संवत्सरस्वरूप अशा 'वैश्वानर' देवानेच आपल्या कृपेने दिलेल्या धनाचा लाभ होतो. अर्थात्, त्या यजमानाला धन देण्याविषयी लोकांना इच्छा उत्पन्न होते.

धनलाभ व्हावा म्हणून संवत्सररूप अशा वैश्वानर देवतेप्रीत्यर्थ इष्टीचा प्रयोग केल्यावर वर्षभर याचना करीत हिंडला व दानशील लोकांच्या कडून धन मिळवून घरी परत आला. परंतु, पुरेसे द्रव्य न मिळाल्यामुळे दारिद्र्यातून मुक्त झाला नाही, तो लोक समाजात अप्रतिष्ठेला प्राप्त होत असतो. यास्तव, अशाप्रकारे अपुरे द्रव्य मिळवून घरी परत आलेला जो यजमान असेल त्याने घरी परत आल्यावर त्याच वैश्वानर देवाच्या उद्देशाने पुन्हा द्वादशकपालात्मक पुरोडाश तयार करून इष्टी करावी. म्हणजे त्या इष्टीने संतुष्ट झालेला वैश्वानर देव त्या यजमानाला पुरेल इतका धनाचा भाग लोकांकडून मिळवून देऊन त्याला दारिद्र्यातून मुक्त करतो. आणि त्यामुळे तो यजमान लोकसमुदायामध्ये प्रतिष्ठेला कारणभूत होतो. अर्थात् प्रतिष्ठा संपादन करतो.

दात्यांच्याकडून इष्टीकर्त्या यजमानाला ज्या गाई मिळाल्या असतील त्यांपैकी उत्कृष्ट असलेली गाय ज्या दोरीने बांधून घरी आणली असेल ती दोरी यजमानाने आपल्या वैऱ्याच्या गोठ्यात त्याचा नाश व्हावा म्हणून टाकून द्यावी. असे केले असता त्या यजमानाने जणू काय दारिद्र्यरूपी राक्षसीलाच आपल्या वैऱ्याकडे पाठविल्यासारखे होते. (अनुवाक ६).

आपल्याला पशूंची प्राप्ती व्हावी अशी ज्याला इच्छा असेल त्या यजमानाने 'इंद्र' देवतेसाठी चरू शिजवून त्याचा याग करावा. कारण 'पशू' हे 'ऐन्द्र' म्हणजे इंद्रदेवतेच्या आधिपत्याखाली राहणारे आहेत. यास्तव, इंद्रदेवते-प्रीत्यर्थ याग केल्याने इंद्राला स्वकीय असलेला हविर्भाग घेऊन यजमानाने जणू काय त्याच्या सन्निध गेल्यासारखे व तो याग त्याला समर्पण केल्यासारखे होते. मग संतुष्ट झालेला तो इंद्रदेव त्या यजमानाला पशू मिळवून देतो व तो यजमान पशुसंपत्तीने समृद्ध होतो. या इष्टीमध्ये हविर्भाग म्हणून तयार केला जाणारा चरू म्हणजे जणू काय पशूचे जन्मस्थानच आहे. अर्थात् तो चरू स्वस्वरूप अशा जन्मस्थानापासूनच जणू काय त्या यजमानासाठी पशू उत्पन्न करतो.

पशूंची प्राप्ती व्हावी अशी ज्याची इच्छा असेल त्या यजमानाने 'इंद्र इंद्रियावान्' म्हणजे ज्याचे इंद्रियबल प्रभूत आहे, अशा इंद्रदेवतेसाठी अकरा कपालांच्या समूहावर पुरोडाश तयार करून त्याचे यजन करावे. क्षीरघृतादि द्रव्याने इंद्रियशक्तीची वाढ होत असल्याने ती द्रव्ये निष्पन्न करणारे पशू देखील इंद्रियरूपच होत. यास्तव, इंद्रदेवतेप्रीत्यर्थ यजन केले असता यजमान जणू काय इंद्रियबलसंपन्न अशा इंद्राच्या हविर्भागासहच त्याच्या जवळ जाऊन तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. व त्यामुळे संतुष्ट झालेला इंद्रदेव त्या यजमानाला इंद्रियजन्यबल व पशू मिळवून देतो. अर्थात् तो पशूंच्या योगाने समृद्ध होतो.

वेदशास्त्राध्ययनजन्य तेजाने आपण युक्त व्हावे अशी इच्छा करणाऱ्या यजमानाने 'इंद्रो धर्मवान्' म्हणजे वेदशास्त्रादिप्रयुक्त ब्राह्म तेजाने संपन्न असलेल्या इंद्रदेवतेसाठी अकरा कपालांच्या गटावर पुरोडाश भाजून त्याची इष्टी करावी. वेदशास्त्रादिप्रयुक्त ब्रह्मतेज धर्म होय. यास्तव, धर्मवान् अशा इंद्राच्या प्रीत्यर्थ इष्टी केली असता यजमानाने जणू काय त्याचा स्वकीय भाग बरोबर घेऊनच त्याच्याजवळ गेल्यासारखे आणि तो भाग त्याला दिल्यासारखे होते. आणि मग त्या भागाने प्रसन्न झालेला तो धर्मवान् इंद्रदेव त्या यजमानाच्या ठिकाणी 'ब्रह्मवर्चस्' म्हणजे वेदशास्त्राध्ययनजन्य तेज स्थापन करतो. मग तो यजमान ब्रह्मवर्चसयुक्तच होतो.

अन्न प्राप्त व्हावे अशी इच्छा असलेल्या यजमानाने 'इंद्र अर्कवान्'

देवतेसाठी एकादशकपालात्मक म्हणजे अकरा कपालांच्या समूहावर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचे यजन करावे. 'अर्क' हाच देवांचे अन्न आहे. यास्तव, अर्कवान् अशा इंद्राप्रीत्यर्थ यजन केले असता, यजमानाने जणू काय त्याला हवासा असलेला हविर्भाग घेऊन त्याच्याजवळ गेल्यासारखे व त्याला तो अर्पण केल्यासारखे होते. आणि मग त्या हविर्भागाने संतुष्ट झालेला अर्कवान् इंद्रदेव त्या यजमानाला अन्न देतो. व तो यथेच्छ अन्न सेवन करणारा होतो.

आपल्याला ऐश्वर्य प्राप्त व्हावे अशी इच्छा असलेल्या यजमानाने इंद्र धर्मवान् इंद्र इंद्रियावान् व इंद्र अर्कवान् या तीन देवतांच्या उद्देशाने प्रत्येकी एकादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचे यजन करावे. 'धर्मवान्' इंद्रासाठी पुरोडाशाचा जो निर्वाप केला जातो त्यामुळे अध्वर्यूने जणू काय यजमानाला ऐश्वर्यादिकांच्या योगाने लोकसमाजात शिरोभागाप्रमाणे उन्नत केल्यासारखे होते 'इंद्रियावान्' इंद्रासाठी अध्वर्यू जो पुरोडाशाचा निर्वाप करतो त्या योगाने त्याने जणू काय यजमानाचे शरीर पुष्ट केल्यासारखे होते. 'अर्कवान्' इंद्रासाठी अध्वर्यू जो पुरोडाशाचा निर्वाप करतो त्या योगाने तो जणू काय ऐश्वर्याला प्राप्तच झालेल्या त्या यजमानाला भक्षणीय अशा अन्नाच्या ठिकाणी प्रतिष्ठित करतो. अर्थात् तो यजमान उत्तरोत्तर अधिक ऐश्वर्याला निश्चयाने प्राप्त होतो.

नरकप्राप्तीला कारणभूत होणारे, निषिध्दाचरणासारखे जे पाप, त्याला 'अंह' असे म्हणतात. अशा प्रकारच्या पातकाने जो घेरला गेला असेल त्या यजमानाने 'इंद्र अंहोमुक्' देवतेच्या उद्देशाने एकादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचा याग करावा. म्हणजे यजमानाने जणू काय पापापासून मुक्त करणाऱ्या इंद्राचा स्वकीय असा हविर्भाग बरोबर घेऊनच त्याच्या जवळ गेल्यासारखे व त्याला तो अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या योगाने संतुष्ट झालेला तो 'अंहोमुक्' अर्थात् पापमुक्तकारी इंद्रदेव त्या यजमानाला 'अंह' शब्दाने व्यक्त होणाऱ्या पातकापासून मुक्त करतो. ज्या यजमानाला त्याचे शत्रू त्याला सर्व बाजूंनी घेरून भीतीने कंपित करीत असतील अथवा, त्याच्या साम्राज्यातील लहान लहान राष्ट्रांचा किंवा प्रदेशांचा नाश करण्यासाठी एकत्र जमून उपद्रव देत असतील, अशा यजमानाच्या रक्षणासाठी 'इंद्रो वैमृध' म्हणजे शत्रुविनाशक अशा इंद्रदेवतेसाठी एकादशकपालात्मक पुरोडाश

तयार करून त्याचे यजन करावे. असे केले असता त्या यजमानाने शत्रुनाशक इंद्रदेवासन्निध त्याला प्रिय असलेला हविर्भाग घेऊन जाऊन त्याला अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या हविर्भागाने संतुष्ट झालेल्या तो शत्रुविनाशक इंद्रदेव त्या यजमानाला उपद्रव देणाऱ्या शत्रूंचा नाश करतो.

जो कोणी आपल्या शत्रूंकडून पायात शृंखला म्हणजे बेडी घातली गेल्यामुळे बध्द झाला असेल अथवा शत्रूंनी सभोवती घातलेल्या वेढ्यात अडकला असेल त्या यजमानाने 'इंद्रस्त्राता' म्हणजे रक्षणकर्त्या इंद्रदेवाच्या उद्देशाने एकादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचा याग करावा. म्हणजे त्या यजमानाने शत्रूपासून संरक्षण करणाऱ्या इंद्रदेवासन्निध त्याचा स्वकीय असा हविर्भाग घेऊन धावतच गेल्यासारखे व तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. व त्या योगाने संतुष्ट झालेला इंद्रदेव त्या यजमानाचे त्याच्या शत्रूपासून रक्षण करतो.

ज्या यजमानाला अश्वमेध अथवा राजसूय अशा प्रकारचा महायज्ञ प्राप्त होत नाही, म्हणजे ज्या यजमानाच्या हातून त्याची इच्छा असतांना देखील पूर्वोक्त महायज्ञ घडत नाही, त्याने 'इंद्र अर्काश्वमेधवान्' म्हणजे अर्क व अश्वमेधयुक्त अशा इंद्रदेवासाठी एकादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचा याग करावा. अश्वमेध यज्ञाला साधनभूत होणारा जो आदित्य, तो अश्वमेध होय. अग्नी व आदित्य हे दोघे म्हणजे अश्वमेधरूप महायज्ञाच्या मागच्या पुढच्या अग्रांच्या ठिकाणी असणारी जणू दोन शरीरेच होत. साधनरूपाने असणारा चित्तरुप अग्नी हा अश्वमेधाचे प्रारंभाकडील शरीर असून साध्यत्वाने किंवा फलरूपत्वाने असणारा आदित्य हा अश्वमेध यज्ञाच्या अंतिमभागी असणारे शरीर होय. अर्क शब्दाने उपलक्षित असा अग्नी व अश्वमेध शब्दाने उपलक्षित असा आदित्य या दोघांचाही इंद्र हा स्वामी असल्यामुळे त्याला 'अर्काश्वमेध' अर्थात् अग्नी व आदित्य यांच्या सह असणारा असे म्हटले जाते. एवं च, पूर्वोक्त याग केल्याच्या योगाने, यजमानाने जणू काय 'अर्काश्वमेधवान्' अशा इंद्राजवळ त्याला स्वकीय असलेला हविर्भाग घेऊन जाऊन तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. आणि त्या भागाने संतुष्ट झालेला तो इंद्रदेव अश्वमेध किंवा राजसूयरूपी महायज्ञाला त्या यजमानाच्या जवळ आणून सोडतो. अर्थात् महायज्ञ त्या यजमानाजवळ जातो म्हणजे त्याच्या हातून अर्काश्वमेधवान्

इंद्रदेवाच्या कृपेने महायज्ञ घडतो. (अनुवाक ७).

आपल्याला गांव मिळावा अशी इच्छा करणाऱ्या यजमानाने 'इंद्र अन्वृजु' देवतेच्या उद्देशाने अकरा कपालांवर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचे यजन करावे. म्हणजे यजमानाने जणू काय 'इंद्र अन्वृजु' देवाच्या सन्निध त्याचा स्वकीय हविर्भाग घेऊन गेल्यासारखे व तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. आणि मग त्या हविर्भागाने संतुष्ट झालेला तो 'इंद्र अन्वृजु' म्हणजे आपल्या उपासकाला साहाय्य करणारा व त्याला केव्हाही विरोध न करणारा इंद्रदेव त्या यजमानाच्या विषयी त्याच्या सजातीय बांधवांना अनुकूल करून देतो. आणि मग तो यजमान निश्चयाने ग्रामाधिपती होतो.

ज्याच्या सैन्याचे ठिकाणी कडवेपणा नसल्यामुळे ते स्वकार्यक्षम होत नाही, त्या यजमानाने 'इंद्राणी' देवतेच्या संतोषासाठी 'चरू' शिजवून त्याची इष्टी करावी. कारण, इंद्राणी हीच सैन्याला तीक्ष्ण करणारी म्हणजे त्याच्या ठिकाणी कड्वेपणा निर्माण करणारी देवता आहे. यास्तव, तिच्याप्रीत्यर्थ इष्टी केली असता, यजमानाने जणू काय त्या देवतेच्या स्वकीय अशा हविर्भागासह तिच्याजवळ जाऊन, तो तिला अर्पण केल्याप्रमाणे होते. आणि त्या भागाने प्रसन्न झालेली ती 'इंद्राणी' देवता त्या यजमानाच्या सैन्याचे ठिकाणी तीक्ष्णपणा उत्पन्न करून ते स्वकार्यक्षम होईल असे करते. उष्टे, खरकटे अन्न अधिक खाण्यात आल्यामुळे गाई ज्या ठिकाणी मूत्रोत्सर्ग करतात त्या ठिकाणी 'बल्बज' नांवाच्या एका जातीचे गवत उगवते. आता सांगितलेल्या इष्टीमध्ये 'इध्म' बांधताना त्यात 'बल्बज' जातीचे गवत बांधावे. म्हणजे त्या योगाने गाई, बैल वगैरे जनावरे जशी आपल्या धन्याच्या स्वाधीन राहून त्याच्या इच्छेनुसार वर्तन करतात, अरण्यात चरावयास गेलेल्या गाई पळून न जाता वक्तशीर घरी येतात, त्रास न देता धार काढू देतात, किंवा शिकवून तयार केलेले बैल आपल्या मालकाच्या मर्जीप्रमाणे गाडी वगैरे वाहून नेतात, त्याच न्यायाला धरून अर्थात् वर्तनक्रमालाच प्राप्त होऊन त्या यजमानाचे सैन्य त्याच्या स्वाधीन राहते. एवं च पूर्वोक्त इष्टी करताना इध्मामध्ये 'बल्बज' नामक गवत बांधले असता, त्या इष्टीची अधिष्ठात्री असलेली इंद्राणी देवता गाई इत्यादि पशूंच्या प्रमाणेच त्या यजमानाचे सैन्य त्याच्या स्वाधीन राहील असे करते. अर्थात् त्याच्या ठिकाणी कडवेपणा निर्माण होऊन ते स्वकार्यक्षम होते.

आपल्या शत्रूशी युध्द करण्याला जो प्रवृत्त झाला असेल त्या यजमानाने 'इंद्रो मन्युमान् मनस्वान्' म्हणजे इंद्रियपाटव, वैऱ्याविषयी अत्यंत क्रोध व अचाट धैर्य यांनी युक्त अशा इंद्र देवाच्या उद्देशाने एकादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याची इष्टी करावी. म्हणजे तो यजमान इंद्रियपटुत्व, अत्यंत क्रोध व अचाट धैर्य यांच्या योगाने युध्द जिंकतो. कारण पूर्वोक्त इष्टी केली असता त्या यजमानाने जणू काय इंद्रियपाटव, अत्यंतक्रोध व मनोधैर्य यांनी युक्त अशा इंद्रदेवाला स्वकीय म्हणजे प्रिय असलेला हविर्भाग घेऊन त्याच्या सन्निध गेल्यासारखे व तो भाग त्याला समर्पण केल्यासारखे होते. त्या हविर्भागाने संतुष्ट झालेला तो इंद्रदेव त्या यजमानाच्या ठिकाणी इंद्रियपाटव, वैऱ्याविषयी अत्यंत क्रोध व अवश्य ते मनोधैर्य धारण करतो. आणि त्यामुळे तो यजमान युध्द जिंकतो.

पुष्कळ दिवस रोगाने पीडल्यामुळे व द्रव्यहानी सारखे एखादे कारण घडल्यामुळे जो गलितचित्त होऊन भ्रमिष्टासारखा बनतो त्या मनुष्यापासून इंद्रियशक्ती, क्रोध व धैर्य ही दूर गेलेली असतात. म्हणजे नष्ट झालेली असतात. आणि म्हणूनच तो गलितचित्त होऊन भ्रमिष्टासारखा बनलेला असतो. अशाप्रकारे भ्रमिष्टासारख्या बनलेल्या यजमानाने 'इंद्रो मन्युमान् मनस्वान्' देवतेच्या उद्देशाने पूर्वोक्त इष्टी करावी. म्हणजे त्या यजमानाने जणू काय इंद्रियपाटव, क्रोध व धैर्य यांनी युक्त अशा इंद्रदेवासन्निध त्याचा स्वकीय असलेला हविर्भाग घेऊन गेल्यासारखे व त्याला अर्पण केल्यासारखे होते. आणि मग तो प्रसन्न झालेला इंद्रदेव त्या यजमानाच्या ठिकाणी इंद्रियपटुत्व, क्रोध व धैर्य यांचे धारण करतो. अर्थात् तो यजमान गलितगात्र होऊन भ्रमिष्टासारखा होत नाही.

लोक मला दान देण्याची इच्छा करणारे व्हावेत, अशी जो इच्छा करीत असेल, त्या यजमानाने 'इंद्रो दाता' म्हणजे आपल्या उपासकाला द्रव्य देणाऱ्या इंद्रदेवतेच्या उद्देशाने एकादशकपालात्मक पुरोडाशाचा याग करावा. असे केले असता, त्या यजमानाने उपासकाला द्रव्य देणाऱ्या इंद्रदेवाच्या सन्निध त्याचा स्वकीय असलेला हविर्भाग घेऊनच गेल्यासारखे व तो त्याला अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या हविर्भागाने संतुष्ट झालेला तो इंद्रदेव त्या यजमानाला दान देण्याची इच्छा लोकांच्या ठिकाणी उत्पन्न करतो. अर्थात्

लोक त्याला दान देण्याची इच्छा करणारे होतात.

ज्याला एखादी ईप्सित वस्तू बहाल करण्याचे जणू निश्चित झाले असूनही ती त्याला दिली जात नाही, त्या यजमानाने 'इंद्रः प्रदाता' म्हणजे आपल्या उपासकाला विशिष्ट ईप्सित वस्तू प्रदान करणाऱ्या इंद्रदेवतेला उद्देशून एकादशकपालात्मक पुरोडाशाचा याग करावा. असे केले असता, त्या यजमानाने उपासकाला विशिष्ट वस्तू प्रदान करणाऱ्या इंद्रदेवाच्या सन्निध त्याचा स्वकीय हविर्भाग घेऊन गेल्यासारखे व तो त्याला अर्पण केल्यासारखे होते. त्या हविर्भागाने संतुष्ट झालेली ती इंद्रदेवता त्या यजमानाला त्या विशिष्ट ईप्सित वस्तूचे प्रदान केले जाईल असे करते.

जो आपल्या राज्यापासून कायमचा भ्रष्ट झाला असेल अथवा भ्रष्ट होण्याच्या स्थितीत असेल त्याने 'इंद्रःसुत्रामा' म्हणजे उत्कृष्ट संरक्षण करणारा अशा इंद्रदेवाच्या उद्देशाने एकादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचे यजन करावे. म्हणजे यजमानाने जणू काय उत्कृष्ट संरक्षक अशा त्या इंद्रदेवाचा स्वकीय असलेला हविर्भाग घेऊन त्याच्या जवळ गेल्यासारखे व तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. आणि त्यामुळे प्रसन्न झालेला तो इंद्रदेव त्या यजमानाचे उत्कृष्ट प्रकारे संरक्षण करतो. अर्थात् तो यजमान स्वराज्यापासून भ्रष्ट होत

पूर्वी एकेकाळी इंद्र हा इतर देवांच्या सारखाच साधा देव होता. त्याला देवांचे आधिपत्य प्राप्त झालेले नव्हते. अर्थात् कोणीही देव त्याचे भृत्यत्व म्हणजे चाकरी पत्करण्यास कबूल होत नव्हता. तेव्हा इंद्र खिन्न होऊन प्रजापतीकडे गेला. आणि इतर देवांहून आपण निराळे असावे, आपणास त्यांच्याहून श्रेष्ठत्व असावे अशी आपली इच्छा त्याने प्रजापतीजवळ व्यक्त केली. मग प्रजापतीने इतर देवांहून इंद्र निराळा दिसावा, इंद्राला देवांचे आधिपत्य मिळावे म्हणून पूर्व कल्पात होऊन गेलेल्या इंद्राच्या उद्देशाने एकादश-कपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करून त्याचा याग केला. या इंद्ररूप यजमानाच्या कडून करविल्या जाणाऱ्या यागात प्रजापतीने स्वतः अध्वर्युत्व केले. आणि त्या यागाच्या प्रभावाने त्याने इंद्राच्या ठिकाणी सामर्थ्य स्थापित केले. मात्र ते सामर्थ्य सिद्ध व्हावे म्हणून त्या यागात प्रजापतीने 'शक्करी' छंदातील दोन ऋचा 'याज्या' व 'पुरोनुवाक्या' म्हणून नियोजित केल्या होत्या. 'शक्करी' छंद हा जणू वज्ररूपच आहे. त्या शक्करी छंदरूपी वज्राने देवांचे आधिपत्यरूप

ऐश्वर्य इंद्राच्या ठिकाणी असल्याचे प्रकाशित केले म्हणजे देवांच्या आधिपत्यास हा योग्य होय अशी त्या इंद्राची सर्वत्र प्रसिध्दी घडवून आणली.आणि मग तो इंद्र देवांचा अधिपती झाला. नंतर देवांचे आधिपत्य प्राप्त झालेल्या त्या इंद्राला हे शक्करीछंदोरूपी वज्र आपल्या उग्र तेजाने मला दग्ध करील की काय? असे वाटू लागले आणि त्या शक्करीछंदोरूपी वज्राचे उग्रत्व शांत होण्याचा काहीतरी उपाय योजावयासाठी तो पुन्हा प्रजापतीकडे गेला. तेव्हा प्रजापतीने शक्करी छंदरूप वज्राचे उग्रत्व शांत व्हावे आणि त्याने इंद्राला दग्ध करू नये म्हणून 'रेवती' म्हणजे 'रेवतीर्नः सधमादम्' ही ऋचा निर्माण केली.

जो कोणी एखादा राजकुमार अथवा थोरामोठ्याचा मुलगा ऐश्वर्याला पात्र झाला असून देखील त्याला खऱ्या अर्थाने ऐश्वर्य प्राप्त न होता इतर सामान्य माणसांच्या सारखाच लेखला जात असेल त्याला खऱ्या अर्थाने ऐश्वर्य प्राप्त होण्यासाठी पूर्वी सांगितल्याप्रमाणे इंद्र देवतेसाठी एकादशकपालात्मक पुरोडाशाचा याग करावा. म्हणजे त्या यागकर्त्याने इंद्राचा स्वकीय भाग आपल्या बरोबर घेऊनच जणू काय त्याच्याजवळ गेल्यासारखे व त्याला तो भाग अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या भागाने प्रसन्न झालेला तो इंद्र यागकर्त्याचे ठिकाणी इंद्रियगत सामर्थ्य स्थापन करतो व त्याच्या प्रभावाने तो ऐश्वर्याला प्राप्त होतो. या यागामध्ये पूर्वोक्त 'रेवतीर्नः' ही ऋचा पुरोनुवाक्या म्हणून योजावी. म्हणजे ती शक्करीछंदोरूप व्रजाची उग्रता शांत करण्याला व त्याच्याकडून यागकर्ता दग्ध न होण्याला कारणभूत होते. शक्करी छंदातील 'प्रोत्वस्मै पुरोस्थम्' ही ऋचा 'याज्या' म्हणून उपयोगात आणावी. शक्करी-छंदात्मक ऋचा हे जणू वज्रच आहे. आणि ते वज्र यज्ञकर्त्याला ऐश्वर्य प्राप्त होण्यासाठी योग्य रीतीने प्रसिध्दीस आणते व त्या योगाने तो निश्चयाने ऐश्वर्याला प्राप्त होतो. (अनुवाक ८).

आपल्या शत्रूसंबंधी अभिचार करीत असेल, म्हणजे आपला शत्रू मरावा म्हणून त्याजवर मारणप्रयोग करावयास प्रवृत्त झाला असेल, अशा यजमानाने 'अग्राविष्णू' म्हणजे अग्नी व विष्णू या दोन देवतांच्या उद्देशाने एकादशकपालात्मक असा एकच पुरोडाश तयार करावा. सरस्वती देवतेच्या उद्देशाने आज्य हेच हविर्द्रव्य योजावे. आणि बृहस्पती देवतेच्या उद्देशाने

चरू शिजवावा. आणि अनुक्रमे त्यांचे यजन करावे. अग्नी हा सर्वदेवतात्मक, अर्थात् सर्वदेवतास्वरूप असून विष्णू हा मूर्तिमंत यज्ञच होय. यास्तव अग्नाविष्णूंच्यासाठी एकादशकपालात्मक पुरोडाशाचे जे यजन केले जाते त्यामुळे त्या यजमानाने सर्व देवता व यज्ञ यांच्या कडूनच जणू काय शत्रूवर अभिचार केल्यासारखे होते. सरस्वती ही वाग्देवता आहे हे प्रसिध्दच आहे. यास्तव सरस्वती देवतेसाठी आज्यरूप हविर्द्रव्याचे जे यजन केले जाते, त्या योगाने वाग्देवतेकडूनच शत्रूवर अभिचार म्हणजे मारणप्रयोग केल्यासारखे होते. बृहस्पती हा देवांमधील श्रेष्ठ असा ब्राह्मण आहे. यास्तव बृहस्पतीदेवतेप्रीत्यर्थ जे चरूचे यजन केले जाते त्या योगाने देवांमधल्या ब्राह्मणाकडूनच जणू काय शत्रूवर अभिचार केल्यासारखे होते. आपल्या अमुक शत्रूने आपल्यावर अभिचार केला आहे, असे समजून आल्यावर आपला बचाव व्हावा आणि आपल्यावर अभिचार करणारा शत्रूच मरावा, म्हणून जो त्याच्यावर उलट अभिचार केला जातो, त्यास 'प्रत्यभिचार' असे म्हणतात. आपल्यावर अभिचार करणारा शत्रू कोण आहे, हे समजल्यावर त्याचे विरोधी असतात ते त्याच्यावरच पुन्हा 'प्रत्यभिचार' करून त्याने केलेला मारणप्रयोग त्याच्यावरच उलटवितात. अशा प्रकारे प्रत्यभिचार करावयाचा असेल त्याने पूर्वोक्त अग्नाविष्णू इत्यादि देवतांना उद्देशूनच यजन करावे. मात्र, शत्रूने केलेल्या अभिचारापेक्षा आपला प्रत्यभिचार अधिक प्रभावी अर्थात् अधिक फलद्रूप व्हावा म्हणून त्या यजनविधीत इतका फरक करावा की; प्रत्येक देवतेच्या पूर्वोक्त पुरोनुवाक्येची आवृत्ती करून अथवा तिच्या जोडीला दुसरा ऋङ्.मंत्र जोडून प्रत्येक देवतेच्या यजनप्रसंगी दोन दोन पुरोनुवाक्या होत्याने पठण कराव्यात.

आपल्यावर आपल्या शत्रूने अभिचार म्हणजे मारणप्रयोग केला आहे असे समजल्यानंतर त्याच्या उलट 'प्रत्यभिचार' न करता फक्त त्याने केलेल्या अभिचाराचा आपल्यावर अनिष्ट परिणाम न होता फक्त आपला बचाव व्हावा असे ज्याला वाटत असेल त्याने हीच इष्टी म्हणजे वर सांगितलेला अग्नाविष्णू इत्यादि तीन देवतांच्या उद्देशाने याग करावा. असे केले असता त्या यजमानाने जणू काय आपण यजन केलेल्या सर्व देवतांच्या कडून शत्रूचे यजन केलेल्या सर्व देवतांचे, आपण संतुष्ट केलेल्या यज्ञाकडून शत्रूने संतुष्ट केलेल्या यज्ञाचे, आपण प्रसन्न करून घेतलेल्या वाग्देवतेचे आणि आपण यजन केलेल्या ब्राह्मणाकडून शत्रूने यजन केलेल्या ब्राह्मणाचे निवारण

केल्यासारखे होते. शिवाय अशाप्रकारचा याग किंवा इष्टी केली असता, त्या यजमानाने जणू काय आपल्या व आपल्या शत्रूच्यामध्ये देवता व यज्ञ व्यवधानरूपाने स्थापित केल्यासारखे होते. व त्यामुळे त्याला कशापासूनही बाधा होत नाही. अर्थात् शत्रूच्या अभिचाराने तो मरण पावत नाही.

ज्याला यज्ञ प्राप्त होत नाही म्हणजे द्रव्याभावासारख्या काही कारणाने ज्याच्या हातून यज्ञ घडत नाही, त्या यजमानाने 'अग्नाविष्णू'च्या उद्देशाने अकरा कपालांच्या समूहावर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचा याग करावा. अग्नी हा सर्वदेवतारूप आणि विष्णू हा यज्ञरूप आहे. यास्तव, आता सांगितल्याप्रमाणे याग केला असता, त्या यजमानाने जणू काय अग्नी व विष्णू यांच्या सन्निध त्यांचा स्वकीय असा हविर्भाग घेऊन जाऊन त्यांना समर्पण केल्यासारखे होते. आणि त्या योगाने संतुष्ट झालेले ते अग्नाविष्णू त्या यजमानाला यज्ञ प्राप्त करून देतात. अर्थात् यज्ञ त्याच्याजवळ येतो. म्हणजे त्याच्या हातून यज्ञ घडतो.

काविळीसारख्या रोगाने ज्याचे डोळे बिघडले आहेत, म्हणजे ज्याची दृष्टी बिघडली आहे अशा यजमानाने अग्नाविष्णूच्या उद्देशाने तुपामध्ये चरू शिजवून त्याचा याग करावा. अग्नीच्या नेत्राने मनुष्ये पाहतात, व यज्ञाच्या सामर्थ्यरूप नेत्राने देव पाहत असतात. यास्तव, यज्ञरूप विष्णूच्या व अग्नीच्या प्रीत्यर्थ याग केला असता त्या यजमानाने जणू काय अग्नाविष्णूंना स्वकीय म्हणजे आपलासा वाटणारा हविर्भाग बरोबर घेऊनच त्यांच्या जवळ गेल्यासारखे व तो त्यांना समर्पण केल्यासारखे होते. आणि त्यामुळे प्रसन्न झालेले ते अग्नाविष्णू त्या यजमानाच्या ठिकाणी उत्कृष्ट अशी दृष्टी स्थापन करतात. अर्थात् तो यजमान अत्यंत सूक्ष्म अशा वस्तूचे अवलोकन करता येईल अशा स्वच्छ दृष्टीने युक्त होतो. आज्य हे जणू काय गाईंनी भक्षण केलेल्या तृणादिकांचे सार असल्याने गाईंचे रेतच असून बैलाने नांगरलेल्या जमीनीत तांदूळ उत्पन्न होत असल्यामुळे तांदूळ हे जणू बैलांचे रेत आहे. सारांश, तुपात शिजवलेला चरू हे जणू काय गायबैलाचे जोडपेच आहे. आणि या जोडप्यापासून यजमानाला दृष्टीचा लाभ होत असतो. शिवाय, या इष्टीमध्ये तुपामध्ये चरू शिजवला जातो. कारण घृत (तूप) हे तेजोरूप असून नेत्रेंद्रिय हे तर मूर्तिमंत तेजच आहे. यामुळे तेजोरूप घृत तेजोरूप नेत्रेंद्रियाचा अवरोध

करते, म्हणजे यजमानाच्या नेत्रेंद्रियाला अनुकूलत्व प्राप्त करून देते.

परस्परांचे शत्रुत्व करणाऱ्या दोघा यजमानांमध्ये एक अग्निष्टोमासारखा एखादा यज्ञ करतो. व दुसरा करीत नाही, म्हणजे त्याच्या हातून घडत नाही. अशा प्रसंगी यज्ञ न करणाराचे इंद्रियसामर्थ्य यज्ञ करणारा जो असतो तो नष्ट करतो. कारण, यज्ञ करणाराला लोक, 'अहो दीक्षित, अहो सोमयाजी', असे बहुमानाने संबोधितात व यज्ञ न करणाराला तसे कोणीच संबोधीत नाही. अर्थात् यज्ञ न करणाराचा साहजिक तेजोभंग होऊन त्याचे इंद्रियसामर्थ्य विगलित होते. तो निरुत्साही बनतो. यास्तव, ज्याच्या हातून यज्ञ घडत नाही अशा यजमानाने आपला शत्रू अग्निष्टोम यज्ञ करीत असेल त्याच वेळी त्याच्या प्रतिपक्षीयाने पूर्वोक्त अग्राविष्णू इत्यादि तीन देवतांची इष्टी करावी. अशा प्रकारे प्रतिपक्षत्वरूपाने केल्या जाणाऱ्या इष्टीस 'अध्वरकल्पा' अशी संज्ञा आहे. 'अध्वरकल्पा' ही इष्टी म्हणजे किंचित् अपूर्ण असा जणू अध्वर म्हणजे यज्ञच होय. कारण अग्राविष्णू इत्यादि तीन देवतांचा याग हा यज्ञात केल्या जाणाऱ्या प्रात:सवनादि तीन सवनीय यागांचा प्रतिपक्षी म्हणून कल्पना करता येणे संभवते. पण ह्या इष्टीत सोमयागाचा अभाव असल्याने यज्ञाच्या तुलनेने तीमध्ये किंचित् अपूर्णता राहते. आणि म्हणूनच अध्वरकल्पा ही इष्टी म्हणजे किंचित् अपूर्ण असलेला अध्वर किंवा यज्ञच होय असे समजावयाचे आहे. एवं च आपला शत्रू अग्निष्टोमासारखा अध्वर म्हणजे यज्ञ करीत असेल त्याच वेळी यज्ञ न करणाऱ्या यजमानाने यज्ञाच्या इतका परिपूर्ण नव्हे, पण किंचित् अपूर्ण असलेला जणू यज्ञच अशी ही 'अध्वरकल्पा' नामक इष्टी करावी. सोमयागाच्या प्रतिपक्षित्वाने केल्या जाणाऱ्या या इष्टीच्या योगाने यज्ञ न करणाऱ्या यजमानाचे इंद्रियसामर्थ्य नष्ट होत नाही. तो निरुत्साही बनत नाही. भरपूरद्रव्यप्राप्ती इत्यादि निमित्ताने त्याचाही लोकांमध्ये उत्कर्ष होतो. अध्वराचे म्हणजे यज्ञाचे साम्यत्व उत्पन्न होण्यासाठी 'अध्वरकल्पा' इष्टीच्या अनुष्ठानाची योजना अशी करावी की, आपला शत्रू प्रात:सवनाचे अनुष्ठान करीत असेल, तोपर्यंत त्याच कालावधीत अग्राविष्णूंच्यासाठी अष्टकपालात्मक पुरोडाश, सरस्वतीसाठी आज्य व बृहस्पतीसाठी चरू अशा प्रकारची हविर्द्रव्ये तयार करून त्यांचा अनुक्रमे याग करावा. 'गायत्री' ही अष्टाक्षरा आहे, म्हणजे चरणाक्षरसंख्येने गायत्रीछंद हा अष्टाक्षरी असून 'प्रात:सवन' हे 'गायत्र' म्हणजे गायत्रीछंदसंबध्द आहे. यास्तव, अक्षरसंख्येच्या दृष्टीने

स्वरूपसाम्य असलेल्या अष्टकपालात्मक पुरोडाशाच्या यागाने जणू काय शत्रूच्या प्रात:सवनाला व्याप्त केल्यासारखे, अर्थात् प्रात:सवनाचेच अनुष्ठान केल्याचे श्रेय मिळविल्यासारखे होते. आपला शत्रू माध्यंदिन सवनाचे अनुष्ठान करीत असेल, तेवढ्या कालावधीत अग्राविष्णूंच्यासाठी एकादशकपालात्मक पुरोडाश, सरस्वतीदेवीसाठी आज्य व बृहस्पतिदेवतेसाठी चरू तयार करून त्या हविर्द्रव्यांचे यजन करावे. त्रिष्टुप् छंद हा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने अकराअक्षरी असून माध्यंदिन सवन हे त्रिष्टुप्छंदसंबध्द आहे. यास्तव, चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने त्रिष्टुप् छंदाशी साम्य असलेल्या अकरा कपालांच्या समूहावर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचे यजन केल्याच्या योगाने शत्रू करीत असलेल्या माध्यंदिन-सवन निमित्तक अनुष्ठानालाच जणू व्याप्त केल्यासारखे होते. म्हणजे माध्यंदिन सवनानुष्ठान केल्याचे श्रेय संपादन केल्यासारखे होते. तृतीय सवनाचे अनुष्ठान शत्रू करीत असेल त्या कालावधीतच अग्राविष्णूंच्यासाठी द्वादशकपालात्मक पुरोडाश, सरस्वतीसाठी आज्य व बृहस्पती देवतेसाठी चरू तयार करून पूर्वीप्रमाणेच याग करावा. जगती छंदाच्या प्रत्येक चरणामध्ये बारा अक्षरे असतात. अर्थात् चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने जगतीछंद हा द्वादशाक्षरी आहे. यास्तव, चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने जगती छंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या द्वादशकपालात्मक पुरोडाशाचा याग केल्याच्या योगाने शत्रू करीत असलेल्या तृतीय सवनाला जणू व्याप्त केल्यासारखे, अर्थात् तृतीय सवनाच्या अनुष्ठानाचे श्रेय मिळविल्याप्रमाणे होते. एवं च 'अध्वरकल्पा' इष्टीमध्ये सर्वदेवतारूप अग्नीचे यजन केल्यामुळे सर्व देवतांच्याकडून शत्रूने यजन केलेल्या सर्व देवतांचे, यजमानाने निवारण केल्यासारखे होते. यज्ञरूप विष्णूचे यजन केल्यामुळे यज्ञाकडून शत्रूने केलेल्या यज्ञाला, वाग्देवता सरस्वतीचे यजन केल्यामुळे वाग्देवतेकडून शत्रूने यजन केलेल्या वाग्देवतेला, ब्राह्मणरूप बृहस्पतिदेवतेचे यजन केल्यामुळे ब्राह्मणाकडून शत्रूने यजन केलेल्या ब्राह्मणाला, अष्टादिकपालांचा उपयोग केल्यामुळे शत्रूने आपल्या यज्ञात उपयुक्त केलेल्या छंदांना आणि पुरोडाशांच्या योगाने शत्रूने अनुष्ठिलेल्या प्रात:सवनादि तिन्ही सवनांना त्या यजमानाने जणू काय व्यापून टाकल्यासारखे, अर्थात् तत्संबंधी सर्व श्रेय संपादन केल्याप्रमाणे होते. या इष्टीमध्ये पूर्वी 'प्रत्यभिचार' निमित्तक इष्टीत सांगितलेल्याच याज्यापुरोनुवाक्या उपयोगात आणाव्यात.

आपला शत्रू 'अवभृत' करून घरी परत आल्यावर उद्वासनीया

नामक इष्टीचे अनुष्ठान करून 'अनूबंध्या' संज्ञक वशेचे म्हणजे वांझ गाईचे 'उपाकरण' करील, अर्थात् त्या वांझ गाईचे हनन करून तिच्या वपादि अंगांचा याग करील त्याच वेळेला त्याचा प्रतिपक्षी असलेल्या यजमानाने 'मित्रावरुण' संज्ञक दोन देवांच्या उद्देशाने एककपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करावा म्हणजे एकाच कपालावर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचे यजन करावे. येथे अशी एक शंका उत्पन्न होते की, पूर्वोक्त कपालांचा उपयोग केल्याने शत्रूने आपल्या यज्ञात उपयुक्त केलेल्या छंदांना व्यापता आले, म्हणजे तन्निमित्तक श्रेय जसे मिळविता आले तसेच 'अनूबंध्या' संज्ञक पशुयागाला देखील का प्राप्त करून घेता येऊ नये? म्हणजे 'अनूबंध्या' संज्ञक वांझ गाईचे हनन करून तिच्या वपादि अंगांच्या हवनाचे श्रेयही का संपादन करता येऊ नये? परंतु ही शंका बरोबर नाही. कारण, संख्यासाम्यतेच्या योगाने छंदांना व्यापणे, अर्थात् तत्संबंधी श्रेय संपादन करणे शक्य आहे. 'अनूबंध्या' संज्ञक पशुयागामध्ये संख्येचेच मुळी अस्तित्व नाही. यामुळे पूर्वोक्त कपालांच्या योगाने अनुबंध्यारूप पशुयागाचे श्रेय संपादन करण्याला यजमान योग्य म्हणजे समर्थ होत नाही. 'मित्रावरुण' देवांच्यासाठी तयार केला जाणारा पुरोडाश एकाच कपालावर केला जात असल्यामुळे संख्यासाम्यत्वाच्या दृष्टीने 'अनूबंध्या' संज्ञक एकाच पशुयागाशी समत्वाला प्राप्त होतो. अर्थात् त्याचा याग 'अनूबंध्या' नामक पशुयागाला, अर्थात् तत्संबंधी श्रेय मिळविण्याला पात्र होतो. सारांश, शत्रूचा जसा अनूबंध्या संज्ञक वशायाग तसाच अध्वरकल्पा इष्टी करणाऱ्या यजमानाचा हा मित्रावरुणांच्यासाठी केलेला एककपालात्मक पुरोडाश म्हणजे प्रतिपक्षत्वरूप वशायाग होय. (अनुवाक ९).

आकाशात तळपत असलेला हा आदित्य म्हणजे भगवान् सूर्यनारायण एकटा विशेषत्वाने प्रकाशेनासा झाला. त्याचा प्रकाश कमी पडू लागला. तेव्हा देवांनी आदित्याच्या ठिकाणी उत्पन्न झालेल्या अल्पप्रकाशरूप दोषाचे प्रायश्चित म्हणजे प्रतीकार करावा अशी इच्छा धरली आणि तिला अनुसरून ह्या आदित्याला पूर्ववत् प्रकाश प्राप्त व्हावा म्हणून 'सोमारौद्र' म्हणजे सोम व रूद्र या दोन देवतांच्या उद्देशाने चरू शिजविला आणि त्याची इष्टी केली आणि तिच्या प्रभावाने देवांनी आदित्याच्या ठिकाणी पूर्वी होता तसा उत्कृष्ट प्रकाश निर्माण केला. यास्तव, जो ब्रह्मवर्चस्काम असेल म्हणजे श्रवण केलेल्या वेदाध्ययनाच्या संपत्तीने आपण युक्त व्हावे असे ज्याला वाटत असेल त्या

यजमानाने सोम व रुद्र या दोन देवतांच्यासाठी एकच चरू शिजवून त्याची इष्टी म्हणजे याग करावा. म्हणजे त्या योगाने जणू काय सोम व रुद्र यांचा स्वकीय असलेला हविर्भाग यजमानाने त्यांच्या सन्निध घेऊन जाऊन तो त्यांना समर्पण केल्या सारखे होते. आणि त्या भागाने प्रसन्न झालेले ते सोम व रुद्र हे दोन्ही देव ब्रह्मवर्चसाचे धारण करतात आणि तो यजमान श्रुताध्ययनसंपत्तीने युक्त होतो.

रुद्र जसा दुःख वितळवितो म्हणजे नाहीसे करतो त्याचप्रमाणे पौष मास हा आपल्या ठिकाणच्या थंडीने उष्णतारूप ताप निवारण करतो. यास्तव पौषमास हा जणू काय रुद्ररूप असून सोम म्हणजे चंद्र पूर्णिमेचे दिवशी पूर्णत्वाने प्रकाशित होत असल्यामुळे पूर्णिमा ही जणू काय सोमरूप आहे. यास्तव, सोमारौद्रांच्यासाठी जी इष्टी करावयाची ती पौषी पौर्णिमेस करावी. म्हणजे तिच्या प्रभावाने यजमान साक्षात् म्हणजे स्वतःच 'ब्रह्मवर्चस्' संपादन करतो. ब्रह्मवर्चसाचा परिग्रह म्हणजे संपादन उत्तम रीतीने व्हावे म्हणून या इष्टीसंबंधी यजन करावयाचे ते वेदीभोवती पडदा बांधून किंवा कुड घालून कोणास दिसू न देता करावे. या इष्टीमध्ये आज्य उपयोगात आणावयाचे ते जिचे वासरु पांढरेच आहे अशा पांढऱ्या रंगाच्या गाईचे दूध विरजून त्याच्या लोण्यापासून तयार केलेले असावे. त्याचप्रमाणे प्रोक्षण व मार्जन ही कर्मे उदकाने न करता आज्यानेच करावीत. असे केले असता जेवढे म्हणून ब्रह्मवर्चस् आहे तेवढे सर्व त्या यजमानाला प्राप्त होते. याविषयी काही ब्रह्मवादी असे म्हणतात की, नुसत्या आज्याने जे ब्रह्मवर्चस् संपादित व्हावयाचे तेवढेच युक्त म्हणजे पुरेसे आहे. परंतु पांढऱ्या रंगाचे वासरु असलेल्या पांढऱ्या गाईच्या दुधापासून निर्माण केलेल्या आज्याचा उपयोग करणे म्हणजे ब्रह्मवर्चसाचा अतिरेक करण्यासारखे होय. आणि त्यामुळे इष्टिकर्ता यजमान श्वेतकुष्ठ रोगाने व्याप्त होण्याचा मात्र वाटेकरी होईल. यास्तव त्या श्वेतकुष्ठ रोगाचा परिहार व्हावयासाठी सामिधेनीसंज्ञक ऋचांच्या ठिकाणी मनूने दृष्ट केलेल्या धाय्यासंज्ञक दोन ऋचा प्रक्षिप्त करून म्हणाव्यात. कारण, मनू जेवढे मंत्रवाङ्मय बोलतो ते सर्व औषधाप्रमाणे उपकारक असते. यास्तव, मनूने दृष्ट केलेल्या 'धाय्या'संज्ञक ऋचा 'सामिधेनी' संज्ञक ऋचांमध्ये प्रक्षिप्त करून म्हटल्या असता होत्याने जणू काय त्या यजमानाला त्याला होणार असलेल्या श्वेतकुष्ठ रोगावर अगोदरच औषधोपचार केल्यासारखे होते. अर्थात्

त्या यजमानाला श्वेतकुष्ठ होत नाही.

मी दुश्चर्मा होईन, म्हणजे माझ्या शरीराच्या कातडीला कसलातरी रोग होऊन ती बिघडेल अशी भीती ज्याला वाटत असेल, त्याने 'सोमापौष्ण' म्हणजे सोम व पूषा या दोन देवतांच्या उद्देशाने एकच चरू शिजवून त्यांचा याग करावा. सोम म्हणजे चंद्र हे उघडच आहे. चंद्राच्या ठिकाणी पोसल्या जाणाऱ्या ओषधींच्या रसापासूनच पुरुष उत्पन्न होत असतो. म्हणजे पर्यायाने सोमदेवतेच्याच द्वारा पुरुष उत्पन्न होत असल्याने तो सौम्य म्हणजे सोमदेवतासंबध्द आहे. ही पृथ्वी म्हणजेच 'पूषा' असे श्रुतिवचन असून पृथ्वीरूपी पूषादेवतेकडून दिल्या जाणाऱ्या तृणादिकावर पशूंचे पोषण होत असल्याने पशू हे 'पौष्ण' अर्थात् पूषादेवतासंबध्द आहेत. यास्तव, पूर्वोक्त चरुयाग केला असता तो त्या यजमानाला पशूंच्यासह अशा त्याच्या स्वकीय देवतेकडूनच अनुग्रहीत करतो. अर्थात्, पशुसहवर्तमान असलेला सोमदेव, त्या यजमानाच्या शरीराची कातडी उत्कृष्ट म्हणजे रोगरहित करतो. त्यामुळे तो यजमान दुश्चर्मा होत नाही.

आपल्याला प्रजा प्राप्त व्हावी, अशी ज्याला इच्छा असेल त्या यजमानाने 'सोमारौद्र' म्हणजे सोम व रुद्ररूप अग्नी या दोन देवतांच्या उद्देशाने चरू शिजवून त्याचा याग करावा. सोम हा गर्भाशयाचे ठिकाणी रेताचे धारण करणारा असून अग्नी हा रेताचे पचन करणारा असल्यामुळे तोच प्रजांना जन्म देणारा आहे. यास्तव, 'सोमापौष्ण' या युक्त देवतांच्या उद्देशाने याग केला असता संतुष्ट झालेला सोमदेव त्या यजमानाच्या ठिकाणी रेताचे धारण करतो आणि रुद्ररूप अग्नी प्रजा उत्पन्न करतो. अशा प्रकारे तो यजमान प्रजा संपादन करतो.

आपला शत्रू मरावा म्हणून त्याच्यावर 'अभिचार' म्हणजे मारणप्रयोग करण्यास प्रवृत्त झालेल्या यजमानाने 'सोमारौद्र' देवतात्मक चरू शिजवून त्याचा याग करावा. सोमदेवतेकडूनच पर्यायाने पुरुष उत्पन्न होत असल्याने पुरुष हा सौम्य म्हणजे सोमसंबध्द आहे. त्याच प्रमाणे जो अग्नी, तोच रुद्र आहे. यास्तव, सोम व रुद्र यांच्या प्रीत्यर्थ चरूयाग केला असता पुरुषावर स्वामित्व करणाऱ्या सोमदेवतेलाच हविर्द्रव्यरूपी मूल्य देऊन तिच्याकडून शत्रू असलेल्या पुरुषाला विकत घेतल्यासारखे, आणि क्रूर अशा रुद्राला चरूरूपी

लाच देऊन संतुष्ट करून त्या शत्रूला त्याच्या स्वाधीन केल्यासारखे होते. आणि तो शत्रू तत्काल मरतो. ज्याला एखादा रोग चिरकाल पीडा देत असतो, त्याच्या शरीरातील प्राणपोषक अन्नरस सोमाच्या ठिकाणी आणि शरीर अग्नीच्या ठिकाणी जात असते. म्हणजे दीर्घकाल रोगग्रस्त असलेल्या माणसाने खाल्लेल्या अन्नापासून जो सूक्ष्मरस उत्पन्न व्हावयाचा तो सोमदेवतेच्या कोपामुळे होतच नाही. त्याचप्रमाणे अन्नरसाच्या अभावी कुपित झालेला जठराग्नी त्या रोगाच्या शरीरातील मांसादि धातूंचे भक्षण करीत असल्यामुळे त्याचे शरीर कृश होत असते. यास्तव, अशा प्रकारे दीर्घकालीन रोगाने जो ग्रस्त झाला असेल, त्याने 'सोमारौद्र'देवतात्मक चरू तयार करून त्याचा याग करावा. असे केले असता त्या यजमानाच्या शरीरातील अन्नरस सोमदेवाला चरूरूपी हवीची किंमत देऊन त्याचे पासून त्या यजमानाने विकत घेतल्यासारखे आणि रुद्ररूपी अग्नीलाही चरुरूपी मोबदला देऊन त्याच्याकडून शरीर विकत घेतल्यासारखे होते. यामुळे तो यजमान निरोगी होतो. इतकेच काय पण, यागकर्ता यजमान घटका दोन घटका गतप्राण होऊन भूमीवर आडवा झाला असला तरी तो सावध होऊन जगतो. मग रोगग्रस्त निरोगी होईल यात काय संशय? दीर्घकालीन रोगी असलेला मनुष्य सोम व रुद्र यांनी ग्रासलेला असतो, म्हणजे सोम व रुद्र या दोघा देवांच्या कडून तो पुरुष घासाप्रमाणे मुखात घातलेला असतो. अशा प्रकारच्या रोग्याला पूर्वोक्त यागप्रसंगी होता जणू काय याज्यापुरोनुवाक्यांच्या पठणबलाने सोम व रुद्र यांच्या मुखातून जणू काय बाहेर ओढून काढीत असतो. आणि त्यामुळे त्याच्यावर सोम व रुद्र यांचा कोप होऊन तो होता दु:ख भोगण्याला पात्र होत असतो. यास्तव, होत्याने एक ओझे वाहणारा बैल ब्राह्मणाला दान द्यावा. देवांच्या हविर्द्रव्याचे ओझे वाहत असल्यामुळे रुद्ररूप अग्नी हा अनड्वान म्हणजे जणू बैलच असून अग्निविषयक आवाहनमंत्र पठण करीत असल्यामुळे होता हाही वन्ही म्हणजे रुद्ररूप अग्नीच आहे. यास्तव, होता जणू काय अनडुहरूप अग्नीने अग्निरूपी स्वत:च्या आत्म्यालाच आपल्याला प्राप्त होणार असलेल्या दु:खाची शांती होण्याकरता जणू काय संतुष्ट करीत असतो.

स्वत:शी शत्रुत्व करणाऱ्या माणसाचे जे घर किंवा जमीन असेल त्याविषयी तंटा उपस्थित करीत असेल त्या यजमानाने 'सोमारौद्र' म्हणजे सोम व रुद्र यांच्यासाठी चरूचा निर्वाप करून त्याचा याग करावा. या

यागाचे अनुष्ठान करताना वेदीचा परिग्रह म्हणजे वेदीचे स्थल मापून व आखून घेण्याचा संस्कार केल्यानंतर त्या वेदिस्थलापैकी अर्ध्या भागाचेच 'उध्दनन' म्हणजे खनन करावे, अर्ध्या भागाचे करू नये. वेदीच्या दक्षिण बाजूच्या अर्ध्या भागात बर्ही पसरावेत, अर्ध्या भागात पसरू नयेत. इध्मापैकी अर्धाच इध्म अग्नीत द्यावा, अर्धा देऊ नये. असे केले असता त्या अनुष्ठानाच्या प्रभावाने तो यजमान स्वतःशी शत्रुत्व करणाऱ्या माणसाच्या मालकीच्या घराविषयी किंवा जमीनीविषयी तंटा उत्पन्न करणारा असा दुसराच एक वैरी उत्पन्न करतो. (अनुवाक १०).

आपल्याला गांव मिळावा अशी इच्छा करणाऱ्या यजमानाने इंद्र देवतेच्या उद्देशाने एकादशकपालात्मक आणि 'मरुत्' नामक देवांच्या उद्देशाने सप्तकपालात्मक पुरोडाश तयार करून त्यांचा याग करावा. म्हणजे त्या यजमानाने जणू काय इंद्र व मरुत् यांचा स्वकीय असा हविर्भाग घेऊनच त्यांच्या जवळ जाऊन त्यांना तो हविर्भाग अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या हविर्भागाने प्रसन्न झालेले ते इंद्र व मरुत् त्या यजमानाला त्याच्या जातीचे लोक अनुकूल करून देतात. अर्थात् त्यांच्या साहाय्याने तो गांव मिळवितो व ग्रामाधिपती बनतो. इंद्र व मरूत् यांच्या हविर्द्रव्याचा विभाग स्पष्टतेने ओळखता यावा म्हणून इंद्र देवतेचा पुरोडाश आहवनीयाग्नीचे ठिकाणी भाजावा आणि मरुत् हे उग्र स्वभावाचे देव असल्यामुळे त्यांच्यासाठी केल्या जाणाऱ्या पुरोडाशाचे 'अधिश्रयण' गार्हपत्याग्नीवर करावे. म्हणजे तो पुरोडाश गार्हपत्याग्नीवर भाजावा. मरुतांचा पुरोडाश सप्तकपालात्मक असतो, याचे कारण मरुतांचे सात गण म्हणजे समुदाय आहेत. यास्तव, सप्तकपालात्मक पुरोडाश केल्याच्या योगाने ते मरुत् आपल्या सातही गणांकडून यजमानाला त्याच्या जातीचे लोक अनुकूल करून देतात. मरुतांच्यासाठी केलेला पुरोडाश होता सामिधेनीसंज्ञक ऋचा म्हणावयास लागल्यानंतर वेदीमध्ये आसादन करावा, म्हणजे ठेवावा. म्हणजे तो त्या यजमानाला सर्व प्रजा अनुकूल असे वर्तन करणाऱ्या होतील असे करतो.

क्षत्रिय व प्रजा यांना मी परस्परांशी कलह करावयास लावीन म्हणजे राजा व प्रजा यांच्यामध्ये वितुष्ट उत्पन्न करून परस्परांत कलह माजेल असे मी घडवून आणीन, अशी ज्याला इच्छा होईल त्या यजमानाने आताच

सांगितलेली इंद्र व मरुत् यांच्या उद्देशाने करावयाची इष्टी करावी. मात्र या इष्टीत फरक करावा तो असा की, इंद्रा करता अवदान घेतेवेळी अध्वर्यूने 'इंद्रायानुबूहिं' असा प्रैष द्यावा आणि आश्रावण केल्यानंतर म्हणजे 'आश्रावय' असे म्हटल्यानंतर 'मरुतो यज' असे म्हणावे. होत्यानेही मरुत् देवांच्या संबंधीच याज्या म्हणावी. मरुतांच्यासाठी अवदान घेत असतांना 'मरुद्‌भ्योऽनुब्रूहि' म्हणजे मरुतांच्या विषयी 'पुरोनुवाक्या' म्हण, असा अध्वर्यूने होत्याला प्रैष द्यावा व आश्रावण केल्यावर 'इंद्रं यज' असे म्हणावे. होत्यानेही इंद्रदेवाचीच 'याज्या' म्हणावी. असे झाल्याने इंद्रासाठी घेतलेला भाग मरुतांना आणि मरुतांच्या करता घेतलेला हविर्भाग इंद्राला दिल्याप्रमाणे होऊन साहजिकच इंद्र व मरुत् यांच्यामध्ये आपापल्या हविर्भागाविषयी अध्वर्यूकडून कलह उत्पन्न केला जाईल. आणि त्यांच्या कलहास अनुसरून राजा आणि प्रजा एकमेकांची हिंसा करावयास म्हणजे परस्परांना अत्यंत पीडा द्यावयास ते प्रवृत्त होतील.

राजा व प्रजा यांच्यामध्ये उत्पन्न झालेला कलह मिटावा आणि परस्परांचा उत्तम सलोखा व्हावा, अशी इच्छा करणाऱ्या यजमानाने हीच इष्टी करावी व तीमध्ये ज्या देवतेसाठी घेतले असेल ते त्याच देवतेला दिले जाईल अशा रीतीने अध्वर्यूने यजन करावे. म्हणजे त्याने ज्याचा भाग त्याला देऊन त्या दोघांनाही संतुष्ट केल्यासारखे होऊन कलहाला कारणच राहणार नाही. आणि इंद्र व मरुत् हे परस्परांशी सलोख्याने वागतील. अर्थात् त्यांना अनुसरून राजा व प्रजा यांच्यामधील कलह मिटून तेही परस्परांच्याशी सुखासमाधानाने वागू लागतील.

आपल्याला गांव मिळावा आणि आपण ग्रामाधिपती व्हावे अशी इच्छा असेल त्या यजमानाने इंद्रदेवतेसाठी एकादशकपालात्मक व विश्वेदेवांच्यासाठी द्वादशकपालात्मक पुरोडाश तयार करून त्यांचा याग करावा. असे केले असता त्या यजमानाने जणू काय इंद्र व विश्वेदेव यांचा स्वकीय हविर्भाग घेऊनच त्यांच्या सन्निध जाऊन तो त्यांना समर्पण केल्यासारखे होते. व त्या योगाने संतुष्ट झालेला तो इंद्र व विश्वदेव त्या यजमानाला त्याच्या जातीचे लोक अनुकूल करून देतात आणि त्यांच्या साह्याने तो गांव मिळवितो. अर्थात् ग्रामाधिपती होतो. या यागात म्हणजे इष्टीत अवदान घेण्याच्या पध्दतीत फरक करावयाचा तो असा की, इंद्रासाठी प्रथम एकदाच अवदान घेतल्यावर

त्याच वेळी विश्वेदेवांच्यासाठी दोन वेळ अवदान घ्यावे आणि त्याच अवदानावर पुन्हा इंद्रासाठी एकदा अवदान घ्यावे. अशा प्रकारचा अवदानक्रम त्या यजमानाला त्याच्या जातीचे ग्रामस्थ लोक दोन्ही बाजूंनी म्हणजे त्याला गांव मिळवून देतांना व मिळाल्यानंतरही साहाय्यकारी होतील, अशाप्रकारे इंद्रियसामर्थ्ययुक्त होतील असे करतो. वस्त्राच्या दोन्ही बाजूला तांबड्या रंगाचे काठ असतात. दोन्ही बाजूकडील काठाचे तांबड्या सुताचे ताणे किंवा धागे प्रथम फणीमध्ये ओंवून घेऊन नंतर मधल्या वस्त्राचे धागे फणीत ओंवून जे वस्त्र तयार केले जाते त्या वस्त्रास 'उपाधाय्यपूर्वयं' अशी संज्ञा आहे. आता सांगितलेल्या यागाच्या सांगतेसाठी 'उपाधाग्यपूर्वयं' संज्ञक वस्त्र दक्षिणा म्हणून द्यावे. म्हणजे ते यजमानाच्या जातीच्या लोकांच्या ठिकाणी ते यजमानाची दोन्ही बाजूंनी सेवा करण्याची प्रवृत्ती उत्पन्न करण्यास कारणभूत होते.

आपल्याला गांव मिळावा अशी इच्छा असलेल्या यजमानाने पांढऱ्या गाईच्या दुधात प्रियंगूंचा म्हणजे राळ्यांचा चरू शिजवावा आणि 'मरुत्' देवांच्यासाठी त्याचे यजन करावे. पांढऱ्या गाईच्या दुधापासून 'मरुत्' उत्पन्न झाले असून 'प्रियंगु' म्हणजे राळे देखील गाईच्या दुधापासून उत्पन्न झाले आहेत. अर्थात् मरुत् आणि प्रियंगू हे परस्परांचे सहोदर आहेत. आणि म्हणूनच देवतेच्या दृष्टीने प्रियगू हे मरुद्देवात्मक आहेत. यास्तव, मरुतांच्यासाठी प्रियगुचरूचा म्हणजे राळ्यांच्या भाताचा याग केला असता त्या यजमानाने जणू काय मरुतांचा स्वकीय हविर्भाग घेऊनच त्यांच्याजवळ गेल्यासारखे व त्यांना तो अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या भागाने संतुष्ट झालेले 'मरुत्' त्या यजमानाला त्याच्या जातीचे लोक अनुकूल करून देतात आणि तो गांव मिळवितो. या यागात 'प्रियवती' म्हणजे 'प्रिय' या शब्दाने युक्त असलेल्या 'याज्यापुरोनुवाक्या' होत्याने पठण कराव्यात. अशा प्रकारचे पठण त्या यजमानाला त्याच्या सजातीय लोकांत प्रिय करते. दोन चरण असलेली पुरोनुवाक्या योजावी. म्हणजे ती द्विपद अशा मनुष्यांना यजमानाला अनुकूल करते. चार चरण असलेली याज्या म्हणावी म्हणजे ती यजमानाला चतुष्पाद असे पशू अनुकूल करून देते.

देव आणि असुर एकमेकांशी युध्द करण्यास उद्युक्त झाले, त्यावेळी देवांपैकी कोणीही दुसऱ्या देवाला 'ज्यैष्ठ' म्हणजे पुढारीपणाचा अग्रमान देण्यास

तयार होईना ! कोणी कोणाचे श्रेष्ठत्व कबूल करीना ! अर्थात्, देवांमध्ये परस्परांविषयी स्नेहभाव राहिला नाही. सर्वजण एकमेकांना अप्रिय झाले ! आणि त्यामुळे त्यांच्यात फाटाफूट उत्पन्न झाली. त्यांच्या सैन्यात चार विभाग पडले व एकेका विभागाचा नेता मीच काय तो श्रेष्ठ अर्थात् वरचढ किंवा पुढारी आहे असे आपल्या मनात समजू लागला. त्यांच्या सैन्याचे जे चार संघ झाले, त्यांपैकी अग्नीने अष्ट वसूंच्यासह एक संघ तयार केला. अकरा रुद्रांच्यासह सोम आपला एक संघ तयार करून बसला. मरुतांच्यासह इंद्राने तिसराच एक संघ निर्माण केला. आणि बारा आदित्यांच्या सह वरुणानेही आपला चौथा संघ निर्माण केला. तेव्हा इंद्र प्रजापतीकडे गेला व त्याची त्याने सेवा केली आणि त्याच्या उपदेशास अनुसरून आपसातील फाटाफूट मिटून इतर देवांनी आपले ज्येष्ठत्व म्हणजे पुढारीपण मान्य करावे म्हणून 'संज्ञानी' नांवाची इष्टी केली. त्या इष्टीच्या प्रभावाने देव परस्परांचा मत्सर करीनासे झाले आणि त्या सर्वांनी एकमताने आपला पुढारी म्हणून इंद्राला उत्तम प्रकारे मान्यता दिली. सारांश - जो कोणी सजातीय लोकांकडून अप्रिय गणला जात असेल त्याच्याकडून आता सांगितलेल्या 'संज्ञानी' इष्टीचे यजन करावे. वसूंच्यासह अग्नीसाठी अष्टकपालात्मक, रुद्रासहवर्तमान असलेल्या सोमाकरता चरू, मरुतांच्यासह इंद्रासाठी एकादशकपालात्मक पुरोडाश, आणि आदित्यांच्यासह असणाऱ्या वरुणाकरिता चरू अशाप्रकारे हविर्द्रव्यांची योजना करून यजन करावे. म्हणजे इंद्राप्रमाणेच आपला स्वामी असलेल्या यजमानाला श्रेष्ठत्व देण्याविषयी त्याच्या जातीचे लोक उत्तम प्रकारे मान्यता देतात. आणि तो वसिष्ठाप्रमाणे आपल्या सजातीयांचा पालक होतो. (अनुवाक ११).

१ ब्रह्मांडरूपी हिरण्याचे ठिकाणी गर्भरूपाने राहणारा प्रजापतीच प्राणिमात्र उत्पन्न होण्यापूर्वी शरीर धारण करून उत्पन्न झाला आणि तोच पुढे उत्पन्न होणाऱ्या जगाचा एकमात्र अधिपती झाला. त्यानेच अत्यंत विस्तीर्ण अशा द्युलोकाचे धारण केले असून ह्या भूमीलाही त्यानेच धारण केले आहे. अशाप्रकारच्या आदिपुरूष प्रजापती देवाला हविर्द्रव्याच्या अर्पणाने संतुष्ट करून आम्ही त्याची सेवा करीत आहोत. २ अग्निचयन करण्याविषयी प्रवृत्त होणाऱ्या कुशल यजमानास उत्पन्न करणारी, व प्रज्वलित करण्यास योग्य अशा अग्नीला उत्पन्न करणारी महनीय अशी उदके, ज्या प्रजापती देवाच्या अनुग्रहाने विश्वाकार झाली आहेत त्या प्रजापती देवापासूनच सर्वांच्या जीवनाला कारणभूत असा एक प्राण

निर्माण झाला. त्या प्रजापतीदेवाला हविर्द्रव्य समर्पण करून आम्ही त्याची सेवा करीत आहो. ३ हे प्रजापते या जगात उत्पन्न झालेल्या ह्या ज्या वस्तू आहेत त्या सर्व वस्तू निर्माण करणारा तुझ्या खेरीज दुसरा कोणीही झाला नाही. आम्ही ज्या फलाची इच्छा धरून तुझे यजन करीत आहोत ते फल आम्हाला प्राप्त होवो. तुझ्या अनुग्रहाने आम्ही सर्व प्रकारच्या धनांचे पालक होऊ. ४ द्युलोक व पृथ्वी यांचा तो पुत्र म्हणजे प्रजापती आपल्या पित्याला, अर्थात् द्युलोकाला जाणतो. तो आपल्या मातेला म्हणजे पृथ्वीला जाणतो. अभिज्ञ असा तो प्रजापती आपल्या मातापितरांचा पुत्र होतो. तो यजमानाला वरचेवर द्यावे लागणाऱ्या धनाने युक्त होतो. आणि तो प्रजापती सर्वव्यापी असे विराट्‌रूप धारण करून वरचा द्युलोक आच्छादित करता झाला. त्याचप्रमाणे त्याने अंतरिक्ष आणि स्वर्गलोकही व्यापून टाकला. इतकेच काय पण इहलोकापासूनचे सर्व लोक व्यापून टाकले आणि तो चतुर्मुख अशा प्रकारचे स्वरूप धारण करून सत्यलोकी मर्यादित होऊन राहिला. ५ सर्व जगाला सूर्य दृष्टीस पडावा म्हणूनच किरणरूपी घोडे त्या जन्मजात ज्ञानी अशा देदीप्यमान सूर्याला अत्यंत उंच अशा उदयाचलावर वाहून आणीत असतात. ६ मित्र, वरुण व अग्नी यांचा अर्थात् उपलक्षणाने त्रैलोक्यातील प्राणिमात्राचा जणू नेत्रच आणि अत्यंत आश्चर्यकारक, अनेक रंगांनी युक्त व जणू काय किरणांचे एकत्र झालेले सैन्यच असे हे आदित्यमंडल उदयास आले आहे. या मंडलाच्या ठिकाणी असणारा भगवान् सूर्यनारायण स्थावर व जंगम अशा सर्व जगाचा आत्माच असून त्याने द्युलोक, पृथ्वी व अंतरिक्ष व्यापून टाकले आहे. ७ हे अग्ने, तू प्राचीन कालचे धनिक उदार होऊन आपल्या ऐश्वर्याचा विस्तार करीत त्याप्रमाणे नवीनच संपादन केलेल्या, आम्हाला देण्यात येणाऱ्या अत्यंत निर्मल अशा सुवर्णाने आपले ऐश्वर्य अत्यंत विस्तीर्ण कर. ८ आपली उपासना करणाऱ्या मनुष्यांना हितकर होतील अशी पुष्कळशी धने हातात धारण करणारा हा अग्निदेव त्याच्या ठिकाणी असलेल्या बुध्दिमत्तेच्या आधिक्याचा उपयोग करून, निरंतर यज्ञानुष्ठानात गढून राहणाऱ्या यजमानांना विधात्याप्रमाणे कार्यक्षम करो. उपासकांचे कल्याण करणारा तो अग्निदेव सर्व धनांचा पालक, अर्थात् धनाधिपती आहे. आणि म्हणूनच तो सर्व ठिकाणची धने एकत्र करण्याला समर्थ आहे. ९ आम्हाला देण्यासाठी ज्याने आपल्या हातात सुवर्ण घेतलेले आहे, अशा भगवान् सूर्याजवळ जाऊन आमचे रक्षण

व्हावया।साठी मी त्याला बोलावीत आहे. तो सूर्यनारायण देवतारूप असल्यामुळे आम्हाला योग्य स्थान कोणते हे समजणारा आहे. १० हे सर्वप्रेरका सूर्यदेवा, आज आम्हाला अपेक्षित असलेले व सेवनीय असे कर्मफल दे. उद्या कर्मफल दे. त्यानंतर प्रत्येक दिवशी कर्मफल देत जा. हे देवा, दीर्घकाळ पर्यंतच्या स्वर्गनिवासाची आम्हाला सिध्दी व्हावी म्हणूनच ह्या श्रध्दायुक्त अशा बुद्धीने आम्ही उत्कृष्ट असे कर्म करणारे होऊ. ११ हे पृथिवी, तूं पर्वतांचा खेदजनक असा भार अशा दृढतेने वाहत आहेस, ते मोठे नवल. हे भूमि, ठिकठिकाणच्या उतरत्या प्रदेशाने युक्त आणि महत्त्वसंपन्न अशी तू आपल्या महिम्याने ज्यांना अत्यंत सुखवीत असतेस, त्या प्राण्यांनाही दृढतेने धारण करीत आहेस. १२ अत्यंत निर्मल आणि जिच्या ठिकाणी विविध अशा जनांची ये, जा चालू असते अशा हे भूदेवि, तू पुढे चालत असलेला दुसरा घोडा पाहताच त्याला मागे टाकण्याच्या ईर्षेने किंकाळणाऱ्या आपल्या घोड्याला त्याच्यावर बसलेला स्वार जसा भरधांव सोडतो त्याप्रमाणे भोग्य वस्तूची इच्छा करणाऱ्याकडे भोग्यवस्तू त्वरेने पाठवितेस, अशा हे पृथिवि, निरनिराळ्या प्राण्यांचे सर्व संघ लोकांच्या नजरेत भरणाऱ्या पिकांच्या निमित्ताने तुझा आश्रय करीत असतात. १३ हरी नामक अश्वांनी युक्त असलेल्या हे इंद्रदेवा, जो सोमरस सेवन केल्यानंतर मला पीडा करीत नाही, अशा, उदरामध्ये स्वास्थ्य पावलेल्या आणि मित्राप्रमाणे हित करणाऱ्या सोमाशी मी एकजीव होऊन राहीन. हा जो सोमरस मी आपल्या उदरात साठविला आहे तो नीट जिरला जावा म्हणून, ओकारी येण्याच्या आपत्तीतून तारणाऱ्या इंद्रदेवाच्या संमुख मी येत आहे.१४ यत्किंचितही क्रोध नसलेला, दगडी बत्याचे प्रहार मुकाट्याने सोसणारा, आपल्यावर होत असलेल्या प्रहारांनी कंपित होणारा, अनेक कर्मांनी युक्त, सर्व अवयव झिजलेला आणि रसविहीन झालेला वल्लीरूप सोम सर्व ठिकाणी विस्तृत झालेल्या सर्व वनांना वाढवीत असतो. ज्यांची उपमा द्यावयाची अशा कोणत्याही लौकिक वस्तू इंद्राशी बरोबरी करून त्याची अपमानरूपी हिंसा करण्यास प्रवृत्त होत नाहीत. १५ जमदग्नीसदृश असा, यज्ञ करण्याची इच्छा असलेला यजमान सोम कुटून त्याचा रस काढल्यावर इंद्राची पूजा करून त्याला सोमपान कसे करवावे हे उत्तम जाणतो. हे इंद्रदेवा, उपासकासाठी फलाचा वर्षाव करणारा तू बलवान् अर्थात् उदरात धारण करण्यास अशक्य व ओकारी येण्याच्या बेतात आलेल्या सोमरसाचे नियंत्रण करणारा आहेस.

यास्तव, त्या सोमरसाला माझ्या उदरात नीट जिरव. तुझे स्तवन करणाऱ्या यजमानाला सोमरस पचावा म्हणून त्याच्या उदरातील सोमरसाचे धारण करणारा वायू दृढ कर. १६ हे सोम, इष्टीरूप श्रेष्ठकर्म करणारे ऋत्विज कुटण्याच्या त्रासाने पीडित झालेल्या तुला साव्यांचे तांदुळ शिजवून तयार केलेले चरुरूपी हविर्द्रव्य अर्पण करून तुझी पूजा करतात. सोम शब्दाने अभिव्यक्त केला जाणारा तू जणू सूर्यच आहेस. ज्या माझ्या उदरात, मी प्यालेला रस मला ओकारी आणण्याच्या बेतात आहे, त्या उदरात हा इंद्र युध्दामध्ये जाण्याच्या कामी जशी त्वरा करतो तशाच प्रकारे ओकारी येण्याच्या बेतात आलेल्या सोमरसाला आवरून धरणाऱ्या वायूला त्वरेने पाठवितो. १७ स्वत:ला कर्मानुष्ठानाकरता प्रेरणा करणारा मी यजमान तुझ्या सन्निध येऊन तुला हवी प्रदान करीत आहे. हे यज्ञात्मक विष्णो, माझे हविर्द्रव्य सेवन कर. उत्कृष्ट अशा स्तुतींनी युक्त अशी माझी वचने तुला संबोधित करोत. परमपूज्य अशा हे विष्णो!, तुम्ही अनेक प्रकारच्या श्रेयाने आम्हाला सर्वदा रक्षण करा. १८ पशूंच्या ठिकाणी प्रविष्ट होऊन राहणाऱ्या हे भगवान् विष्णुदेवा, आज मी करीत असलेल्या यज्ञात तुझ्या त्या नांवाची- तुझ्या नांवाचे स्पष्टीकरण करणारा मी - प्रशंसा करतो. यज्ञ म्हणजे विष्णू पशू हे शिपी होत. यज्ञरूप विष्णूच पशूंच्या ठिकाणी प्रतिष्ठित झालेला असतो. म्हणूनच त्याला 'शिपिविष्ट' असे म्हणतात. अशाप्रकारे तुझ्या शिपिविष्ट नांवाचे स्पष्टीकरण जाणणाऱ्यांचा स्वामी असलेला मी जरी तपस्वी नाही, तरी देखील हे विष्णो, दिसत असणाऱ्या ह्या मलिन लोकाच्या पलीकडे अत्यंत दूर राहणारा तपस्वी जो तू, त्या तुझे मी स्तवन करीत आहे. १९ हे भगवान् विष्णो तू, 'मी शिपिविष्ट आहे' असे ज्या अर्थी वरचेवर म्हणत असतोस त्या अर्थी तुझ्या मनात हे तुझे नांव लोकात निंद्य झाले आहे असे तुला वाटत असावे. पण ते व्यर्थ आहे. तुझे हे श्रेष्ठ नांव आमच्यापुढे गुप्त ठेऊ नकोस, जरी तू आपले नांव गुप्त रहावे म्हणून एका युध्दप्रसंगी रूपांतर केले होतेस, तरी आमच्या बुध्दीचे ठिकाणी तुझे नांव प्रशस्त आहे, असेच वाटते. २० हे अग्रे तुला हवी प्रदान करणाऱ्या यजमानाला धन, आणि सुंदर अवयवांनी युक्त व भृत्यादिकांनी संपन्न असा पुत्र दे. तू देणार असलेल्या पुत्रांनी युक्त अशा आम्हाला सर्व कार्यात तीक्ष्ण कर. २१ हे अग्रिदेवा, आम्हाला यज्ञानुष्ठानाचे जणू द्वारच असे शेकडो पशू दे. आणखीही हजारो पशू दे.

अन्नदानाविषयी आमची कीर्ती व्हावी म्हणून आमच्या जवळच्या अन्नाची निर्विघ्नपणे वाढ कर. मंत्रपुरस्सर अशा कर्माने द्युलोक व पृथ्वी ही आम्हाला अत्यंत अनुकूलतेने वागवितील असे कर. उष:काल स्वर्गाला प्रकाशित करतात त्याप्रमाणे आमच्या घरी ते प्रकाशाचा अत्यंत विस्तार करोत. २२ हा अग्निदेव आम्हाला धन देवो. आमच्या पुत्रादिकांचा पालक असा जो अग्नी तो ऋषीसारखा पुत्र हजार प्रकाराने देवो. ह्या अग्नीने स्वर्गलोकाचे ठिकाणी आमचे हविर्द्रव्य विस्तारले आहे. त्या अग्नीची निरनिराळ्या प्रदेशांमध्ये अनेक स्थाने विशेषत्वाने संपादित झालेली आहेत. २३ हे इंद्रदेवा आम्हाला व आमच्या प्रजांना परस्परांमध्ये कलह करण्याविषयी केव्हाही प्रवृत्त करू नको. आणि अगत्यपूर्वक हविर्द्रव्य तुला अर्पण करणाऱ्या यजमानाला देण्याकरिता तुझ्याजवळ जे भरपूर धन साठविलेले असेल, ते आण आणि आम्हाला दे. हे इंद्रदेवा, तुला हविर्द्रव्य प्रदान करण्यास साधनीभूत व प्रशस्त अशा या नूतन यज्ञकर्मामध्ये तुझ्या विषयीच पठण केल्या जाणाऱ्या उक्थ-संज्ञक मंत्रसंघाचे ठिकाणी तुझीच स्तुती करणारे आम्ही आमची इच्छा सफल करण्याविषयी तुझी मन:पूर्वक प्रार्थना करीत आहोत. २४ हे इंद्रदेवा तू आम्हाला देण्याकरिता धन घेऊन येच. हे तू आणलेले धन आमच्याखेरीज इतरत्र न राहो. इतर कोणाच्या हाती न पडो. ज्या अर्थी आम्ही तुलाच सर्व धनिकांपेक्षा श्रेष्ठ असा धनाधिपती समजतो त्या अर्थी तू आम्हाला देण्यासाठी धन घेऊन ये. हे इंद्रा तुझ्याजवळ महनीय व देण्याला योग्य असे धन असेल, ते धन, हे हरीसंज्ञक दोन घोडयांच्या रथात बसणाऱ्या इंद्रदेवा तू आम्हाला दे. २५ हे अन्नवंता, प्रजापतिदेवा, तुझे शरीर पापरहित आहे. घृताप्रमाणे पवित्र व सुवर्णाप्रमाणे शुध्द असलेले ते तुझे शरीर अलंकाराप्रमाणे सर्वांना आवडो. २६ चंद्राप्रमाणे उत्कृष्ट आल्हाद देणाऱ्या देवा, तू आपल्या मुखाचे ठिकाणी तुपाने भरलेल्या जणू काय दोन पळयाच अशा हनुवटया धारण केल्या आहेस. आणि हे बलाधिपते, 'शस्त्रे' पठण केली जाणाऱ्या यज्ञात आम्हाला तू उत्कर्षपूर्ण कर. स्तुती करणाऱ्या यजमानाच्यासाठी तू अन्न घेऊन ये. २७ हे वायुदेवा, पुष्ट असे शंभर घोडे आपल्या रथाला जोड. किंवा तुझे हजार घोडे रथाला जोडले जावोत. तुझा रथ तीव्र वेगाने लौकर येवो. २८ हे वायुदेवा, यज्ञगृहाचे ठिकाणी केल्या जाणाऱ्या इष्टीच्या सिध्दीसाठी 'नियुत्' नांवाच्या घोड्या जोडलेल्या रथात बसून तू तुला हवी प्रदान करणाऱ्या यजमानाजवळ त्वरेने येऊन

पोचतोस. त्या घोड्या आम्हाला उत्तम प्रकारे अनुकूलच आहेत. ह्या यज्ञकर्मात आम्हाला भोजनोपयुक्त धन भरपूर मिळवून दे. त्याप्रमाणे पुत्र, गाई आणि अश्व यांच्यासह असलेले अन्न आम्हाला मिळवून दे. २९ ज्या उदकांच्यासह आम्ही इंद्राचे स्तवन करीत हर्षित होत असतो ती धनवंत, आमच्या बरोबर हर्षित होणारी, आणि भरपूर अन्नाने युक्त अशी उदके इंद्राच्या ठिकाणी आम्हाला सुख देण्यासाठी उभी असोत. ३० हरी नांवाचे घोडे आपल्या रथाला जोडणाऱ्या हे इंद्रदेवा, हा यजमान धनसंपन्न असाच होऊन धनवान्, उत्साहयुक्त व सर्व देवांत श्रुत असलेल्या तुझ्या सारख्या देवाचे अत्यंत स्तवन करणारा होवो. (अनुवाक १२).

प्रपाठक ३

ऐश्वर्यप्राप्तीला योग्य असून ज्याला ऐश्वर्य प्राप्त होत नाही त्याला आदित्यांनी त्याच्यावर असलेल्या अवकृपेमुळे ऐश्वर्यापासून दूर केला आहे, असे समजावे. यास्तव ज्याला ऐश्वर्यप्राप्तीची इच्छा असेल, त्या यजमानाने 'आदित्याःभुवद्वन्तः' म्हणजे ऐश्वर्याने युक्त असलेले जे आदित्य, त्यांच्या चरूचे निर्वपण करून त्याचा याग करावा. म्हणजे यजमानाने जणू काय, ऐश्वर्यसंपन्न आदित्यांच्या सन्निध त्यांचा स्वकीय हविर्भाग घेऊन गेल्या सारखे व तो त्यांना समर्पण केल्यासारखे होते. आणि मग, त्या हविर्भागाने सतुंष्ट झालेले ते ऐश्वर्यवंत आदित्य त्या यजमानाला ऐश्वर्याला प्राप्त करतात व तो यजमान खचित ऐश्वर्यसंपन्न होतो.

एखाद्या राजाला त्याच्या राज्यापासून भ्रष्ट करणारे किंवा स्वराज्य-भ्रष्ट झालेल्या राजाला पुन्हा त्याच्या राज्यावर स्थापन करणारे 'आदित्याः धारयद्वंतः' म्हणजे 'धारणक्षम' असे सामर्थ्य ज्यांच्या जवळ आहे असे आदित्यसंज्ञक देवच होत. यास्तव, जो राजा आपल्या राज्यापासून भ्रष्ट झाला असेल अथवा भ्रष्ट होण्याच्या स्थितीत असेल, त्याने धारणक्षम अशा सामर्थ्याने युक्त अर्थात् राज्यभ्रष्ट झालेल्याला पुन्हा स्वराज्यावर स्थापन करणाऱ्या आदित्यांच्या उद्देशाने चरू शिजवून त्याची इष्टी म्हणजे याग करावा. म्हणजे यजमानाने जणू काय 'धारयद्वंत' अशा आदित्यांना स्वकीय असलेला हविर्भाग घेऊनच त्यांच्याजवळ जाऊन तो त्यांना अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या भागाने संतुष्ट झालेले धारयद्वन्तसंज्ञक आदित्य हे देवच स्वराज्यभ्रष्ट

अशा त्या यजमानाला त्याच्या राज्यातील प्रजाजनांमध्ये पुन्हा सामान्यत्वाने स्थापन करतात. अर्थात् तो राजा शत्रूंकडून भ्रष्ट केला जात नाही. स्वराज्यभ्रष्ट होण्याच्या स्थितीत असेल त्या यजमानाने या यागाचे अनुष्ठान करीत असतांना 'अदितेऽनुमन्यस्व' म्हणजे हे भूदेवते, स्वराज्यभ्रष्ट होण्याच्या स्थितीत असलेल्या मला माझा, माझ्या राज्यात प्रवेश होण्याविषयी अर्थात् माझे राज्य शत्रूकडे न जाता माझ्याकडे राहण्याविषयी अनुमोदन देऊन तू मला धन्य कर असे म्हणून त्याने शत्रूने पादाक्रांत केलेल्या भूमीतील धूळ उचलून घ्यावी. ही भूमी म्हणजे अदिती देवी होय. यास्तव, पूर्वोक्त मंत्राने शत्रूने पादाक्रांत केलेल्या भूमीतील धूळ उचलून घेतली असता ती अदिती देवी त्या राजाचे राज्य त्याच्याच हाती राहण्याविषयी अनुमोदन देते. म्हणूजे त्या राजाला स्वराज्यभ्रष्ट होऊ देत नाही. यजमानाने 'सत्याशीः' असा मंत्र म्हणावा. मी इच्छित असलेले फल सत्य होवो, मी इच्छिलेले फळ मला प्राप्त होवो, असा त्या मंत्राचा अर्थ आहे. तो म्हटला म्हणजे अदिती देवी त्याने इच्छिलेले फळ सत्य करते. म्हणजे त्याला मिळवून देते. 'इह मनः' असे यजमानाने म्हणावे. माझ्या राज्यप्रवेशाला म्हणजे माझे राज्य माझ्याच स्वाधीन राहण्याविषयी प्रजांचे मन अनुकूल असो, असा त्या मंत्राचा अर्थ आहे. त्या योगाने अदितीदेवी प्रजांना त्या राजाला अनुकूल अशा मनाच्या करते. स्वराष्ट्रभ्रष्ट होण्याच्या स्थितीत असलेल्या राजाला त्याच्या राज्यात प्रवेश मिळवून देणाऱ्या, अर्थात् त्याचे राज्य त्याच्याकडेच टिकविणाऱ्या हे मरुतांनो, अमुक एका विरोधी राजाशी युद्धास प्रवृत्त होणाऱ्या अमुक नांवाच्या स्वराज्यभ्रष्ट होण्याच्या स्थितीत असलेल्या राजाकडे मुख करून त्याचे रक्षण करण्यासाठी त्याच्या जवळ जा , असा अर्थ असलेला 'उप प्रेत मरुतः सुदानव एना विश्पतिनाऽभ्यमुं राजानं' हा मंत्र अध्वर्यूने म्हणावा. प्रजा ही मरूतांच्या स्वाधीन असल्याने 'मारुती' म्हणजे मरुत्संबध्द असून प्रजांचा ज्येष्ठ म्हणजे श्रेष्ठ पालक असतो तो विश्वपती अर्थात् प्रजांचा अधिपती किंवा राजा होय. यास्तव, पूर्वोक्त मंत्र पठण केला असता अध्वर्यूने जणू काय त्या राजाला त्याच्या प्रजांच्या अनुकूलतेने राज्य मिळवून दिल्यासारखे, अर्थात् त्या राजाला स्वराज्याने समृध्द केल्यासारखे होते.

गावांच्या म्हणजे गावकऱ्यांच्या हिताच्या गोष्टी राजसभेत उघडपणे राजाला जो कळविणारा अथवा एकांतात राजाची भेट घेऊन त्याला गुप्तपणे

कळविणारा जो असतो त्याला 'ग्राम्यवादी' अशी संज्ञा आहे. त्यांपैकी राजाजवळ गुप्तपणे गावकऱ्यांच्या हिताची जो मसलत करणारा असतो त्याला 'परस्ताद् ग्राम्यवादी' असे म्हणतात. या दोहोपैकी 'परस्ताद् ग्राम्यवादी' असा जो कोणी असेल, त्याच्या घरातून काळे व पांढरे असे दोन प्रकारचे साळीचे भात एकत्र करूनच आणावे. घरी आल्यावर ते निवडून वेगवेगळे करून कांडावे. पांढऱ्या भाताचे जे तांदूळ असतील त्यांचा आदित्य देवतेसाठी चरू शिजवून त्याचा याग करावा. देवतेच्या दृष्टीने प्रजा ही 'आदित्य' म्हणजे आदित्यदेवतात्मक आहे. यास्तव, आदित्यदेवतेप्रीत्यर्थच याग केल्याच्या योगाने यजमानाने प्रजेचेच जणू काय संपादन केल्यासारखे होते.

ह्या यजमानाला आदित्याप्रीत्यर्थ केलेल्या चरुयागाच्या प्रभावाने प्रजा जरी प्राप्त झाली असली तरी राष्ट्र म्हणजे शत्रूने पादाक्रांत केलेला भूप्रदेश काही प्राप्त होत नाही, असे तज्ज्ञ विद्वान म्हणत असतात. यास्तव काळ्या भाताचे जे तांदूळ असतील त्यांचा वरुणदेवतेला उद्देशून निर्वाप करावा. आणि त्या तांदुळाचा चरू शिजवून त्याचा याग करावा. राष्ट्र हे 'वारुण' म्हणजे वरुणदेवतेच्या अधिष्ठातृत्वाखाली असते. यास्तव, त्याच्यासाठी चरुयाग करून त्याला संतुष्ट केल्याने प्रजा व राष्ट्र, अर्थात् शत्रूने पादाक्रांत केलेला भूप्रदेश ह्या दोहोंचीही यजमानाला प्राप्ती होते.

आता सांगितलेला याग किंवा इष्टी केल्यानंतर जर शत्रूच्या तीव्र प्रतिकारामुळे प्रजा व राष्ट्र यांची प्राप्ती होण्याला अडथळा प्राप्त होईल तर, 'माझी प्रजा व माझे राष्ट्र मला मिळावे म्हणून माझा शत्रू असलेल्या अमुक राजापासून आणि त्याच्या अमुक प्रजेपासून आणलेल्या ह्या व्रीहीरूप हविर्भागाचा मी आदित्यांच्यासाठी निर्वाप करतो', असा अर्थ व्यक्त करणाऱ्या 'इममहमादित्येभ्यो भागं निर्वपाम्यामुष्मादमुष्यै विशोऽवगंतोः' ह्या मंत्राचे पठण करून साळीच्या भाताचा निर्वाप करावा. त्या भाताच्या तांदुळाचा चरू शिजवून याग करावा. असे केल्याच्या योगाने त्या हविर्भागाची आपण होऊन अपेक्षा करणारे आदित्य त्या यजमानाला त्याची प्रजा अनुकूलत्वाने प्राप्त करून देतात.

आता सांगितलेला चरुयाग केल्यावर देखील त्या राजाला त्याची प्रजा व राष्ट्र मिळाले नाही तर पुन्हा पूर्वोक्त चरुयाग करावा. मात्र विशेष इतकाच की, 'अमक्या वैऱ्यापासून त्याच्या स्वाधीन झालेल्या माझ्या अमुक

प्रजा मला प्राप्त व्हाव्यात म्हणून मी असे हे आदित्यांना बांधतो', अशा अर्थाचा 'इदमहमादित्यान्बधाम्यामुष्यादमुष्यै विशोऽवगन्तो:' हा मंत्र म्हणून पिंपळाच्या लाकडाच्या केलेल्या सात लहान लहान खुंट्या निर्वाप करण्यासाठी साळीचे भात ज्या गाड्यावर भरून ठेवलेले असते, त्या गाड्याच्या मधल्या दांडीला खिळे ठोकून बांधाव्यात. म्हणजे आदित्य स्वत:च बध्दवीर होऊन यजमानाला त्याच्या प्रजेची प्राप्ती करून देतात. इतकेही करून त्या राजाला त्याची प्रजा व राष्ट्र मिळाले नाही, तर पुन्हा पूर्वीप्रमाणेच चरुयाग करावा. विशेष इतकाच की इध्मबंधनात त्यातही सात शंकू म्हणजे खुंट्या बांधाव्यात. म्हणजे तो राजा स्वराज्यभ्रष्ट न होता त्याच्या प्रजा व त्याचे राष्ट्र त्या चरुयाग करणाऱ्या राजाला मिळते.

इध्म्यामध्ये बांधण्यात येणारे सात शंकू अश्वत्थाच्या म्हणजे पिंपळाच्या लाकडाचेच असावेत. कारण अश्वत्य नांवाचा जो वृक्ष आहे, तो जणू काय मरुतांचे ओज म्हणजे बलच आहे. यास्तव पिंपळाचे शंकू इध्म्यात बांधले असता मरुतांच्या बळानेच जणू काय यजमान प्रजांची प्राप्ती करून घेतो.

ह्या शंकूंची संख्या सात असावी. कारण मरुतांचे गण सात आहेत. म्हणून सात शंकू इध्म्यामध्ये बांधले म्हणजे सर्व समुदायासह प्रजा यजमान संपादन करतो. (अनुवाक १).

देव अपमृत्यूला भ्याले. त्यांना अपमृत्यूची भीती वाटली तेव्हा देव प्रजापतीजवळ गेले आणि आपणास वाटणाऱ्या अपमृत्यूचे भय निवारण करण्याविषयी त्याची त्यांनी विनवणी केली. तेव्हा प्रजापतीने त्या देवांची भीती निवारण्याचा उपाय म्हणून पूर्वकल्पातील प्रजापतीदेवतेला उद्देशून एका 'कृष्णल' नांवाच्या वजनाचे एक सुवर्णशकल, अशा रीतीने शंभर सुवर्णशकलांचे निर्वपण करून त्यांचे जिच्यामध्ये यजन करावयाचे असते, अशी 'शतकृष्णला' नांवाची इष्टी केली. आणि त्या इष्टीच्या प्रभावाने देवांच्या ठिकाणी त्याने अमृत धारण केले. अर्थात् देवांना अपमृत्यूची भीती उरली नाही.

जो अपमृत्यूपासून भयभीत होईल त्या यजमानाची भीती निवारण्यासाठी अध्वर्यूने प्रजापतिदेवात्मक, अर्थात् प्रजापतिदेवतेच्या उद्देशाने शतकृष्णला संज्ञक इष्टीचा निर्वाप करून शंभर सुवर्णशकलांचे यजन करावे. असे केल्याच्या योगाने प्रजापतीला हवा असलेला स्वकीय असा हविर्भाग घेऊनच यजमानाने

त्याच्याजवळ गेल्यासारखे व तो भाग त्याला अर्पण केल्यासारखे होते. मग त्या भागाने संतुष्ट झालेला प्रजापतिदेव त्या यजमानाच्या ठिकाणी त्याच्या जन्मकालीच त्याच्या पूर्व कर्मानुसार जितके आयुष्य त्याला मिळालेले असेल, तितके सर्व आयुष्य स्थापन करतो. आणि तो यजमान अपमृत्युरहित अशा सर्व आयुष्याला प्राप्त होतो.

एका 'कृष्णल'भार सुवर्णशकलालाही 'कृष्णल' अशी पारिभाषिक संज्ञा आहे. आता सांगितलेल्या इष्टीत निर्वपण केल्या जाणाऱ्या कृष्णलांची म्हणजे सुवर्णशकलांची एकंदर संख्या शंभर असते. पुरूष हा शंभर वर्षांच्या आयुष्याने आणि शंभर इंद्रियांनी युक्त असतो. यास्तव शंभर कृष्णलांचे निर्वपण केल्याच्या योगाने तो यजमान शंभर वर्षांच्या आयुष्याच्या व शंभर इंद्रियांच्या समुदायाचे ठिकाणी प्रतिष्ठेला प्राप्त होतो.

सुवर्णशकले घृतात शिजवावीत. घृत हे आयुष्याचे वर्धन करणारे असल्यामुळे आयुष्यरूपच असून सुवर्ण हे अविनाशी असल्यामुळे अमृतरूप आहे. यास्तव, सुवर्णशकले घृतात शिजविल्याने अध्वर्यू जणू काय आपल्या यजमानाच्या ठिकाणी आयुष्य आणि अमृत ही दोन्ही स्वकार्यक्षम होतील अशा प्रकारे धारण करतो.

प्रधान देवतांचे यजन करतांना स्रुचीमध्ये आज्याचे उपसारण केल्यावर चार चार कृष्णलांचे एक असे दोनदा अवदान घ्यावे आणि नंतर त्यावर आज्याने अभिघारण केल्यावर त्यांचा याग करावा. म्हणजे 'चतुरवत्त' धर्माचे म्हणजे अवदान पध्दतीचे संपादन केल्यासारखे होते.

चतुर्धाकरणाचे वेळी सर्व ऋत्विजांना द्यावयाचे सुवर्णशकलांचे भाग प्राशित्रपात्रात एकत्र करून ब्रह्म्याला द्यावेत. अशा प्रकारे केलेले दान यजमानाच्या ठिकाणी सर्व आयुष्य एकत्र करून धारण करते.

आकाशात तळपत असलेला आदित्य प्रकाशावा तसा प्रकाशेनासा झाला. त्याच्या ठिकाणचे तेज कमी झाले ! तेव्हा त्याच्या ठिकाणचा हीन-तेजत्वाचा दोष नाहीसा व्हावा म्हणून देवांनी काहीतरी उपाय करण्याचे मनात आणले. आणि त्यांनी पूर्वकल्पातील सूर्याच्या उद्देशाने चरू शिजविला आणि त्याचे यजन केले. त्या यजनाच्या प्रभावाने त्यांनी आदित्याच्या ठिकाणी पुरेसे तेज म्हणजे प्रकाश धारण केला. अर्थात् आदित्य प्रकाशावयास पाहिजे तसा प्रकाशूं लागला. यास्तव,

जो ब्रह्मवर्चसाची म्हणजे वेदाध्ययनजन्य तेजाची इच्छा करीत असेल त्याने ब्रह्मवर्चस् संज्ञक तेजाच्या प्राप्तीसाठी ह्या सूर्यदेवतात्मक चरूचे निर्वपण करून याग करावा. म्हणजे त्या यजमानाने जणू काय आदित्याचा स्वकीय असा हविर्भाग घेऊनच त्याच्या सन्निध गेल्यासारखे व तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. आणि त्या भागाने संतुष्ट झालेला तो आदित्य यजमानाच्या ठिकाणी ब्रह्मवर्चस्संज्ञक तेज निर्माण करतो, आणि तो यजमान ब्रह्मवर्चस्संपन्न होतो.

सूर्यदेवतेसाठी ज्या स्थालीत चरू शिजविला असेल ती स्थाली वेदीमध्ये ठेवतांना खाली सोन्याचा रुक्म (वाटोळा पत्रा) ठेवून त्यावर स्थाली ठेवावी. आणि तिच्यावर पुन्हा सोन्याचा रुक्म झाकणासारखा ठेवावा. अशा प्रकारे चरुरूप हविर्द्रव्याच्या ठिकाणी खाली व वर दोन्ही बाजूंना रुक्म ठेवल्याच्या योगाने तो चरू यजमानाच्या ठिकाणी खालून आणि वरून दोन्ही बाजूंनी ब्रह्मवर्चस्संज्ञक कांती निर्माण करतो.

या इष्टीमध्ये प्रयाजांचे यजन करण्याच्या प्रसंगी प्रत्येक प्रयाजाहुती देतांना स्रुचीत असलेल्या आज्यामध्ये एक एक 'कृष्णल' म्हणजे सुवर्णशकल टाकून आहुती द्यावी. म्हणजे ती यजमानाला पांचाही दिशांच्याकडून ब्रह्मवर्चस् संज्ञक तेज संपादन करून देते. ज्या कोणाला प्रथमत: प्रयत्न करून थोडे हिरण्य म्हणजे सोने नाणे वगैरे द्रव्य मिळावे आणि नंतर प्रयत्न न करता व्याजबट्ट्याच्या रूपाने अधिक द्रव्य मला मिळावे अशी इच्छा होईल त्याने अग्निदेवतेसाठी अष्टाकपालात्मक व सवितादेवतेसाठी द्वादशकपालात्मक पुरोडाश आणि भूमिदेवतेसाठी चरू तयार करून त्या हविर्द्रव्यांचा अनुक्रमे याग करावा. हिरण्य हे आग्नेय म्हणजे अग्निदेवतात्मक आहे. यास्तव, अग्निदेवतेसाठी जे यजन केले जाते, त्या योगाने संतुष्ट झालेल्या अग्निनारायणाच्या कृपेने ज्याच्याजवळ हिरण्य असते त्याच्याकडूनच ते यजमानाला मिळते. सविता देवाचे जे यजन केले जाते, त्यामुळे सवितादेवाच्या प्रेरणेनेच हिरण्य यजमानाला प्राप्त होते. भूमीसाठी जो चरुयाग केला जातो, त्याच्या प्रभावाने त्या भूमीच्या ठिकाणी यजमानाला हिरण्याची प्राप्ती होते. आणि मग ते हिरण्य आपोआपच वृद्धिंगत होऊन त्या यजमानाला मिळते.

ज्याला सुवर्ण मिळते त्याला ते चोरीस जाईल की काय? अशी

चिंता उत्पन्न होऊन तो वीर्याने म्हणजे मनोधैर्याने रहित होत असतो. यास्तव, ज्याला सुवर्णाचा लाभ होईल त्याने आता सांगितलेली हीच इष्टी करावी. म्हणजे तिच्या प्रभावाने तो सुवर्णलाभ झालेला यजमान मनोधैर्यरहित होत नाही.

ज्याच्या जवळचे हिरण्य नाहीसे होईल, हरवेल, त्याने ते पुन्हा मिळावे म्हणून आता सांगितलेली इष्टी म्हणजे याग करावा. हिरण्य हे अग्निदेवात्मक आहे. यास्तव, अग्निदेवतेचे यजन केले असता, त्या यजनाने ज्याचे हिरण्य हरवले असेल ते त्याला परत मिळते. सवितादेवतेचे यजन केल्याने सवितादेवाच्या प्रेरणेनेच ते हरवलेले हिरण्य त्या यजमानाला पुन्हा मिळते. भूमिदेवतेसाठी जो चरुयाग केला जातो त्या योगाने भूमीचे ठिकाणी जे हिरण्य हरवलेले असते, ते त्याच भूमीचे ठिकाणी पुन्हा त्या यजमानाला सापडते.

इंद्राने त्वष्ट्याच्या यज्ञात, त्याचे निमंत्रण नसताना जाऊन बलात्काराने सोमपान केले. त्वष्ट्याच्या भयाने इंद्राने लगेच तेथून पळ काढला ! दाही दिशांनी इंद्र एकसारखा वेडावाकडा धावत सुटला. तथापि इंद्रियांना सुस्ती आणणाऱ्या भरपूर सोमपानाने तो थकला. त्याला पळण्याचे सामर्थ्य राहिले नाही. इंद्राला वांती झाली. त्याने प्यालेला सोमरस त्याच्या मुखातून वर उसळून आला व भूमीवर पडला. ते श्यामाक झाले ! म्हणजे तो सोमरस श्यामाक (सावे) नांवाच्या धान्याच्या रूपाने उत्पन्न झाला ! तेव्हा इंद्र प्रजापतीकडे गेला आणि त्याने केलेल्या उपदेशाप्रमाणे आपण प्यालेला तो सोमरस आपणास पचावा, ओकून पडू नये म्हणून पूर्वकल्पातील इंद्र व सोम या दोन देवतांना उद्देशून इंद्राने सोमरसोत्पन्न अशा त्या साव्यांचा एकाच ठिकाणी चरू शिजवून त्याचा याग केला. आणि त्याच्या प्रभावाने स्वतःच्या ठिकाणी इंद्रियांना उत्तेजक अशा सोमपानाचे धारण केले.

जो कोणी सोमरस ओकतो, तो इंद्रियशक्ती व सोमपान यांनी रहित होतो. अशा सोमवामी म्हणजे सोमरस ओकलेल्या यजमानासाठी हा सोमैंद्र म्हणजे सोम व इंद्र ह्या दोन देवतांच्या उद्देशाने श्यामाकांचा (साव्यांचा) चरू शिजवून त्याचा याग करावा. म्हणजे यजमानाने जणू काय सोम व इंद्र यांचा स्वकीय हविर्भाग घेऊनच त्यांच्याजवळ गेल्यासारखे व तो त्यांना अर्पण केल्यासारखे होते. आणि मग ते सोम व इंद्र हे दोघे देव त्या

ज्ञान होण्याला कष्टप्रद असतो. अशाप्रकारे मध व आत्मा यांचे साम्य असल्यामुळे मध म्हणजे जणू पुरुषाचा आत्माच आहे. यामुळे अग्नीच्या ठिकाणी मधाची आहुती दिली असता यजमानाने जणू काय आपला आत्माच अग्नीचे ठिकाणी स्थापन केल्यासारखे होते. पांच पांच अक्षरांचा एक एक चरण असलेल्या पंक्ति छंदातील ऋचा ह्या हविर्द्रव्यांचे यजन करतांना याज्यापुरोनुवाक्या म्हणून नियोजित कराव्यात. दोन हात, दोन पाय व मस्तक ह्या पांच अवयवांनी युक्त असल्यामुळे पुरुष हा पांक्त आहे.त्याचप्रमाणे चार पाय व मस्तक ह्या पांच अवयवांनी युक्त असणारे पशूही पांक्त आहेत. यास्तव, पंक्तिछंदातील याज्यापुरोनुवाक्यांची योजना करून यजन केले असता यजमानाने जणू काय मृत्युरूप अशा अग्नीपासून आपला आत्मा विकत घेतल्यासारखे होते व तो पशूंना आपल्याजवळ करतो. म्हणजे पशूंचे संपादन करतो. (अनुवाक २).

पूर्ण समृध्दी प्राप्त होण्यास पुरेसे होईल इतके धन आपणास मिळावे, अशी कामना धारण करून देवांनी सत्राचे म्हणजे पुष्कळ दिवस चालू राहणाऱ्या यज्ञाचे अनुष्ठान केले. पण त्या सत्ररूप यज्ञापासून निष्पन्न झालेले फलरूपी यश देवांपैकी एकट्या सोमालाच प्राप्त झाले. ते यश इतर देवांना मिळू नये म्हणून तो सोम मिळालेल्या यशासह एका दुर्गम अशा पर्वतावर चढून गेला. लागलीच त्याच्या पाठोपाठ अग्नीही त्याच पर्वतावर चढून गेला. तेव्हा दोघांची गाठ पडून अग्नी व सोम परस्परांशी एकमताचे झाले. नंतर बराच काळ लोटल्यावर सत्ररूप यज्ञापासून फलरूपाने प्राप्त होण्याच्या यशाने रहित झालेला इंद्र त्या पर्वतावर जाऊन त्या दोघांना भेटला आणि 'सत्ररूप यज्ञापासून फलीभूत होणारे यश मला मिळण्यासाठी मजकडून एखादे अनुष्ठान करवा' असे त्यांना म्हणाला. तेव्हा अग्नी व सोम या दोघांनी इंद्राला फलीभूत असे यश मिळावे म्हणून जिच्यामध्ये अग्निदेवतेसाठी अष्टाकपालात्मक पुरोडाश, इंद्रदेवतेसाठी एकादशकपालात्मक पुरोडाश आणि सोमदेवतेसाठी चरू अशी तीन हविर्द्रव्ये तयार करावी लागतात अशा ह्या इष्टीचे निर्वपण केले. आणि त्या इष्टीच्या प्रभावाने त्यांनी इंद्राच्या ठिकाणी तेज, इंद्रियशक्ती व ब्रह्मवर्चस् ही तीन्ही धारण केली.

जो 'यज्ञविभ्रष्ट' झाला असेल, म्हणजे इष्टी, पशुयाग किंवा सोमयज्ञ अशा प्रकारचे अनुष्ठान ज्या ज्या वेळी करावयास पाहिजे त्या त्या वेळी

ज्याच्या हातून केले गेले नसेल, अशा यजमानाने ही आता सांगितलेली इष्टी करावी. अग्निदेवतेसाठी अष्टाकपालात्मक पुरोडाश, इंद्रदेवतेसाठी एकादशकपालात्मक पुरोडाश आणि सोमदेवतेसाठी चरू तयार करून त्यांचे यजन करावे. अग्नीसाठी जो याग केला जातो त्या योगाने यजमानाच्या ठिकाणी अध्वर्यूने जणू काय तेज धारण केल्यासारखे होऊन इंद्रासाठी केलेल्या यजनाने यजमानाच्या ठिकाणी इंद्रियशक्ती धारण केल्याप्रमाणे होते. तसेच सोमदेवतेप्रीत्यर्थ जे यजन केले जाते त्याच्या प्रभावाने यजमानाच्या ठिकाणी ब्रह्मवर्चस् धारण केल्यासारखे होते.

अग्नीच्या पुरोडाशातील व सोमाच्या चरूतील थोडा थोडा अंश इंद्राच्या पुरोडाशाशी उत्तम प्रकारे मिसळून एकजीव करावा. असे केले असता अध्वर्यूने जणू काय यजमानाच्या ठिकाणी तेज म्हणजे आज्ञाशक्ती व श्रुताध्ययनसंपत्ती ह्या दोहोंचेही उत्तम प्रकारे धारण केल्यासारखे होते. इच्छिलेल्या मनोरथाची ज्याला पूर्णता मिळत नाही, त्याने अग्नी व सोम ह्या दोन देवतांना मिळून अकरा कपालांवर एकच पुरोडाश भाजून तयार करावा आणि त्याची इष्टी करावी. ब्राह्मण हा अग्नीबरोबर उत्पन्न झालेला असल्यामुळे अग्नी ही त्याची स्वकीय देवता आहे. त्याचप्रमाणे तो सोमरस पितो म्हणून सोम ही देखील त्याची स्वकीय देवता आहे. यास्तव अग्नी व सोम या दोघांच्यासाठी पुरोडाशाचे यजन केले असता यजमानाने जणू काय स्वकीय अशा देवतेच्या सन्निधच तिचा स्वकीय भाग घेऊन गेल्यासारखे व तिला समर्पण केल्यासारखे होते. आणि मग संतुष्ट झालेली ती स्वकीय देवता त्या यजमानाला मनोरथपूर्तिने समृध्द करते. अर्थात् सर्व प्रकारचा मनोरथ सिद्ध होऊनच त्याच्याजवळ चालून येतो.

ब्रह्मवर्चस् प्राप्त व्हावे अशी ज्याची इच्छा असेल, त्याने 'अग्नीषोमीय' म्हणजे अग्नी व सोम ह्या दोघांना उद्देशून अष्टाकपालात्मक अशा साव्यांच्या तांदुळाच्या पिठाचा एकच पुरोडाश तयार करून त्याचा याग करावा. म्हणजे यजमानाने त्यांचा स्वकीय असणारा भागच त्यांच्याजवळ घेऊन जाऊन त्यांना अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या भागाने संतुष्ट झालेले ते अग्नी व सोम त्या यजमानाच्या ठिकाणी 'ब्रह्मवर्चस्' धारण करतात. आणि तो यजमान ब्रह्मवर्चस्संपन्न होतो. अष्टाकपालात्मक पुरोडाश असतो तो चरणाक्षरसंख्येच्या

दृष्टीने गायत्री छंदाशी समानरूप असून अग्नी हा गायत्रीछंदसंबध्द असतो. एवं च, तो पुरोडाश अग्निदेवतात्मक असतो. श्यामाक म्हणजे सावे हे सोमापासूनच उत्पन्न झाले असल्यामुळे साव्यांच्या तांदुळाच्या पिठाचा तो पुरोडाश असल्यामुळे तोच सोमदेवतात्मकही असतो. सारांश, तो पुरोडाश यजमानाच्या समृध्दीला कारणभूत होतो.

आपल्याला नपुंसकत्व प्राप्त झाले आहे किंवा होणार आहे असे भय ज्याला उत्पन्न झाले असेल त्याने प्रजोत्पत्तिसमर्थ अशा अन्नरसाने युक्त असलेल्या सोमदेवतेसाठी श्यामाकांचा चरू शिजवून त्याचा याग करावा. प्रजोत्पत्तिसमर्थ असे अन्नरसरूप रेत त्याच्यापासून नष्ट झालेले असते व त्यामुळेच त्याला नपुंसकत्व प्राप्त होण्याचा संभव असतो. आणि त्याला नपुंसकत्वाची भीती वाटू लागते. यास्तव आता सांगितल्याप्रमाणे याग केला असता त्याने जणू काय प्रजोत्पादनाला समर्थ अशा रसाने संपन्न असलेल्या सोमदेवतेच्या जवळ तिचा स्वकीय असलेला हविर्भाग घेऊन गेल्यासारखे व तो तिला समर्पण केल्यासारखे होते. त्या भागाने प्रसन्न झालेला तो सोमदेवच त्या यजमानाच्या ठिकाणी प्रजोत्पादनसमर्थ अशा अन्नसरूपाने असणारे रेत धारण करतो. आणि त्यामुळे तो यजमान नपुंसक होत नाही.

आपल्याला गाव मिळावा अशी इच्छा असेल, त्या यजमानाने 'ब्रह्मणस्पती' या देवतेच्या उद्देशाने एकादशकपालात्मक पुरोडाशाचे निर्वपण करून त्याचा याग करावा. म्हणजे ब्रह्मणस्पतीदेवतेचा स्वकीय भाग घेऊनच यजमानाने त्याच्याजवळ जाऊन तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. मग त्या भागाने संतुष्ट झालेला तो ब्रह्मणस्पतिदेव त्या यजमानाला सजातीय असे लोक अनुकूल करून देतो. व त्यांच्या साहाय्याने तो यजमान ग्रामी होतो. म्हणजे गावाचे आधिपत्य संपादन करतो. ह्या यागामध्ये 'गणवती' म्हणजे 'गण' या शब्दाने युक्त असलेल्या याज्यापुरोनुवाक्या होत्याने पठण कराव्यात. म्हणजे त्याने जणू काय त्या यजमानाला त्याच्या सजातीय लोकांच्या द्वारा गणवंत म्हणजे समुदायाने युक्त केल्यासारखे होते.

धनसंपत्तीने मदांध झालेल्या वैश्यजातीतील लोकांचा गर्वपरिहार करून त्यांना ब्राह्मणवर्गाच्या ठिकाणी मी आत्मसात् करीन म्हणजे त्या वैश्यजातीय लोकांना ब्राह्मणवर्गाशी नमून वागावयास लावीन, अशी ज्याची आकांक्षा असेल

त्यानेही आता सांगितलेला याग म्हणजे इष्टी करावी. मात्र या इष्टीमध्ये होत्याने 'मारुती' म्हणजे 'मरुत्' शब्दाने युक्त असलेल्या याज्यापुरोनुवाक्या पठण कराव्यात. 'मरुत्' देवामध्ये वैश्य होत. यास्तव तत्संबंधी याज्यापुरोनुवाक्या पठण केल्याच्या योगाने होत्याने जणू काय मरुतांच्या अनुग्रहाने वैश्यजातीय लोकांना हतगर्व करून ब्राह्मणांच्या ठिकाणी आधीनतेने वागावयास लावल्यासारखे होते. (अनुवाक ३).

आपणाला स्वर्गलोक प्राप्त व्हावा, अशी ज्याला इच्छा होईल, त्याने 'अर्यमा' देवतेला उद्देशून चरू शिजवावा आणि त्याचा याग करावा. आकाशात प्रकाशणारा आदित्य म्हणजे भगवान् सूर्यनारायण म्हणजे अर्यमा नांवाचा देव होय. यास्तव, त्याच्या उद्देशाने याग केला असता यजमानाने जणू काय अर्यमा देवाचा स्वकीय असलेला हविर्भाग बरोबर घेऊनच त्याच्याजवळ गेल्यासारखे व तो त्याला अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या भागाने संतुष्ट झालेला तो अर्यमा यजमानाला स्वर्गलोक प्राप्त करून देतो.

मला दान देणाऱ्या प्रजांची प्राप्ती व्हावी असे ज्याला वाटत असेल त्याने अर्यमा देवाच्या उद्देशाने चरूचे निर्वपण करून त्याचा याग करावा. हा आदित्य म्हणजेच अर्यमादेव होय. आणि जो सत्पात्री दान करणारा असतो, तो देखील कीर्तीच्या योगाने सूर्याप्रमाणेच भासमान होत असल्यामुळे अर्यमा देवासारखाच समजावा. यास्तव, पूर्वोक्त याग केला असता यजमानाने जणू काय मुख्य अशा अर्यमादेवाचा स्वकीय असा हविर्भाग घेऊन त्याच्याजवळ गेल्या सारखे व तो त्याला अर्पण केल्यासारखे होते. आणि त्यामुळे प्रसन्न झालेला तो अर्यमादेव त्या यजमानाला दान देणाऱ्या प्रजा निर्माण करतो व त्या प्रजा यजमानाला दान करण्याला मन:पूर्वक प्रवृत्त होतात.

मी निर्विघ्नपणे जनसमूहामध्ये प्रवेश करीन, अशी इच्छा धारण करून जनसमूहामध्ये जाण्यास जो सिध्द झाला असेल त्याने अर्यमा देवाच्या उद्देशाने चरू शिजवून त्याचा याग करावा. हा आदित्य म्हणजेच 'अर्यमा' देव होय. यास्तव, पूर्वोक्त याग केला असता यजमानाने जणू काय अर्यमा देवाच्या स्वकीय भागासह त्याच्याजवळ जाऊन तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. मग त्या भागाने संतुष्ट झालेला तो अर्यमा देव तो यजमान ज्या जनसमूहात जाण्याची इच्छा करीत असतो, त्या जनसमूहात त्याला विर्विघ्नपणे

स्वकीय हविर्भाग घेऊन तिच्याजवळ गेल्या सारखे व तो तिला समर्पण केल्यासारखे होते. आणि त्या भागाने संतुष्ट झालेला तो बृहस्पतिदेव त्या ब्राह्मणाला त्याच्या बरोबरीच्या ब्राह्मणांच्या अग्रभागी नेऊन पोचवितो. म्हणजे सर्व ब्राह्मणसमाजात त्याला अत्यंत श्रेष्ठ करतो. या यागात बुध्नवती व अग्रवती या संज्ञा असलेल्या याज्यापुरोनुवाक्या होत्याने म्हणाव्यात. आनुषूक-संज्ञक साळीच्या तांदुळाच्या पिठाचा पुरोडाश या इष्टीत करावा. बृहस्पती हीच आनुषूक संज्ञक धान्याची हविर्भाग सेवन करणारी देवता होय. आनुजावर असा जो ब्राह्मण असतो, त्याला समृध्दी प्राप्त होण्याला ही देवता कारणभूत होते. (अनुवाक ४).

प्रजापतीला अंबा, दुला, नितत्नी, अभ्रयंती, मेघयंती, वर्षयन्ती आणि चुपुणीका ह्या 'कृत्तिका' संज्ञक सात आणि अश्विनी इत्यादि नक्षत्र नांवाच्या सव्वीस मिळून तेहतीस मुली होत्या. त्या त्याने सोमराजाला म्हणजे चंद्राला दिल्या. त्या तेहतीसांपैकी सोमराजा फक्त रोहिणीवरच प्रेम करी व तिच्याशीच समागम करी. यामुळे तिच्याविषयी इतरांना मत्सर वाटू लागला आणि त्या सोमराजावर रागावून आपल्या माहेरी प्रजापतीकडे परत गेल्या. त्यांच्या मागोमाग सोमराजा प्रजापतीकडे आला. माझ्या स्त्रिया मला परत द्या असे त्याला म्हणाला. प्रजापतीने त्या मुली त्याला पुन्हा दिल्या नाहीत. तो म्हणाला, हे सोमराजा, 'मी रोहिणीवर जसे प्रेम करीत आहे तसेच सर्वांच्यावर करीन, नि:पक्षपातीपणाने सर्वांच्याशी समागम करीन' अशी तू आधी शपथ घे, मग मी माझ्या मुली तुला परत देईन. सोमराजाने त्याप्रमाणे शपथ घेतली आणि प्रजापतीने आपल्या मुली पुन्हा त्याच्या स्वाधीन केल्या. पण सोमराजाने शपथ मोडली ! तो पुन्हा एकट्या रोहिणीवरच प्रेम करू लागला. आणि फक्त तिच्याशीच समागम करू लागला. अर्थात् सोमराजाच्या ह्या वर्तनाने इतर स्त्रियांच्या ठिकाणी त्याच्या विषयी तळतळाट उत्पन्न झाला. त्याचा परिणाम म्हणूनच की काय, सोमराजाला क्षय रोग झाला. राजाला यक्ष्मा म्हणजे क्षयरोग झाला म्हणूनच तो 'राजयक्ष्मा' ह्या नांवाने जन्मला, सोमराजा हा पातकी म्हणजे स्त्रीद्रोहरूप पापाचरण करणारा असून त्याला हा रोग झाल्यामुळे पापलक्ष्मा हे नांव धारण करून तो रोग जन्मला. जायांच्याशी म्हणजे स्त्रियांच्याशी द्रोहरूप अपराध केल्याच्या निमित्ताने सोमराजा क्षयी झाल्या कारणाने जायेन्य या नांवाने तो क्षयरोग जन्मला. राजयक्ष्मा, पापयक्ष्मा

व जायेन्य हे क्षयरोगाचेच तीन अवांतर भेद आहेत. हे तीन भेद जो जाणतो त्याला हे तीन प्रकारचे क्षयरोग होत नाहीत. रोहिणीव्यतिरिक्त इतर स्त्रियांशी आपण द्रोह केला, त्यांच्या तळतळाटानेच आपण क्षयरोगी झालो, अशाप्रकारे सोमराजाला पश्चाताप झाला. आणि तो पाया पडतच त्या सर्व स्त्रियांच्या जवळ गेला व आपल्याला झालेला पश्चाताप त्याने त्यांच्यापाशी व्यक्त केला. तेव्हा त्या सर्व स्त्रिया त्याला म्हणाल्या की, जशी रोहिणींशी तुझी वागणूक आहे तशीच तू आमच्याशी करशील आणि पक्षपातरहित मनाने आम्हा सर्वांच्याशी समागम करशील, असा आम्हाला तू वर दे. सोमाने तशाप्रकारे त्यांना वर दिल्यानंतर सोमराजाचा क्षयरोग नष्ट होऊन त्याला आरोग्य प्राप्त व्हावे म्हणून त्या स्त्रियांनी आदित्य देवतेसाठी चरू शिजवून त्याचा याग केला आणि त्या यागाच्या प्रभावाने सोमराजाला प्रबल अशा त्या क्षयरोगापासून मुक्त केला.

यास्तव पापयक्ष्मा रोगाने पीडित झाला असेल त्याने आपल्या रोगमुक्तीसाठी ह्या आदित्यदेवतात्मक चरूचे निर्वपण करून त्याचा याग करावा. असे केले असता, यजमानाने जणू काय आदित्याच्या सन्निध त्याचा स्वकीय हविर्भाग घेऊन गेल्यासारखे व तो त्याला अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या हविभार्गाने संतुष्ट झालेला तो आदित्य त्या यजमानाला प्रबल अशा त्या क्षयरोगापासून मुक्त करतो. अमावास्येच्या दिवशी हा याग करावा. म्हणजे तो शुक्ल प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत चंद्र जसा एकेका कलेने वृद्धिंगत होतो त्या रीतीने त्या क्षयरोग्याला आरोग्यरूपी एकेका कलेने वृद्धिंगत करून पूर्णपणे रोगमुक्त करतो. या यागामध्ये 'नवो नवो भवति जायमानः' ही ऋचा पुरोनुवाक्या म्हणून होत्याने पठण करावी. तिच्या योगाने होता जणू काय त्या यजमानाच्या ठिकाणी आयुष्य धारण करतो. 'यमादित्या अंशुमाप्याययन्ति' ही ऋचा 'याज्या' म्हणून होत्याने नियोजित करावी. तिच्या प्रभावाने तो जणू काय यजमानाला रोगमुक्त करून त्याचे आरोग्य वृद्धिंगत करतो. (अनुवाक ५).

प्रजापतीने भक्षणाला योग्य असे अन्न देवांना विभागून दिले आणि तो देवांना म्हणाला, ह्या तीन लोकांना व्यापून जे अन्न उरेल ते माझे असावे. भूलोकांचे पालन 'इंद्रराजा' करीत असल्यामुळे भूलोकाचेही इंद्रराजा हे नांव असून अंतरिक्ष लोकाचा 'अधिराज इंद्र' हा पालक असल्याने त्या

लोकाला 'अधिराज इंद्र' हे नांव आहे. त्याचप्रमाणे द्युलोकाचे 'इंद्रः स्वराट्' ;हा पालन करीत असल्यामुळे त्या लोकास इंद्र स्वराट् हे नांव आहे. सारांश, प्रजापतीने देवांना दिलेले अन्न इंद्रराजा, अधिराज इंद्र व इंद्र स्वराट् ह्या तीन नांवांनी उपलक्षित असलेल्या पृथिव्यादि तीन लोकांना व्यापून उरले. नंतर प्रजापतीने ह्या तीन लोकांचे दोहन केले. त्यांची धार काढली. म्हणजे त्या तिन्ही लोकांतून थोडथोडे सार काढून घेतले. हे सार म्हणजेच प्रजापतीने आपल्या आवडीने स्वीकारलेले तीन लोक व्यापून उरलेले अन्न होय. प्रजापतीने तीनदा दोहन केले. हेच आता सांगण्यात येणाऱ्या 'त्रिधातु' यागाचे त्रिधातुत्व म्हणजे 'त्रिधातु' हे नांव पडण्याचे कारण होय.

' हा भक्षणीय असे अन्न भक्षण करणारा व्हावा' अशी ज्याला उद्देशून अध्वर्यू इच्छा करीत असेल, त्याने त्या यजमानासाठी हा 'त्रिधातु'संज्ञक याग किंवा इष्टी करावी. इंद्र राजा, इंद्र अधिराजा व इंद्र स्वराट् या तीन देवांच्या उद्देशाने प्रत्येकी अकरा अकरा कपालांवर भाजून पुरोडाश तयार करावेत व त्या पुरोडाशांनी अनुक्रमे तीन देवतांचे यजन करावे. हा इंद्र राजा, हा इंद्र अधिराजा आणि हा इंद्र स्वराट् हे तिघे देव अनुक्रमे त्यांच्या नांवानेच उपलक्षित होणाऱ्या या तीन लोकांना स्वकीयभाग म्हणून उपभोगीत असतात. यास्तव, पूर्वोक्त याग किंवा इष्टी केली असता यजमानाने जणू काय हे तीन लोक व त्यांचे पूर्वोक्त तीन अधिपती यांच्या सन्निध त्यांचा त्यांचा स्वकीय भाग घेऊनच गेल्यासारखे व तो त्यांना दिल्यासारखे होते. आणि त्या भागाने संतुष्ट झालेले इंद्रराजादि देव त्या यजमानाला अन्न देतात व तो यजमान अन्न सेवन करणारा होतो. एवं च, वासराने चाटल्यामुळे पान्हवलेल्या गाईची लोक जशी धार काढून दुधाचे संपादन करतात त्याप्रमाणे यजमान जणू काय पान्हवलेल्या अर्थात् यागफल देण्यास उत्सुक झालेल्या ह्या तीन लोकांची धार काढून सेवनीय असे अन्न संपादन करतो. पुरोडाशांच्या ठिकाणी सत्त्वहीनता उत्पन्न होऊ नये म्हणून पहिला पुरोडाश उताण्या मांडलेल्या कपालांच्यावर ठेवून त्यावर दुसरा व त्यावर तिसरा अशा प्रकारे एकावर एक तीन पुरोडाश ठेवावेत. ह्या इष्टीत तीन पुरोडाश केले जातात. हे लोकही तीनच आहेत. अर्थात् हे तीन पुरोडाश यजमानाला तीन लोक प्राप्त करून देण्याला कारणभूत होतात. एकापेक्षा एक मोठा असे तीन पुरोडाश करावेत. कारण हे तीन लोकही एका पेक्षा

एक मोठा असेच आहेत. अर्थात् उत्तरोत्तर मोठे केलेले पुरोडाश यजमानाच्या समृध्दीला कारणभूत होतात. प्रत्येक देवतेचे यजन करतांना कोणत्याही पुरोडाशाला वगळल्या सारखे होऊ नये म्हणून अवदान घेताना तिन्ही पुरोडाशांना एकदमच हस्तस्पर्श करून तिन्ही पुरोडाशांतील अवदान घ्यावे. (अनुवाक ६).

देव व असुर हे परस्परांच्याशी युध्द करण्यास प्रवृत्त झाले. त्या युध्दात असुरांनी देवांना जिंकले. त्यामुळे पराजित झालेले देव असुरांच्या प्रजारूपत्वाला प्राप्त झाले. म्हणजे असुरांचे अंकित असे प्रजानन बनले. तेव्हा त्यांचे इंद्रियसामर्थ्य आणि शरीरसामर्थ्य ही दोनही त्यांच्यापासून दूर निघून गेली. हे इंद्राने जाणले. आणि ते दोन्ही प्रकारचे सामर्थ्य अडवून परत आणण्यासाठी इंद्र त्याच्या मागे धावला. पण, त्या दोन्ही प्रकारच्या सामर्थ्याला तो अडवू शकला नाही. तथापि, त्या सामर्थ्यांपैकी अर्धे त्याच्या हाती लागले व तेवढे घेऊन तो स्वस्थानी परत आला. नंतर बाकीचे अर्धे मिळविण्यासाठी तो प्रजापतीकडे गेला आणि त्याची त्याने सेवा केली. तेव्हा प्रजापतीने इंद्राकडून 'सर्वपृष्ठा' नांवाची इष्टी करविली आणि त्या इष्टीच्या प्रभावानेच त्याने इंद्राच्या ठिकाणी इंद्रियसामर्थ्य आणि शरीरसामर्थ्य पूर्णपणे स्थापन केले. इंद्रियसामर्थ्य आणि शरीरसामर्थ्य प्राप्त होण्याची ज्याला इच्छा होईल त्या यजमानाकडून अध्वर्यूने ही सर्वपृष्ठा इष्टी करविली तर जणू काय त्या सर्वपृष्ठा इष्टीच्या प्रधान देवतांच्या सन्निध त्यांचा स्वकीय भाग घेऊन जाऊन त्यांना अर्पण केल्या सारखे होते. आणि मग त्या भागाने संतुष्ट झालेल्या सर्व देवता त्या यजमानाच्या ठिकाणी इंद्रियसामर्थ्य व शरीरसामर्थ्य ह्या दोहोंचेही धारण करतात. रथंतर नांवाचे 'पृष्ठ' स्तोत्र जाणणाऱ्या राथंतरसंज्ञक इंद्राकरता जे निर्वपण म्हणजे यजन केले जाते, त्याच्या प्रभावाने जणू काय अग्नीचे जेवढे म्हणून तेज आहे, तेवढे संपादन केल्यासारखे होते. बृहत् नांवाचे 'पृष्ठ' स्तोत्र जाणणाऱ्या बार्हतसंज्ञक इंद्राकरता जे यजन केले जाते, त्याच्या प्रभावाने यजमानाने जणू काय इंद्राचे जेवढे तेज आहे, तेवढे संपादन केल्यासारखे होते. वैरूप नांवाचे पृष्ठ स्तोत्र जाणणाऱ्या वैरूपसंज्ञक इंद्राकरता जे यजन केले जाते, त्याच्या प्रभावाने यजमानाने जणू सवित्याच्या ठिकाणी जितके तेज आहे, तितक्या तेजाचे संपादन केल्यासारखे होते. वैराज नामक पृष्ठस्तोत्र जाणणाऱ्या वैराजसंज्ञक इंद्राकरता जे यजन केले जाते त्या योगाने यजमानाने जणू काय धाता नामक देवाचे जितके तेज

आहे, तितके संपादन केल्यासारखे होते. 'शाक्वर' संज्ञक पृष्ठस्तोत्र जाणणाऱ्या शाक्वरसंज्ञक इंद्रासाठी जे यजन केले जाते, त्याच्या प्रभावाने यजमानाने मरुतांचे जेवढे तेज आहे, तेवढेच संपादन केल्यासारखे होते. 'रैवत' नामक पृष्ठ स्तोत्राचे ज्ञान असणाऱ्या रैवतसंज्ञक इंद्रासाठी जे यजन केले जाते, त्याच्या प्रभावाने बृहस्पतीचे जेवढे तेज आहे तेवढे तेज यजमानाने संपादन केल्यासारखे होते. सारांश, ज्या ज्या देवतांची जेवढी जेवढी तेजे आहेत तेवढी तेवढी सर्व तेजे यजमानाने संपादन केल्यासारखे होते. उताण्या कपालांच्या ठिकाणी पुरोडाशाचे अधिश्रयण म्हणजे स्थापन करावे. सर्व देवतांच्यासाठी मिळून द्वादशकपालात्मक असा एकच पुरोडाश तयार करावा. प्रत्येक देवतेसाठी अवदान घेताना पुरोडाशाच्या सर्व बाजूंनी घ्यावे. असे केले असता यजमानाच्या ठिकाणी सर्व बाजूंनी इंद्रियसामर्थ्य व शरीरसामर्थ्य धारण केल्यासारखे होते. देवतांच्या ठिकाणचे देवतात्व नष्ट होऊ नये म्हणून याज्या व पुरोनुवाक्यांची योग्य प्रकारे उलटापालट करून होत्याने त्या पठण कराव्यात. यजमानाला अधिकत्वाने पौरुष प्राप्त व्हावे म्हणून या इष्टीच्या सांगतार्थ एक घोडा, एक बैल, एक मेंढा आणि एक बोकड दक्षिणा म्हणून द्यावा.

ज्याच्यावर कोणतेही पाप केल्याचा खोटा अपवाद आला असेल त्याने आपल्यावरील अपवाद दूर होण्यासाठी ह्याच 'सर्वपृष्ठा' इष्टीने देवतांचे यजन करावे. ह्या इष्टीच्या देवता जर खोटा अपवाद झालेल्या यजमानाचे हविर्द्रव्यरूप अन्न सेवन करतात, तर इतर मनुष्ये त्याचे अन्न सेवन करतीलच करतील. (अनुवाक ७).

कुणिनामक एका पुरुषाचा पुत्र रजन हा रोगाने बिघडलेली दृष्टी उत्कृष्ट रीतीने दुरुस्त करण्यात वाकबगार असणाऱ्या जनकपुत्र ऋतुजित् याच्याकडे आला आणि आपली बिघडलेली दृष्टी सुधारण्याविषयी त्याने ऋतुजिताची विनवणी केली. तेव्हा त्याच्यासाठी ऋतुजिताने ही इष्टी केली. म्हणजे अग्नी भ्राजस्वान् म्हणजे अत्यंत देदीप्यमान अशा अग्नी करता अष्टाकपालात्मक पुरोडाश, सूर्याकरता चरू आणि अग्नी भ्राजस्वान् या देवतेकरता अष्टाकपालात्मक पुरोडाश केला आणि त्याचे यजन केले. या इष्टीच्या प्रभावाने त्याने रजनाच्या ठिकाणी उत्कृष्ट दृष्टी प्राप्त केली.

यास्तव आपली बिघडलेली दृष्टी उत्तम सुधारावी अशी ज्याची इच्छा

असेल, त्या यजमानासाठी आता सांगितलेली ही इष्टी करावी. भ्राजस्वान् अशा अग्निदेवतेसाठी अष्टाकपालात्मक पुरोडाश, सूर्यदेवतेसाठी चरू आणि भ्राजस्वान् अग्नीसाठी अष्टाकपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचा याग करावा. अग्नीच्या प्रभावाने प्राप्त झालेल्या दृष्टीने मनुष्ये पाहत असतात. व सूर्याच्या दृष्टीने देव पाहत असतात. यास्तव, अग्नी व सूर्य यांच्यासाठी यजन केले असता यजमानाने जणू काय अग्नी व सूर्य यांचा स्वकीय हविर्भाग घेऊनच त्यांच्याजवळ जाऊन त्यांना अर्पण केल्यासारखे होते. आणि त्यायोगे संतुष्ट झालेले ते अग्नी व सूर्य त्या यजमानाच्या ठिकाणी उत्कृष्ट अशी दृष्टी स्थापन करतात. व तो यजमान उत्कृष्ट अशा दृष्टीने युक्त होतो. या इष्टीत अग्निदेवतात्मक दोन पुरोडाश असतात. ही पुरोडाशांची जोडी यजमानाच्या दोन्ही डोळ्यांच्या ठिकाणी उत्कृष्ट दृष्टी स्थापन करते. सूर्यदेवतेसाठी जो पुरोडाश केला जातो तो यजमानाचे नाक व्यवस्थित करून ठेवतो. एवं च, मध्ये सूर्यदेवतात्मक चरू व त्याच्या दोहो बाजूला दोन अग्निदेवात्मक पुरोडाश अशा प्रकारची योजना या इष्टीत होत असते. म्हणूनच मध्ये नाक व त्याच्या दोहो बाजूला दोन डोळे अशी शरीराच्या ठिकाणी स्थिती असते. एकमेकात मिसळू नयेत, किंवा चिकटू नयेत म्हणूनच नाकाकडून दोन डोळे अलग अलग धारण केलेले असतात. पहिल्या व तिसऱ्या भ्राजस्वान् अग्नीसाठी सारख्याच म्हणजे ज्या पहिल्याच्या त्याच तिसऱ्याच्या अशा प्रकारे याज्यापुरोनुवाक्या होत्याने नियोजित कराव्यात. कारण दोन्ही डोळे समान म्हणजे एकरूपच असतात. यास्तव एकरूप अशा याज्यापुरोनुवाक्या यजमानाच्या समदृष्टीला कारणभूत होतात.

चतुर्धाकरणाच्या वेळी सूर्यदेवतेच्या चरूपैकी तीन पिंड म्हणजे अंश निराळे करून घ्यावेत. आणि 'उदु त्यं जातवेदसं' 'सप्त त्वा हरितो रथे' आणि 'चित्रं देवानां उदगादनीकं' ह्या तीन मंत्रांने एक अशा रीतीने ते तीन पिंड अध्वर्यूने यजमानाला भक्षणासाठी द्यावेत. असे केले असता अध्वर्यूने जणू काय रोगोत्पत्तीपूर्वी जशी यजमानाची दृष्टी उत्कृष्ट होती तशीच आता त्याला पुन्हा ती दिल्याप्रमाणे होते. (अनुवाक ८).

१ हे मध्यम परिधे, तू स्थिर आहेस. तुला स्थापन केल्याने मी देखील सजातीय लोकांमध्ये स्थिर, धैर्यवान्, अभिज्ञ आणि धनवान होईन. २ हे दक्षिण परिधे तू स्थिर आहेस. तुला स्थापन केल्यामुळे मी सुध्दा

माझ्या ज्ञातीतील लोकांमध्ये स्थिर, माझ्या विरुध्द कोणीही बोलणार नाही अशा उग्रस्वभावाचा, धैर्यशील, ज्ञानसंपन्न आणि धनसंपन्न होईन. ३ हे उत्तर परिधे, तू स्थिर आहेस, तुला या ठिकाणी स्थापन केल्याच्या योगाने मीही माझ्या ज्ञातिबांधवांमध्ये स्थिर होईन. माझा शब्द मोडणाराचा पराभव करणारा, ज्ञाता व धनाढ्य होईन. ४ हे आज्या तू सजातीयांशी आपला स्नेहभाव रहावा असे मानणारा आहेस. यास्तव, ह्या स्वजातीयांच्याशी आपला स्नेह असावा असे मानणाऱ्या यजमानाला जे देव, सजातीय असलेले वृध्द, तरुण आणि कुमार, समानचित्त, अर्थात् अनुकूल असे असतील त्यांना मी मनापासून चाहतो. आणि तेही मला मनापासून चाहोत. त्यांना तू माझ्याशी समानचित्त कर. आज्याच्या अधिष्ठात्री देवतेला ही आहुती समर्पण असो. ५ हे आज्या, तू सजातीयांशी स्नेह असावा, असे मानणारा आहेस. यास्तव, ह्या सजातीयांच्याशी स्नेह असावा असे मानणाऱ्या यजमानाला जे देव आणि ज्या स्त्रिया सारख्या मनोवृत्तीच्या अर्थात् अनुकूल असतील त्यांना मी मन:पूर्वक चाहतो आणि ते देव व त्या स्त्रियाही मला मन:पूर्वक चाहोत. त्यांना तू माझ्याशी समानचित्त कर. आज्याच्या अधिष्ठात्री देवतेला ही आहुती समर्पित असो.

परस्परांनी परस्परांचा एकमताने स्वीकार करणे याला संग्रहण असे नांव आहे. असे संग्रहण ज्या इष्टीने घडून येते ती 'सांग्रहणी' होय. विश्वेदेव ह्या इष्टीचे अधिष्ठाते देव असल्यामुळे तिला वैश्वदेवी असेही नांव आहे. आपणाला गांव मिळावा अशी ज्याला इच्छा असेल त्याने ही सांग्रहणी इष्टी करावी. वैश्वदेव हे परस्परांचे सजातीय आहेत. यास्तव त्यांच्यासाठी इष्टी केली असता, यजमानाने जणू काय सर्वच देवांच्या सन्निध त्यांचा स्वकीय असा हविर्भाग घेऊन जाऊन तो त्यांना समर्पण केल्यासारखे होते. आणि त्या भागाने संतुष्ट झालेले ते वैश्वदेव म्हणजेच सर्व देव त्या यजमानाला त्याचे सजातीय लोक अनुकूलत्वाने मिळवून देतात. व त्यांच्या साहाय्याने तो ग्रामी म्हणजे गांवाचे आधिपत्य संपादन करणारा होतोच होतो. स्वजातीय लोकांचे मन स्वाधीनतेने आकर्षण करून घेणे याला संग्रहण म्हणतात. असे संग्रहण ह्या इष्टीने होत असल्यामुळे ह्या इष्टीचे सांग्रहणी हे नांव यथार्थ आहे. या इष्टीच्या योगाने यजमान आपल्या ज्ञातिबांधवांचे मन आपल्याकडे निश्चयाने आकर्षक करतो. 'ध्रुवोऽसि ध्रुवोऽहं' इत्यादि तीन मंत्रांनी तीन परिधी

आहवनीयाग्रीच्या तीन बाजूस स्थापन करावेत. म्हणजे अध्वर्यूने यजमानाच्या मंत्रांत व्यक्त झालेल्या सर्व इच्छा सफल होण्याविषयी आशीर्वादाचीच याचना केल्याप्रमाणे होते. परिधिस्थापनेचे हे महत्त्व जाणणाऱ्या ज्या यजमानाचा अध्वर्यू पूर्वोक्त मंत्रांनी आहवनीयाग्रीच्या तीन बाजूस ते तीन परिधी स्थापन करतो, त्या यजमानाला मंत्रांमध्ये प्रार्थिलेले जे जे फल आहे ते ते सर्व फल त्याच्या ज्ञातिबांधवांपेक्षा अधिकत्वाने प्राप्त होते. 'आगमनस्यामनस्य देवा;' इत्यादि तीन मंत्रांनी तीन आज्याहुती द्याव्यात. म्हणजे तो यजमान त्याला अपेक्षित असतील ते सर्व सजातीय लोक म्हणजे जे वयाने थोर असतील, जे लहान असतील, त्याचप्रमाणे ज्या लहान मोठ्या स्त्रिया असतील त्या सर्वांना आपल्या स्वाधीन करून घेतो आणि ते सर्व त्याच्या आधीन होऊन त्याची सेवा करतात. (अनुवाक ९).

१ जे ताकातून घुसळून बाहेर काढल्यावर नव्याच स्वरूपाला प्राप्त होत असते, ते नवनीत किंवा लोणी या नांवाला प्राप्त होते. तेच नवनीत पात्रात घालून अग्रीवर ठेवल्यावर विरघळून पसरू लागते, तेव्हा ते 'सर्पि' या नांवाला पात्र होते. आणि ते अग्रीवरून उतरून थंड पात्रात गाळल्यावर पुन्हा जेव्हा घट्ट होते तेव्हा ते 'घृत' या नांवाला प्राप्त होते. २ हे यजमान, तू अश्विनीकुमारांचा जणू प्राणच आहेस. ज्या अर्थी त्या दोघा अश्विनीकुमारांना तू प्राणाप्रमाणे प्रिय आहेस, त्या अर्थी प्राणप्रिय अशा तुला ते अश्विनीकुमार आयुष्याला हेतुभूत असलेला प्राण देवोत. अश्विनीकुमारांना ही आहुती उत्तम प्रकारे समर्पण असो. ३ हे यजमान, तू जणू इंद्राचा प्राणच आहेस. त्या तुला तो इंद्र प्राण देवो. ४ हे यजमान, तू मित्रावरुणांचा जणू प्राणच आहेस, ज्या मित्रावरुणांना तू प्राणाप्रमाणे प्रिय आहेस त्या तुज यजमानाला ते मित्रावरुण प्राण देवोत. ५ हे यजमान, तू विश्वेदेवांचा प्राणच आहेस. ज्या विश्वेदेवांना तू प्राणवत् प्रिय आहेस, त्या तुला ते विश्वेदेव आयुष्याला आवश्यक असा प्राण देवोत. ६ अमृताप्रमाणे अविनाशी अशा कर्मफलांचा साधनभूत असा जणू राजमार्ग अशी, वृष्टी तृणोत्पत्ती इत्यादि परंपरेने इंद्रदेवाने संपादिलेली, आणि देवांमधील वैश्याधिपती असलेल्या मरुतांनी विक्रयार्थ पात्रात साठविलेली अशी ही जी घृतधारा तिला मी अवलोकन करतो. हे घृता, आतापर्यंत वर्णन केल्याप्रमाणेच असणाऱ्या तुला विष्णूसारखा यजमान सर्वतोपरी न्याहाळून पाहतो. पूर्ववर्णित अशा तुंज घृताला पशूंची अभिमानिनी 'इडा'

नामक देवता गाईंच्या ठिकाणी स्थापन करते. ७ हे यजमान, बहिष्पवमानादिकांशी संबंधित असणाऱ्या व त्रिवृत् इत्यादि स्तोत्राने साध्य होणाऱ्या, गायत्री छंदाच्या मार्गाने म्हणजे सोमाहरणरूप यज्ञांगसंपादनाने 'उपांशु' संज्ञक ग्रहपात्रात भरून घेतलेल्या सोमरसाच्या हवनाने साध्य होणाऱ्या सामर्थ्याने जीवनाला हेतुभूत अशा औषधादिकांच्या संपादनासाठी आणि चिरकाल जगण्याची तुझी इच्छा पूर्ण व्हावी म्हणून सवितादेव तुला ह्या दीर्घकालीन होमापासून मुक्त करो. ८ हे यजमान, बृहत् व रथंतर या दोन सामासंबंधी विशिष्ट अशा स्तोमाने, त्रिष्टुप् छंदाच्या मार्गाने 'शुक्र' नामक ग्रहातील सोमरसाच्या हवनसाध्य सामर्थ्याने जीवनहेतुभूत अशा औषधाच्या संपादनासाठी आणि चिरकाळ जगण्याची तुझी इच्छा पूर्ण व्हावयासाठी सवितादेव तुला या प्रबल रोगापासून मुक्त करो. ९ हे यजमान, अग्नीच्या महत्त्वाचे मापन ज्या सामगायनाने केले जाते, त्या 'यज्ञायज्ञिय' सामाने, जगती छंदाच्या मार्गाने 'आग्रयण' ग्रहपात्रातील सोमरसाच्या हवनसाध्य सामर्थ्याने, जीवनहेतूभूत अशा औषधाच्या संपादनासाठी व चिरकाल जगण्याची तुझी इच्छा पूर्ण व्हावी म्हणून सवितादेव तुला या दीर्घकालीन रोगापासून मुक्त करो. १० हे अग्निदेवा, ह्या यजमानाला दीर्घायुष्य व शरीरबल प्राप्त होण्याला समर्थ कर. हे वरुणदेवा आणि सोमराजा, या यजमानाला प्रिय असलेले पुत्रोत्पादक असे रेत संपादन करून दे. हे भूदेवी, आईप्रमाणे तू या यजमानाला सुख दे. विश्वेदेव या यजमानाला तो अगदी म्हातारा होईपर्यंत जेणे करून जगेल अशाप्रकारे व्याधिरहित करोत. ११ अग्नी हा आयुष्याने संपन्न असा देव आहे. तो वनस्पतींच्या योगाने आयुष्यसंपन्न होत असतो. अग्नीवर काष्ठे घातली म्हणजे त्याच्या ठिकाणी ज्वाला उत्पन्न होतात व त्यांच्या परंपरेने तो वृध्दिंगत होतो, विझत नाही, हे प्रसिध्दच आहे. हे यजमान, त्या अग्नीच्या आयुष्याने मी तुला आयुष्मंत म्हणजे दीर्घायुष्यसंपन्न करतो. १२ सोम हा आयुष्मान् आहे. तो औषधींच्या योगाने आयुष्मान् होत असतो. सोमराजाच्या त्या आयुष्याने मी तुला आयुष्मंत करतो. १३ यज्ञ हा आयुष्मान् आहे. तो दक्षिणांच्या योगाने आयुष्मान होत असतो, त्या यज्ञाच्या आयुष्याने हे यजमान, मी तुला आयुष्मंत करतो. १४ ब्रह्म हे आयुष्मत् आहे. ते ब्राह्मणांच्या योगाने आयुष्मत् होत असते. त्या ब्रह्माच्या आयुष्याने मी तुला दीर्घायुषी करतो. १५ हे यजमान, देव आयुष्मंत आहेत. ते अमृताच्या योगाने चिरकाल आयुष्मंत होत असतात. देवांच्या त्या चिरकालीन

आयुष्याने मी तुला आयुष्मंत करतो. १६ पितर हेही आयुष्मंत म्हणजे आयुष्याने युक्त असे आहेत. ते 'स्वधा' असे म्हणून त्यांच्या पुत्रादिकांनी त्यांना दिलेल्या पिंडरूप अन्नाच्या योगाने आयुष्मंत झालेले असतात. हे यजमान, त्या पितरांच्या आयुष्याने मी तुला आयुष्मंत करतो. (अनुवाक १०).

ज्याला दीर्घकालीन व्याधी पीडा देत असते म्हणजे जो फार दिवस रोगग्रस्त झालेला असतो, त्याच्या शरीरातील मांस जठराग्नीने खाऊन टाकल्यामुळे त्याचे शरीर जणू काय अग्नीत प्रविष्ट झाल्यासारखे असते. त्याच्या शरीरातील जीवनरस सोमाकडे गेलेला असतो. सोमाने त्याचा जीवनरस आकर्षण केल्यामुळे त्याचे बल क्षीण झालेले असते. वरुणाने आपला उदरासारख्या व्याधिरूपाने असलेला आपला पाश टाकून त्याला घेरलेला असून त्याची वाणी म्हणजे बोलण्याची शक्ती सरस्वतीकडे गेलेली असते. आणि जीवात्मा तर अग्राविष्णूच्याजवळ जाऊन पोहचलेला असतो. आणि त्यामुळे तो मरणाच्या बेतात आलेला असतो. अशा प्रकारे दीर्घकालीन रोगांनी पीडलेला असेल त्याच्या रोगमुक्ततेसाठी किंवा जो निरोगी असून ज्याला अपमृत्युरहित असे प्रारब्धानुसार जन्मतः प्राप्त झालेले सर्व आयुष्य आपणास उपभोगण्यास मिळावे अशी इच्छा असेल त्याची इच्छा पूर्ण होण्यासाठी अध्वर्यूने आता सांगितल्या जाणाऱ्या ह्या इष्टीचे निर्वपण म्हणजे यजन करावे. अग्निदेवतेसाठी अष्टाकपालात्मक पुरोडाश, सोमदेवतेसाठी चरू, वरुणदेवतेकरता दशकपालात्मक पुरोडाश, सरस्वती देवतेच्या उद्देशाने चरू आणि अग्नी व विष्णू या दोन देवतांच्यासाठी मिळून एकादशकपालात्मक पुरोडाश करून त्या त्या देवतांचे यजन करावे. पुरोडाशरूपी किंमत देऊन अध्वर्यू जणू काय आपल्या यजमानाचे शरीर विकत घेतो. चरूरूपी किंमत देऊन सोमापासून यजमानाच्या शरीरातील जीवनरस तो विकत घेतो. व वरुणाचे यजन करून आपल्या यजमानाला वरुणपाशातून मोकळा करतो. सरस्वतीदेवतेच्या यजनाने तिला संतुष्ट करून यजमानाच्या ठिकाणी बोलण्याची शक्ती पुन्हा धारण करतो. अग्नी हा सर्वदेवतारूप असून विष्णू हा प्रत्यक्ष यज्ञमूर्तीच आहे. अध्वर्यू त्यांनाही हविर्द्रव्याने संतुष्ट करून त्या दोघांचेही यजन केल्याने अध्वर्यू जणू काय सर्व देवतांच्याकडून आणि यज्ञदेवतेकडून आपल्या यजमानाला औषधोपचार करतो. त्या योगाने त्याचा रोगग्रस्त यजमान क्षणभर गतप्राण झाला असला तरी पुन्हा जिवंत होतो. मग जिवंत असेल

तो रोगमुक्त होईल अथवा निरोगी असेल त्याला अपमृत्युरहित असे सर्व आयुष्य लाभेल हे काय सांगावयास पाहिजे?.

कृतिभूत अशा दर्शपूर्णमासेष्टीत सांगितल्याप्रमाणे 'आज्यामसि सत्यमसि' हा मंत्र न म्हणता 'यन्नवमैत्तन्नवनीतमभवत्' हा मंत्र म्हणून आज्याचे अवलोकन करावे. 'अश्विनो:प्राणोऽसि' हा मंत्र म्हणून अध्वर्यूने उपहोमसंबंधी आज्याहुती द्यावी. अश्विनीकुमार हे देवांचे वैद्य आहेत. अर्थात् त्या आहुतीच्या योगाने त्या अश्विनीकुमारांच्या कडून यजमानाला औषधोपचार केल्यासारखे होते. 'इंद्रस्य प्राणोऽसि' हा मंत्र म्हणून दुसरी आहुती द्यावी. त्या योगाने यजमानाच्या ठिकाणी इंद्रियशक्ती धारण केल्यासारखे होते. 'मित्रावरूणयो: प्राणोऽसि' हा मंत्र तिसरी आहुती देताना म्हणावा. त्या योगाने यजमानाच्या ठिकाणी प्राण व अपान या दोन वायूंचे धारण केल्यासारखे होते. 'विश्वेंषां देवानां प्राणोऽसि.' ह्या मंत्राने चौथी आहुती द्यावी. त्यायोगाने यजमानाच्या ठिकाणी वीर्य धारण केल्यासारखे होते.

'पावमानेन त्वा सोमेन'. हा मंत्र ऋत्विजांनी म्हणावा. तसे केल्याने यजमानाच्या ठिकाणी प्राणाचेच धारण केल्यासारखे होते. 'बृहद्रथंतरयोस्त्त्वा सोमेन.' हा मंत्र म्हणावा. म्हणजे ऋत्विजांनी जणू काय यजमानाच्या ठिकाणी ह्या मंत्राने ओज धारण केल्यासारखे होते. 'अग्रेस्त्त्वा मात्रया.' हा मंत्र ऋत्विजांनी म्हणावा. म्हणजे ह्या मंत्राने यजमानाच्या ठिकाणी जीवात्म्यांचेच धारण केल्यासारखे होते.

आता सांगितलेले तिन्ही मंत्र सर्व ऋत्विजांनी म्हणावेत. म्हणजे जितके ऋत्विज आहेत त्या सर्वांनी यजमानाला औषधोपचार केल्याप्रमाणे होते.

ब्रह्म्याने यजमानाचा उजवा हात धरावा आणि सर्व ऋत्विजांनी ब्रह्म्याच्या हाताला स्पर्श करून पूर्वोक्त मंत्र म्हणावा. म्हणजे ब्रह्म्यांसह सर्व ऋत्विजांनी एकमताने यजमानाच्या ठिकाणी त्याच्या प्रारब्धानुसार जितके आयुष्य त्याला मिळाले पाहिजे, तितके सर्व आयुष्य स्थापन केल्यासारखे होते.

सुवर्ण घृतात बुडवावे आणि त्या सुवर्णापासून जे घृत गळेल त्याचे

यजमानाने प्राशन करावे. कारण घृत है आयुष्यवर्धक असल्यामुळे जणू काय आयुष्यरूपच असून सुवर्ण हे अविनाशी असल्यामुळे अमृतरूप आहे. यास्तव, सुवर्णापासून गळलेल्या घृताचे प्राशन केले असता, यजमानाने जणू काय अमृतापासून गलित झालेल्या आयुष्याचेच प्राशन केल्यासारखे होते. सुवर्ण शंभरगुंजाभार असावे. पुरुष हा शंभर वर्षांच्या आयुष्याने आणि शंभर इंद्रियांनी युक्त असतो. यास्तव शंभरगुंजाभार सुवर्ण असल्याच्या योगाने यजमान संपूर्ण आयुष्य व संपूर्ण इंद्रियसामर्थ्य यांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतो. अथवा अध्वर्यूला आपला यजमान पुढे जितक्या वर्षे जगावा असे वाटत असेल, तितक्या गुंजाभार सुवर्ण असावे. ते यजमानाच्या समृध्दीला कारणभूत होते. यजमान सुवर्णापासून गळत असलेल्या घृताचे प्राशन करीत असतांना 'इममग्र आयुषे वर्चसे कृधि' हा मंत्र म्हणून अध्वर्यूंने त्याचे अभिमंत्रण करावे म्हणजे त्याला स्पर्श करून मंत्र म्हणावा. म्हणजे त्याने यजमानाच्या ठिकाणी आयुष्य व उत्कृष्ट अशी शरीरकांती धारण केल्याप्रमाणे होते. 'विश्वेदेवा जरदष्टिर्यथा सत्' म्हणजे, विश्वेदेव ह्या यजमानाला त्याने खाल्लेले अन्न त्याला नीट पचेल असा निरोगी जेणे करून होईल असे करा' असे म्हणावे. हे मंत्र अध्वर्यूने यजमानाचा उजवा हात आपल्या उजव्या हाताने धरला असताना म्हणावेत म्हणजे त्या मंत्रांच्या ठिकाणी आयुष्यप्रद असे जे देव व्यक्त केले गेले आहेत, ते सर्व देव त्या यजमानाच्या ठिकाणी संपूर्ण आयुष्य धारण करतात व तो यजमान सर्व आयुष्याच्या उपभोगाला प्राप्त होतो. (अनुवाक ११).

प्रजापतीने वरुणाला अश्व म्हणजे घोडा दिला. परंतु असे केल्याने त्याने स्वतःचे अश्वाचे ठिकाणी असलेले देवत्वच आपल्यापासून दूर केल्यासारखे झाले. कारण, वरुणाला अश्व देण्यापूर्वी प्रजापती हीच अश्वाची अधिष्ठात्री देवता होती. वरुणाला अश्व दिल्यानंतर त्याचे स्वतःचे अश्वस्वामित्व नष्ट झाले आणि त्या कारणाने त्याला फार दुःख झाले. त्या प्रजापतीचे शरीर दीर्घरोगाने सर्वतोपरी ग्रस्त झाले. तेव्हा 'वरुण देवतेच्या उद्देशाने चतुष्कपालात्मक म्हणजे चार कपालांच्या समूहावर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचे यजन करणे' हाच एक उपाय स्वतःच्या रोगमुक्तीस उपयुक्त असल्याचे त्याने आपल्या अंतर्दृष्टीने पाहिले आणि तदनुसार त्याने वरुणदेवतेसाठी चतुष्कपालात्मक पुरोडाश करून त्याचे यजन केले व त्या यजनाच्या प्रभावाने तो वरुणाच्या रोगरूपी

पाशापासून मुक्त झाला. जो अश्वाचे दान करतो त्याला वरुणदेव आपल्या रोगरूपी पाशाने ग्रहण करतो, म्हणजे आपल्याकडे खेचतो. यास्तव जित्तके अश्व दान दिले असतील तितके चतुष्कपालात्मक पुरोडाश तयार करून त्यांचे वरुणदेवतेप्रीत्यर्थ यजन करावे. असे केले असता वरुणदेवाचा स्वकीय भाग घेऊनच यजमानाने त्याच्याजवळ गेल्यासारखे व तो त्याला समर्पण केल्यासारखे होते. आणि त्यामुळे प्रसन्न झालेला तो वरुणदेव त्या यजमानाला आपल्या पाशापासून मुक्त करतो.

सर्व पुरोडाश चतुष्कपालात्मक करावेत. कारण अश्व हा चतुष्पाद असतो. अर्थात् चतुष्कपालात्मक पुरोडाश यजमानाच्या समृध्दीला कारणभूत होतात. या पुढे कदाचित् हा यजमान एखादा अश्व दान करील, किंवा एखादा अश्व दिल्याचे विसरून जाईल, असे होण्याचा संभव असतो. यास्तव जितके अश्व दिले असतील त्या संख्येपेक्षा एक पुरोडाश अधिक करावा म्हणजे त्यापासून यजमान वरुणपाशातून मुक्त होतो. काही अश्व दिल्यावर लागलीच त्या अश्वांच्या संख्येहून एक पुरोडाश अधिक करून याग केला तर ठीकच. पण तशा तऱ्हेने याग केला नाही इतकेच नव्हे तर काही काळाने दुसरा एखादा अश्व दिला तर अश्वसंख्येहून एक अधिक पुरोडाश करून त्याबरोबर सूर्यदेवतेच्या उद्देशाने आणखी एका एककपालात्मक पुरोडाशाचे निर्वपण करून त्याचेही यजन करावे. त्या योगाने संतुष्ट झालेला भगवान् आदित्य त्या यजमानाच्या हातून इष्टीविषयी झालेल्या विलंबरूप दोषाचा परिहार करून त्याला उच्च स्थितीला प्राप्त करतो. इष्टी झाल्यानंतर उदकासन्निध जाऊन उदकाच्या ठिकाणी 'अवभृत' संज्ञक कर्म करावे. कारण वरुण हा उदकांमध्येच राहत असतो. यास्तव, अवभृत केले असता यजमानाने जणू काय वरुणालाच आपणापासून निराकृत म्हणजे दूर केल्यासारखे होते. अवभृत करून यज्ञशालेत परत आल्यावर 'अपोनप्तृ' संज्ञक देवतेच्या उद्देशाने चरू शिजवून त्याचा याग करावा. कारण अश्व हा उदकाच्या ठिकाणी जन्मलेला असतो. यास्तव, आता सांगितलेला चरुयाग केल्याच्या योगाने जणू काय दान दिलेल्या अश्वाला त्याच्या स्वकीय अशा जन्मस्थानीच पाठविल्यासारखे होते. मग तो अश्व शांत होऊन रोग उत्पन्न न होऊ देता यजमानाची सेवा करतो. (अनुवाक १२).

१ हे मित्रावरुणहो, तुमची पापमोचनाविषयी प्रयत्न करणारी जी

तनू आहे त्या तनूने ह्या यजमानाला पापमुक्त करा. २ हे मित्रावरुणहो, तुमचे जे बलप्रद, ३ संरक्षक आणि ४ कांतिप्रत असे जे शरीर आहे त्या शरीराने तुम्ही ह्या यजमानाला पापापासून मुक्त करा. ५ हे इंद्रावरुणहो, तुमच्याविषयी अग्नीच्या ठिकाणी हवन करताना जे पाप यजमानाने केले आहे, ते पाप तुमच्या संतोषासाठीच करीत असलेल्या ह्या हवनरूप कार्याने मी नष्ट करीत आहे. ६ हे इंद्रावरुणहो, मनुष्ये ७ चतुष्पाद असे पशू ८ गोड ९ घरे १० उदके ११ ओषधी आणि १२ वनस्पती यांच्या ठिकाणी व्यवहार करीत असताना तुमच्या संबंधी जे पातक यजमानांनी केले असेल ते पातक तुमच्या संतोषासाठीच करीत असलेल्या ह्या हवनरूप कर्माच्या योगाने मी नष्ट करीत आहे.

जो पातकाने घेरला गेलेला असतो त्याच्या इंद्रियशक्तीसह इंद्र त्याच्यापासून दूर गेलेला असतो आणि त्याला वरुण रोगरूपी पाशाने जखडून टाकीत असतो. यास्तव, जो पातकाने घेरला गेला असेल, दूषित झाला असेल त्याच्या पापमुक्तीकरता 'ऐंद्रावरुणी' म्हणजे इंद्र व वरुण या दोन देवांच्या उद्देशाने आमिक्षा तयार करावी आणि तिचे यजन करावे. म्हणजे इंद्र त्या यजमानाच्या ठिकाणी इंद्रियशक्ती स्थापन करतो. वरुण आपल्या रोगरूपी पाशातून त्याला मुक्त करतो. या यागात आमिक्षा हेच हविर्द्रव्य असते. कारण, त्या यजमानापासून 'पय' म्हणजे दुग्धादि सात्त्विक आहार करून श्रध्देने केलेल्या कर्माचे पुण्य जेव्हा दूर होते म्हणजे त्याच्या हातून सत्कर्म घडेनासे होते, तेव्हाच तो पापाने घेरला जातो. यास्तव, दुधापासून बनविलेली आमिक्षा हविर्द्रव्य म्हणून नियोजित केली म्हणजे तिच्या योगाने यजमानाच्या ठिकाणी अध्वर्यूने जणू काय सात्त्विक आहार करून श्रध्देने केलेल्या कर्माचे पुण्यच धारण केल्यासारखे होते. इंद्रावरुणदेवात्मक असा एक पुरोडाश तयार करून तो आमिक्षेमध्ये प्रक्षिप्त करावा म्हणजे ठेवावा. ज्याच्या हातून पातक घडते त्याचे शरीर तज्जन्य रोगाने हलक होत असते. यास्तव, शरीरसदृश व कठिण असा पुरोडाश आमिक्षेच्या ठिकाणी ठेवल्याने यजमानाला अध्वर्यूने दृढ अशा शरीराने युक्त केल्यासारखे होते. शिवाय पुरोडाशाला आधारभूत असलेल्या आमिक्षेप्रमाणेच अध्वर्यू जणू काय त्या यजमानाला गृहग्रामादि आधाराने युक्त केल्यासारखेही होते. 'यो वामिंद्रावरुणा' इत्यादि मंत्रांनी अध्वर्यू आमिक्षारूप हविर्द्रव्याचे चार भाग करतो, तेणे करून तो जणू काय यजमानाला चार

दिशांच्या ठिकाणी प्रतिष्ठित करतो. आमिक्षेचे केलेले चार विभाग पुन्हा एकत्र करावेत म्हणजे अध्वर्यूने जणू काय चारी दिशांच्याकडून यजमानाला औषधोपचार केल्यासारखे होते. आमिक्षा व पुरोडाश यांचे एकत्र मिश्रण करून अवदान घ्यावे. म्हणजे वैऱ्याने स्वशरीराचे ठिकाणी मारलेला बाण जसा चिमटयाने बाहेर उपसून काढून मोडून टाकावा त्याप्रमाणे ते अवदान यजमानाच्या शरीरात घुसलेले पातक बाहेर उपसून काढून नष्ट करते. होमाला आधारभूत अशा अग्नीच्या ठिकाणी केलेल्या पातकाने अकल्याण होत असते. यास्तव, 'हे इंद्रावरूणहो, तुमच्या विषयी अग्नीच्या ठिकाणी हवन करताना जे पाप यजमानाने केले आहे, ते पाप तुमच्या संतोषासाठीच करीत असलेल्या ह्या हवनरूप कर्माच्या योगाने मी नष्ट करीत आहे,' अशा अर्थाचा जो मंत्र आज्याहुती देताना अध्वर्यू म्हणतो तेणेकरून तो जणू काय आपल्या यजमानाचे अकल्याणापासून रक्षण करतो.'हे इंद्रावरुणहो, मनुष्ये व पशू यांच्या ठिकाणी व्यवहार करीत असताना तुमच्या संबंधी जे पातक यजमानाने केले असेल ते पातक तुमच्या संतोषासाठीच करीत असलेल्या ह्या हवनरूप कर्माच्या योगाने मी नष्ट करीत आहे,' असा अर्थ असलेला 'यो वामिंद्रावरुणा'. हा मंत्र अध्वर्यू आहुती देताना म्हणत असतो. उदके, ओषधी, वनस्पती, प्रजा व पशू हे पांच पदार्थ प्राण्यांच्या उपजीवनास योग्य आहेत. या पांच पदार्थांपैकी पशू हा शब्द मनुष्ये व घरे यांचाही उपलक्षक आहे असे समजावे. यास्तव, ह्या उपजीवनीय वस्तूंचा निर्देश असलेल्या मंत्रांनी आज्याहुती दिल्या असता ह्या सर्व वस्तू त्या यजमानाला वरुणाच्या रोगरूपी पाशापासून मुक्त करतात. (अनुवाक १३).

१ ब्रह्मांडरूपी हिरण्याचे ठिकाणी गर्भरूपाने राहणारा प्रजापतीच प्राणिमात्र उत्पन्न होण्यापूर्वी शरीर धारण करून उत्पन्न झाला. आणि तोच पुढे उत्पन्न होणाऱ्या जगाचा एकमात्र अधिपती झाला. त्यानेच अत्यंत विस्तीर्ण अशा द्युलोकाचे धारण केले असून या भूमीलाही त्यानेच धारण केले आहे. अशा प्रकारच्या आदिपुरुष प्रजापतेदेवाला हविर्द्रव्याच्या अर्पणाने संतुष्ट करून आम्ही त्याची सेवा करीत आहोत. २ अग्निचयन करण्याविषयी प्रवृत्त होणाऱ्या कुशल यजमानाला उत्पन्न करणारी, व प्रज्वलित करण्यास योग्य अशा अग्नीला उत्पन्न करणारी महनीय अशी उदके ज्या प्रजापती देवाच्या अनुग्रहाने विश्वाकार झाली आहेत त्या प्रजापती देवापासूनच सर्वांच्या जीवनाला कारणभूत असा

एक प्राण निर्माण झाला, त्या प्रजापती देवाला हविर्द्रव्य समर्पण करून आम्ही त्याची सेवा करीत आहोत. ३ हे ऋत्विज आणि यजमान हो, तुमच्या पुत्रपौत्रादिजनांच्या कार्यसिद्धीसाठी सर्व जगाच्यावर उत्कृष्टत्वाने स्थित असणाऱ्या इंद्रदेवाला आम्ही बोलावीत आहोत. तो इंद्र इतरांच्याहून आम्हालाच अधिक प्रिय मानणारा असो. ४ अग्निचयनाचे अनुष्ठान करणारे यजमान अग्न्यादि देवांच्या अर्ध्या हविर्भागाचे धारण करण्याकरिता इंद्राला बोलावीत असतात. ज्या अर्थी विटांची विशेष रीतीने मांडणी करून त्यांवर स्थापित केलेल्या अग्नीचे ठिकाणी बुद्धी एकाग्र करतात त्या अर्थी त्यांनी इतर देवांच्या बरोबर अर्धा हविर्भाग सेवन करण्याकरिता इंद्राला बोलविणे साहजिकच आहे. हे इंद्रा तू शूर, मनुष्यांना धन देणारा व आमच्या बलाचे संवर्धन करणारा होऊन आम्हाला गाई, म्हशी, बैल इत्यादि पशूंनी गजबजलेल्या संघाच्या ठिकाणी प्रामुख्याने स्थापन कर. ५ हे सोमराजा, आम्हाला उपद्रव देऊ इच्छिणाऱ्या सर्व पापसंघापासून आमचे तू रक्षण कर. तुझ्या सारख्या प्रभूची थोडी तरी मैत्री असलेला कोणीही मनुष्य तुझ्या अनुग्रहाने नाश पावत नाही. ६ हे सोमराजा, द्युलोकात तुझी जी स्थाने आहेत, त्याचप्रमाणे पृथ्वी, पर्वत, ओषधी आणि उदके यांच्या ठिकाणी जी जी तुझी स्थाने आहेत, त्या सर्व स्थानांनी युक्त असा तू प्रसन्नचित्त आणि क्रोधरहित होऊन आमच्या हविर्द्रव्यांचा स्वीकार कर. ७ हे अग्नीषोमहो, सारख्याच ज्ञानाने युक्त, एकाच वेळी उपासकाकडून बोलावले जाणारे आणि देवसमुदायात सर्वदा परस्परांना संलग्न होऊन वागणारे तुम्ही आमची स्तवनरूप भाषणे मान्य करून घ्या. ८ हे सोमदेवा, तू आणि अग्नी दोघेही सारख्याच संकल्पाने प्रेरित होऊन द्युलोकाचे ठिकाणी ही स्वप्रकाशाने चमकणारी नक्षत्रे स्थापन केलीत. हे अग्नीषोमहो, तुम्ही दोघांनी अपूर्णतेच्या आरोपाने आणि चिखलासारख्या दुष्ट दोषाने घेरलेल्या ह्या सर्व नद्यांना अपूर्णत्वाच्या आरोपातून व चिखलासारख्या दुष्ट दोषापासून मुक्त केलेत. ९ हे अग्नीषोमहो, इच्छिलेल्या फलांची वृष्टी करणारे तुम्ही माझे हे निमंत्रण उत्तम रीतीने श्रवण करा. आम्ही उच्चारलेल्या सूक्तांचा मन:पूर्वक स्वीकार करा. तुम्हाला हवी अर्पण करणाऱ्या यजमानाला सुखप्रद व्हा. १० हे अग्नीषोमहो, तुमच्यापैकी एकाला म्हणजे अग्नीला वायूने द्युलोकात राहणाऱ्या आदित्यापासून खाली आणले. आणि दुसऱ्याला म्हणजे सोमाला श्येन पक्ष्याचे रूप धारण करणाऱ्या गायत्रीने पर्वतावर असणाऱ्या

सोमरक्षकाचे मंथन करून म्हणजे त्यांना पराजित करून खाली आणले. हे अग्नीषोमहो, वेदमंत्राने वृद्धिंगत होणारे तुम्ही यज्ञासाठी विस्तीर्ण असे स्थानही निर्माण केलेत. ११ हे अग्नीषोमहो, उपासकांनी इच्छिलेल्या फलांचा वर्षाव करणारे तुम्ही, तुम्हाला समर्पण केलेल्या हवीचे सार ग्रहण करा. आणि ग्रहण केलेले ते सार सेवन करा. उत्तम प्रकारच्या सौख्याने आणि उत्तम प्रकारच्या संरक्षक शक्तीने युक्त असे तुम्ही व्हा. नव्हे, तसे तुम्ही आहात, म्हणूनच आता यजमानाला सुख, आणि पुत्रपौत्रादि संतती देऊन समृद्ध करा. १२ हे सोमदेवा तू सर्व बाजूंनी वाढत रहा. विश्वातील भूतमात्राची उत्पत्ती करण्यास समर्थ असे वीर्य तुझ्याकडे चालून येतो. निरनिराळ्या प्रकारचे अन्न आमच्यासाठी एकत्र जमविण्याला तू कारणभूत हो. १३ हे सोमा पिण्याला योग्य असे दुग्धादि सर्व रस तुझ्याजवळ येवोत. त्याचप्रमाणे सर्व प्रकारची अन्ने व सर्व प्रकारच्या प्रजोत्पादनशक्तीही तुजकडे चालत येवोत. हे सोमा शत्रूंचा पराभव करणारा तू अन्न,रस व प्रजोत्पादनशक्ती यांच्या योगाने वृद्धिंगत होऊन यजमानाला देवत्व प्राप्त होण्यासाठी द्युलोकाचे ठिकाणी श्रवणमनोहर आणि विविध प्रकारची उत्कृष्ट अन्ने संपादन करून ठेव. १४ वैदिक वाङ्.मयात जितके म्हणून मंत्र आहेत, त्या सर्व मंत्रांचा पालक असणाऱ्या हे ब्रह्मणस्पतिदेवा, सर्व देवगणांचा स्वामी, विद्वानांमध्ये श्रेष्ठ विद्वान्, कीर्तीविषयी उपमा देण्यास सर्वथैव योग्य असा कीर्तिमान् आणि राजांमध्ये श्रेष्ठ असा राजा असलेल्या तुला आम्ही बोलवीत आहो. यास्तव, तू आमच्या रक्षणास अवश्य अशा सर्व साधनांनी युक्त होऊन ये. आणि या यज्ञात तुझ्यासाठीच मांडून ठेवलेल्या ह्या आसनावर बैस. १५ श्रध्दायुक्त अशा अंत:करणाचा जो यजमान देवांचाही पालक असलेल्या ब्रह्मणस्पतिनामक देवाची स्वसंपादित अशा हविर्द्रव्याने सर्वतोपरी सेवा करतो तोच खरा यजमान. नोकरचाकर इत्यादिकांनी युक्त अशा अन्नाचे धारण तोच करतो, तोच कर देणाऱ्या प्रजाजनांनी युक्त असे अन्न धारण करतो. तोच पुत्रपौत्रादि संततीने युक्त अशा अन्नाचे धारण करतो. आणि तोच बंधूच्यासहित असलेल्या धनांचे धारण करतो. १६ तो बृहस्पतिदेव, सामगानसंबंधी उत्कृष्ट अवयवांनी युक्त, पुष्कळ ऋचांनी युक्त आणि श्रवणीय अशा ध्वनीने युक्त अशा मंत्रसमूहाने संतुष्ट झाला असता यज्ञकर्माचे फल धारण करणाऱ्या यजमानाला प्राप्त होणाऱ्या प्रबल प्रतिबंधाचा चुराडा करतो. तो यजमानाने अर्पिलेल्या हविर्द्रव्याचा उपयोग करणारा बृहस्पतिदेव

'हा हवी किती तरी स्वादिष्ट आणि रुचकर आहे.!' असे मोठ्याने बोलून त्याची प्रशंसा करतो. आणि, पान्हा फुटल्यामुळे आपल्या वासरांना उद्देशून त्यांनी आपल्याजवळ यावे, म्हणून हंबरणाऱ्या गाई मोठ्या उत्साहाने यजमानाच्या घरी पाठवतो. १७ हे मरुद्गणहो तुमचे यजन करणाऱ्याला देण्यासाठी तुम्ही जी सुखे संपादन करून ठेवली आहेत, ती त्रैलोक्यातील सर्व सुखे तुम्हाला हविर्द्रव्ये अर्पण करणाऱ्याला तुम्ही त्याच्या अपेक्षेपेक्षा अधिक देता. यास्तव ती सर्व सुखे आम्हाला द्या. त्याचप्रमाणे आम्हाला धन आणि पराक्रमी पुत्र द्या. १८ अखंडनीय अशी अदिती देवी आमचे शत्रूपासून रक्षण करो. अदिती देवी आम्हाला सुख देवो. त्याचप्रमाणे अदिती देवी आमचे पापापासून रक्षण करो. १९ इच्छित फलांचा वर्षाव करणारा, मोठा बलवान्, धनांचा दाता, पुष्कळ यज्ञांत बोलावला जाणारा, स्वर्ग देण्याला योग्य असा जो अर्यमा देव उदयाला येतो, तो सहस्रनेत्र, पर्वतांचा भेद करण्यास समर्थ, वज्रबाहू देव आमच्या ठिकाणी धन धारण करो. २० हे अर्यमन्, हे राजन् तुझे देवांकडे जाण्याला योग्य असे जे पुष्कळ मार्ग स्वर्गलोकापर्यंत जातात, हे देवा ! त्या मार्गांनी आम्हाला महनीय असें सुख दे. आमचा संबंधी असलेल्या मनुष्याला व पशूला तू सुखप्रद हो. २१ यज्ञकर्माच्या प्रारंभापासून शेवटपर्यंत अंगिरा नामक ऋषीसारख्या अनेक ऋत्विजांकडून प्रशंसिल्या जाणाऱ्या इंद्राने पर्वताप्रमाणे सर्वांना आधारभूत असलेल्या आपल्या उपासक राजाच्या श्रेष्ठत्वाला आड येतील अशी त्याच्या विरोधकांनी केलेली द्रोहमूलक सर्व कारस्थाने हाणून पाडली. तसेच आपल्या उपासकाला अटकाव करण्याकरिता त्याच्या बरोबरीच्या राजांनी जी कृत्रिम स्थले उभारली होती त्यांचा विध्वंस करून ती उभारली जात असतानाच हाणून पाडली. जेव्हा इंद्र सोमरस पिऊन धुंद झाला, तेव्हा त्या धुंदीच्या भरातच त्याने ही सारी कृत्ये केली. २२ इंद्राने आरंभापासून शेवटपर्यंतच्या स्थळांची मानदंडांनी मोजणी करून त्या स्थलांची आखणी निश्चित केली. नंतर त्या स्थलांतून नद्यांचे प्रवाह निष्प्रतिबंधत्वाने वहावेत म्हणून वज्राने ती स्थले एथूल तेथून खोदून काढली आणि जलप्रवाहाला आड येणारे पर्वत वगैरे फोडून काढले. आणि मग लांब पर्यंतच्या पल्लयापर्यंत जाणाऱ्या मार्गांनी त्याने निरनिराळ्या नद्यांचे प्रवाह अगदी सहज वहावयास लावले. सोमरस पिऊन धुंद झाला असतानाच ही सारी कृत्ये इंद्राने केली. २३ सर्वज्ञ असा तो बृहस्पतिदेव ह्या यजमानाचा

बंधू म्हणजे त्याच्या बरोबरीच्या लोकांत, भावाप्रमाणे त्याच्याशी अनुकूलत्वाने वागणारा कोण आहे, हे बरोबर जाणतो. कारण, बृहस्पतिदेव, सर्व प्राण्यांचे सर्व जन्म पुन्हा पुन्हा बोलून दाखवितो. अभिज्ञ अशा बृहस्पतिदेवाने वेदाच्या पहिल्या, मधल्या व वरच्या भागांतून श्रेष्ठ असे कर्म उद्धृत केले. आणि यजमानाला अमृताप्रमाणे हितकर अशी म्हणजे यजमानाला श्रेष्ठता प्राप्त करून देण्याविषयीची मनोवृत्ती धारण करून यजमानाकडे येण्यासाठी त्याने प्रस्थान केले. २४ अत्यंत सामर्थ्यवान् असा हा बृहस्पती जन्मला तेव्हाच त्याने अतिशय विस्तीर्ण अशी पृथ्वी, अंतरिक्ष, द्युलोक इतकेच नव्हे तर मनुष्यांचे प्रत्येक घर आणि पृथ्वीवरील रज:कणही निर्माण करून त्यांना अलग अलग स्थापित केले. साम्राज्याला प्राप्त झालेला बृहस्पती हा ज्याची देवता आहे, त्या यजमानाने ब्राह्मणकुलात जन्म घेतल्यानेच आपल्या आयुष्याच्या आरंभापासून अंतापर्यंतचा काळ स्वजातीय अशा ब्राह्मणसमुदायात आपल्या श्रेष्ठत्वाने व्यापलेला आहे. २५ जो बृहस्पती कोणत्याही कर्माला प्रारंभापासून शेवटपर्यंत आपल्या बलाने सिध्दीस नेतो, त्या बृहस्पतिदेवाची इतर सर्व देव त्याच्या जवळ येऊन विशेषत्वाने सेवा करतात. तो आपल्या उपासकाला त्याच्या जातीतील जो कोणी विरोध करीत असेल त्या प्रबळ पुरुषाला ठोकून ताळ्यावर आणतो. आपल्या उपासकाच्या कल्याणाच्या आड येणाऱ्या त्याच्या बरोबरीच्या लोकांची गांवे त्याने पूर्णपणे उध्वस्त केली आहेत. त्याने उत्साहनिदर्शक अशी गर्जना करून स्वर्ग, पृथ्वी, तिच्यावरील उदके हे सारे जिंकले आहे. (अनुवाक १४).

प्रपाठक ४

देव, मनुष्य आणि पितर असे तिघे एकीकडे व असुर, राक्षस आणि पिशाच हे तिघे एकीकडे, असे दोन पक्ष निर्माण होऊन उभय पक्षांकडील सैन्य विरूध्द पक्षाशी युद्ध करण्यास सिध्द झाले, युध्द चालू झाल्यावर देवांच्या पैकी ज्यांना विरूध्द बाजूचे सैनिक शस्त्रप्रहाराने लहानशी जखम करून तीतून रक्त वहावयास लावीत, त्या जखमेचे ठिकाणी दररोज रात्रीचे वेळी राक्षस गुपचुपपणे येत आणि काहीतरी विषप्रयोग करीत. त्या जखमा क्षुब्ध होऊन ते जखमी झालेले देव तात्काळ मरत. अशा रीतीने आपणांपैकी काही देव मेलेले पहावेत आणि मग रात्र संपून उजाडावे, असे

होऊ लागले. आपल्यापैकी जो कोणी जखमी होतो त्याला राक्षस विषप्रयोग करून मारतात हे देवांनी जाणले. तेव्हा त्यांनी राक्षसांना एकांती बोलावून घेऊन त्यांच्याशी मसलत केली. तेव्हा राक्षस म्हणाले, आम्ही तुम्हाला येऊन मिळालो तर तुम्ही आम्हाला 'वर' म्हणजे काहीतरी देणगी दिली पाहिजे. देव राक्षसांना म्हणाले की, आम्ही जर असुरांच्यावर जय मिळविला, तर त्यापासून होणाऱ्या लाभामध्ये आमच्या बरोबर तुम्हीही विभागी असाल. अर्थात् त्या लाभातील भाग आम्ही आपल्या बरोबरीने तुम्हास देऊ. राक्षसांनी देवांचे म्हणणे मान्य केले व ते देवांना येऊन मिळाले. नंतर देवांनी असुरांना जिंकले आणि युध्दात जय मिळविला. परंतु असुरांना जिंकल्यावर पूर्वी कबूल केल्याप्रमाणे राक्षसांना लाभापैकी काहीही विभाग न देता देवांनी राक्षसांना हाकून लावले. तेव्हा राक्षसांनी देवांनी आपल्याशी लबाडी केली हे पक्के लक्षात ठेऊन देवांच्यावर हल्ला करावयाचे ठरावेले आणि त्यांनी देवांना सर्व बाजूंनी वेढा घातला. तेव्हा देवांनी आपल्या कार्याची सिद्धी करण्याविषयी म्हणजे राक्षसांच्या वेढ्यातून सुरक्षितपणे पार पडण्याविषयी अग्नीजवळ जाऊन त्याच्या मदतीची याचना केली. 'अग्नि: प्रवान्', 'अग्निर्विबाधवान्' व 'अग्नि: प्रतीकवान्' या तीन अग्निदेवतांच्यासाठी अनुक्रमे अष्टाकपालात्मक पुरोडाश करून त्याची इष्टी केली. 'अग्नी: प्रवान्' नामक देवाप्रीत्यर्थ जी इष्टी केली तिच्या योगाने पूर्व दिशेस असलेल्या राक्षसांना त्यांनी दूर हाकलून दिले. 'अग्निर्विबाधवान्' देवतेप्रीत्यर्थ जी इष्टी केली, तिच्या प्रभावाने दक्षिण व उत्तर ह्या दोन बाजूंना असलेल्या राक्षसांना त्यांनी खूप पीडा देऊन दूर पिटाळले. 'अग्नि: प्रतीकवान्' देवतेसाठी जी इष्टी केली तिच्या योगाने पश्चिम दिशेस असलेल्या राक्षसांना लांब धुडकावून लावले. नंतर देव विजयी झाले व असुर पराभव पावले.

ज्या कोणाला शत्रू उत्पन्न झाले असतील, अर्थात् जो आपल्या शत्रूशी स्पर्धा करून झगडत असेल, त्याने आता सांगितलेली इष्टी करावी. अग्नि: प्रवान्, अग्निर्विबाधवान् व अग्नि: प्रतीकवान् ह्या तीन देवतांच्यासाठी प्रत्येकी अष्टकपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करुन अनुक्रमे यजन करावे. 'अग्नि: प्रवान्' देवतेसाठी जे यजन केले जाते, त्या योगाने यजमान आपल्याहून जो अधिक बलवान असेल त्या शत्रूला दूर करतो. 'अग्निर्विबाधवान्' देवतेसाठी जे यजन केले जाते, त्याच्या प्रभावाने यजमान आपल्याशी समानबल असलेल्या

शत्रूला दूर पिटाळतो. आणि 'अग्निः प्रतीकवान्' देवतेसाठी जे यजन केले जाते, त्याच्या प्रभावाने यजमान आपल्याहून जो हीनबल असेल त्या पापी शत्रूला दूर हाकलून लावतो. सारांश, ह्या इष्टीचे सामर्थ्य जाणून जो त्या इष्टीने अग्नीचे यजन करील, तो आपणापेक्षा श्रेष्ठ बल असलेल्या शत्रूला दूर घालवितो, समान असलेल्या शत्रूचे अतिक्रमण करतो, आणि हीनबल असलेल्या शत्रूला तर आपल्याजवळ येऊन पोचू देखील देत नाही. (अनुवाक १).

देव आणि असुर हे एकमेकांच्याशी युध्द करण्यास सिध्द झाले. तेव्हा देव एकमेकात बोलू लागले की, आमच्यामध्ये सर्वांपेक्षा अधिक वीर्यवान् असेल, त्याला अनुसरून म्हणजे त्याच्याकडे आमचे नेतृत्व सोपवून तो आज्ञा करील त्याप्रमाणे आम्ही सर्वजण युध्दाचा उपक्रम करू. मग ते इंद्राला म्हणाले की, तूच खरोखर आम्हा सर्वांत अधिक वीर्यवान् आहेस. यास्तव, तुझ्या अनुशासनाप्रमाणे असुरांच्याशी युध्दाचा प्रारंभ करू. तेव्हा इंद्र त्यांना म्हणाला की, माझी जी ही तीन शरीरे अत्यंत वीर्यवान् आहेत, त्यांना तुम्ही संतुष्ट करा. आणि मग असुरांना पराभूत करा. देव म्हणाले, तुझ्या त्या तीन तनू म्हणजे शरीरे कोणती? तेव्हा ही 'अंहोमुक्' ही 'विमृधा' आणि ही 'इंद्रियावती' असे म्हणून इंद्राने आपल्या तीन तनू म्हणजे शरीरे किंवा स्वरूपे देवांना प्रदर्शित केली. नंतर देवांनी 'इंद्र अंहोमुक्', 'इंद्रो वैमृध' व 'इंद्र इंद्रियावान्' या इद्रशरीररूप तीन देवतांच्या उद्देशाने प्रत्येकी अकरा अकरा कपालांच्या गटावर पुरोडाश भाजून तयार करून त्यांचा अनुक्रमे याग केला. आणि त्या इंद्रशरीररूप तीन देवतांना संतुष्ट केले. अंहोमुक् म्हणजे पापापासून मुक्त करणाऱ्या इंद्रदेवतेचे जे त्यांनी यजन केले त्या योगाने ते पापापासून मुक्त झाले. शत्रूला दूर करणाऱ्या इंद्रदेवतेप्रीत्यर्थ जे त्यांनी यजन केले त्या योगाने त्यांनी शत्रूंना हाकून लावले. आणि इंद्रियसामर्थ्यांने संपन्न अशा इंद्रदेवतेकरता जे त्यांनी यजन केले त्याच्या प्रभावाने त्यांनी आपल्या ठिकाणी इंद्रियसामर्थ्य धारण केले. अकरा अकरा कपालांवर भाजून तयार केलेल्या तीन पुरोडाशांचे एकीकरण करून देवांनी जणू काय तेहतीस कपालांवर एकच पुरोडाश केला. व त्या योगाने तेहतीस देवांनाच जणू काय इंद्राने आपल्या आधीन करून घेतले. तेहतीस देवांचे हे इंद्राधीन होणें ऐश्वर्यप्राप्तीला कारणभूत झाले. एवं च, पूर्वोक्त याग किंवा इष्टी केल्यानंतर देव असुरांच्याशी

युध्द करण्यास प्रवृत्त झाले आणि त्यांनी पापविमोचन, शत्रुवध आणि इंद्रियसामर्थ्यधारण अशा तीन प्रकारे उत्कृष्ट जय मिळविला.

ज्याला शत्रू उत्पन्न झाला असेल त्याने आपल्या शत्रूशी स्पर्धा करतांना आता सांगितलेल्या ह्या यागाने म्हणजे इष्टीने देवतांचे यजन करावे. इंद्र अंहोमुक्, इंद्रो वैमृध व इंद्र इंद्रियावान् या तीन देवतांना उद्देशून प्रत्येकी एकादश कपालात्मक पुरोडाश तयार करून त्याचा अनुक्रमे याग करावा.

ज्या यजमानापेक्षा त्याचा शत्रू अधिक श्रेष्ठ असतो त्या यजमानाला शत्रूकडून अपमान भोगण्याची पाळी येते. अपमान हे एक पापच आहे. अर्थात् तो डोईजडशत्रू असलेला यजमान अपमानरूपी पापाने घेरला जात असतो. तो 'इंद्र अंहोमुक्' देवतेचे जे यजन करतो, त्या योगाने तो पापापासून मुक्त होतो. बरोबरीच्या लोकांत ज्या यजमानापेक्षा दुसरा श्रेष्ठ असतो, तो जरी यजमानाचा शत्रू नसला तरीसुध्दा त्याचा श्रेष्ठपणा सहन न झाल्यामुळे हा यजमान त्याच्याकडून मी पराभूत झालो आहे, असे समजून मनात झुरत असतो. सारांश, अशाप्रकारे काल्पनिक शत्रूकडून हा यजमान पराभूत होत असतो. अशा प्रकारचा यजमान जे 'इंद्रो वैमृध' देवतेप्रीत्यर्थ यजन करतो, त्या योगाने तो आपल्या शत्रूंना दूर करतो. 'इंद्र इंद्रियावान्' देवतेसाठी जे यजन केले जाते त्याच्या प्रभावाने यजन करणारा यजमान आपल्या ठिकाणी इंद्रियसामर्थ्य धारण करतो. सारांश, अकरा अकरा कपालांच्यावर तयार केलेल्या तीन पुरोडाशांच्या एकीकरणाने यजमान जणू काय तेहतीस कपालांवर एकत्र पुरोडाश तयार करून त्याचे यजन करतो. देवतांची संख्या तेहतीसच आहे. अर्थात् तेहतीस कपालांवर तयार केलेल्या पुरोडाशाच्या यजनाने यजमान त्या तेहतीस देवतांना आपल्याला अनुकूल करून घेतो. अशाप्रकारे देवतांचे स्वाधीनत्व त्या यजमानाला ऐश्वर्य प्राप्त करून देण्यास कारणभूत होते.

जिच्या योगाने योध्दे आपल्या शत्रूंना जिंकतात ती 'विजिति' होय. यास्तव, आतापावेतो ज्या यागाचे किंवा इष्टीचे विवेचन केले त्या इष्टीचे 'विजिति' हेच नांव आहे. या इष्टीचे माहात्म्य जाणून जो यजमान ही इष्टी करतो, तो आपल्या शत्रूपक्षाशी युद्ध करून उत्कृष्ट अशा प्रकारचा विजय संपादन करतो. (अनुवाक २).

देव व असुर हे परस्परांशी युध्द करण्यास सिद्ध झाले. दोघेही

रणांगणावर येऊन पोचले. तेव्हा त्या दोघांच्या ठिकाणची शरीरशक्ती, दृष्ट्यादिपाटव, उत्साह, प्रजा व पशू काढून घेऊन गायत्री दूर जाऊन उभी राहिली. तिला पाहून ते देव व असुर आपआपल्या ठिकाणी असे मानू लागले की, आपल्या परस्परविरुध्द अशा दोन वर्गांपैकी ज्या वर्गातील व्यक्तींजवळ ही गायत्री जाऊन पोचेल त्या वर्गातील व्यक्तीच हे सर्व ऐश्वर्य संपादन करू शकतील. तेव्हा त्या दोघांनीही गायत्रीने आपल्या जवळ यावे म्हणून तिला हाक मारली. 'हे विश्वकर्मन्' म्हणजे सर्व प्रकारची कर्मे करणाऱ्या हे गायत्रि, असे म्हणून देवांनी तिला बोलाविले. आणि 'हे दामि', म्हणजे विरोधकांचा नाश करणाऱ्या हे गायत्रि, असे म्हणून असुरांनी तिला आपल्याकडे बोलाविले. परंतु ती गायत्री देव किंवा असुर या दोघांपैकी कोणाकडेही गेली नाही. तेव्हा देवांच्या विवेचक दृष्टीला तिला जवळ आणण्याचा उपाय म्हणून एक यजुर्मंत्र दिसला. तो असा 'हे सर्वात्मके गायत्री देवी, तू त्वचा, रक्तमांसादि शरीरगत धातूंपैकी ओज नामक आठवा धातू आहेस, तू सर्वांच्या ठिकाणचे सहिष्णुत्व किंवा धैर्य आहेस, तू शरीरशक्ती आहेस, तू सर्वांच्या शरीराची कांती आहेस, तू देवांचा स्वर्ग आहेस. तूच इंद्र इत्यादि नांवे धारण करणारी आहेस, अचेतन असे सर्व जगत् तूच आहेस, सर्व प्रकारच्या अन्नाने युक्त असे चेतनरूप सर्व जगत् तूच आहेस, चेतनरूप अशा सर्व जगाचे आयुष्य तूच आहेस आणि वैऱ्यांचा पराभव करणारीही तूच आहेस.'

या स्तुतिरूप मंत्रांनी देवांनी गायत्रीला प्रसन्न करून आपलीशी केली. आणि तिच्या प्रसादाने असुरांचे ओज, बल, इंद्रियसामर्थ्य, वीर्य म्हणजे उत्साह, प्रजा व पशू ह्या सहांचा नाश करून ह्या सर्व गोष्टी स्वत: संपादन केल्या.

ज्या अर्थी गायत्री ओज, बल इत्यादि सर्व काढून घेऊन देव व असुरांच्या पासून ती दूर जाऊन उभी राहिली, परंतु पूर्वोक्त मंत्राने स्तवन केल्यावर तिने ओज इत्यादि सर्व देवांना परत आणून दिले, त्याअर्थी त्या मंत्राने हविर्द्रव्याचे अभिमंत्रण करून जी इष्टी करावयाची असते, तिला 'गायत्री' असे म्हणतात. गायत्री ही संवत्सरस्वरूप आहे. कारण संवत्सराचे पंधवडे आणि गायत्री छंदातील अक्षरे यांची संख्या सारखीच म्हणजे चोवीसच आहे. अर्थात्, संवत्सर हाच गायत्रीरूपाने देवासुरांचे ओज वगैरे घेऊन दूर

जाऊन उभा राहिला असेच समजणें युक्त आहे. ज्या अर्थी ह्या 'गायत्री' संज्ञक इष्टीच्या योगाने देवांनी असुरांचे ओज, बल, इंद्रियशक्ती, उत्साह, प्रजा व पशू ही वर्जित म्हणजे नष्ट केली त्या अर्थी इष्टीला म्हणजे यागाला 'संवर्ग' असेही म्हणतात. सम्यक म्हणजे उत्तम प्रकारे व्रज्यते म्हणजे विनाश केला जातो, ज्या यागाने त्या यागास 'संवर्ग' हे नांव युक्तच होय.

जो भातृव्यवान होईल, म्हणजे शत्रूकडून पीडिला जाईल, त्याने शत्रूशी स्पर्धा करीत असतांना आता सांगितलेल्या संवर्गसंज्ञक यागाने म्हणजे 'गायत्री' नामक इष्टीने यजन करावे. या इष्टीमध्ये 'अग्नि संवर्ग' देवतेच्या उद्देशाने अष्टाकपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करावा. तो पुरोडाश भाजून तयार झाल्यावर त्याचे वेदीमध्ये आसादन करावे. आणि त्या पुरोडाशाला स्पर्श करून पूर्वोक्त 'ओजोऽसि सहोऽसी' इत्यादि मंत्र म्हणावा. असे केले असता यजमानाने जणू काय आपल्या शत्रूचे ओज, बल, इंद्रिय, वीर्य, प्रजा व पशू हे सर्व नष्ट केल्यासारखे होते आणि तो यजमान ऐश्वर्यसंपन्न होतो व त्याचा शत्रू पराभव पावतो. (अनुवाक ३).

सृष्टिकर्त्या प्रजापतीने प्रजा उत्पन्न केल्या. पण त्या त्याच्याकडे पाठ फिरवून दूर निघून गेल्या. त्यांनी जेथे वस्ती केली त्या ठिकाणी खरकटी भांडी विसळतांना सांडलेल्या पाण्याच्या ओलाव्याने नांगरट केल्यावाचून देखील 'गर्मुत' म्हणजे रानमूग या नांवाचे धान्य उगवले. त्यावरूनच प्रजांनी येथे वस्ती केली असावी असा माग लागला. आणि त्याला अनुसरून बृहस्पती व प्रजापती हे दोघे त्या ठिकाणी आले. तेव्हा प्रजा प्रजापतीच्या सान्निध्यात येऊन त्याच्या अनुशासनाने वागाव्यात ह्या हेतूने बृहस्पती प्रजापतीला म्हणाला, हे प्रजापते, ह्या 'गर्मुत्' संज्ञक धान्याच्या अधिष्ठात्री देवतेच्या रूपाने म्हणजे धान्यवत्वानेच मी तुला प्रतिष्ठित करतो. म्हणजे धान्यवान् अशा तुला त्या धान्याची गरज लागणाऱ्या प्रजा तुझ्या जवळ आपोआप येतील व तुझ्याशी अनुकूलत्वाने वागू लागतील. नंतर बृहस्पतीने प्रजापतीला धान्यवान् अर्थात् त्या 'गर्मुत्' संज्ञक धान्याचा अधिपती म्हणून प्रतिष्ठित केले. तेव्हा गर्मुत् धान्याच्या गरजेमुळे प्रजा प्रजापतीजवळ आल्या व त्याच्या आधीनतेने वागू लागल्या.

ज्याला प्रजा प्राप्त व्हाव्या, अशी इच्छा असेल, त्या यजमानाने

आपली इच्छा पूर्ण व्हावयासाठी प्रजापतिदेवतात्मक म्हणजे प्रजापतिदेवाला उद्देशून गार्मुत म्हणजे रानमुगांचा चरू शिजवावा आणि त्याचा याग करावा. म्हणजे त्या यजमानाने प्रजापतीचा स्वकीय असलेला हविर्भाग घेऊनच त्याच्याजवळ गेल्यासारखे व तो त्याला अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या भागाने संतुष्ट झालेला तो प्रजापतिदेव त्या यजमानाकरता प्रजा उत्पन्न करतो. म्हणजे त्याला प्रजा प्राप्त करून देतो.

प्रजापतीने पशू निर्माण केले. पण ते त्याच्याजवळ न राहता त्याला पराङ्‌मुख होऊन दूर निघून गेले. ते ज्या ठिकाणी जाऊन राहिले, त्या प्रदेशात गुरांनी खाल्लेल्या तृणांचे अवशेष व शेण वगैरे पडत असल्यामुळे 'गर्मुत्' अर्थात् रानमूग नांवाचे धान्य आपोआप उगवले. त्या धान्यापासून पशूंचा माग लागल्यामुळे प्रजापती, पूषा व सोम हे तिघे त्या ठिकाणी आले. तेव्हा पूषा प्रजापतीला म्हणाला, ह्या गर्मुत् धान्याच्या देवतात्वाने म्हणजे या धान्याचा धनी म्हणून मला तू प्रतिष्ठित कर. नंतर ह्या प्रजा तुझ्या जवळ येतील. सोम म्हणाला, हे प्रजापते, अकृष्टपच्य म्हणजे नांगरट न करता किंवा बीज न पेरता, आपोआप जे धान्य निसर्गाने उगवत असते ते माझे आहे. यास्तव, ह्या धान्याची देवता या नात्याने तू मला प्रतिष्ठित कर. प्रजापती म्हणाला मी तुम्हा दोघांनाही प्रतिष्ठित करतो. त्याप्रमाणे प्रजापतीने पूषा व सोम ह्या दोघांनाही गर्मुत् धान्याच्या देवतारूपाने प्रतिष्ठित केले. आणि मग पशू प्रजापतीजवळ आले व त्याच्या आधीनतेने वागू लागले.

आपल्याला पशू प्राप्त व्हावेत अशी इच्छा ज्याला होईल त्याने आपल्या इच्छेच्या पूर्णतेसाठी 'सोमापौष्ण' म्हणजे सोम व पूषा ह्या दोन देवतांच्या उद्देशाने रानमुगाचा चरू शिजवून त्याचा याग करावा. म्हणजे त्या यजमानाने जणू काय सोम व पूषा ह्या दोघांचा स्वकीय असलेला हविर्भाग घेऊनच त्यांच्या जवळ गेल्यासारखे व तो त्यांना समर्पण केल्यासारखे होते. आणि त्या हविर्भागाने संतुष्ट झालेले ते सोम व पूषा हे दोन्ही देव त्या यजमानाला पशूंची प्राप्ती करून देतात. सोम हा रेताचे धारण करणारा देव असून पूषा हा पशूंना उत्पन्न करणारा देव आहे. अर्थात् सोम त्या यजमानाला पशू मिळवून देण्यासाठी रेताचे धारण करतो व पूषा पशू उत्पन्न करतो. (अनुवाक ४).

१ हे अग्निदेवा, गाईच्यासह तू आमच्याजवळ ये. हे इंदो, पशूंच्या बहुलत्वाने तू आम्हास सुखी कर. इंद्रदेव आमच्या घरी असलेल्या पशूंचे धारण पोषण करणारा होवो. २ हजारो पशूंनी युक्त असलेला तो सवितादेव तो आमच्या घरांच्या ठिकाणी अत्यंत रमून राहो. पशूंचे पोषण करणारा पूषादेव आमच्या घरी येवो. धनही आमच्या घरी येवो. ३ सर्व जगाचे धारण करणारा, आणि सर्व जगाचे पालन करणारा परमेश्वर आम्हाला धन देवो. तोच परमेश्वर भरपूर अशा धनसंपत्तीने आमचे रक्षण करो. ४ जो अत्यंत श्रेष्ठ व उपासकांनी इच्छिलेल्या फलांचा वर्षाव करणारा आहे, तो त्वष्टादेव आमच्या घरांमध्ये पशूंच्या हजार संख्येनेच काय, पण दहाहजार संख्येसह रममाण होवो. ५ हे धनपालका देवा, ज्या तुझ्या अनुग्रहाने देवांनी अमृत व अत्यंत पूर्ण आणि कीर्तीला कारणभूत होणारे अन्न द्युलोकात स्थापन केले, तो तू आमच्याकरिता गाईंचे कळप घेऊन ये आणि आमचे जीवन नीट चालावे म्हणून ते आम्हाला दे. ६ आमच्या घराचा अधिपती असलेला अग्निदेव, अखिल विश्व ज्याची सेवा करते, तो सोमदेव आणि ज्याची धारणाशक्ती उत्कृष्ट आहे असा भगवान् सविता ह्या सर्वांना आहुतिरूप असे हे आज्य उत्तम प्रकारे समर्पण होवो. ७ हे गृहपते अग्निदेवा, जो तुझा घृतपूर्ण व सन्मान्य असा भाग आहे, त्यासह ओज म्हणजे शरीरातील सारभूत असा आठवा धातू तुझ्यासाठी यज्ञानुष्ठान करणाऱ्या यजमानाच्या ठिकाणी स्थापन कर. तुझी उपासना करणारा मी, श्रेष्ठ जनांनी दाखवून दिलेल्या अनुष्ठानमार्गापासून केव्हाही दूर होणार नाही. आहुतिरूप असे हे आज्य तुला उत्कृष्ट प्रकारे समर्पित असो. (अनुवाक ५).

पशूंची प्राप्ती व्हावी, अशी ज्याची इच्छा असेल त्याने 'चित्रा' नांवाच्या इष्टीने पुढे सांगण्यात येणाऱ्या देवतांचे यजन करावे. ही चित्रा नामक इष्टी म्हणजे जणू ही भूमीच आहे. म्हणजे भूमिसदृश आहे. कारण, या भूमीचे ठिकाणी सर्व प्राणिमात्राची अधिकतेने उत्पत्ती होत असते. चित्र म्हणजे विविध प्रकारच्या प्राण्यांच्या उत्पादनामुळे ह्या भूमीस चित्रा हे नांव आहे. त्याचप्रमाणे चित्र, अर्थात् विविध प्रकारचे पशू प्राप्त करून देणारी पूर्वोक्त इष्टीही चित्रा या नांवाने उल्लेखिली जात असते. सारांश, 'चित्रा' इष्टीचे हे माहात्म्य जाणून जो कोणी त्या इष्टीच्या अनुष्ठानाने यजन करतो तो प्रजा व पशू यांच्या जोड्यांनी युक्त असा होतो.

अग्निदेवतेच्या उद्देशाने केलेल्या हविर्द्रव्याच्या यागाने यजमान जणू काय पशूंच्या उत्पत्तीस कारणभूत होणाऱ्या बीजांचा प्रक्षेप करतो. सोमदेवतेसाठी केलेल्या हविर्द्रव्ययागाने यजमान जणू काय बीजांच्या ठिकाणी रेताचे धारण करतो. तिसऱ्या हविर्द्रव्ययागाने संतुष्ट केला जाणारा त्वष्टादेव धारण केलेल्या रेताला भिन्न भिन्न स्वरूपाचा आकार देतो. सरस्वती आणि सरस्वान् ह्या चौथ्या व पांचव्या देवतांचे दोन याग केले जातात. सरस्वती व सरस्वान् हे देवसमुदायातील जणू मिथुन म्हणजे नवराबायकोचे दांपत्य म्हणजे जोडपेच आहे. इतर हविर्द्रव्ययागांच्या मध्यंतरी ह्या देवामधील जोडप्याप्रीत्यर्थ याग केल्याच्या योगाने अध्वर्यूने जणू काय यजमानाच्या हितासाठी त्याच्या घरामध्ये हे देवसमुदायातील दांपत्य आणून ठेवल्यासारखे होते. शिवाय ते देवांचे दांपत्य उत्पन्न झालेल्या प्रजांच्या व पशूंच्या ठिकाणी पुष्टी संपादन करते व प्रजा आणि पशू यांची आणखी उत्पत्ती करते. सिनीवाली ही सहावी देवता होय. ह्या देवतेसाठी 'चरू' हे हविर्द्रव्य योजलेले असते. सिनीवाली ही वाग्देवताच होय. वाग्देवता ही पुष्टीला कारणभूत होत असल्याने खरोखर पुष्टिरूप आहे. सभेत पांडित्य करणाऱ्या पंडितांची वाणीच त्यांना पुष्टिकारक होत असते हे आपण पाहतोच. यास्तव चरूचा याग केल्याने यजमानाला पुष्टीला कारणभूत होणारी वाणी प्राप्त होते. इंद्र ही सातवी म्हणजे शेवटची देवता होय. अर्थात् इंद्रदेवतेसाठी जो याग करावयाचा तो शेवटी करावा. इंद्र हा पुरुष व सिनीवाली ही स्त्री. ही दोन्ही मिळून एक मिथुन म्हणजे दांपत्य होत असते. अग्नीपासून इंद्रापर्यंतचे हे हवी सात होतात. ग्राम्य पशू सात आहेत. त्याचप्रमाणे आरण्यपशूही सात आहेत. गायत्री, इत्यादि छंदही सातच आहेत. एवं च, पूर्वोक्त सात हवींचे यजन केले असता ते यजमानाला दोन्ही प्रकारचे पशुसंघ आणि सात छंदांचा एक संघ यांची प्राप्ती करून देण्याला कारणभूत होते. सात हवींचे यजन झाल्यावर 'अग्ने गोभिर्न आ गहि' इत्यादि सात मंत्रांनी सात आज्याहुती द्याव्यात. आहुतिमंत्रांमध्ये व्यक्त झालेले देव हे पुष्टिपती आहेत. आज्याहुतींच्या योगाने संतुष्ट झालेले हे देव यजमानाच्या ठिकाणी पुष्टी धारण करतात. आणि प्रजा व पशू यांच्या योगाने त्याचे पोषण करतात. शिवाय, ह्या सात मंत्रांनी आज्याहुतींचा जर होम केला, तर तो यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होतो. (अनुवाक ६).

१ हे कृष्णवर्ण वस्त्रा तू मरुतांच्याशी संबंध असणारे आहेस. कारण

तुला रंगवितांना आलेला ओलेपणा मरुतांनी, म्हणजे वाऱ्यांनीच शुष्क केला आहे. तू जणू काय मरुतांचे बलच आहेस. नभोमंडळातून खाली येणाऱ्या पर्जन्योदकाच्या धारांना प्रतिबंध करणाऱ्या मेघाचा तू भेद कर. २ हे मरुद्गणहो, ज्या पूर्व दिशेकडून वाहणाऱ्या वाऱ्याने मेघांच्या पासून मोकळे झालेले जल तीव्र अशा धारांच्या स्वरूपाला धारण करून उन्हाच्या अत्यंत तापाने पीडित झालेल्या भूतलावर येवून पोचते, त्या आकाशमार्गाने येणाऱ्या, मनाप्रमाणे तीव्र वेग असलेल्या जलाचा वर्षाव करणाऱ्या आणि पश्चिम वाऱ्याला उत्तम रीतीने प्रतिबंध करणाऱ्या पूर्वेकडील वाऱ्याला तुम्ही खूप खेळवा. देवांचे वैद्य असलेल्या हे उभयतां अश्विनी कुमारहो, पर्जन्यरूपाने भूमीवर पडणारे जल जेणे करून सर्वांना क्षेमकर होईल अशा रीतीने चोहीकडे साठून राहील असे करा. ३ जो पूर्व दिशेकडील वारा पर्जन्यवृष्टी सुरु करून सर्व प्रजांना सुखवीत फिरत असतो, त्या वायूला ही आज्याहुती उत्तम प्रकारे समर्पण असो. ४ सोसाट्याच्या वाऱ्याने आणि तीव्र अशा पर्जन्यधारांनी युक्त होऊन जो फिरतो त्या बाजूला ही आहुती उत्तम प्रकारे समर्पण होवो. ५ मोठमोठ्याने गरजून पर्जन्यवृष्टी करीत असल्याने भीतिजनक होऊ पाहणाऱ्या वायूला ही आहुती उत्तम प्रकारे समर्पित असो. ६ प्राणघातक अशी वीज उत्पन्न न होऊ देता, धो, धो असा आवाज करीत, मधून मधून विजेचा प्रकाश पाडून पर्जन्यवृष्टी करीत, आणि पर्जन्यधारांनी भिजून गेलेल्या शेतजमिनींना प्रकाशित करीत जो भ्रमण करतो त्या वायूला ही आहुती समर्पण असो. ७ अहोरात्र पर्जन्यवृष्टी करून सर्व भूतल जलमय करून सोडतो, अशाप्रकारे भ्रमण करणाऱ्या वायूला ही आहुती उत्तम रीतीने अर्पण असो. ८ आजच्या ह्या अत्यंत तीव्र वाऱ्याने खूपच पर्जन्य पाडला, अशाप्रकारे लोकांमध्ये प्रख्यात होऊन जो वाहतो त्या वाऱ्याला ही आहुती उत्तम प्रकारे समर्पित असो. ९ ऊन पडले असतांनाच पर्जन्यवृष्टी करीत, आणि लोकांना विशेष रंजवीत जो वाहत असतो, अशा वायूला ही आहुती उत्तम प्रकारे समर्पण असो. १० धो,धो असा आवाज करीत, आणि मधून मधून विजेची चमक उत्पन्न करून पर्जन्यवृष्टी करणारा आणि सर्व लोकांना धारणक्षम असा जो वाहणारा वायू, त्याला ही आहुती उत्तमप्रकारे समर्पित असो. ११ हर्षजनक, वर्षणजन्य शब्दाने युक्त, शुध्दीला हेतुभूत, प्रवाहरूपाने वाहणाऱ्या,पांढऱ्या स्वच्छ दिसणाऱ्या, उन्हाची सावली पडल्यामुळे काळसर दिसू लागून वाहणाऱ्या, सर्व जमीन

भिजवून चिंब करणाऱ्या, पुष्कळ फेसाने युक्त, जगन्मित्र, राजाचे पोषण करणाऱ्या आणि सर्व राष्ट्रात धान्यसमृध्दीने उत्तम सुबत्ता उत्पन्न करणाऱ्या, अशा सर्व प्रकारच्या हे उदकांनो, तुम्ही ह्या यज्ञकर्मामध्ये उचित असे फल देऊन माझे संरक्षण करा. १२ हे रज्जू, तू सिंचनसमर्थ अश्वाप्रमाणेच असलेल्या कृष्णाजिनाला घट्ट बांधण्याचे साधन आहेस. पर्जन्यवृष्टी व्हावी म्हणून तुझ्या योगाने हे कृष्णाजिन मी घट्ट बांधतो. (अनुवाक ७).

१ प्रजांची व्यवस्थितपणे वस्ती करणाऱ्या हे देवहो, हे अग्ने, हे सोमदेवा आणि हे भगवान् सूर्यनारायणा २ सुखप्रद अशा हे देवहो, हे मित्रावरुणांनो, आणि हे अर्यमन् ३ एकाचवेळी सर्व मिळून सोमपान करणाऱ्या हे देव हो, हे उदकांचे रक्षण करणाऱ्या शीघ्रगामी अपानपात् आणि हे आशुहेमन् तुम्ही आम्हाला उदके द्या, आणि त्यासाठीच उदक धारण करणाऱ्या मेघाचे तुम्ही विदारण करा. नंतर विदीर्ण झालेल्या त्या मेघांपासून भूमीवर पडणाऱ्या पर्जन्यापासून होणाऱ्या वृष्टीच्या योगाने आमचे रक्षण करा. ४ जेव्हा देव पर्जन्यवृष्टीने पृथ्वीला खूप भिजवून चिंब करतात त्यावेळी उदक वाहणाऱ्या पर्जन्याच्या योगाने दिवसा देखील अंधार उत्पन्न करतात. मग रात्री करीत असतील हे काय सांगावयास पाहिजे?. ५ देवतांना उत्कृष्ट रीतीने हवी प्रदान करणारे ऋत्विज हवी प्रदान करणाऱ्या यजमानासाठी उदक धारण करणाऱ्या ज्या मेघाला द्युलोकाच्या आसमंतात सर्वत्र पसरवितात, तो मेघ प्रथमतः एकच असतो, पण त्याचेच अनेक मेघ बनतात आणि ते द्युलोक व पृथ्वी यांना अनुलक्षून खूप पर्जन्यवृष्टी करतात. आणि त्या वृष्टी उदकरहित अर्थात् शुष्क अशा भूमीकडे जाण्याला प्रवृत्त होतात. ६ हे मरुतांनो, तुम्ही समुद्रासारख्या ह्या मेघापासून वृष्टी उत्पन्न करा. नंतर धुळीने व्याप्त असलेल्या भूप्रदेशांना पर्जन्याने भिजवून टाका. भूमीचा शुष्कपणा नष्ट करणाऱ्या हे मरुतांनो, जगावर उपकार करण्याचे हे पर्जन्यवृष्ट्युत्पत्तिरूप कार्य करण्यासाठी निघालेल्या तुम्हाला धेनुसदृश मेघ क्षीणबल करणार नाहीत. इतर देवांचे रथही तुमच्या रथाचे अनुकरण करोत, म्हणजे या यज्ञकर्मामध्ये पर्जन्यवृष्टी करण्यासाठी येणाऱ्या तुमच्या मागोमाग इतर देवही रथारूढ होऊन येवोत. ७ हे मरुत्संघा, द्युलोकातून पर्जन्यवृष्टी कर आणि त्या पर्जन्योदकांनी उन्हाच्या तापाने शुष्क झालेला हा समुद्रासारखा विस्तीर्ण कुंभ काठापर्यंत भरून टाक. ८ हे मेंढी, तू उदकापासूनच उत्पन्न झाली आहेस. म्हणजे तू आपल्या

मातापितरांच्या ठिकाणी रेतरूपाने परिणत झालेल्या उदकापासून जन्मली आहेस. तू सुवर्भानुनामक असुराने सूर्यावर आच्छादित केलेला अंधकार दूर होताच प्रथम उत्पन्न झालेली आहेस. इतकेच नव्हे तर, तू समुद्रासारख्या मेघाचे वृष्ट्युत्पादक असे बलच आहेस. म्हणूनच तू मोठमोठ्याने एकसारखी ओरडू लागलीस म्हणजे आता पर्जन्यवृष्टी लौकरच होणार असे अनुमान करणे शक्य होत असते. ९ हे पुनर्नवा नांवाच्या ओषधी, तू उदकवृष्टीने पृथ्वीला खूप भिजवून चिंब करून टाक. आणि त्यासाठीच द्युलोकात आकाशाप्रमाणे व्याप्त झालेले मेघमंडळ विदीर्ण कर. नंतर त्या द्युलोकातून उत्पन्न झालेल्या उदकाची वृष्टी आम्हाला दे. पुनर्नवासंज्ञक ओषधी उत्पन्न करणाऱ्या हे देवा, तू आमचा स्वामी होऊन उदकाने तुडुंब भरलेली मेघरूपी पखाल मोकळी कर. म्हणजे तिचे तोंड खुले करून तिच्यातील उदक भूमीवर पडेल असे कर. १० द्युलोकाचा उपयोग करणारे जे देव असतील, त्याचप्रमाणे अंतरिक्षाचा उपयोग करणारे आणि भूलोकाचा उपयोग करणारे जे देव असतील ते सर्व देव ह्या यज्ञाचे संरक्षण करोत. ते धान्योत्पादक अशा क्षेत्रात प्रविष्ट होवोत. ते ह्या क्षेत्रापैकी प्रत्येक क्षेत्रात येऊन विशेषत्वाने राहोत. (अनुवाक ८).

'मारुतमसि मरुतामोज:' हा मंत्र म्हणून यजमानाने काळ्या दशा असलेले काळे वस्त्र नेसावे. कारण कृष्णवर्णवस्त्र हे जणू काय पर्जन्यवृष्टीचेच स्वरूप होय. पर्जन्यवृष्टीचे वेळी अंधार पडत असतो हे प्रसिद्ध आहे. काळे वस्त्र धारण केलेला यजमान वृष्टीचेच स्वरूप धारण करणारा होऊन पर्जन्यवृष्टी करण्याला समर्थ होतो. 'रमयत मरुत: श्येनमायिनं.' हा मंत्र पठण करावा. म्हणजे त्या योगाने यजमानाने जणू काय पश्चिम दिशेकडील वाऱ्याला प्रतिबंध केल्यासारखे होऊन पूर्वेकडील वारा उत्पन्न केल्यासारखे होते. आणि तो पूर्वेकडील वारा पर्जन्यवृष्टी प्राप्त करून देण्याला कारणभूत होतो. 'पुरोवातो वर्षतू' इत्यादि आठ मंत्रांनी वाऱ्याच्या नांवांनी आठ आज्याहुती द्याव्यात. वायू हा वृष्टीचा सत्ताधारक स्वामी असतो. यासाठी त्याच्या नांवांनी होम केला असता यजमानाने जणू काय वृष्टीचा मालक असलेल्या वायुदेवाच्या सन्निध त्याचा स्वकीय भाग घेऊन जाऊन तो त्याला अर्पण केल्यासारखे होते. आणि त्यायोगे संतुष्ट झालेला वायुदेव यजमानासाठी पर्जन्याची वृष्टी करतो.

वायूच्या नांवांना उद्देशून आठ आहुती द्याव्यात. पूर्व इत्यादि चार दिशा आणि आग्नेय इत्यादि चार अवांतर दिशा मिळून आठ दिशा होतात. यास्तव दिशांच्याशी संख्यासाम्य असलेल्या आठ आहुती दिल्या असता वायुदेव आठही दिशांकडून पर्जन्यवृष्टीला प्रचलित करतो. म्हणजे सर्व बाजूंनी पर्जन्याची वृष्टी होते. ताडफळांचे किंवा करीर नामक वेलीच्या अंकुरांचे पीठ कृष्णाजिनावर कालवावे. म्हणजे यजमानाने अध्वर्यूकडून हविर्द्रव्यच तयार करविल्याप्रमाणे होते. वेदीमध्ये कृष्णाजिन पसरून त्यावर पीठ कालवावे. असे करणे हे त्या पिठाला हविर्द्रव्यत्व संपादन करून देण्याला कारणभूत होते.

ब्रह्मात्मप्रतिपादक असा शब्द देखील मुखाने न उच्चारणाऱ्या यतींना इंद्राने लांडग्यांच्या स्वाधीन केले. ते लांडगे त्या यतींना फाडून तोडून खात खात असतांना त्यांच्या मस्तकांची हाडे भूमीवर पडली. तीच खर्जूर म्हणजे ताडांचे वृक्षांच्या रूपाने उत्पन्न झाली. त्या वृक्षांच्या फळांमधून ती उंचावरून खाली पडल्यामुळे जो रस उसळून भूमीवर पडला तोच करीर म्हणजे नेपती नांवाच्या वेलींच्या रूपाने उत्पन्न झाला. म्हणजे त्या रसापासून करीर नांवाच्या वेली उत्पन्न झाल्या. करीर नामक वल्ली सोमवल्लीचा प्रतिनिधी मानली असल्यामुळे त्या वेलीचे जे अंकुर असतात ते सौम्य म्हणजे सोमसंबध्द किंवा सोमतुल्य असतात. अर्थात् करीरसंज्ञक अंकुरांच्या पिठाची दिली जाणारी आहुती म्हणजे जणू सोमरसाचीच आहुती होय. अशा प्रकारच्या आहुतीच्या योगाने द्युलोकापासून वृष्टीचे संपादन केल्यासारखे होते. करीर संज्ञक अंकुरांचे पीठ मधाशी कालवावे. कारण, मध हा उदके व ओषधी यांचा सारभूत रसच आहे.

'मान्दा वाशाः' इत्यादि मंत्राने करीरांचे पीठ मधाशी कालवावे. असे केले असता उदकांची नांवे घेऊन त्यांच्या जवळ जाऊन पोचल्या प्रमाणे होते. शिवाय, आपण एखाद्याला, हे देवदत्त ये, असे म्हणून त्याच्या जवळ जाऊन बोलावतो, त्याचप्रमाणे उदकांच्या जवळ जाऊन त्यांच्या नांवांनी त्यांना आपल्याकडे बोलावल्या सारखे होते. 'वृष्णो अश्वस्य संदानमसि वृष्ट्यै त्वोप न ह्यामि' असा मंत्र म्हणून दोरीने कृष्णाजिन बांधावे. अश्व जसा सेचनसमर्थ असतो तसाच पर्जन्यही सेचनसमर्थ असतो. पाऊस पडतांना कृष्णवर्ण झाल्यासारखा होऊनच पडतो. म्हणजे त्यावेळी काळसर अंधार पडलेला असतो. यास्तव, पूर्वोक्त मंत्र म्हणून काळ्या दोरीने कृष्णाजिन बांधले असता रज्जुरूप कृष्णवर्णानेच

जणू पर्जन्याला समृध्द केल्यासारखे होते. व असे करणे पर्जन्यवृष्टी प्राप्त होण्याला कारणभूत होते. (अनुवाक ९).

'देवा वसव्या:', 'देवा: शर्मण्या:' 'देवा: सपीतया:' या तीन मंत्रांपैकी अनुक्रमे एक एक मंत्र म्हणून पूर्वोक्त करीराच्या अंकुरांच्या मधात कालविलेल्या पिठाच्या कमळांच्या पानांत गुंडाळलेल्या तीन पिंडी म्हणजे गोळ्या गाड्यावर बांधलेल्या एका एका छदीला म्हणजे आच्छादनाला एक एक दिवस बांधाव्यात. याप्रमाणे तीन दिवस करावे. असे केले असता मंत्रोक्त देवतांच्या कडून अनुगृहीत झालेल्या यजमानाने दररोज पर्जन्यवृष्टीची इच्छा केल्याप्रमाणे होते. पिठाची गोळी बांधल्यावर जेव्हा पडेल तेव्हा होम करावा. म्हणजे पहिल्याच दिवशी पर्जन्य पडला तर त्या छदीला बांधलेल्या तीन गोळ्यांचा होम करावा. आणि तेथेच अनुष्ठान संपवावे. याचप्रमाणे दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी करावे. तिन्ही दिवसांत पर्जन्य न पडेल तर नंतरच्या म्हणजे चौथ्या दिवशी हवींचा निर्वाप करावा.

अहोरात्र हे मित्रावरुणदेवतात्मक आहेत. दिवस हा सूर्यप्रकाशयुक्त असल्यामुळे तो मित्ररूप किंवा मित्रदेवतात्मक असून रात्र ही अंधकाररूप आवरणाने युक्त असल्यामुळे ती वरूणरूप किंवा वरूणदेवतात्मक आहे. अहोरात्रांच्या म्हणजे दिवस आणि रात्र ह्या दोन काळांच्या खेरीज पाऊस पडूच शकत नाही. अहोरात्रांच्या योगाने पर्जन्य पडतो. बरे, नेहमी दिवसाच पडतो असेही ठरविता येत नाही. अथवा रात्रीच पडतो असेही अनुमान करता येत नाही. केव्हा दिवसा पडतो, तर केव्हा रात्री पडतो, केव्हा एकसारखा अहोरात्र पडत असतो. सारांश, पर्जन्यवृष्टी होणे मित्रावरुणांच्या आधीन आहे. यास्तव, पूर्वी सांगितलेल्याप्रमाणे छदीचे ठिकाणी अहोरात्र करीरपिठाच्या पिंडी म्हणजे गोळ्या पळसाच्या पानात गुंडाळून बांधल्या असता यजमानाने जणू काय मित्रावरुणांच्या सन्निध त्यांचा स्वकीय भाग घेऊन त्यांच्याजवळ गेल्यासारखे व तो त्यांना अर्पण केल्यासारखे होते. आणि त्या योगाने संतुष्ट झालेले ते मित्रावरुण यजमानासाठी अहोरात्रांच्या द्वारा पर्जन्यवृष्टी करतात.

'अग्निर्धामच्छद्' देवतेसाठी अष्टाकपालात्मक, मरुतांच्यासाठी सहाकपालात्मक आणि सूर्यदेवतेसाठी एककपालात्मक पुरोडाशाचा निर्वाप करून इष्टी करावी. अग्री हा त्याच्या ठिकाणी अर्पित केलेल्या आहुतींच्या द्वारा

वृष्टी उत्पन्न करून ती या भूलोकातून वर आदित्याकडे पाठवितो. अग्नीने उत्पन्न करून वर पाठविलेली ती वृष्टी मरुत् हे आकाशात सर्वत्र पसरवितात आणि वरून खाली येणाऱ्या अत्यंत प्रखर अशा किरणांनी अत्यंत संतप्त होऊन जेव्हा आदित्य नभोमंडळात संचरतो त्यावेळी तो पर्जन्यद्वारा वृष्टी करतो. पुष्कळ मेघांनी युक्त होऊन सर्व घरे दारे आच्छादित करीत असल्याप्रमाणे जणू काय पर्जन्य पडत असतो. एवं च, 'अग्निर्धामच्छद्' म्हणजे अंधेर पाडणाऱ्या वृष्टीने घरादारांना आच्छादित करणारा अग्निदेव, मरुत् आणि भगवान् आदित्य ह्या तीन देवताच पर्जन्यवृष्टीचे नियंत्रण करणाऱ्या अधिकारी आहेत. त्यांचे पूर्वोक्त हविर्भागांनी यजन केले असता, यजमानाने जणू काय त्यांचा स्वकीय असलेला भाग घेऊन त्यांच्याजवळ गेल्यासारखे व त्यांना अर्पण केल्यासारखे होते. आणि संतुष्ट झालेल्या देवता यजमानासाठी पर्जन्याचा वर्षाव करतात. पर्जन्य आपणहून काही आता पडत नाही असे प्रथम भासत असले तरी ह्या देवतांनी त्याला प्रेरणा केली म्हणजे तो पूर्वेकडील वारा वगैरे सर्व सामग्री संपादन करून निश्चयाने पडतोच पडतो. 'सृजा वृष्टिं दिव आद्भिः समुद्रं पृण' हा मंत्र म्हणून कच्च्या मातीचा म्हणजे न भाजता उन्हाने वाळविलेला कुंभ पाण्याने भरावा. 'अद्भिः पृण' ह्या मंत्रभागाच्या उच्चारणाने भूलोकावरील उदकांना समृध्द केल्यासारखे होऊन 'सृजा वृष्टिं' ह्या मंत्रभागाच्या उच्चारणाने स्वर्गलोकातील उदकांना समृध्द केल्यासारखे होते. शिवाय, भूलोकावरील उदकांच्या साहाय्याने स्वर्गलोकातील उदके आणावयास गेल्यासारखे होते. 'अब्जा असि प्रथमजा बलमसि समुद्रियं' ह्या मंत्राने काळ्या मेंढीचे प्रोक्षण केले असता, ते त्या यजुमंत्रात व्यक्त झालेल्या अर्थाप्रमाणे स्वकार्यक्षम होते. 'उन्नंभय पृथिवीं' ह्या मंत्राने 'वर्षाह्वा' म्हणजे पर्जन्यवृष्टीला बोलावणाऱ्या 'पुनर्नवा' संज्ञक ओषधीचे ठिकाणी आज्याहुती द्यावी. सर्व ओषधींमध्ये पुनर्नवा हीच ओषधी वृष्टीचा उपभोग करणारी आहे. अर्थात् तिच्या अनुग्रहाने यजमानाने जणू काय पर्जन्यवृष्टीला भूमीवर आणल्याप्रमाणे होते. 'ये देवा दिविभागाः' हा मंत्र म्हणून कृष्णाजिन झाडावे. म्हणजे पृथिव्यादि तिन्ही लोक संतुष्ट होऊन यजमानाला अभीष्टप्रद होतात. (अनुवाक १०).

आता सांगितल्या जाणाऱ्या ह्या 'त्रैधातवीया' नामक इष्टीमध्ये सर्वच छंदांचे पठण केले जाते असे तज्ज्ञ पंडित म्हणत असतात. आता त्याप्रमाणे सर्व छंदांचे पठण कसे होईल हे पाहावयाचे आहे. 'ककुत्' छंद हा त्रिष्टुभ्

छंदाचे सार असून 'उष्णिक्' छंद हा जगती छंदाचे सार आहे. यास्तव, उष्णिक् व ककुत् छंदांचे अनुवचन म्हणजे पठण केल्याच्या योगाने सर्व छंदांचे पठण, संपादन केल्यासारखे होते. उष्णिक् छंद हा खरोखर गायत्री छंदच आहे. उष्णिक् छंदाची अठ्ठावीस अक्षरे असतात. त्यांपैकी चोवीस अक्षरांच्या योगाने गायत्री छंद त्यात अन्तर्भूत झालेला आहे. जी चार अक्षरे अधिक आहेत ती चतुष्पाद पशुस्वरूपच होत. ज्याप्रमाणे एखाद्या इष्टीमध्ये एका पुरोडाशावर दुसरा पुरोडाश ठेवावयाचा असतो त्याचप्रमाणे उष्णिक् छंदातील ऋचेमध्ये गायत्री छंदातील अक्षरसंख्येपेक्षा अधिक असलेली चार अक्षरे समाविष्ट झालेली आहेत. पुरोडाशसाम्य सिध्द होण्याच्या दृष्टीने हे चार अक्षरांचे आधिक्य युक्तच आहे. जगती छंदातील ऋचेने जर सामिधेनीसंज्ञक ऋचांचे पठण समाप्त केले तर यज्ञाचा नाश केल्यासारखे होईल, यास्तव, त्रिष्टुप् छंदातील ऋचेच्या पठणाने समिधेनींचे समापन करावे. त्रिष्टुप् छंद हा जणू इंद्रियजन्य सामर्थ्याच आहे. अर्थात् त्रिष्टुप् छंदाने सामिधेनींचे समापन केल्याच्या योगाने इंद्रियजन्य सामर्थ्याचेच ठिकाणी यज्ञाला प्रतिष्ठित केल्या सारखे होते. व तो नाश पावत नाही. 'अग्ने तीन् ते वाजिना' या त्रिष्टुप्छंदात्मक आणि 'त्रि' हा शब्द जिच्यामध्ये अनेकवेळा असल्यामुळे जिला त्रिवती ही संज्ञा आहे त्या ऋचेने परिधान म्हणजे सामिधेनी ऋचांचे समापन करावे. म्हणजे ते त्रैधातवीया या इष्टीशी परिधान केलेल्या ऋचेचे समानरूपत्व केल्यासारखे होते. सर्व यज्ञांत ज्या छंदांचा प्रयोग केला जातो, त्या सर्व छंदांचा प्रयोग या त्रैधातवीया इष्टीत केला जात असल्यामुळे ही इष्टी म्हणजे जणू काय सर्वयज्ञस्वरूप आहे. ज्या अर्थी अग्निष्टोमदि सर्व यज्ञ कामनांच्या सिध्यर्थ अनुष्ठित केला जातो, त्या अर्थी सर्वयज्ञस्वरूप अशी ही त्रैधातवीया इष्टी देखील सर्व प्रकारच्या कामनांच्या सिध्दीसाठी अनुष्ठित केली जावी, हे युक्तच आहे.

ज्याला शत्रूवर 'अभिचार' करावयाचा असेल, त्यानेही या त्रैधातवीया इष्टीने यजन करावे. कारण त्रैधातवी किंवा त्रैधातवीया इष्टी ही सर्वयज्ञस्वरूप आहे. यास्तव, जो यजमान या सर्वयज्ञस्वरूप इष्टीच्या योगाने शत्रूवर अभिचार करतो, तो शत्रूला मारतो.

शत्रूने केलेल्या अभिचाराने जो पीडित झाला असेल त्यानेही ह्या इष्टीने यजन करावे. ही 'त्रैधातवी' सर्वयज्ञस्वरूप आहे. यास्तव, जो यजमान

या इष्टिरूपी सर्वयज्ञाने यजन करतो त्याला तो सर्वयज्ञ शत्रूने केलेल्या अभिचारापासून मरू देत नाही.

ज्या यज्ञामध्ये सहस्रसंख्यात्मक दक्षिणा द्यावयाची असते, असा अप्तोर्यामादि यज्ञ ज्याला करावयाचा असेल त्याने त्या यज्ञाचे कार्य सिध्दीस जाण्यासाठी ह्या त्रैधातवी इष्टीने यजन करावे. म्हणजे तो यजमान प्रभूत म्हणजे एकच काय, पण अनेक हजार संख्येने मोजता येण्याजोगी दक्षिणा देण्यास समर्थ होतो.

सहस्रदक्षिणात्मक यज्ञ ज्याने केला असेल त्यानेही ह्या त्रैधातवी इष्टीने यजन करावे. कारण, जो सहस्रदक्षिणात्मक यज्ञ करतो तो पशूंच्या अंताला गेलेला असतो. म्हणजे त्याच्या हातून पुष्कळ पशू मारले जात असतात. आणि त्यामुळे तो पुढचे मोठमोठे यज्ञ करण्याला असमर्थ होतो. यास्तव, पशूंची प्राप्ती व्हावी या इच्छेने त्याने त्रैधातवी इष्टी करावी. प्रजापतीने जे पशू उत्पन्न केले, ते खरोखर 'त्रैधातवी' इष्टी करून तिच्या प्रभावानेच उत्पन्न केले. हे जाणणारा जो विद्वान सहस्रदक्षिणात्मक यज्ञ केल्यानंतर पशूंच्या प्राप्तीच्या इच्छेने त्रैधातवीय संज्ञक यागाने यजन करील तो ज्या त्रैधातवीयेष्टिरूप जन्मस्थानापासून प्रजापतीने पशू उत्पन्न केले, त्याच जन्मस्थानापासून पशू उत्पन्न करतो. आणि त्या योगाने पुढे केल्या जाणाऱ्या यज्ञात देण्यास उपयोगी पडणाऱ्या हजार गाईंचा कळप त्या यजमानाला प्राप्त होतो.

जो 'यक्ष्ये' म्हणजे यज्ञ करीन, असा संकल्प करून यज्ञ करीत नाही, तो देवतांच्या पासून सर्वथैव विच्छिन्न होत असतो. म्हणजे तुटला जातो. त्याच्या हातून देवतांचा द्रोहच घडल्यासारखे होते. यास्तव, संकल्प केल्यानंतर ज्याच्या हातून यज्ञ घडला नसेल त्याने 'त्रैधातवीय' संज्ञक इष्टीने म्हणजे योगाने यजन करावे. त्रैधातवीया ही इष्टी किंवा याग हा सर्वयज्ञस्वरूप आहे. यास्तव, ह्या त्रैधातवीयेष्टीरूप सर्वयज्ञाचे जो यजन करतो, तो देवतांच्यापासून विच्छिन्न होत नाही.

ह्या इष्टीमध्ये द्वादशकपालात्मक पुरोडाश तयार करावा. मात्र हे द्वादशकपालात्मकत्व किंवा एकपुरोडाशत्व हे तीन कपालसमूहांच्या व तीन पुरोडाशांच्या एकत्र गणनेने सिध्द होत असते. यास्तव चार चार कपालांच्या

समूहावर तीन पुरोडाश भाजून तयार करावेत. ते तीन पुरोडाश म्हणजे पुरोडाशांची तीन ही संख्या यजमानाला तीनदा समृध्दत्व प्राप्त करून देण्याला कारणभूत होते. तीन पुरोडाश करावेत हे सांगितलेच आहे. पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक आहेत. ह्या तीन लोकांची प्राप्ती करून देण्याला हे तीन पुरोडाश कारणभूत होतात. पहिल्यापेक्षा दुसरा पुरोडाश मोठा करावा व दुसऱ्यापेक्षा तिसरा मोठा करावा. अशा प्रकारे उत्तरोत्तर मोठाले पुरोडाश करावेत. कारण हे तीन लोकही तसेच म्हणजे उत्तरोत्तर मोठे आहेत. पहिला व तिसरा हे दोन पुरोडाश तांदुळाच्या पिठाचेच करावेत, परंतु मधला म्हणजे दुसरा पुरोडाश सातूच्या पिठाचा करावा. तो जणू काय अंतरिक्षाचेच रूप आहे. भूलोकावरची माणसे डोळ्यांना स्पष्ट दिसतात. द्युलोकातले सूर्य चंद्रही डोळ्यांना स्पष्ट दिसतात, परंतु अंतरिक्षातले यक्ष गंधर्व डोळ्यांना स्पष्ट दिसत नाहीत. एवं च, पृथ्वी व द्यु या दोन लोकांपेक्षा अंतरिक्षलोक हा विलक्षण म्हणजे भिन्नस्वरूप आहे. यास्तव इतर दोन पुरोडाशांहून भिन्न अशा सातूच्या पिठाच्या पुरोडाशाचे अंतरिक्षलोकाशी स्वरूपसाम्य असणे हे युक्तच आहे. आणि हे त्याचे अंतरिक्षरूपत्व यजमानाच्या समृध्दीला कारण होते. तिन्ही पुरोडाशांच्या ठिकाणी एकदमच हस्तस्पर्श करून त्यांच्या ठिकाणचे अवदान करावे.

या त्रैधातवीय इष्टीच्या किंवा यागाच्या सांगतेसाठी हिरण्य द्यावे. त्या योगाने यजमानाला तेजाची प्राप्ती होते. तुपात भिजलेले वस्त्र द्यावे. त्या योगाने यजमानाला पशूंची प्राप्ती होते. धेनू द्यावी. म्हणजे आशीर्वादाचा लाभ होतो. हिरण्य हे 'साम'स्वरूप असून ताप्र्य म्हणजे तुपात भिजविलेले वस्त्र हे जणू काय यजुर्मंत्राचे स्वरूप होय. त्याचप्रमाणे धेनू ही जणू काय 'उक्थामद' संज्ञक ऋग्वेद मंत्राचे स्वरूप आहे. (अनुवाक ११).

हतपुत्र म्हणजे ज्याचा विश्वरूप नामक पुत्र इंद्राने मारला होता असा त्वष्टा इंद्रावर रागावलेला असल्यामुळे त्याला न बोलावता सोमयाग करण्यास उद्युक्त झाला. त्या सोमयागात सोमपान करण्याची आपली इच्छा इंद्राने त्वष्ट्याजवळ व्यक्त केली. तुझ्या या सोमयागात सोमपान करण्यासाठी मला बोलाव, असे इंद्र त्वष्ट्याला म्हणाला. तेव्हा, तू माझ्या पुत्राचा वध केला आहेस, म्हणून तुला मी बोलावणार नाही, असे त्वष्ट्याने इंद्राला

स्पष्ट सांगितले. आणि त्याला बोलावले नाही. तेव्हा, इंद्राने त्वष्ट्याच्या सोमयज्ञात हाणामारी करून जबरदस्तीने सोमपान केले. नंतर इंद्राने सोमपान केल्यावर अवशिष्ट राहिलेला जो काही थोडा सोमरस होता, तो घेऊन त्वष्टा आहवनीय अग्नीजवळ गेला आणि इंद्रावर अभिचार करण्याच्या अर्थात् त्याला मारण्याच्या उद्देशाने त्याने त्या उरलेल्या सोमरसाची आहवनीयाग्नीचे ठिकाणी आहुती दिली. आहुती देतांना 'स्वाहेंद्रशत्रुर्वर्धस्व' असा त्याने मंत्र उच्चारला होता. या मंत्राचा अर्थ असा की, ' हे अग्ने तुला सोमरसाची ही आहुती उत्तम प्रकारे समर्पण असो; इंद्राला मारणारा असा कोणी पुरुष होऊन तू वृध्दिंगत हो'. त्या अग्नीने ज्वालारूपाने प्रकट होऊन मी इंद्राचा पराभव करीन, त्याला मारीन, असे जितक्या वेळात सूचित करावयास पाहिजे होते तितक्या वेळात तो अग्नी स्वतःच शांत झाला. त्या अग्नीची होती ती ज्वाला कमीच झाली. असे होण्याचे कारण असे झाले की, त्वष्ट्याकडून मंत्राचा उच्चार करण्यात चूक झाली. 'इंद्राला मारणारा शत्रू वाढीव' असा अर्थ निष्पन्न होण्यासाठी पूर्वोक्त मंत्र 'अंतोदात्त' अशा स्वराने उच्चारावयास पाहिजे होता. त्या ऐवजी त्वष्ट्याकडून तो मंत्र 'आद्युदात्त' स्वराने उच्चारला गेला. व त्या योगाने 'इंद्र ज्याचा मारक आहे, म्हणजे इंद्र ज्याला मारील असा पुरुष होऊन वाढ', असा त्या मंत्राचा अर्थ झाला. आणि त्यामुळे अग्नीची ज्वाला उंच न वाढता कमीच झाली. मंत्रोच्चारात काही चूक झाली नाही तर अग्नीची ज्वाला मोठी होते. आणि ती यजमानाच्या कार्याची सिध्दी दर्शविते. आणि अग्नीची ज्वाला पूर्वीपेक्षा कमी होणे, हे यजमानाच्या कार्याची सिध्दी होणार नसल्याचे सूचक असते. त्वष्ट्याने आहुती दिल्यावर त्याचे कार्य न होण्याचे सुचविण्यासाठी अग्नीची ज्वाला कमी झाली असो किंवा त्याच्या कार्याची सिध्दी होण्याचे सुचविण्यासाठी अग्नीची ज्वाला वृध्दिंगत झाली असो. ते काही असो. पण, तो अग्नी पुरुषरूपाने उत्पन्न झाला व तो असा उत्पन्न झाला की, त्याने होमाधारभूत अग्नीला व आहुतिरूपाने दिल्या गेलेल्या सोमरसाचा अभिमानी देव असलेल्या सोमाला चोहोकडून घेरले, आणि त्या दोघांना आपल्या मुखात घालून खालच्या वरच्या दातांनी खूप चिरडले.

उत्पन्न झालेला हा पुरुष दररोज इषुमात्र, इषुमात्र म्हणजे धनुष्यापासून सोडलेला बाण जितक्या लांब जाऊन पडतो तितक्या प्रदेशापर्यंत वाढत वाढत गेला, आणि त्याने सर्व दिशांच्या मर्यादेत असलेला प्रदेश व्यापून

टाकला. इतकेच नव्हे तर त्याने तिन्ही लोकांना व्यापून टाकले ! त्याने सर्व लोकांना आवृत म्हणजे व्याप्त करणे हेच त्या आवरक किंवा व्यापक पुरुषाचे 'वृत्रत्व'. त्याचे 'वृत्र' हे नांव पडण्याचे हेच कारण होय. त्या 'वृत्र' संज्ञक पुरुषाला इंद्रही भ्याला व त्वष्टाही भ्याला! कारण, त्याने त्रैलोक्य व्यापल्यामुळे इंद्र व त्वष्टा ह्या दोघांनाही राहण्याला ठिकाण उरले नाही. तेव्हा हा पुरुष नष्ट झालेला बरा असे त्वष्ट्याला वाटले आणि त्याने इंद्राशी मैत्री केली व त्या पुरुषाला मारण्यासाठी मंतरलेल्या पाण्याने धुऊन स्वच्छ केलेले एक वज्र इंद्राला दिले. इंद्राच्या हाती पडलेले वज्र मंत्राने भारलेले असल्याने तपोरूपच झाले होते. पण ते वज्र त्या वृत्रावर टाकण्यास इंद्र समर्थ झाला नाही. इतक्यात त्या इंद्रापुढे 'विष्णु' नांवाचा दुसराच एक देव उभा राहिलेला आढळला. तेव्हा इंद्र त्याला म्हणाला की, हे विष्णो ये, ह्या वृत्राचे सामर्थ्य मनात उभे रहिल्यामुळे भयभीत झालेल्या माझा हात वृत्रावर हे वज्र फेकण्यास उचलला जात नाही. यास्तव, ज्या सामर्थ्याने वृत्राने हे जग व्यापले आहे ते सामर्थ्यच आपण दोघे त्याच्यापासून हिसकावून घेऊ. यासाठी विष्णो, या कामात तू माझे साहाय्य करण्यासाठी ये. तेव्हा विष्णूने त्रिधा होऊन आपली तीन शरीरे निर्माण केली आणि एक पृथ्वीवर, एक अंतरिक्षात आणि एक द्युलोकात याप्रमाणे सर्वांच्या रक्षणार्थ त्यांची त्रैलोक्यात स्थापना केली. वृत्राच्या सर्वदिग्व्यापी वाढीमुळे भ्यायलेल्या इंद्राची भीती निवारण करण्यासाठी अशी तीन शरीरांची तीन ठिकाणी स्थापना करणे योग्यच होते.

तीन शरीरांपैकी विष्णूने जे आपले एक शरीर पृथ्वीवर ठेवले, त्याच्या साहाय्याने म्हणजे त्या विष्णूच्या पाठीमागे उभे राहून इंद्राने वृत्रासुरावर वज्र उगारले. तेव्हा वृत्र भ्याला आणि इंद्राला म्हणाला, हे इंद्रा, मला मारू नको, या पृथ्वीला व्यापून टाकण्याला समर्थ असे जे सामर्थ्य माझ्या ठिकाणी आहे, ते सर्व मी तुला देतो. आणि त्याप्रमाणे ते सामर्थ्य त्याने इंद्राला दिले. इंद्राने ते घेतले. हे सामर्थ्य मी धारण करणार, यास्तव, हे मला दे. असे विष्णू जेव्हा म्हणाला, तेव्हा इंद्राने मोठ्या आदराने ते त्याला दिले. नंतर आम्हा देवांमध्ये इंद्रच हे सामर्थ्य धारण करो, असे विष्णूने आपल्या मनाशी ठरविले, आणि ते सामर्थ्य विष्णूने पुन्हा इंद्राला देऊन टाकले. विष्णूने जे आपले एक शरीर अंतरिक्षलोकात ठेवले, त्याच्या

साहाय्याने अर्थात् त्या विष्णूशरीराच्या पाठीमागे उभे राहून इंद्राने वृत्रावर प्रहार करण्यासाठी वज्र उगारले, त्याबरोबर वृत्र भ्याला आणि म्हणाला, हे इंद्रा, मला मारू नको. या अंतरिक्षलोकाला व्यापण्याला समर्थ असे जे वीर्य म्हणजे सामर्थ्य माझ्या ठिकाणी आहे, ते मी तुला देतो. याप्रमाणे वृत्राने ते सामर्थ्य इंद्राला दिले, व त्याने ते घेतले. नंतर, जसे पूर्वी मजपासून घेतलेले सामर्थ्य तू मला परत दिलेस तसेच आता दुसऱ्या खेपेसही दे' असे म्हणतच ते सामर्थ्य इंद्राने विष्णूला दिले. नंतर आम्हा देवांमध्ये इंद्रच हे सामर्थ्य धारण करो, असे ठरवून विष्णूने ते सामर्थ्य पुन: इंद्राला देऊन टाकले.

विष्णूने जे आपले एक शरीर इंद्राच्या रक्षणासाठी द्युलोकात ठेवले त्या योगाने म्हणजे त्याच्या पाठीशी उभे राहून वृत्रावर प्रहार करण्यासाठी इंद्राने वज्र उगारले. तेव्हा वृत्र भ्याला आणि म्हणाला, 'हे इंद्रा मला मारू नको, ज्या सामर्थ्याने मी हे सर्व जग व्यापले ते सर्व सामर्थ्य मी तुला देतो. तेव्हा 'त्वी' म्हणजे 'ठीक आहे, तू म्हणतोस तसेच होवो,' असे म्हणून वृत्रासुराच्या म्हणण्याला इंद्राने मान्यता दिली.

वृत्र पुन्हा म्हणाला, 'तुम्ही आम्ही परस्परांचे ऐक्य करू. हे इंद्रा मी तुझ्यामध्ये प्रवेश करीन म्हणजे तुमचे आमचे ऐक्य झाले.' तेव्हा इंद्र म्हणाला 'तू जर माझ्या ठिकाणी प्रवेश केलास तर मलाच खाऊन टाकशील की काय?' वृत्र म्हणाला, 'नाही नाही, मी तुला खाणार तर नाहीच पण उलट तुलाच प्रदीप्त करीन. तुझा जठराग्नी अधिक प्रज्वलित करीन. तो तुला अनेक प्रकारचे अन्न खावयास उपयोगी पडेल'. नंतर 'आता प्रवेश करतो' असे म्हणून वृत्राने इंद्राच्या शरीरात प्रवेश केला आणि इंद्र विस्तीर्णउदर झाला. तात्पर्य, इंद्राचे खूप मोठे झालेले उदर पुष्कळसे अन्न आंत भरले तरी ते साठण्यास अवकाश होईल इतके व्यापक म्हणजेच वृत्र होय. उदरात असलेली क्षुधा ही जणू काय मनुष्याला अत्यंत पीडा देणारा एक सहज म्हणजे जन्मजात शत्रूच होय. हे जो जाणतो तो क्षुधारूपी शत्रूचा नाश करतो.

इंद्राच्या शरीरात प्रवेश करण्यापूर्वीच वृत्राने आपले जगाला व्यापण्याचे सामर्थ्य तीनवेळा मिळून इंद्राला दिले. आणि इंद्राने ते घेतले. 'ते मला

असू दे,' असे विष्णूने इंद्राला म्हणताच इंद्राने ते विष्णूला तीनवेळा मिळून दिले. नंतर आम्हा देवांमध्ये इंद्रच हे इंद्रियसामर्थ्य धारण करो, असा विचार करून विष्णूने तीन वेळा ते परत इंद्राला दिले.

वृत्राने तीन वार इंद्राला सामर्थ्य दिले व प्रत्येक वेळी विष्णूला दिलेले ते सामर्थ्य इंद्राने पुनश्च विष्णूकडून तीनवार परत घेतले. यामुळे त्रिधा विभक्त अशा या सामर्थ्यात्मक पुरोडाशरूपी हविर्द्रव्याचे 'त्रिधातु' हे नांव अन्वर्थक होय. अर्थात् एतत्संबंधी यागातील पुरोडाश हवी देखील त्रिधातु होय. कारण प्रत्येकी चार कपालांवर शिजविलेला एक असे द्वादशकपालात्मक पुरोडाशाचे तीन भाग त्यात संभवतात.

ज्या अर्थी विष्णुदेवता साहाय्य करण्यासाठी इंद्राच्या पाठीमागे अनुकूलत्वाने उभी ठाकली, आणि या इंद्राने देखील वृत्राकडून मिळविलेले सामर्थ्य अत्यंत आदराने त्या विष्णुदेवतेला देऊन टाकले, त्याअर्थी एतत्संबंधी करावयाच्या यागात जो हवी अर्पण करावयाचा तो इंद्र आणि विष्णू या दोनही देवतांना उद्देशून करावा.

या यागकर्मात ज्या सामर्थ्यरूपी हवीचे त्रिवार दान करण्यात आले तो हवी ऋक्-साम-यजुरूपच होय. हे सामर्थ्य ऋग्वेदादि वेदत्रयीरूपच होय, असा याचा अर्थ. आणि ज्या अर्थी त्या इंद्रदेवतेला हजारो प्रकारांनी युक्त असणाऱ्या सामर्थ्याची प्राप्ती झाली, त्या अर्थी एतद्विषयक यागकर्माच्या सांगतेसाठी देण्याची सुवर्णदक्षिणा सहस्रसंख्याक द्यावयाची असते. (अनुवाक १२).

जन्मास येणाऱ्या राजाला देव भ्याले. कारण, त्याच्या ठिकाणी अप्रतिबध्द म्हणजे कोणाकडूनही कुंठित न होणारी शक्ती असल्यामुळे तो जन्मल्यावर इतर वैऱ्यांच्याप्रमाणे आम्हा देवांनाही मारील असे त्यांना वाटले. आणि त्या भयभीत झालेल्या देवांनी जन्मास येणारा राजा गर्भावस्थेत आहे, तोच शक्तिप्रतिबंधकलक्षणरूप दाव्याने जेणे करून तो शक्तिहीन होईल अशा रीतीने त्याला जखडून टाकले. आणि म्हणूनच जेव्हा जेव्हा राजा जन्मास येतो, तेव्हा तेव्हा तो शक्तिकुंठित झालेला असाच जन्मास येत असतो. जर तो अप्रतिबध्द अर्थात् प्रतिबंधरहित अशा शक्तीसह जन्मास येईल, तर तो गर्भातून बाहेर आल्यापासून वैऱ्यांना मारीतच जणू काय जन्माला आला आहे अशा रीतीने लोकांत वागेल.

आपल्या यजमानाच्या पोटी आता जो राजा जन्मास येणार हा देवांनी ज्याची शक्ती प्रतिबंधित केली नाही असाच जन्माला यावा आणि वैऱ्यांना मारीतच जणू हा जन्माला आला आहे अशा प्रकारे त्याने लोकात वागावे, अशी ज्या राजाविषयी अध्वर्यूला इच्छा होईल त्याने आपल्या यजमानासाठी हा 'ऐंद्राबार्हस्पत्य' संज्ञक म्हणजे इंद्र व बृहस्पती ह्या दोन देवांच्या उद्देशाने चरू शिजवून त्याचा याग करावा. मनुष्यांमधला राजा हा ऐंद्र म्हणजे इंद्रदेवतात्मक अर्थात् इंद्रस्वरूप असतो. बृहस्पती हा देवांमधला ब्राह्मण आहे. यास्तव, इंद्र व बृहस्पती या देवांच्यासाठी चरूचा याग केला असता यजमानाच्या पोटी इंद्रस्वरूप असा जो राजा जन्मास येणार त्याला बृहस्पतीच्या सामर्थ्याने अध्वर्यूने जणू काय देवांच्या कडून होणाऱ्या शक्तिप्रतिबंधापासूनच मुक्त केल्यासारखे होते. या यागाच्या सांगते करता सोन्याचे दावे दक्षिणा म्हणून द्यावे. म्हणजे ते जन्मास येणाऱ्या राजाला शक्तिप्रतिबंधक अशा दाव्यातून प्रत्यक्षतःच मोकळा करते. (अनुवाक १३).

१ चंद्राला प्रकाशित करण्याला कारणभूत होणारा हा भगवान् आदित्य प्रतिदिवशी उदयाला येऊन नवानवा होत असतो. म्हणजे अयनगतीस अनुसरून दक्षिणेस किंवा उत्तरेस आपले उगमस्थान थोडेथोडे बदलून उगवत असतो. हा आदित्य जणू काय दिवसांचे निदर्शक चिन्हच आहे. प्रभातकालाचा उपक्रम होताच हा पूर्व दिशेस उदयाला येतो. आणि देवांना हविर्भाग देतो. म्हणजे यावेळी अग्निहोत्री हे अग्निहोत्र होम करून देवांना हविर्भाग देत असतात. हा भगवान् आदित्य ह्या यज्ञकर्मात येऊन यजमानाला दीर्घायुष्य देवो. २ बारा आदित्य हे शुक्लपक्षामध्ये ज्या चंद्राला दररोज एक कला देऊन वाढवीत असतात आणि पौर्णिमेच्या रात्री सर्व कलांनी युक्त होऊन उगवणाऱ्या ज्या चंद्राला कृष्ण पक्षात दररोज स्वतः क्षयरहित असलेले अग्न्यादि देव एका एका कलेने पिऊन टाकतात, म्हणजे एका एका कलेने क्षीण करतात, त्या अमृतमय चंद्रासह देदीप्यमान असा आदित्य, वरुण इत्यादि स्वर्गलोकाचे रक्षण करणारे देव आम्हा रोगग्रस्तांना आमचा रोग निवारण करून पुष्ट करोत. ३ हे इंद्रदेवा तू पूर्व दिशेच्या ठिकाणी राज्य करणारा अधिपती आहेस. आणि वृत्रघातका, उत्तर दिशेस तू शत्रूंचा नाश करणारा आहेस. नद्या ज्या ठिकाणी वाहत असतात ते सर्व तुझेच म्हणजे तू जिंकलेलेच आहे. तू अभिमत फलांचा वर्षाव करणारा आणि होमयोग्य होऊन आहवनीयाच्या

दक्षिण बाजूस येऊन बैस. ४ इंद्र सर्व ठिकाणी जय मिळवितो. कोठेही पराजित होत नाही. इतर सर्व राजांच्याहून श्रेष्ठ असा राजा होऊन, जे राजे नसतील त्यांनाही राज्य देऊन राजे करतो. यास्तव, हे इंद्रदेवा, तू सर्व राजांच्याकडून शरण जाण्यास योग्य वा नमस्कारार्ह असा ज्या योगाने होशील त्या रीतीने सर्व शत्रुसैन्यांचा पराभव करण्यास समर्थ हो. ५ ह्या इंद्राचेच महत्त्व पृथ्वी, अंतरिक्ष आणि द्युलोक यांच्या पलीकडे सर्वत्र प्रचलित झाले आहे. इंद्र शत्रूशी लढण्यासाठी आपली सेना रणांगणावर पाठवीत असतो. हा इंद्र म्हणजे सर्वांपेक्षा स्वतंत्र असा राजा आहे. युध्दासाठी तातडीने बाहेर निघता यावे म्हणून हा घरी नेहमी आयुधे सज्ज करून असतो. शत्रूवर चाल करून जाण्याचा स्वभाव असलेला हा इंद्र क्षुधारुप रोगापासून अन्न देऊन मुक्त करणारा आहे. ६ दूध आटलेल्या गाई ज्याप्रमाणे आपल्या वासरांना उद्देशून आदराने हंबरत असतात त्याप्रमाणे या जंगम व स्थावर अशा सर्वांचाच स्वामी असलेल्या आणि स्वर्गलोकप्रकाशक अशा तुला तुझ्या भोवती असणारे आम्ही वारंवार स्तवीत आहोत. ७ हे इंद्रदेवा, यज्ञानुष्ठान करणारे आम्ही ऋत्विज आम्हाला भरपूर अन्न मिळावे म्हणून तुलाच बोलावीत आहोत. शत्रू चालून आले असताना सन्मार्गाने आमचे पालन करणाऱ्या तुला आम्ही बोलावीत आहो. सर्व बाजूंनी आमच्याकडे येणारे शत्रुसेनेतील अश्व पाहून आम्ही तुला बोलावीत आहोत. आम्हाला सामर्थ्य देऊन आमचे पालन कर. ८ हे इंद्रा, शतसंख्याक द्युलोक आणि तितकेच पृथ्वीलोक अवांतर विशेषांनी युक्त असले तरी ऐश्वर्याच्या बाबतीत नुकत्याच जन्मलेल्या देखील तुझी बरोबरी करू शकत नाहीत. त्याचप्रमाणे सहस्रसंख्याक सूर्य अंतरिक्षात एकवटले तरी हे वज्रधारी इंद्रा, तेजाच्या बाबतीत नुकत्याच जन्मलेल्या देखील तुझी ते बरोबरी करू शकत नाहीत. ९ तुझ्याकरिता अभिषेक करणाऱ्या ऋत्विजांनी आपल्या दोन्ही हातांनी नीट रीतीने उचलून घेतलेला व अनियमितपणाने जेथे जेथे घाव घातला जाईल तेथे तेथे सोमवल्लीचा चुराडा करणारा दगडी बत्ता जो सोमरस उत्पन्न करील तो सोमरस तू पी. १० ज्या उदकांच्यासह आम्ही इंद्राचे स्तवन करीत असतांना हर्षित होतो, ती धनयुक्त, आमच्यासह हर्षित होणारी, पुष्कळ अन्नाने युक्त अशी उदके आमचा स्वामी असलेल्या इंद्राच्या ठिकाणी आम्हाला सुख देण्यासाठी उपस्थित होवोत. ११ हे अग्निदेवा शुद्ध असे तुझे किरण प्रकाशमान होऊन वर जात असतात. आणि तुझी

पूजा करणारे हे देवतारूपाला प्राप्त होतात. १२ हा अग्नी मोठ्या प्रकाशाने तळपत सर्व प्रकारच्या माहात्म्याने युक्त होऊन प्रकट होतो. आसुरी व दुस्तर अशा मायांचा नाश करतो. राक्षसांचा नाश करण्याकरिता तो आपली ज्वालारूपी दोन शिंगे तीक्ष्ण करतो. १३ सर्व जगाला सूर्य दृष्टीस पडावा म्हणूनच किरणरूपी घोडे त्या जन्मजात ज्ञानी अशा देदीप्यमान सूर्याला अत्यंत उंच अशा उदयाचलावर वाहून आणीत असतात. १४ हे विद्वान सूर्यदेवा, चकाकणारे जणू केशच अशी किरणे धारण करणाऱ्या तुला सात घोडे रथात बसवून वाहून नेत असतात. १५ मित्र, वरुण आणि अग्नी इत्यादिकांनी उपलक्षित अशा सर्व प्राण्यांचे जणू चक्षुरिंद्रियच आणि रक्तश्वेतादि विविध वर्णांनी युक्त व देदीप्यमान अशा किरणांचे जणू काय सैन्यच असे मंडल उदय पावले आहे. त्या मंडळाचे ठिकाणी असणारा भगवान् सूर्य ह्या सर्व जंगम व स्थावर वस्तूंचा आत्मा असून त्याने द्युलोक, पृथ्वी आणि अंतरिक्ष हे तिन्ही लोक सर्वतोपरी व्यापले आहेत. १६ यज्ञाची अभिवृध्दी करणारे, त्या त्या ऋतूंच्या द्वारा उपलक्षित होणाऱ्या यज्ञकर्मामध्ये हविर्द्रव्यांचा स्वीकार करण्यासाठी आलेले, निमंत्रण ऐकणारे विश्वेदेव योग्य व दुधाप्रमाणे सारभूत असलेले हविर्द्रव्य सेवन करोत. १७ हे विश्वेदेवहो, माझे निमंत्रण श्रवण करा. जे तुम्ही अंतरिक्षात राहत असाल, जे पृथ्वीच्या सन्निध राहत असाल, जे द्युलोकात असाल, शिवाय जे अग्निरूपी जिव्हेने हविर्द्रव्याचा स्वीकार करणारे किंवा आणखी यजनीय असे जे देव असतील ते सर्व देव ह्या यज्ञामध्ये येऊन बसा आणि अर्पण करण्यात येणारे हविर्द्रव्य सेवन करून आनंदित व्हा आणि यजमानालाही आनंदित करा. (अनुवाक १४).

प्रपाठक ५

अनेक रूपे धारण करणारा, विश्वरूप नांवाचा त्वष्ट्याचा पुत्र अग्नी हा देवांचा पुरोहित आणि असुरांचा भागिनेय होता. त्याला तीन मस्तके होती. पैकी सत्त्वगुणी मुखाने तो सोमपान करी तर तमोगुणी मुखाने सुरापान करी. अन्नाचे सेवन तो रजोगुणी मुखाने करीत असे. तो एकदा यज्ञमंडपात गेला आणि देवांना उद्देशून हविर्भाग देणे योग्य होय, असे सर्वांच्या समक्ष प्रकटपणे उद्गारला. त्याचबरोबर तेथे उपस्थित असलेल्या ऋत्विजांनाच फक्त ऐकू जाईल, इतरांना ऐकू येणार नाही असे, म्हणजे इतरांच्या परोक्ष बोलला

की, असुरांना हविर्भाग देणे योग्य होय. लौकिक व्यवहारातही सर्वजण समोर असलेल्या व्यक्तीला 'हा तुझा भाग आहे,' असे त्याला संतुष्ट करण्यासाठीच प्रकटपणे सांगतात. परंतु, ज्याला उद्देशून तो भाग असल्याचे परोक्ष म्हणजे अप्रत्यक्षतया सुचविले जाते, त्याच्याचसाठी वस्तुत: तो भाग अभिप्रेत असतो. विश्वरूपाच्या या वागण्यामुळे इंद्र त्याच्याबद्दल आशंकित झाला. यज्ञातील हविर्भाग आमच्यापासून हिरावून घेऊन तो असुरांना अर्पण करण्याचे विश्वरूपाने ठरविणे म्हणजे समस्त राष्ट्राशीच विपरीत आचरण करणे होय, असा विचार करून इंद्राने वज्र उगारून विश्वरूपाची मस्तके तोडून टाकली. तुटून पडलेल्या त्या मस्तकांनी पक्ष्यांची रूपे घेतली. 'सोमपान' नामक मस्तकाने कपिंजल पक्ष्याचे तर 'सुरापान' संज्ञक मस्तकाने कलविंज पक्ष्याचे रूप घेतले. 'अन्नादन' नांवाचे मस्तक झाले तित्तिरी. विश्वरूपाचा बुध्दिपुरस्सर वध केल्याने उत्पन्न झालेल्या ब्रह्महत्त्यारूपी पातकाचा, यमचित्रगुप्तादिकांसमोर, हात जोडून पण निर्भयपणें इंद्राने स्वीकार केला. प्रायश्चित्त न करता एक वर्षभर तो या ब्रह्महत्त्येला आपल्याबरोबर धारण करीत होता. आत्मज्ञानी असलेल्या इंद्राला पापाचा लेप लागणे शक्यच नव्हते. तथापि, समस्त प्राणी त्याला ब्रह्महत्त्या करणारा म्हणून दूषण देऊ लागले.

तो इंद्र पृथ्वीकडे जाऊन तिला म्हणाला की, या ब्रह्महत्त्यारूपी पातकाच्या एकतृतीयांश भागाचा तू स्वीकार कर. ती म्हणाली, ''ठीक आहे, पण मी एक वर मागते. लोक ठिकठिकाणी माझ्या शरीरावर खळगे खणतात. त्यामुळे पीडित होऊन मी खचून जाईन असे मला वाटते. मी अशा प्रकारे खचून जाऊ नये, मला पीडा होऊ नये, म्हणून एक वर्ष पूर्ण होण्याच्या आतच धूळमातीच्या योगाने वा तण गवत इत्यादि उगवल्याने हे खळगे भरून यावेत.'' नंतर पृथ्वीला इंद्राकडून जाहीरपणे सर्वांसमक्ष तो वर मिळाला आणि एक वर्ष पूर्ण होण्याच्या आतच पृथ्वीचे खळगे भरून येऊ लागले. इंद्राने केलेल्या ब्रह्महत्त्येपायी उद्भवलेल्या पातकाचा जो एकतृतीयांश भाग पृथ्वीने ग्रहण केला, त्यापासून तिच्या ठायी एक स्वकृत म्हणजे नैसर्गिक उजाड क्षेत्र निर्माण झाले. ब्रह्महत्त्येच्या परिणामस्वरूप असलेल्या या उजाड भूभागात श्रध्दाळू आहिताग्नी पुरुषाने कधीही, निदान देवयजन करीत असताना तरी वास्तव्य करू नये. हा भूभाग ब्रह्महत्त्येचे एक स्वरूप म्हणून पुढे विख्यात झाला.

इंद्र नंतर वनस्पतींच्याकडे जाऊन त्यांना म्हणाला की, या ब्रह्महत्त्यापातकाचा एकतृतीयांश भाग तुम्ही ग्रहण करा. वनस्पती म्हणाल्या की, त्यासाठी आम्ही एक वर मागतो. त्या पुढे म्हणाल्या की, आमच्या शरीराचे छेदन झाल्याने आम्ही परास्त होऊ नये, असे आम्हाला वाटते. तसे न व्हावे म्हणून आमच्या शरीराच्या ज्या भागातून आमचे छेदन होईल तेथूनच आमची पुनश्च अंकुररूपाने विपुल प्रमाणात उगवण व्हावी. त्याप्रमाणे इंद्राकडून त्यांना सर्वांसमक्ष जाहीर रीतीने वरप्राप्ती झाली. तेव्हापासून वृक्षांच्या तोडलेल्या जागेतून त्यांची अंकुररूपाने विपुल प्रमाणात उगवण होऊ लागली. ब्रह्महत्त्येचा वृक्षांनी ग्रहण केलेला एकतृतीयांश भाग म्हणजेच तोडलेल्या जागेतून बाहेर पाझरलेला त्यांचा निर्यास म्हणजे गोंदासारखा घट्ट झालेला द्रव. त्याच्या या स्वरूपामुळेच भोज्य पदार्थ म्हणून त्याचा स्वीकार निषिध्द मानण्यात आला. असेही म्हणता येईल की, ज्याचा रंग काळसर असतो तो आणि वृक्षांच्या छेदनामुळेच जो बाहेर पडतो तो असे दोन प्रकारचे निर्यासच भोज्य पदार्थ म्हणून निषिध्द होत. अन्य प्रकारच्या निर्यासाचा, इच्छा झाल्यास, खाद्य म्हणून स्वीकार करता येतो. वृक्षच्छेदनातून बाहेर पाझरलेला निर्यास ब्रह्महत्त्येचे एक स्वरूप म्हणून पुढे विख्यात झाला.

तो इंद्र नंतर, केवळ स्त्रियाच जेथे उपस्थित असतात अशा स्त्रियांच्या सभेत जाऊन त्यांना म्हणाला की, माझ्या ब्रह्महत्त्यापातकाच्या एकतृतीयांश भागाचा तुम्ही स्वीकार करावा. स्त्रिया म्हणाल्या, 'ठीक आहे. पण आम्ही तुझ्याकडे एक वर मागतो. ऋतुप्राप्तीनंतर झालेल्या पुरुषसमागातून गर्भधारणा झाल्यानंतरही जोंवर प्रसूती होत नाही तोंवर यथाकाम पुरुषसमागम करण्यास हरकत नसावी. असा समागम निषिध्द मानला जाऊ नये आणि तो गर्भघातकही न व्हावा.' इंद्राकडून त्यांना त्यानुसार प्रकटपणे तो वर मिळाला. तेव्हापासून ऋतुप्राप्तीनंतर झालेल्या पुरुषसमागमातून गर्भधारणा झाल्यानंतरही, प्रसूतीकालापर्यंत स्त्रिया स्वेच्छेने पुरुषसमागम करू लागल्या. ब्रह्महत्त्येच्या एकतृतीयांश भागाचा स्वीकार केल्यामुळे स्त्री मलिनवसना रजस्वला झाली. ब्रह्महत्त्यारूपी मलिनता धारण करणाऱ्या रजस्वला स्त्रीबरोबर म्हणूनच भाषण करू नये, की तिच्यासह बसणे उठणे करू नये. तिने स्पर्शिलेले वा तिच्या स्वामित्वाचे अन्न देखील ग्रहण करू नये. ब्रह्महत्त्येपायीच ही रजस्वला स्त्री तितक्या दिवसात ब्रह्महत्त्यारूपी पापाचे सूचक अशा रक्तवर्णी रजाने विमोचन करीत असते. या बाबतीत

आणखी काहीजण असे म्हणतात की, स्त्रीच्या बाबतीत अंजनादिद्रव्ये शृंगारोपयोगित्वामुळे अन्नाप्रमाणेच आवश्यक असल्याने तिने दिलेल्या अंजनादिकांचाच स्वीकार करू नये, अन्य गोष्टींचा स्वीकार, इच्छा असल्यास, करण्यास हरकत नाही. तिनेही या काळात स्वत: अंजनादिकांचा उपयोग करू नये. इच्छा असल्यास इतर अन्नादिकांचे सेवन करावे.

मलिनवसना रजस्वला स्त्रीशी समागम केल्यास होणारी संतती अप्रशस्त, निंद्य ठरते. अशा स्त्रीशी अरण्यात समागम केल्यास होणारी संतती चोरी करणारी होते. लज्ज़ेमुळे वा तोंडातून शब्द बाहेर पडेल या भीतीने तोंड फिरवून बसलेल्या स्त्रीशी समागम केल्यास होणारी संतती सभेमध्ये धीटपणाला पारखी होत्साती, मान खाली घालून बसणारी होते. स्नान करणाऱ्या स्त्रीशी केलेल्या समागमातून होणाऱ्या संततीला पाण्यात बुडून मरण येते; तर शरीराला तेल माखून बसलेल्या स्त्रीशी समागम केल्यास होणारे अपत्य कुष्ठी होते. या काळात भिंतीवर वगैरे चित्रकर्म करणाऱ्या रजस्वलेच्या संततीचे केस गळून पडतात व तिला मृत्यूही वाईट प्रकारे येतो. ऋतुकालात डोळ्यात अंजन घालणाऱ्या स्त्रीची संतती काणी म्हणजे एकाक्ष होते तर दंतधावन करणाऱ्या रजस्वलेच्या अपत्याचे दात काळपट होतात. या काळात नखे कापणाऱ्या रजस्वलेच्या संततीची नखे खराब होतात तर या काळात गवत वगैरे उपटणाऱ्या रजस्वलेची संतती क्लीब होते. ऋतुकाळात दोर वळण्याचे काम करणाऱ्या स्त्रीच्या अपत्याला दोराच्या फासाने मरण येते. या काळात झाडाच्या पानांतून जलादिकांचे पान करणाऱ्या रजस्वलेच्या संततीला उन्माद होतो तर अग्निपक्व अशा मातीच्या खापरातून दुग्धादिकांचे पान करणाऱ्या रजस्वलेची संतती ठेंगणी होते.

या काळात रजस्वला स्त्रीने भावी संततीच्या निरामयतेसाठी तीन दिवस समागमवर्जनादिरूपी व्रताचे आचरण करावे. जलादिकांचे पान हाताच्या ओंजळीने करावे. तसेच दुग्धादिकांचे पान अनग्निसिध्द खापरातून करावे. (अनुवाक १).

त्वष्ट्याने एकदा यज्ञ केला. त्या यज्ञात त्याने सोमाचा हविर्भाग इंद्राला अर्पण केला नाही, कारण इंद्राकडून त्याचा पुत्र मारण्यात आला होता. आपल्याला यज्ञात आवाहन केले पाहिजे अशी इच्छा इंद्राने व्यक्त

केली. पण, 'तू माझ्या मुलाला मारलेस यास्तव मी तुला बोलावीत नाही,' असे त्वष्ट्याने इंद्रास सांगितले. इंद्राने जबरदस्तीने त्या यज्ञात प्रवेश करून सोमपान केले. तेव्हा त्या सोमातील अवशिष्ट भागाची त्वष्ट्याने 'स्वाहा इंद्रशत्रुर्वर्धस्व' असा मंत्र म्हणून आहवनीय अग्नीत आहुती दिली. 'इंद्राचा शत्रुस्वरूप असा कोणी पुरुष होऊन तू वृध्दिंगत हो', असे त्वष्ट्याला म्हणावयाचे होते. अग्नीत त्याने दिलेली आहुती हेच वृत्राचे वृत्रत्व, परंतु, वरील मंत्राचा उच्चार करताना षष्ठीसमासोपयोगी स्वराच्या उच्चाराऐवजी बहुव्रीहीसमासोपयोगी स्वराचा त्याच्याकडून चुकीने उच्चार झाल्यामुळे 'इंद्र ज्याचा शत्रू आहे असा कोणी पुरुष होऊन तू वृद्धिंगत हो,' असा आशय त्यातून व्यक्त झाला. त्यामुळे उत्पन्न झालेला वृत्र, इंद्राचा घातक होण्याऐवजी इंद्राकडून घात होणारा असाच वृत्र उत्पन्न झाला. वृत्राची उत्पत्ती झाल्यावर तो अग्नी आणि सोम यांच्याशी संगत झाला. त्या दोघांनाही त्याने व्यापून टाकले. एकदा सोडलेला बाण जितक्या अंतरावर जाऊन पडतो तितक्या प्रमाणात सर्व बाजूंनी तो सारखा वृध्दिंगत होऊ लागला. त्यामुळे सर्व लोक त्याने व्यापून टाकले. हेच त्याचे वृत्रत्व म्हणजे व्यापनशीलत्व. इंद्राला त्याचे भय वाटू लागले.

इंद्र पुढे प्रजापतीकडे धावला आणि त्याला म्हणाला की, मला मारणारा शत्रू जन्माला आला आहे. प्रजापतीने इंद्राला त्याचे वज्र अभिमंत्रून दिले व या वज्राने त्या तुझ्या शत्रूला मारून टाक, असे इंद्राला सांगितले. ते वज्र घेऊन वृत्राला मारण्यासाठी इंद्र परत फिरला.

वृत्रावर चाल करून येणाऱ्या इंद्राला अग्नी व सोम यांनी म्हटले की, इंद्रा तू वृत्रावर प्रहार करू नकोस. आम्ही दोघेही वृत्राच्या मुखात आहोत. तुझ्या वज्राने आम्हावरही प्रहार होईल. इंद्र त्यांना म्हणाला की, तुम्ही तर माझेच आहात. वृत्राला सोडून तुम्ही माझ्याकडे या. अग्नी व सोम यांनी त्यासाठी यज्ञातील काही हविर्भाग त्यांनाही मिळावा, अशी इच्छा इंद्रापाशी प्रगट केली. तेव्हा इंद्राने त्यांना पूर्णमासेष्टीमध्ये अकरा कपालांवर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचा हविर्भाग त्यांचा म्हणून देऊ केला.

नंतर ते इंद्राला म्हणाले की, आम्ही वृत्राच्या तोंडातील दंतपक्तींनी सर्व बाजूंनी आहत झालो आहोत. म्हणून आपण होऊन तोंडातून बाहेर पडू शकत नाही. तेव्हा त्यांना बाहेर यावे म्हणून इंद्राने स्वशरीरापासून

'शीत' आणि 'रूर' म्हणजे शीतज्वरातील थंडी आणि ताप यांची निर्मिती केली. शीतज्वरातील थंडी व ताप यांचा जन्म असा झाला. त्यांची ही उत्पत्ती जो जाणतो, त्याला थंडी व ताप आहत करीत नाहीत. इंद्राने नंतर आयुधस्वरूप असलेल्या या थंडीतापरूपी अस्त्रांचा वृत्रावर मारा केला. त्यामुळे जांभया देणाऱ्या, तोंड उघडून धापा टाकणाऱ्या आणि मोठमोठ्याने श्वासोच्छ्वास करणाऱ्या वृत्राच्या मुखातून अग्नी व सोम बाहेर पडले.

वृत्राच्या मुखातून अग्नी व सोम बाहेर पडले तेव्हा त्यांच्या रूपाने प्राण व अपान यांनीच जणू वृत्रशरीराचा त्याग केला. 'दक्ष' आणि 'क्रतू' ही अनुक्रमे या प्राणअपानांची नांवे होत. ज्या अर्थी त्यांना या नांवांनी संबोधिले जाते त्या अर्थी, यज्ञयागप्रसंगी ज्या वेळी शीतज्वरादिकांमुळे यजमानाचे अंग मोडून येते, तो जांभया देतो, तोंड उघडे टाकून धापा टाकतो किंवा जोरजोराने श्वासोच्छ्वास करतो त्यावेळी तत्परिहार्थ त्याने 'मयि दक्षक्रतू तिष्ठेताम्' म्हणजे माझ्या ठिकाणी दक्ष व क्रतू या संज्ञा असलेले हे प्राण व अपान वास्तव्य करोत,' अशा अर्थाचा मंत्र म्हणावा. या मंत्रपाठाच्या योगाने यजमान स्वत:च्या ठिकाणी प्राण व अपान यांचे सम्यक् धारण करतो आणि अपमृत्यूचा परिहार झाल्याने त्याचे नियत असे पूर्ण आयुष्य त्याला प्राप्त होते.

इंद्राने वृत्राच्या मुखात अडकलेल्या अग्निसोमप्रभृति सर्व देवतांना बाहेर काढले आणि वृत्राचे हनन करणाऱ्याला म्हणून पूर्णमासेष्टीमध्ये 'वार्त्रघ्न' नामक हवी समर्पित केला. त्या देवता वृत्ररूप म्हणजे व्यापनशील अशा अंधकाररूपाने विद्यमान असणाऱ्या शत्रूला पूर्णिमेच्या दिवशी ज्योत्स्नेच्या योगाने पूर्णतया नष्ट करतात. आणि अमावास्येला चांदण्याचा पूर्णपणे अभाव असल्याने पूर्णपणे त्या शत्रूला वृध्दिंगत करतात. या कारणानेच 'वार्त्रघ्न' म्हणजे वृत्रहननकृत्याशी संबध्द असलेल्या 'अग्निर्वृत्राणि जंघनत्.' व 'त्वं राजोत वृत्रहा.' या दोन ऋचांचे उच्चारण पूर्णिमेला आणि 'वृधन्वती' म्हणजे वृत्राच्या अभिवर्धनकृत्याशी संबध्द असलेल्या 'कविर्विप्रेण वावृधे' व 'वर्धयामो वचोविद:' या ऋचांचे उच्चारण अमावास्येला केले जाते.

वृत्रहननाच्या हेतूने आज्यस्वरूप वार्त्रघ्न हवीचे हवन करण्याचे कृत्य पूर्ण झाल्यावर इंद्र हातात वज्र घेऊन भूमीपासून द्युलोकापर्यंत म्हणजे अंतरिक्षात

विस्तारलेल्या वृत्राचा वध करण्याच्या हेतूने पुनश्च त्याच्यावर चालून गेला. त्यावेळी पृथ्वी आणि अंतरिक्ष यांनी त्याला म्हटले की तू वृत्रावर प्रहार करू नको. कारण पृथ्वीपासून द्युलोकापर्यंत म्हणजे समस्त आकाशाला व्यापून आम्हा दोघांच्या आश्रयाने तो सध्या राहत आहे. सध्या तो एकप्रकारे आमचाच आहे. त्याला मारू नकोस. आपले म्हणणे इंद्र मान्य करीत नाही असे पाहून त्या दोन देवता त्याला पुन: म्हणाल्या की, तू आमचा आश्रित असलेल्या वृत्रावर प्रहार कर पण त्यासाठी आम्ही तुझ्याकडे एक वर मागतो. नक्षत्रादिकांनी आपण अलंकृत असावे असा वर द्युदेवतेने म्हणजे अंतरिक्षाने मागितला, तर मनुष्यपशुवृक्षपर्वतनदीसमुद्रादिरूपी चित्रविचित्र पदार्थांनी मी अलंकृत असावे असा वर पृथ्वीदेवतेने मागितला. या वरांच्या योगाने तेव्हापासून आकाशदेवता नक्षत्रादिकांनी व पृथ्वीदेवता मनुष्यादि चित्रविचित्र पदार्थांनी अलंकृत झाली. आकाश आणि पृथ्वी यांना मिळालेला हा वर जो जाणतो त्याला स्वाभीष्ट वराची प्राप्ती होते. नंतर द्यावापृथ्वींच्या अनुज्ञेने त्यांच्या आश्रयाला असलेल्या वृत्राला इंद्राने मारून टाकले.

इंद्राने वृत्राचे हनन केल्यानंतर त्याच्या मुखातून बाहेर पडलेल्या अग्नी व सोम यांना इंद्राच्या बाजूला असलेल्या समस्त देवांनी म्हटले की, या वृत्रहननकार्याप्रीत्यर्थ तुम्ही आमच्यासाठीही यज्ञयागात हविर्भागाचे वहन करावे. तेव्हा ते अग्नी आणि सोम त्या देवांना म्हणाले की, वृत्राने वारंवार आम्हाला दंश करून स्वत:च्या मुखात बंदिस्त करून ठेवल्याने आम्ही गततेजस्क झालो आहोत, आमचे तेज वृत्राच्या ठिकाणीच राहिले आहे. ते ऐकून ते देव एकमेकांत वार्तालाप करू लागले की वृत्राच्या ठिकाणी राहिलेले अग्निसोमांचे तेज आणण्यासाठी आपल्यातील कोण जाऊ शकेल? तेव्हा त्या देवांमध्ये बुध्दिमान असणारे देव म्हणाले की, सर्वांशी मित्रता असल्याने, कुणाशीच वैर नसल्याने गायच वृत्रशरीरातून ते तेज घेऊन येण्यास योग्य होय. तेव्हा गाय म्हणाली की, यासाठी मी एक वर मागते. अग्नीसोमसंबंधी घृतदुग्धरूपी तेज वृत्रशरीरातून मी घेऊन येईन. पण ते नंतर नित्य माझ्याच ठिकाणी राहील. आणि त्या उभयगत पण मत्स्थित घृतदुग्धरूपी तेजाचे तुमच्याकडून तुमचे भोजन निष्पन्न होण्याकरीता म्हणून ग्रहण केले गेले पाहिजे. तसा वर मिळाल्यानंतर गाईने त्या तेजाचे आहरण केले. हा वर गाईला मिळाला तेव्हापासून गाईच्या ठिकाणी असलेल्या घृतदुग्धरूपी उभयात्मक तेजाचा म्हणजे

सामर्थ्याचा स्वीकार करूनच त्रैलोक्यातील सर्वजण आपापले भोजन निष्पन्न करू लागले. हे जे गाईचे घृत तेच अग्नीचे तेज व तिचे दूध हेच सोमाचे तेज होय. अग्नी व सोम यांचे गाईच्या ठिकाणी निविष्ट झालेले हे उभयात्मक तेज जो जाणतो तो तेजस्वी होतो.

ब्रह्मवादी विचारतात की, पौर्णमासी इष्टीची देवता कोणती? ती देवता प्रजापती म्हणजे ती इष्टी प्राजापत्य होय, असे त्यावर सांगतात. या पौर्णमाससंबंधी कृत्याने प्रजापतीने आपला जेष्ठ पुत्र जो इंद्र त्याला निःशेष म्हणजे आयुष्यभर पुरेल इतके धन देऊन उत्तम प्रकारे सुस्थित केले. हे असे आहे म्हणूनच लोकांत देखील बहुतेकजण आपापल्या जेष्ठ पुत्राला निःशेष म्हणजे त्याच्या हयातीपर्यंत पुरेल इतके धन देऊन त्याला सुस्थित करण्यासाठी अवश्य ते सर्व करीत असतात. (अनुवाक २).

वृत्राला मारणाऱ्या इंद्रावर वृत्राचे पक्षपाती असणारे इंद्राचे शत्रू सर्व बाजूंनी चाल करून आले. आणि त्यांनी इंद्राला भयावह रीतीने धमकाविले. त्या वेळी त्या इंद्राला पूर्णमास यागात प्रधान कर्मानंतर, शत्रुपक्षातील वैऱ्यांचा नाश करणाऱ्या 'विमृत्' नांवाच्या देवाला उद्देशून ज्याची आहुती दिली जाते असा अकरा कपालांच्यावर भाजून तयार केला जाणारा 'वैमृध' नांवाचा पुरोडाश दिसला.तेव्हा इंद्राने या शत्रुविमर्दक वैमृधसंज्ञक पुरोडाशाचे पूर्णमासयागात यथाविधी हवन केले आणि वृत्रपक्षपाती शत्रूंना पिटाळून लावले.

अशाप्रकारे जेव्हा पूर्णमासयागात यजमानाकडून उपरिनिर्दिष्ट वैमृधसंज्ञक पुरोडाशाचे प्रधानकर्माच्या नंतर यथाविधी समर्पण केले जाते, तेव्हा यागसमाप्तीनंतर त्या यजमानाकडून त्याचे वैरी पिटाळून लावले जातात.

वृत्राला मारून टाकण्याच्या उद्योगात आणि वृत्राच्याच भीतीपायी इंद्राला आपल्या स्वस्थानापासून दूर अंतरावर पळून जावे लागल्यामुळे तो स्वपक्षीय देवांच्यापासून वेगळा पडला आणि आपल्या इंद्रियसामर्थ्यानेही उणावला. तेव्हा इंद्राने अमावास्येष्टीत अर्पण केलेला अष्टकपालात्मक आग्नेय चरू आणि पूर्वावतारातील इंद्रदेवतेला अर्पिलेले दही पाहिले. तदनुसार मग त्यानेही तशा प्रकारे अष्टकपालात्मक चरू अग्नीला आणि दही इंद्राला समर्पित केले. त्या योगाने त्याला पुनश्च स्वतःच्या सहकारी देवतांची आणि स्वतःच्या इंद्रियसामर्थ्याची प्राप्ती झाली.

जो यजमान वरीलप्रमाणे अमावस्येष्टीत अष्टकपालात्मक आग्नेय चरू

अग्नीला आणि दही इंद्राला समर्पित करतो, तो वरीलप्रमाणे देवता आणि इंद्रियसामर्थ्य यांची प्राप्ती करून घेतो.

वृत्राला मारणाऱ्या इंद्राचे आंगिक सामर्थ्य पृथ्वीवर इतस्ततः गळून पडले. त्यापासून नाना प्रकारच्या 'औषधी' म्हणजे फलरूपात पर्यवसित होणाऱ्या वनस्पती आणि 'वीरुध' म्हणजे वेली वगैरे वनस्पती उत्पन्न झाल्या. तेव्हा इंद्राने प्रजापतीकडे जाऊन त्याला सांगितले की, वृत्राला मारण्याच्या उद्योगात माझे आंगिक तेज पृथ्वीवर इतस्ततः गळून पडले आणि त्यापासून ओषधी व वीरुध या प्रकारच्या वनस्पती उत्पन्न झाल्या. तेव्हा प्रजापतीने गायप्रभृती पशूंना सांगितले की, सद्यःकाळी वनस्पतींच्या ठिकाणी विद्यमान असणारे इंद्राचे इंद्रियतेज तुम्ही त्यांच्याकडून ग्रहण करून परत इंद्राकडे पोचते करा. त्याप्रमाणें पशूंनी वनस्पतींच्या पासून इंद्राच्या त्या इंद्रियतेजाचे ग्रहण केले व आपापल्या शरीरात त्याची सम्यक् रीतीने स्थापना केली. आपल्या ठिकाणी प्रस्थापित झालेल्या त्या इंद्राच्या इंद्रियसामर्थ्यांचे नंतर दुग्धादिरूपाने दोहन करून पशूंनी त्या स्वरूपात ते इंद्राला समर्पित केले. गायप्रभृती पशूंच्या कडून अशाप्रकारे इंद्राचे इंद्रियसामर्थ्य गोरसरूपाने सम्यक्तया परत इंद्राकडे आणविले जाणे, हेच त्या 'सांनाय्य' संज्ञक गोरसाचे सांनाय्यत्व. गोरसाला सांनाय्य हे नांव म्हणूनच देण्यात येते. या गोरसाचे इंद्रासाठी प्रतिदिन दोहन केले जात असल्याने 'प्रतिधुक्' हेही नांव त्या गोरसाला अन्वर्थक ठरते.

इंद्र प्रजापतीला म्हणाला की, हे प्रजापते, तुझ्या आज्ञेने गायप्रभृती पशू माझे इंद्रियसामर्थ्य सम्यक्तया माझ्याकडे आणून देतात आणि प्रतिदिन त्याचे माझ्यासाठी क्षीररूपात दोहन करून मला ते अर्पण करतात. पण या क्षीररूपात हे सामर्थ्य माझ्या ठिकाणी ठरत नाही, पचनाभावी माझ्या उदरात ते जिरत नाही. तेव्हा प्रजापतीने पशूंना सांगितले की, हे क्षीर तुम्ही इंद्राला 'शृत' म्हणजे पक्व करून देत जा. तेव्हा त्या पशूंनी ते क्षीर इंद्राला शृत करून म्हणजे तापवून दिले. त्या योगाने ते क्षीररूपी इंद्रियसामर्थ्य इंद्राच्या ठिकाणी उत्तमप्रकारे आश्रय करून राहू लागले; अर्थात् इंद्राच्या उदरात पचू लागले. सम्यक्तया शृत म्हणजे पक्व होऊन शरीरात आश्रित होऊन राहणें हेच क्षीराचे शृतत्व. शृत हे त्याचे नांव यावरूनच निष्पन्न झाले.

इंद्र प्रजापतीला म्हणाला की, माझ्या इंद्रियसामर्थ्याचे क्षीररूपाने सम्यक् आनयन करणें, प्रत्यही त्याचे दोहन करणें व नंतर ते शृत म्हणजे सम्यक् पक्व करणे या सर्व गोष्टी पशूंच्याकडून होत असल्या तरी ते क्षीर मला प्रचोदित म्हणजे काम करण्यास प्रवृत्त करीत नाही. तेव्हा प्रजापतीने 'आनंचन' म्हणजे दुधाचे ताक करणे हे कर्म करणाऱ्यांना सांगितले की, आता त्या क्षीराचे दही करून इंद्राला द्या. तेव्हा त्यांनी त्या क्षीराचे दही करून दिले. त्यायोगे त्याच्या ठिकाणी काम करण्याविषयी प्रेरणा उत्पन्न झाली. दधीचे दधित्व ते हेच दधी हे नांव त्याच्या प्रेरकता या धर्मावरूनच निष्पन्न होते.

ब्रह्मवादी म्हणतात की, दही हे पूर्वी म्हणजे पूर्व दिवशी रात्री केले जाते. यास्तव क्षीरदधिइत्यादिकांच्या आहुती जेव्हा द्यावयाच्या तेव्हा दह्याची आहुती प्रथम क्षीराच्या आहुतीच्या पूर्वी द्यावी.

पण सिध्दान्ती या मताचा अनादर करून म्हणतो की, दह्याचे अवदान देण्याच्या अगोदर शृत क्षीराचेच प्रथम अवदान द्यावे. कारण शृतरूपात इंद्राच्या ठिकाणी इंद्रियसामर्थ्य आधी सम्यक्तया अवस्थित होत असते. आणि नंतर प्राप्त होणाऱ्या दधिरूपाने ते इंद्राला कार्यप्रवृत्त करते. क्षीर आधी असते आणि दही नंतर संभवते. या उत्पत्तिक्रमावरूनही दह्याच्या अगोदर क्षीराचेच अवदान योग्य ठरते.

सोमवल्लीशी सादृश्य असणाऱ्या 'पूतिक' संज्ञक वेलीचे तुकडे अथवा 'पर्णवल्क' म्हणजे पलाशवृक्षाच्या सालीचे तुकडे दुधात टाकून विरजलेले दही सोमदेवतेला प्रिय असते. तसेच, बोरीची फळे दुधात टाकून विरजलेले दही राक्षसांना तर तंडुलकण दुधात टाकून विरजलेले दही विश्वेदेवांना प्रिय असते. 'आनंचन' म्हणजे फार आंबट नसलेले ताक दुधात टाकून विरजलेले दही मानवांना प्रिय असते, आणि दहीच दुधात टाकून विरजलेले दही इंद्रदेवतेला प्रिय असते. यास्तव, इंद्रदेवतेच्या प्रीत्यर्थ द्यावयाचे अवदान दुधात दही टाकून विरजलेल्या दह्याचेच द्यावे.

अग्निहोत्रयागात उपयोजून अवशिष्ट राहिलेले यवागूसंज्ञक द्रव्य दुधात टाकून विरजलेल्या आनंचित म्हणजे ताकाप्रमाणे अम्लरसस्वभावी द्रव्याचे अवदान, त्या यज्ञाचे सातत्य कायम रहावे म्हणून, अग्निहोत्रयागानंतरच्या दर्शयागात करण्यात येते.

वृत्राचा वध केल्याने आपण असुरांचा अपराध केला असे मानून इंद्र भीतीने पार दूर निघून गेला. बाकीच्या देवतांनी त्याला शोधून आणावयाचे ठरविले. तेव्हा प्रजापती म्हणाला की,, तुम्हांपैकी जो इंद्राला प्रथम शोधून काढील त्याला अवदानातील प्रथम भाग दिला जाईल. इंद्राला पितृदेवतांनी प्रथम शोधून काढले. याच कारणासाठी पितरांना उद्देशून पूर्वदिवशी पिण्डपितृयज्ञ करावयाचा असतो. दर्शयागाच्या देवतांना उद्देशून केल्या जाणाऱ्या यागाचा आरंभ अमावास्येला होतो आणि प्रतिपदेला त्याची सांगता होते.

पितरांना उद्देशून केले जाणारे पिण्डदान मात्र पूर्व दिवशी म्हणजे अमावास्येलाच केले जाते.

पितरांनी शोध घेतल्यानंतर इंद्र पलायनदेशातून स्वस्थानी अमावास्येच्या दिवशी परत आला. त्याला भेटण्यासाठी त्याच्यापाशी एकत्र जमा झालेले ते सर्व देव आपापसात बोलू लागले की, आम्हा सर्वांचे सामुदायिक सर्वश्रेष्ठ धन आज आम्हाला पुनः प्राप्त झाले आहे. इंद्र हेच आम्हा देवांचे सर्वश्रेष्ठ सामुदायिक धन होय. अमा म्हणजे आमच्यापाशी या इंद्ररूपी धनाचे वास्तव्य आज पुनश्च होत आहे, असे देवांनी ज्या दिवसाला उद्देशून म्हटले तो दिवस म्हणजेच अमावास्या,अमावास्येचे अमावास्यात्व ते हेच.

ब्रह्मवादी विचारतात की, सांनाय्यसंज्ञक हविर्भागाची देवता कोणती? कोणत्या देवतेला उद्देशून हा हवी समर्पण करावयाचा? त्यावर उत्तर देतात की, हा सांनाय्य हवी वैश्वदेवात्मक आहे; विश्वेदेवांना उद्देशून त्याचे समर्पण केले जावे. कारण पितरांनी शोध घेतल्यानंतर परत आलेल्या इंद्राला सामोरे जाणारे ते सर्व देव सांनाय्याच्या अपेक्षेनेच इंद्रापाशी आले होते. अथवा, हा सान्नाय्य हवी ऐंद्र होय, इंद्रदेवतेला उद्देशूनच हा हवी अर्पण करण्यात यावा, हे म्हणणेही बरोबर आहे. कारण, सान्नाय्याच्या अपेक्षेने नव्हे, तर भीतीने दूरदेशी गेलेला त्यांचा स्वामी इंद्र परत आला, त्यांचे सर्वश्रेष्ठ सामुदायिक धन त्यांना पुनश्च प्राप्त झाले, म्हणून त्याला भेटून त्याला आश्वस्त करून त्याचे भय निवारण्यासाठी ते सर्व देव त्याच्या भेटीसाठी त्याला सामोरे गेले होते. अर्थात् सांनाय्य हे वैश्वदेवात्मक नसून ऐंद्रच मानणें योग्य होय. (अनुवाक ३).

ब्रह्मवादी म्हणतात की, जो यजमान दर्श आणि पूर्णमास हे दोन

याग करताना ते इंद्रदेवतेला उद्देशून करतो, तोच खरोखर दर्शपूर्णमासयाजी होतो. 'वैमृध' आणि 'सान्नाय्य' या हविर्द्रव्यांचे हवन या यागात केल्याने त्यांचे इंद्रसहितत्व संपादिले जाते. पूर्णमास यागात वैमृधसंज्ञक क्षीररूपी हवी इंद्राला अर्पिला जातो. त्यामुळे तो याग इंद्रसहित होतो. आणि 'ऐंद्र' म्हणजे इंद्राला उद्देशून असलेला दधिस्वरूप हवी अमावास्येला अर्पिला जातो म्हणून अमावास्या इंद्रसहित होते. जो यजमान हे जाणतो आणि तदनुसार दर्श आणि पूर्णमास हे दोन याग करतो त्याचे ते दोन्ही याग सेंद्र म्हणजे इंद्राला उद्देशून केल्यासारखे होतात. आणि त्यायोगे उत्तरोत्तर प्रतिदिन त्याच्या ठिकाणी धनाची अभिवृध्दी होत जाते.

देवांनी केलेला यज्ञ व त्यांना त्यामुळे झालेला लाभ पाहून असुरांनीही, देवांनी यज्ञात जे जे केले, ते ते करण्यास आरंभ केला. असुरांची ही इष्टी देवांनी पाहिली. तेव्हा त्या असुरांची वंचना करून त्यांच्या त्या इष्टीच्या नंतर देवांनी पौर्णमास याग केला व त्यात एकादशकपालांवर शिजविलेल्या पुरोडाशाचा हवी अग्नी व विष्णू यांच्यासाठी, सरस्वतीदेवतेसाठी चरू आणि सरस्वान् देवतेसाठीही चरू याप्रमाणे हविर्द्रव्यांची स्थापना करून त्यांचे यथाविधी निर्वपण केले. त्या योगे देवांचा विजय झाला व असुर पराभूत झाले.

ज्याचे शत्रू विद्यमान असतात असा यजमान जेव्हा उपरिनिर्दिष्ट इष्टीच्या नंतर पौर्णमास याग संपन्न करतो आणि शेवटी अग्नी व विष्णू या देवतांना एकादशकपालात्मक पुरोडाश व सरस्वती आणि सरस्वान् या देवतांच्यासाठी वेगवेगळे चरू यांचे निर्वपण करतो तेव्हा प्रधानस्वरूप असलेला तो पौर्णमास याग यजमानाच्या शत्रूना वज्रासमान होतो. या यागाने यजमानाच्या शत्रूंवर जणू वज्रप्रहारच केल्यासारखे होते. अग्नी हा सर्वदेवात्मक आणि विष्णू हा यज्ञस्वरूप असल्याने त्यांना समर्पित केलेल्या हविर्द्रव्यांच्या योगाने शत्रुपक्षीय देवता, त्यांचा यज्ञ व त्यांचे सर्व उद्योग यांचाच तो यजमान जणू नाश करतो. सरस्वती आणि सरस्वान् या स्त्रीपुरुषदेवतांना समर्पित केलेल्या हवीच्या योगाने यजमानाच्या शत्रूकडील समस्त स्त्रीपुरुषात्मक पशूंचा विनाश होतो. एवं च, या पौर्णमास यागाने शत्रुपक्षाचे जितके आणि ज्या प्रकारचे धन असेल त्या सर्वांचा नाश होतो.

ज्याला शत्रू असतील अशा यजमानाने वरीलप्रमाणे पौर्णमासीलाच

यजन करावे; अमावास्येला करू नये. पूर्णमासाचे अनुष्ठान केल्याने त्याने आपल्या शत्रूला मारून टाकल्यासारखे होते व दर्शयागाचा त्याग केल्याने शत्रूचा कायमचा काटा काढल्यासारखे होते.

दही आणि दूध यांनी भरलेल्या आणि ब्राह्मणांकडून ज्यांचे वहन केले जात आहे अशा दधिक्षीरपूर्ण चार कुंभांच्या समवेत जाणारा अध्वर्यू ज्या यागात होमस्थानाकडे प्रस्थान करतो त्या यागाला 'साकंप्रस्थानीय' म्हणतात. पशुधनाची इच्छा करणाऱ्या यजमानाने या साकंप्रस्थानीय यागात यजन करावे. या यज्ञात विपुल अशा क्षीररूपी द्रव्याने युक्त असलेल्या हवीचे हवन करावयाचे असते. लौकिक व्यवहारात असे दिसून येते की, ज्या राजाच्या प्रजा त्याला कररूपात अल्प प्रमाणात धन देतात तो राजा तितक्याने स्वत: पूर्णपणे संतुष्ट होत नाही व इतरांनाही पुरेसे दान करू शकत नाही. पण ज्याला त्याच्या प्रजा विपुल प्रमाणात कररूपाने धन देतात तो स्वत: तर तृप्त होतोच पण इतरांनाही प्रचुर प्रमाणात दान देऊ शकतो. म्हणूनच प्रस्तुत यागात हविर्द्रव्याचा होम विपुल प्रमाणात केला म्हणजे त्या योगाने यागदेवता असणारा इंद्रदेव स्वत: सम्यक्तया तृप्त होतो व यजमानालाही विपुल प्रमाणात प्रजा आणि पशू मिळवून देऊन त्याला तृप्त करतो.

या यागात क्षीरद्रव्याची आहुती देण्यासाठी मातीच्या नव्हे तर लाकडी पात्राचीच योजना करावी. कारण या यागात थोड्या थोड्या प्रमाणात व वरचेवर नव्हे तर एकदाच पूर्ण पात्र भरून क्षीरहवीचा होम करावयाचा असतो. आणि इतके क्षीरद्रव्य मातीच्या पात्रात मावतही नाही.

हे पात्र 'औदुम्बर' म्हणजे उंबराच्या झाडापासून तयार केलेले असावे. उदुम्बर हा सामर्थ्यस्वरूप असतो. पशू देखील 'ऊर्कमय' म्हणजे सामर्थ्यस्वरूप असतात. म्हणून ऊर्जास्वरूप उंबराच्या पात्रातून क्षीरद्रव्याचे हवन केले म्हणजे त्या यजमानाला ऊर्जा व पशू यांची प्राप्ती होते.

ज्याच्या ठिकाणी श्री म्हणजे ऐश्वर्य नसते अशाने महेन्द्रदेवतेचे यजन करू नये. ज्याच्या ठिकाणी श्री म्हणजे ऐश्वर्य निवास करीत असते अशा व्यक्ती तीन: शुश्रुवान् म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद या वेदत्रयीचा अभिज्ञ, ग्रामणी म्हणजे ग्रामाध्यक्ष आणि राजन्य म्हणजे राजपुत्र. महेन्द्र

ही त्यांची देवता असते. जो पुरुष आपल्या देवतेला सोडून अन्य देवतांचे यजन करतो, तो स्वत:च्या देवतेपासून तर च्युत होतोच पण परकीय देवताही त्याला प्राप्त होत नाही. इतकेच नव्हे तर त्याच्या देवतेच्या शापाने तो पापी व दरिद्री होतो.

एका संवत्सराहून अधिक काळ व्रताचे अनुष्ठान करावयाचे नसते. म्हणून ज्याच्या ठिकाणी श्री म्हणजे ऐश्वर्य नसते त्याने एक संवत्सरपर्यंत इंद्रदेवतेचे यजन करावे. त्यानंतर पुढील एक संवत्सरपर्यंत स्वीय देवतेचे यजन करावे. तसे केले म्हणजे ती देवता त्या यजमानाला ऐश्वर्यप्राप्तीसाठी प्रकाशित म्हणजे उद्दीपित करते. त्यायोगे तो अधिक ऐश्वर्यसंपन्न होतो.

अग्नी हा व्रतपालक आहे. म्हणजे यजमानाने आरंभिलेल्या व्रताचे सम्यक्तया पालन अग्नीमुळेच होत असते. यास्तव एक संवत्सर पूर्ण झाल्यानंतर व्रती यजमानाने आठ कपालांवर शिजवून तयार केलेल्या पुरोडाशाचा हविर्भाग व्रतपालक अग्नीला अर्पण करावा. पूर्वी महेंद्राला उद्देशून याग करण्याचा अधिकार हिरावून घेण्याचे पाप हेच ज्याचे स्वरूप आहे अशा वृत्राला मारणाऱ्या यजमान इंद्राने एक संवत्सरपर्यंत पूर्वावतारातील इंद्राला उद्देशून, अपेक्षित अधिकार प्राप्त व्हावा म्हणून व्रतानुष्ठान केले, त्यावेळी या व्रतपती अग्नीने इंद्राच्या व्रताचा प्रतिपाळ केला. म्हणजे त्याचे व्रतानुष्ठान निर्विघ्नपणे शेवटास नेले. व्रतपती अग्नीचा हा व्रतपालक स्वभाव ध्यानात घेऊनच एकसंवत्सरपर्यंत करावयाच्या व्रतानुष्ठानानंतर उपर्युल्लिखित पुरोडाश त्याला यजमानाने अर्पण करावयाचा असतो.

अशाप्रकारे एकवर्षपर्यंत केलेल्या व्रतानुष्ठाच्या शेवटी व्रतपती अग्नीला उद्देशून अष्टकपालात्मक पुरोडाश अर्पण करण्याची इष्टी करून झाल्यानंतर त्या ऐश्वर्यहीन यजमानाने त्याच्या इच्छेनुसार इंद्र वा महेंद्र यांपैकी कोणत्याही देवतेला उद्देशून यजन करावे. कारण या इष्टीमुळे त्याला आता महेंद्रालाही उद्देशून यजन करावे. कारण या इष्टीमुळे त्याला आता महेंद्रालाही उद्देशून यजन करण्याचा अधिकार प्राप्त झालेला असतो. (अनुवाक ४).

ज्याने सोमयाग केलेला नाही त्याने दर्शेष्टीच्या दिवशी 'सान्नाय्य' करू नये. कारण ज्याने सोमयाग केलेला नसतो त्या यजमानाला पय म्हणजे दूध हे शास्त्रदृष्ट्या प्राप्त झालेले नसते. यास्तव असोमयागी म्हणजे सोमयाग

न केलेला यजमान जर सान्नाय्य करील तर चोर ठरेल. आणि त्याने अनृत म्हणजे खोटेपणाचे वर्तन केल्यासारखे होईल. शिवाय अग्नीत प्रक्षिप्त केले जाणारे ते सांनाय्यसंज्ञक द्रव्य अन्यायाने तयार केलेले असल्यामुळे अग्नीच्या पलीकडे भस्मावरच प्रक्षिप्त केल्यासारखे होऊन विफल होते. यास्तव सोमयाजी जो असेल त्यानेच दर्शेष्टीस सान्नाय्य करावे. सोम हा औषधींचा सारभूत रस असल्याने पयोरूप असून सान्नाय्यही पयोरूपच आहे. म्हणूनच सोमयाजी जो असतो तो सोमरूप पयासह सान्नाय्यरूप पय आपल्या ठिकाणी धारण करतो.

जो यजमान यागात अर्पण करण्याचे हविर्द्रव्य चतुर्दशीच्या दिवशी प्रात:कालीन अग्निहोत्रानंतर, आता ही अमावास्याच होय, अशी भ्रांती होऊन त्यामुळे दुसरे दिवशी चंद्राचा उदय होणार, त्या दिवशी देवतांना अर्पण करावयाचे हविर्द्रव्य तयार करून ठेवावे, अशा समजुतीने पूर्वीच म्हणजे चंद्रोदय होण्यापूर्वी निरूप म्हणजे संपादित करून ठेवतो,त्या यजमानाला नंतर म्हणजे प्रतिपदेच्या दिवशी पूर्व दिशेला उदय पावलेला चंद्र प्रजा आणि पशू यांनी विरहित करतो, आणि त्याच्या शत्रूची मात्र अभिवृध्दी करतो. असे न व्हावे, भ्रांतीमुळे अयोग्य वेळी संपादन करून ठेवलेले हविर्द्रव्य निरुपयोगी ठरून यजमानाचे त्या योगे नुकसान न व्हावे म्हणून चतुर्दशीच्या रात्रीच त्याने हविर्द्रव्याचे निर्वपण म्हणजे संपादन करून ठेवावे व चंद्रोदयाची वाट पाहत रहावे. त्यासाठी त्याने तंडुलकणांचे तीन भाग करावेत. पैकी मध्यम भागापासून अष्टकपालात्मक पुरोडाश दात्या अग्निदेवतेला अर्पण करण्यासाठी तयार करावा, अधिकांश भागापासून एक चरू प्रदात्या म्हणजे विपुल धन देणाऱ्या इंद्राला अर्पण करण्यासाठी आणि तिसऱ्या अल्पांश भागापासून म्हणजे अल्पसंख्याक तंडुलकणांपासून शृत म्हणजे तापविलेल्या दुधात तयार केलेला चरू शिपिविष्ट म्हणजे जलनिवासी विष्णूसाठी सिध्द करून ठेवावा. असे केल्याने अग्नी त्या यजमानाच्या ठिकाणी प्रजांची निर्मिती करतो तर इंद्र त्या प्रजेची अभिवृध्दी घडवून आणतो. विष्णू हाच यज्ञ असून शिपी या शब्दाचा अर्थ पशूही असल्याने विष्णू त्या यजमानाला यज्ञ आणि पशू यांच्या ठिकाणी सुप्रतिष्ठित करतो.

काहीजण म्हणतात की, पौर्णमासीला अन्वाधान करून प्रतिपदेला

पौर्णमासयाग करावा आणि त्याच वेळी प्रतिपदेला पुनश्च अन्वाधान करून द्वितीयेला पौर्णमास याग करावा. अमावास्येला देखील असेच करावे. अशी समृध्दिकामेष्टीच चांगली असते. परंतु, पूर्णिमेला आणि अमावास्येला याप्रमाणे दोन वेळ यजन करावे हे सिध्दान्तीचें म्हणणे युक्त नव्हे. कारण आधीच्या पूर्णिमेला यजन केल्यानंतर पुनश्च दुसऱ्यांदा पौर्णमास याग करणे जसे व्यर्थ ठरेल तसेच दुसऱ्या पौर्णमास यागाच्या सम्यक् अनुष्ठानाने पहिले पूर्णमासीचे यजन व्यर्थ ठरेल. आणि मग इष्टी दोन वेळ केली असेही म्हणता येणार नाही. कारण इष्टीत अधिक आवृत्ती विहित नसते. इतकेच नव्हे तर अनुष्ठानाला अग्रिष्टोमादि यज्ञही म्हणता येणार नाही. कारण प्रात:सवनादि कृत्ये तशा स्थितीत होऊ शकणार नाहीत. उलटपक्षी, अशाप्रकारे दोन वेळ यजन केल्याने उभयत: भ्रष्ट झाल्याने अनुष्ठान करणाऱ्या यजमानाला विद्वत्सभेत लाजून तोंड खाली घालून बसावे लागेल, कोणी विचारल्यास समर्पक उत्तरही देता येणार नाही. म्हणून समृध्दीची इच्छा करणाऱ्या यजमानाने उपर्युल्लिखित अनुष्ठान आवृत्त रूपात म्हणजे दोन वेळ न करता पौर्णमासीला व अमावस्येला मिळून एकदाच करावे. म्हणजे त्या यजमानाचा पुत्र देखील विद्वत्सभेत तोंड वर करून बोलण्याइतका प्रगल्भ होऊ शकेल.

वरील पूर्वपक्षाचा अनादर करून सिध्दान्ती म्हणतो की, यजन पूर्वी सांगितल्याप्रमाणे दोनदाच करावे. याचे कारण असे की, योग्य रीतीने अनुष्ठिलेल्या आधीच्या इष्टीने यज्ञमुखाची प्राप्ती होते तर नंतरच्या इष्टीने त्या यज्ञमुखात आहुती देऊन यज्ञाची सांगता होते. आधीच्या इष्टीने देवतांची तर नंतरच्या इष्टीने इंद्रियसामर्थ्याची प्राप्ती होते, तसेच आधीच्या इष्टीने देवलोकावर व नंतरच्या इष्टीने मनुष्यलोकावर विजय मिळतो. अर्थात् कोणतीही इष्टी व्यर्थ होत नाही. धड इष्टी नाही व धड यज्ञ नाही, असेही घडत नाही. कारण प्रत्येकश: इष्टी असतांही या एकूण कृत्याला सामूहिकतेमुळे प्रौढयज्ञत्व प्राप्त होते. किंबहुना अशा प्रकारच्या म्हणजे द्विवार केलेल्या अनुष्ठानाच्या योगाने यजमानाला एकदिवसीय, अदिवसीय, अनेकदिवसीय अशा अनेक यज्ञक्रतूंची प्राप्ती होते. किंबहुना, प्रतिपदेला पुनश्च अग्न्याधान करून द्वितीयेला दुसऱ्यांदा यजन करू इच्छिणाऱ्या यजमानासाठीच जणू सुहृद्भावाने चंद्र उदयाला येत असतो. म्हणूनच या इष्टीला 'सुमना' म्हणतात. या अशा उभयविध इष्टीने यजमानाला इहलोकीच समृध्दता प्राप्त होते.

ज्याला स्वर्गाची कामना असेल त्याने दाक्षायण यज्ञाचे अनुष्ठान करावे. वर जी दोन वेळ मिळून करण्याची इष्टी सांगितली तीत उत्तरकालीन पौर्णमासात इंद्रदेवतेसाठी सान्नाय्य अर्पण करावे आणि अमावास्येला मित्र व वरूण या देवतांना उद्देशून आमिक्षा नामक द्रव्याने (घट्ट दही) यजन करावे.

इंद्रदेवतेसाठी ज्याप्रमाणे दही तयार ठेवावयाचे असते त्याप्रमाणे पूर्णमासेष्टीत देवांच्या साठी सोमाचे अभिषवण करावयाचे असते. पौर्णमासीपासून अमावास्येपर्यंतच्या पंधरवड्यात हे निरंतर करावयाचे असते.

मित्र आणि वरुण यांच्यासाठी अमावास्येच्या दिवशी जी आमिक्षा तयार केली जाते तीच देवांची अनूबंध्या वशा म्हणजे बळी म्हणून देण्याची भाकड गाय समजावी. या अनुष्ठानात पूर्व दिवशी म्हणजे शुक्ल प्रतिपदेला यजमानाकडून जे यजन केले जाते ते म्हणजे सोमासाठी वेदी तयार केल्यासारखेच होय. तसेच त्या दिवशी गोवत्सांना तेथून अपाकृत म्हणजे दूर काढून लावले जाते त्यायोगे यजमानाकडून सदोमंडप व हविर्धानमंडप या दोन मंडपांचे जणू संपादन केल्यासारखे होते. द्वितीयेला प्रातःकाळी यजमान अग्नीला उद्देशून अर्पण करावयाच्या अष्टकपालात्मक हवीचे जेव्हा यजन करतो तेव्हा त्याने देवांना अभिप्रेत असलेले सोमाचे अभिषवणच संपादित केल्यासारखे होते. अशा प्रकारे अनुष्ठान करणारा तो यजमान मग शुक्लपक्षातील अर्धमासपर्यंत सातत्याने देवांच्यासह मोठ्या उल्लासाने सोमपान करतो. मित्र आणि वरुण यांना उद्देशून अमावास्येच्या दिवशी जी आमिक्षा यजमानाडून अर्पण केली जाते, की जी देवांच्या दृष्टीने अनूबंध्या वशा असते, ती आमिक्षा सोमयागाच्या शेवटी त्या यजमानाचीच होते. जो यजमान या अग्न्यादी देवतांना उद्देशून करण्यात येणाऱ्या यज्ञांचे सम्यक् अनुष्ठान करतो तो साक्षात् त्या देवांच्या बरोबरीचा होतो. म्हणजे देवयोग्य भोगांचा दीर्घकाळपर्यंत उपभोग घेतो. इतकेच नव्हे तर एखादा श्रेष्ठ पुरुष उच्च पदावर आरूढ झाल्यानंतर जे जे इच्छितो ते ते प्राप्त करून घेतो त्याप्रमाणे हा 'आवृत्तयाजी' म्हणजे वरील प्रमाणे प्रस्तुत यज्ञानुष्ठानाची आवृत्ती करणारा यजमान अपेक्षित फळांची पुन:पुन: प्राप्ती करून घेतो. वरील यज्ञ करणाऱ्या यजमानाकडून अन्य यज्ञ करताना जर काही विकलता संभवली तर तो पापी होतो आणि अशा प्रकारचे

वैकल्य त्याच्याकडून घडले नाही तर मात्र तो इतरांच्या बरोबरीचाच राहतो. अर्थात् इतरांच्या पेक्षा त्याच्यात काही अधिक वैशिष्ट्य संभवत नाही. म्हणून जो यजमान व्यावृत्काम म्हणजे इतरांच्यापेक्षा काहीतरी श्रेष्ठतादर्शक वेगळेपणाची इच्छा करणारा असेल त्याने दाक्षायण यज्ञाचे अनुष्ठान करावे. हा दाक्षयणयज्ञ क्षुर आणि वज्र यांच्याप्रमाणे तीक्ष्ण आहे. या यज्ञाचे अनुष्ठान करणारा म्हणूनच, अनुष्ठान उत्तमप्रकारे पार पडले तर इतरांच्याहून 'ताजक्पुण्य' म्हणजे त्वरित पुण्यवान् किंवा श्रेष्ठ होतो. आणि अनुष्ठानात वैकल्य उद्‌भवले तर त्याचा नाशही त्वरित होतो.

दाक्षायण यज्ञाचे अनुष्ठान करणाऱ्या यजमानाने यज्ञातील वैकल्य टळावे म्हणून पुढील व्रत आचरणात आणावे-खोटे बोलू नये, मांसाशन करू नये, स्त्रीगमन करू नये, त्याची वस्त्रे क्षारादि शोधक द्रव्यांनी स्वच्छ केली जाऊ नयेत. हे सर्व म्हणजे खोटे बोलणे इत्यादि देव करीत नाहीत. म्हणूनच या यजमानानेही ते काही करू नये. (अनुवाक ५).

दर्श व पूर्णमास हे दोन याग म्हणजे जणू काय देवांचा रथच आहे. यास्तव हे दोन केल्यानंतर जो सोमयागाने यजन करतो, त्याच्या अनुष्ठानामध्ये मोठे सौकर्य उत्पन्न होते. ज्याप्रमाणे रथाची पुष्कळ ये जा झाल्यामुळे मोठ्या रस्त्यातील काटे, खडे यांचा चुराडा होऊन मार्ग विस्पष्ट होतो, आणि 'हा ह्या गांवाचा मार्ग' असे सहज रीतीने ओळखता येते, त्याप्रमाणे, दर्शपूर्णमासरूप रथाची ये जा होऊन देवांच्याकडे जाणाऱ्याचा मार्ग निष्कंटक होऊन विस्पष्ट झाल्यामुळे, त्या श्रेष्ठ अशा मार्गावर पाऊल टाकणे सोमयागाच्या साधनाने यजमानाला सुकर होते. मनुष्याच्या शरीराची मनगट, कोपर इत्यादि अंगे ज्याप्रमाणे संधिरूप पर्वे म्हणजे कांडे आहेत, त्याचप्रमाणे बारा दर्श व बारा पूर्णमास ही संवत्सराची संधिरूप पर्वे म्हणजे कांडे आहेत. हे जाणून जो यजमान दर्शपूर्णमासांचे यजन करतो, त्याने संवत्सराच्या शरीराचे ठिकाणी संधिरूप कांडे निर्माण केल्यासारखे होते. दर्शपूर्णमास याग हे जणू काय संवत्सराचे दोन नेत्र आहेत. हे जाणणारा जो यजमान दर्शपूर्णमासांचे यजन करतो, तो त्या दोन नेत्रांच्या योगाने स्वर्गलोकाला अवलोकन करतो. दर्शपूर्णमास हे देवांच्या पराक्रमरूपच आहेत, हे जाणून जो त्यांचे यजन करतो, तो यजमान देवांच्या पराक्रमाप्रमाणेच पराक्रम संपादन

करतो. दर्शपूर्णमास हे देवांकडे जाण्याचे जणू राजमार्गच आहेत, असे समजून जो यजमान त्यांचे यजन करतो तो देवांचे जे दोन अश्व आहेत, त्यांच्याकडून देवांच्यासाठी हविर्द्रव्य वाहून नेतो. दर्शपूणमास हे जणू देवांचे मुखच आहे असे समजून जो त्यांचे यजन करतो, तो साक्षात् देवांच्या मुखाच्या ठिकाणीच हविर्द्रव्यांच्या आहुती देतो. दर्शपूर्णमासांचे यजन करणारा यजमान हा जणू काय हविर्धान मंडपाने युक्त असा सोमयाजीच होय. कारण, सांज, सकाळ दोनवेळ तो दररोज 'अग्निहोत्र' संज्ञक होमाचे अनुष्ठान करीत असून पर्वापर्वाचे ठिकाणी दर्शपूर्णमासाचे यजन करतो. त्यामुळे हविर्धानात बसून सोमपान करणाऱ्या देवांच्यासाठी दररोज सोमाचा अभिषेक केल्यासारखे म्हणजे सोम कुटून त्याच्या रसाने देवांना तृप्त केल्याप्रमाणे होते. हे जाणणारा जो यजमान दर्शपूर्णमासांचे यजन करतो, त्याचे ठिकाणी 'मी हविर्धान मंडपाने युक्त असा सोमयाजी आहे' अशी दृढ भावना उत्पन्न होते. व त्यानंतर त्याला सोमयागात देवांना जे जे काही द्यावे लागत असते, ते ते सर्व त्याने दिल्यासारखे होते.

यज्ञ करण्याला योग्य असा एकही दिवस एकदा देवांना आढळला नाही, शेवटी विचार करता, करता, त्यांनी अमावास्या व पौर्णिमा या दोन तिथी किंवा दिवस यज्ञाला योग्य आहेत असे ठरविले. ज्या दिवशी सूर्यच तेवढा दिसतो, चंद्र मुळीच दिसत नाही तो दर्श किंवा अमावास्यासंज्ञक दिवस होय. ह्या दिवशी चंद्र हा सूर्याच्या अगदी सन्निध असल्यामुळे तो दिसू शकत नाही. सारांश, फक्त सूर्याचेच दर्शन ज्या दिवशी होते, तो दिवस किंवा तिथी 'दर्श'संज्ञक यागाचे अनुष्ठान करण्यास योग्य होय. ज्या दिवशी म्हणजे ज्या तिथीला चंद्रमंडळ पूर्णपणे उदित झालेले दिसते, ती पूर्णिमा किंवा पौर्णमासी नामक तिथी होय. चंद्राचे पूर्णत्व त्या तिथीस होत असल्याने तत्संबंधी पूर्ण किंवा पौर्ण(मास) संज्ञक यागाचे अनुष्ठान करण्यास ती तिथी योग्य होय. सारांश, देवांनी विचार करून निश्चित केलेल्या अमावास्या व पूर्णिमा ह्या दोन तिथी किंवा दिवस अत्यंत पवित्र व याग करण्यास योग्य आहेत. हे जाणून जो यजमान दर्शपूर्णमाससंज्ञक दोन यागांचे अनुष्ठान करतो, त्याने पवित्र (यागयोग्य) अशा दिवशी त्यांचे यजन केल्याप्रमाणे होते. अमावास्या व पौर्णिमा या दोन तिथींस यजमानाने स्त्रीजवळ जाऊ नये म्हणजे तिच्याशी समागम करू नये.

शुक्लपक्ष व कृष्णपक्ष या दोन पंधरवडयांना 'अर्धमास' हे नांव आहे.

ह्या दोन्ही अर्धमासांच्या रात्री ह्या सोमराजाच्या स्त्रिया होत्या. पण, त्यांपैकी अमावास्या व पौर्णमासी यांच्याशी तो समागम करीत नसे. परंतु एकदा त्या दोघींनी सोमराजाला एकांतात गाठून त्याला बलात्काराने आपल्याशी समागम करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे त्याला क्षयरोग जडला. सोमराजाला यक्ष्मा म्हणजे क्षयरोग जडला म्हणून तो 'राजयक्ष्मा' हे नांव धारण करून जन्मास आला. सोमराज हा क्षयरोगरूपी पापाने युक्त झाला, म्हणून तो 'पापयक्ष्मा' या नांवाने जन्मला. दोघी 'जायांच्या' कडून म्हणजे त्यांच्याशी समागम केल्यामुळे सोमराजा क्षयरोग जडला, यास्तव, तो 'जायेन्य' हे नांव धारण करून जन्मला. याप्रमाणे तीन प्रकारच्या क्षयरोगांचे जन्म जो जाणतो, त्याला तीनही क्षयरोग प्राप्त होत नाहीत.

सोमराजा त्या अमावास्या व पौर्णमासी नामक दोन्ही स्त्रियांना नमस्कार करीतच त्यांच्या जवळ गेला व आपल्या रोगमुक्तीविषयी त्याने त्यांची विनवणी केली, तेव्हा त्या दोघी त्याला म्हणाल्या की, 'आम्ही दोघीही देवांचे हविर्भाग धारण करणाऱ्या होऊ, आमचा आश्रय करून अग्न्यादि देव यजन करोत' असा आम्हाला 'वर' दे. सोमराजाने त्याप्रमाणे त्यांना वर दिला व तो रोगमुक्त झाला. सारांश, अमावास्या व पौर्णमासी यांच्याशी समागम केल्यामुळे सोमराजाला क्षयरोग जडला. यास्तव, ह्या तिथींच्या दिवशी स्त्रीसमागम करू नये हे ह्या वृत्तांताचे तात्पर्य आहे. सोमराजाने वर दिल्यापासून आपल्या बरोबरीच्या स्त्रीरूप सवतींच्यामध्ये अमावास्या व पौर्णमासी ह्या दोघीच रात्री म्हणजे तिथी देवांचे यजन करण्यास योग्य ठरल्या. आणि देव ह्या तिथींस यजन करू लागले. एवं च, ह्या दोन तिथी देवांचे हविर्भाग धारण करणाऱ्या आहेत. हे जो जाणतो त्याला सर्व मनुष्ये भाग देणारी होतात.

सर्व भूतांनी आपआपली क्षुधा नाहींशी केली. मनुष्यांनी दररोज, देवांनी पंधरवड्यातून एक दिवस, पितरांनी महिन्यातून एक दिवस, आणि वनस्पतींनी संवत्सरांतील त्या त्या ऋतूंत आपली क्षुधा निवारण करून घेतली, व सर्वजण तृप्त झाले. आणि म्हणून मनुष्ये दररोज अन्न खाण्याची इच्छा करीत असतात, पंधवड्यातून एक दिवस देवांचे यजन केले जाते व तो हविर्भाग देव सेवन करून आपली क्षुधा निवारण करतात; पितरांना महिन्यातून एक दिवस म्हणजे अमावास्येच्या दिवशी श्राध्दविधीने अन्न दिले

जाते व त्या अन्नाने ते तृप्त होत असतात; वनस्पती या संवत्सरातून विशिष्ट अशा एका हंगामात फलांचे धारण करून आपली क्षुधा शमवितात. सारांश, याप्रमाणे जो कोणी भूतमात्रांनी केलेला क्षुधेचा शमनप्रकार जाणतो तो आपल्या क्षुधारूप शत्रूचा नाश करतो. (अनुवाक ६).

देव ऋङ्.मंत्राच्या ठिकाणी संतुष्ट झाले नाहीत व यजुर्मंत्राच्या ठिकाणीही समाधान पावले नाहीत. ते सामाच्या ठिकाणी मात्र संतुष्ट झाले. यास्तव, होत्याने सामिधेनींचे पठनास आरंभ करण्यापूर्वी 'हिं' असे म्हणावे म्हणजे ज्या सामाचे ठिकाणी देव संतुष्ट झाले, त्या सामापासूनच होत्याने त्या यागदेवतांना संतुष्ट केल्यासारखे होते. होत्याने पुन्हा एकदा 'हिं' असे म्हणावे, म्हणजे त्याने सामाला आश्रयभूत अशा ऋग्रूप वाणीचाच संबंध केल्यासारखे होते. होत्याने तिसऱ्या वेळी 'हिं' असे म्हणावे. त्या योगाने यजमानाने प्रजेचे उत्पादन केल्यासारखे होते. पहिली सामिधेनी ऋचा तीन वेळ म्हणावी. त्याचप्रमाणे शेवटचीही तीन वेळ म्हणावी. म्हणजे होत्याने यज्ञरूपी वस्त्रातून फल खाली सांडू नये म्हणून त्याच्या दोन्ही पदरांना गाठी दिल्यासारखे होते. होत्याने सामिधेनीचे पठण संतत करावे. म्हणजे पहिल्या ऋचेच्या उत्तरार्धाला पुढच्या ऋचेचा पूर्वार्ध जोडून म्हणावा. अशा प्रकारचे पठण केल्याने यजमानाला प्राण व सेवनीय अन्न हे सातत्याने प्राप्त होते. आणि दोन ऋचा एकमेकांना जोडतांना होत्याकडून होणारा श्वासनिरोध राक्षसांना दूर करण्याला उपयोगी होतो.

'प्र वो वाजाः' ही 'राथंतरी' संज्ञक ऋचा प्रथम म्हणावी. हा भूलोक 'रथंतर'सामरूप आहे. या ऋचेच्या पठणाने हा लोक जिंकल्या सारखा होतो. तिसरी ऋचा तीन ठिकाणी विग्रह करून म्हणजे तोडून म्हणावी. पहिल्या चरणाच्या शेवटी पहिला, दुसरा चरण संपतो तेथे दुसरा व शेवटच्या म्हणजे तिसऱ्या चरणाला जोडून पुढच्या ऋचेचा पहिला चरण जेथे संपतो तेथे तिसरा, अशा प्रकारे विग्रह करावेत. हे लोक तीन आहेत. यास्तव, तीन विग्रह करून ऋचा म्हटल्याने पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक जिंकल्यासारखे होते. पहिल्या तीन ऋचांचे एक 'तृच' या दृष्टीने, त्या तृचातील शेवटची म्हणजे आताच ज्या ऋचेचे तीन विग्रह करावयास सांगितले, ती ऋचा म्हणावी. या ऋचेत 'बृहत्' हा शब्द असल्यामुळे तिला 'बृहती'

अशी संज्ञा आहे. स्वर्गलोक हा बृहत्सामरूप आहे. यास्तव, या ऋचेच्या पठणाने स्वर्गलोकच जिंकल्यासारखे होते.

सामिधेनींच्यापैकी 'प्र वो वाजा अभिद्यव:' ही अनिरुक्ता व प्राजापत्या संज्ञक पहिली ऋचा पठण करावी. या ऋचेत कोणत्याही देवतेचे विशिष्ट नांव व्यक्त झालेले नसल्यामुळे या ऋचेस 'अनिरुक्ता' ही संज्ञा आहे. सृष्टीची उत्पत्ती होतांना प्रजापतीला कोणतेही विशिष्ट नांव नसल्यामुळे तोही अनिरुक्त होय. अर्थात् प्रजापतीशी पूर्वोक्त ऋचेचे स्वरूपसाम्य असल्यामुळे तिला 'प्राजापत्या' असे नांव आहे. यज्ञ हा प्रजापतीस्वरूप आहे. यास्तव, पूर्वोक्त प्रजापतीदेवात्मक ऋचेचे प्रथम पठण केले असता यज्ञरूप प्रजापतीच्या यज्ञाचा प्रारंभ केल्यासारखे होते. 'प्र वो वाजा.' ही ऋचा म्हणावी या ऋचेत 'वाज' हा शब्द आहे. वाज म्हणजे अन्न. यास्तव, या ऋचेचे होत्याकडून पठण झाले असता यजमानाला अन्न प्राप्त होते. तसेच या ऋचेत 'प्र' हा शब्द आहे. त्याचा उच्चार झाल्याने प्राचीन म्हणजे बीज धारण करणाऱ्या आणि अभिमुख असणाऱ्या स्त्रीशरीरात प्रवेश करणाऱ्या पुरुषरेताची स्त्रीच्या गर्भाशयात स्थापना केल्यासारखे होते. या ऋचेच्या शेवटच्या चरणाला जोडून पुढच्या ऋचेचा 'अग्न आ याहि वीतये' हा पहिला चरण म्हणावा. या मध्ये 'आयाहि' म्हणजे 'इकडे ये' असे म्हटले आहे. यास्तव, या चरणाच्या पठणापासून यजमानाला त्याच्याकडे मुख करून असणाऱ्या म्हणजे तत्सदृश असणाऱ्या प्रजा उत्पन्न केल्यासारखे होते.

'प्र वो वाजा'. असे होता म्हणत असतो. क्रमाक्रमाने प्रवर्तित होणारे जे चैत्रादिमास यांनाच 'वाज' ही संज्ञा आहे. पूर्वपक्ष व उत्तरपक्ष या दोन स्वरूपाने सर्वतोपरी प्रकाशमान होणारे जे अर्धमास किंवा पंधरवडे यांनाच 'अभिद्यु' असे नांव आहे. हविर्द्रव्यांचे सेवन करणारे जे देव तेच हविष्मंत होत. घृतादिकांच्या प्राप्तीला साधनभूत असणारी गौ म्हणजे गाय हीच 'घृताची' होय. यज्ञ हा देवांच्याकडे जात असतो. आणि यजमान हाच सुखेच्छु असतो.

सामिधेनींच्या योगाने प्रज्वलित होणाऱ्या हे अग्निदेवा, तूच हे चैत्रादि मासांचे स्वरूप आहेस. हे अर्धमासांचे स्वरूपही तूच आहेस. सर्व देवांचे स्वरूप तूच आहेस. असे हे एकंदर मंत्राचे तात्पर्य आहे. हे तात्पर्य मान्य

केल्याने म्हणजे जाणल्याने यजमानाने यज्ञाचे अत्यंत प्रिय असे स्थानच संपादन म्हणजे प्राप्त केल्यासारखे होते.

आपला यजमान अपमृत्युरहित अशा संपूर्ण आयुष्याने संपन्न व्हावा अशी ज्या यजमानाच्या बद्दल होत्याला इच्छा होईल त्याने 'प्र वो वाजा.' ही जी ऋचा आहे, तिचे मध्ये विच्छेदन न करता संपूर्ण पठण करून तिलाच पुढच्या 'अग्र आ याहि वीतये' ह्या ऋचेचा अर्धाभाग जोडून म्हणावा. असे केले असता त्या यजमानाच्या प्राणवायूसह अपानवायूचे धारण केले जाते व तो संपूर्ण आयुष्याला प्राप्त होतो. कोपरापासून करंगळीच्या शेवटापर्यंतचा जो भाग त्यास 'अरत्नी' असे नांव आहे. अरत्नीच्या मध्ये कोठेही छेद नसतो. त्याचप्रमाणे सामिधेनी ऋचांचे पूर्वोक्त पध्दतीने सांतत्य करून म्हणजे दोन ऋचा विशिष्ट रीतीने परस्परांस जोडून पठण करणे हीच सामिधेनींची 'अरत्नी' होय. ही अरत्नी जाणणारा होता आपल्या यजमानाचा शत्रू त्याच्या अरत्नीच्या ठिकाणी स्थापन करतो म्हणजे चार अरत्नी उंच असलेल्या पुरुषापुढे एक अरत्नी इतक्याच उंचीचे लहान मूल जसे ठेंगणे दिसते. त्याप्रमाणे यजमानाच्या ऐश्वर्यापुढे त्याच्या शत्रूचे ऐश्वर्य ठेंगणे दिसेल असे करतो.

सामिधेनीसंज्ञक निरनिराळ्या ऋचा निरनिराळ्या ऋषींच्यापासून निर्मित झालेल्या आहेत. ह्या ऋचा जर एकीशी एक जोडून पठण न केल्या जातील, तर त्या प्रजा व पशू यांच्याशी यजमानाचा वियोग करतील. यास्तव, पहिल्या अर्ध्या ऋचेच्या उत्तरार्धाला पुढल्या अर्ध्या ऋचेचा पूर्वार्ध जोडून त्यांचे पठण करावे म्हणजे त्या सर्व ऋचा एकमेकींशी जोडून पठण केल्यासारख्या होतात. अशाप्रकारे होत्याने संयुक्त केलेल्या त्या ऋचा यजमानाला अनुकूलतेने प्राप्त होतात आणि त्याला सर्व प्रकारच्या इच्छा करणाऱ्या आशीर्वादाचा देवजनांच्याकडून लाभ करून देतात. (अनुवाक ७).

ज्या यज्ञात सामगान नसते, तो 'अयज्ञ' होय. म्हणजे तो यज्ञ मुख्य नव्हे. दर्शपूर्णमासेष्टिरूप यज्ञात सामांचे गान होत नसल्यामुळे तो यज्ञ अयज्ञ म्हणजे अमुख्य होईल. तसे न होता त्याला मुखत्व येण्याकरिता होत्याने सामिधेनीसंज्ञक ऋचांपैकी पहिल्या 'प्र वो वाजा अभिद्यव:' ह्या ऋचेचे पठण केल्यानंतर 'अग्र आ याहि वीतये' ही ऋचा म्हणावी. कारण, ही ऋचा जणू 'रथंतर' सामाचे स्वरूप आहे. मग 'तं त्वा समिद्भिरंगिर:'

ह्या ऋचेचे पठण करावे ही ऋचा 'वामदेव्य' साम स्वरूप आहे. नंतर 'स नः पृथु श्रवाय्यं' ह्या ऋचेचे पठण करावयाचे असते. ह्या ऋचेच्या 'बृहदग्ने सुवीर्यं' या तिसऱ्या चरणात 'बृहत्' असे जे पद आहे, ते बृहत्सामाचेच स्वरूप आहे. एवं च, आता सांगितलेले हे 'तृच' म्हणजे तीन ऋचांचा समूह होत्याने जर पठित केला तर त्याने दर्शपूर्णमास यज्ञालाही सामगानयुक्त अर्थात् मुख्य यज्ञ केल्यासारखे होते.

पूर्वी अग्नी स्वर्गलोकी आणि आदित्य भूलोकी होता. त्यामुळे दोन्ही लोक क्षुब्ध झाले. स्वर्गात राहणारे देव अमृतपान करून राहणारे असल्यामुळे त्यांना स्वयंपाकासाठी अग्नीची जरूर नव्हती. पण प्रकाशासाठी आदित्य हवा होता. भूलोकावर राहणारांना आदित्याचा प्रकाश मिळे, पण स्वयंपाककरता त्यांना अग्नीची अपेक्षा होती. अशा प्रकारे दोन्ही लोकांमध्ये अशांतता उत्पन्न झाली होती. तेव्हा, देव परस्परांना म्हणाले की, तुम्ही सर्व एकत्र जमा. आपण अग्नी व आदित्य ह्या दोघांची उलटापालट करूया. नंतर पूर्वोक्त तृचापैकी पहिली 'अग्न या याहि वीतये' ही ऋचा पठण करुन या भूलोकावर त्यांनी अग्नी आणून ठेवला. या ऋचेच्या तिसऱ्या चरणात, 'बर्हीवर येऊन बैस' असे अग्नीला उद्देशून म्हटले आहे. अर्थात्, ह्या ऋचेच्या पठणाने अग्नीचे भूलोकी येणे युक्तच आहे. 'स नः पृथु श्रवाय्यं' ही पूर्वोक्त तृचापैकी तिसरी ऋचा होय. या ऋचेत 'विवाससि' हे प्रकाशत्वद्योतक लिंग असल्यामुळे ही ऋचा म्हणून देवांनी स्वर्गलोकाचे ठिकाणी आदित्य स्थापन केला. तेव्हा हे दोन्ही शांत झाले. भूलोकावर राहणारांची स्वयंपाकाची आणि स्वर्गलोकात राहणारांची प्रकाशाची सोय झाली. यास्तव, या ऋचांचे होत्याने केलेले पठण भू व स्वर्ग ह्या दोन्ही लोकांच्या शांततेला कारणभूत होते. ह्या ऋचांचे माहात्म्य जो जाणतो त्याच्यासाठीही हे दोन्ही लोक शांत होतात.

पंधरा 'सामिधेनी' संज्ञक ऋचा होत्याने म्हणाव्यात. अर्ध्या महिन्याच्या रात्री पंधराच असतात. पंधरा सामिधेनी ह्या जणू काय अर्धमाससंबंधी पंधरा रात्रींच्या स्वरूप आहेत. यांच्या पठणाने अर्धमासांच्या चोवीस भागांनी पूर्ण होणाऱ्या संवत्सरांची प्राप्ती होते. पंधरा सामिधेनी ह्या चोवीसअक्षरी गायत्री छंदात्मक असल्यामुळे त्या सर्वांची मिळून तीनशे साठ अक्षरे भरतात. एका संवत्सराच्या रात्रीही तितक्याच असतात. यास्तव, त्यांच्या पठणाने

अक्षरश: संवत्सराची प्राप्ती होते.

नृमेध आणि परुच्छेप या दोघांमध्ये मंत्रसामर्थ्याविषयी म्हणजे आपणांपैकी कोणाचे मंत्रसामर्थ्य अधिक आहे, या संबंधी वाद उपस्थित झाला. त्यावेळी उभयतांमध्ये असे ठरले की, आपण दोघांनी आपआपल्या मंत्रसामर्थ्याने या ओल्या काष्ठाच्या ठिकाणी मंथन करून अग्नी उत्पन्न करू या. त्या योगाने आपणांपैकी अधिक मंत्रसामर्थ्यवान् कोण आहे, याचा निर्णय आपोआप होईल. प्रथम नृमेधाने ओल्या लाकडाकडे एकाग्र दृष्टी लावून मंत्र म्हटला; आणि त्या मंत्राच्या प्रभावाने त्याने त्या लाकडाच्या ठिकाणी धूर उत्पन्न केला. आणि नंतर परुच्छेपाने त्या धूर उत्पन्न झालेल्या आर्द्र काष्ठावर एकाग्र नजर लावून मंत्र म्हटला व त्याच्या प्रभावाने त्याने त्या ओल्या काष्ठाचे ठिकाणी अग्नी उत्पन्न केला. तेव्हा, परुच्छेप हा अतींद्रियद्रष्टा आहे, म्हणजे इंद्रियांना आकलन न होणाऱ्या ज्ञानानेही संपन्न आहे; असे ओळखून नृमेध त्या परुच्छेपाला म्हणाला, हे ऋषे 'सामिधेनी' मंत्राचा अर्थ सारख्याच रीतीने जर कळत आहे, तर या ओल्या काष्ठाचे ठिकाणी तू कसा अग्नी उत्पन्न केलास? आणि मी कसा करू शकलो नाही? तेव्हा परुच्छेपाने उत्तर दिले की, 'सामिधेनी' संज्ञक मंत्राचे पठण आणि त्याच्या शब्दार्थाचे ज्ञान तुझे माझे सारखे असेल, परंतु त्या मंत्राच्या ठिकाणचा वर्ण म्हणजे त्याचे तात्त्विक स्वरूप अर्थात् त्यांच्या ठिकाणचे रहस्य मी जाणतो, आणि तू जाणत नाहीस. सामिधेनीसंज्ञक ऋचांपैकी 'तं त्वा समिद्भिरंगिर:' ही ऋचा पठित केले जाते. या ऋचेत घृत' शब्दाने युक्त असे जे दुसरे 'घृतेन वर्धयामसि' हे 'पद' म्हणजे चरण उच्चारले जाते, तोच त्या सामिधेनीसंज्ञक ऋचेचा वर्ण, म्हणजे तात्त्विक स्वरूप किंवा रहस्य होय. ह्या चरणाचे रहस्यज्ञानपूर्वक पठणच सामिधेनीच्या ठिकाणी ज्योती म्हणजे तेज उत्पन्न करते.

ह्या सामिधेनींचा निर्देश करतांना ऋचा, गायत्री आणि सामिधेनी या तिहीपैकी कोणत्याही शब्दाने निर्देश केला गेला तरी त्या शब्दाने ह्या 'स्त्रिया' आहेत असाच बोध होतो. ह्यासाठी 'वृषन्' पदाने घटित असा शब्द जिच्यामध्ये आहे, त्या ऋचेचे पठण करावे. म्हणजे त्या योगाने सर्वच सामिधेनी ऋचा पुरुषवती इंद्रिययुक्त होऊन स्त्रीपुरुषात्मक मिथुनरूपाला प्राप्त होतात.

अग्री हा देवांचा दूत होता व कविपुत्र उशना हा असुरांचा दूत होता. ते दोघे प्रजापतीकडे गेले आणि त्याला त्या दोघांनी असा प्रश्न केला की, परस्परांशी विरोध करणाऱ्या राजांचा संधी म्हणजे मित्रत्व जुळविण्याची किंवा परस्परांचे मित्र असलेल्या राजांमध्ये 'विग्रह' म्हणजे फूट पाडण्याची कामगिरी म्हणजे दूतकार्य करण्याला आम्हा दोघांमध्ये तुला कोण योग्य वाटतो? तेव्हा प्रजापतीने 'अग्निं दूतं वृणीमहे' (मी अग्रीला दूत म्हणून नियोजित करतो) ही ऋचा म्हटली आणि उशनाकडे पाठ फिरवून त्याने आपले मुख अग्रीकडे वळविले. तेव्हा देवांचा विजय झाला. आणि असुर पराभूत झाले. ज्या यजमानाचा हे वृत्त जाणणारा होता 'अग्निं दूतं वृणीमहे' ही ऋचा पठण करतो तो यजमान उन्नतावस्थेला प्राप्त होतो. व त्याचा शत्रू पराभव पावतो 'सानिध्यमानो अध्वरे' ही 'अध्वर' शब्दाने युक्त असलेली ऋचा होत्याने म्हणावी म्हणजे तिच्या प्रभावाने तो यजमानाच्या शत्रूला मारतो. या ऋचेच्या दुसऱ्या चरणात 'पावक' हा शब्द असल्याने ह्या ऋचेचे पवित्रत्व स्पष्ट्च झाले आहे. तथापि 'शोचिष्केशस्तमीमहे' ह्या तिसऱ्या चरणात आलेल्या 'शोचि:' या शब्दाने शुध्दिकारक अशा किरणांचा बोध होत आहे. अशा अभिप्रायाने हे सर्वच वाक्य पवित्र आहे असे समजले पाहिजे. सारांश, ह्या ऋचेच्या पठणाने होता यजमानाला पवित्र करतो. 'समिध्दो अग्न आहुत' ही ऋचा म्हणावी या ऋचेतील 'समिध्द:' ह्या भूतकाळवाचक शब्दावरून सामिधेनींच्या योगाने साधावयाच्या अग्निप्रज्वलनरूप कार्याची परिसमाप्ती सुचविली जाते. परिसमाप्तीसाठी अग्रीच्या ठिकाणी प्रक्षिप्त करण्यात येणारा जो इध्मसंज्ञक काष्ठविशेष, त्याला 'परिधि' अशी संज्ञा आहे. अर्थात् होत्याने 'समिध्दो अग्न' इत्यादि मंत्रच परिधिरूपाने अग्रीच्या ठिकाणी स्थापन केल्यासारखे होते. हा परिधी प्रक्षिप्त केल्या जाणाऱ्या इध्म काष्ठांचा नाश न होऊ देण्याला कारणभूत होतो. ह्या ऋचेच्या पठणानंतर पठण केल्या जाणाऱ्या 'आ जुहोता दुवस्यत' ह्या ऋचेच्या वेळी जर काष्ठप्रक्षेप केला तर परिधीच्या बाहेर सांडलेले आज्य, पुरोडाशादि हविर्द्रव्य सांडून जसे फुकट जाते त्याचप्रमाणे होते. म्हणजे तो काष्ठप्रक्षेप निष्फळ होतो.

हविर्द्रव्ये वाहून नेणारे अग्री तीन आहेत. हव्यवाहन हा देवांचा, कव्यवाहन हा पितरांचा आणि सहरक्षा हा असुरांचा हविर्द्रव्यवाहक अग्री होय. या तिन्हीपैकी प्रत्येक अग्री देव, पितर व असुर या सर्वांनी मलाच

हव्यवाहक म्हणून नियोजित करावे, मलाच नियोजित करावे अशी आशा करीत असतो. परंतु, देवांनी 'वृणीध्वं हव्यवाहनं' म्हणजे 'हव्यवाहन' अग्नीलाच हविर्द्रव्यवाहक म्हणून नियोजित करा' अशी घोषणा केली. यास्तव, 'आ जुहोता'. इत्यादि ऋचेचे पठण केल्याने होत्याने जणू काय देवांचा जो 'हव्यवाहन' अग्नी त्यालाच नियोजित करून देवांची हविर्द्रव्ये वाहण्याविषयी याचीच प्रार्थना केल्यासारखे होते.

होत्याने यजमानाचा गोत्रप्रवर्तक ऋषी असेल, त्याच्या अपत्यपरंपरेचे प्रवरानुसार 'वरण' (नियोजन) करावे. त्या योगाने तो यजमान त्याच्या पूर्वज बांधवापासून दूर होत नाही. शिवाय अशाप्रकारे केलेले गोत्रप्रवर्तक ऋषीचे वरण त्या यजमानाला संतती प्राप्त होण्याला कारणभूत होते. मूळ जो गोत्रप्रवर्तक ऋषी असेल त्याच्यापासून अलीकडच्या पुरुषांचे वरण करावे. आणि म्हणूनच पूर्व-पूर्व-भावी पिते उत्तरोत्तर-भावी पुत्रांचे अनुक्रमे पालन करीत असतात. (अनुवाक ८).

आता होत्याने पठण करावयाच्या 'निगद' संज्ञक मंत्रांचे क्रमाने विवरण करण्यात येत आहे. 'अग्ने महान् असि' म्हणजे 'हे अग्निदेवा, तू मोठा आहेस', असे होता म्हणतो. कारण, अग्नी हा जो देव आहे, तो सर्व आहुतींना आधारभूत असल्याने महान म्हणजे मोठा आहे. त्याला 'ब्राह्मण' असे होता म्हणतो. कारण, अग्नी हा देवांमधला ब्राह्मण असून मानवजातीय ब्राह्मणांचा अभिमानी आहे. 'भारत' म्हणजे हे भारता अशा प्रकारे होता अग्नीला संबोधितो. कारण हा अग्निदेवच देवांच्यासाठी हविर्द्रव्याचे भरण म्हणजे धारण करतो, 'देवेध्द' म्हणजे देवांनी प्रज्वलित केलेला, असे होत्याने म्हणावे. कारण देवांनीच याला प्रथम आपल्या यज्ञात प्रज्वलित केले. त्याला 'मन्विध्द' असे होता म्हणतो. कारण देवांच्या नंतर आद्य मानव असणाऱ्या मनूनेच त्याला प्रज्वलित केले. त्याला 'ऋषिष्टुत' असे होता म्हणतो. कारण, ऋषींनी याला स्तविले आहे. त्याला 'विप्रानुमदित' म्हणजे 'विप्रांनी संतोषित केलेला' असे होता म्हणत असतो. जन्माने ब्राह्मण व श्रुताध्ययनसंपन्न जे असतात तेच विप्र होत. अशा विप्रांनी अग्नीला संतोषित केलेले आहे. 'कविशस्त' म्हणजे 'कवींनी प्रशंसिलेला' असे होता त्याला म्हणतो जे श्रुताध्ययनसंपन्न विद्वान् असतात, तेच कवी होत. अशा कवींनीच अग्नीची प्रशंसा केली

आहे. 'ब्रह्मसंशित' असा निविदमंत्र होता अग्नीला उद्देशून म्हणत असतो. 'मंत्राने तीक्ष्ण केलेला' असा त्या मंत्राचा अर्थ आहे. अग्नी हा मंत्राने तीक्ष्ण केला जात असतो. 'घृताहवन:' असे होता म्हणत असतो. कारण घृताची आहुती अग्नीला फार प्रिय आहे. 'प्रणीर्यज्ञानाम्' असे होता म्हणतो. कारण, अग्नी हाच यज्ञांचा नेता आहे. 'रथीरध्वराणाम्' हा मंत्र होत्याने म्हणावयाचा असतो. कारण, अग्नी हा जणू देवांची हविर्द्रव्ये वाहणारा रथच आहे. अथवा देव समुदायांपैकी अग्नी हाही एक रथात बसून संचार करणारा देव आहे. 'अतूर्तो होता' म्हणजे कोणाकडूनही अतिक्रमित न होणारा होता असा निविद मंत्र होता म्हणतो. कारण आह्वान करणाऱ्या ह्या अग्नीचे कोणाताही देव अतिक्रमण करत नाही. 'तूर्णिर्हव्यवाट्' हा निविदमंत्र होता म्हणत असून 'हविद्रव्ये वाहून नेऊन ती देवांना पोचविणारा', असा या मंत्राचा अर्थ आहे. कारण, सर्वच देवमय म्हणजे देवांना दिले गेलेले हविर्द्रव्य अग्नीने वाहून नेल्यामुळेच ज्याचे त्याला प्राप्त होत असते. 'आस्पात्रं जुहूर्देवानाम्' म्हणजे लोखंडी पात्राप्रमाणे दृढ असे देवांचे 'जुहू' नामक पात्र, असे होता अग्नीला अनुलक्षून म्हणतो. 'जुहू' नामक पात्रात जसे हविर्द्रव्य प्रक्षिप्त केले जाते त्याचप्रमाणे अग्नीत केले जात असल्यामुळे अग्नी हा जणू काय देवांची दृढ अशी 'जुहूच' आहे. 'चमसो देवपान:' म्हणजे देवांचा सोमपान करण्याचा चमस, असा एक निविद मंत्र होत्याने म्हणावयाचा असतो. कारण, अग्नी हाच देवांचे सोमपान करावयाचे साधन असलेले 'चमस' संज्ञक पात्र होय. 'अरान् इवाग्ने नेमिर्देवानां त्वं परिभूरसि' म्हणजे, हे अग्ने गाडीच्या चाकाच्या तुंब्यात बसविलेले आरे निखळू नयेत म्हणून जशी त्यांच्या भोवती 'नेमि' म्हणजे लोखंडी धाव बसविलेली असते त्याप्रमाणे तू देवांच्या भोवती व्यापून राहणारा आहेस, असे होता म्हणतो. कारण, हा अग्नी देवांना सर्व बाजूंनी व्यापून राहत असतो.'आ वह देवान् देवयते यजमानाय' म्हणजे देवांची इच्छा करणाऱ्या यजमानासाठी, हे अग्ने तू देवांना बोलाव', असे जर होता म्हणेल तर तो यजमानाला शत्रू उत्पन्न करणारा होईल. कारण दुसरा एखादा देवांची इच्छा करणारा यजमान असेल तर त्याच्यासाठीही तू देवांना बोलाव असे अग्नीला उद्देशून होत्याने म्हटल्यासारखे होईल. यास्तव,'आ वह देवान् यजमानाय' म्हणजे ह्या यजमानासाठी तू देवांना बोलाव असेच म्हणावे.म्हणजे त्या योगाने होत्याने आपल्या यजमानालाच वृध्दिंगत केल्यासारखे होते.

'अग्निमग्न आवह सोममा वह' म्हणजे हे अग्ने अग्नीला बोलाव, सोमाला बोलाव, असे होत्याने म्हणावे. म्हणजे त्याने अग्नीच्या द्वारा ज्या ज्या देवतांना बोलवावयाचे असते त्या त्या देवतांना अनुक्रमाने बोलावल्यासारखे होते. 'आ चाग्ने देवान्वह सुयजा च यज जातवेदः' म्हणजे, हे जातवेद अग्ने, देवांना बोलावून आण आणि उत्कृष्ट अशा यजनपध्दतीने त्यांचे यजन कर, असे होत्याने म्हणावे. म्हणजे त्याने जणू काय अग्नीला तीक्ष्ण केल्याप्रमाणे होते. व तो तीक्ष्ण झालेला अग्नी देवांच्यासाठी हविर्द्रव्ये वाहून नेतो.

'अग्निर्होता' इत्यादि निगद होत्याने म्हणावा. कारण अग्नी हाच देवांचा होता आहे. अर्थात् देवांचा जो होता आहे त्यालाच होता म्हणून होत्याने नियोजित केल्यासारखे होते. सर्वच होमकर्माचा भार देवांचा होता असलेल्या अग्नीवर आम्ही टाकतो असे नव्हे, अशा भावाने, 'स्मो वयम्' म्हणजे आम्हीही तुला साहाय्य करणारे आहोतच, असे होता म्हणतो. त्या योगाने त्याने स्वतःच्या आत्म्यालाच सत्त्वास्थितीला पोचविल्याप्रमाणे होते. दैवी होत्याचा मी मानव होता सहायक आहे अशी वृत्ती हीच आत्म्याची सत्त्वस्थिति होय.

'साधु ते यजमान देवता' म्हणजे, हे यजमान तुझे हविर्द्रव्य स्वीकारणारी देवता तुला उत्कृष्ट फल देवो, असे होत्याने म्हणावे. त्याने यजमानाला सत्फल मिळण्याविषयींच्या आशीर्वादाचीच देवतेजवळ याचना केल्यासारखे होते. या निगदाला जोडून म्हणजे 'देवता' या शब्दाच्या पुढे 'योऽग्निं होतारमवृथाः' म्हणजे हे यजमान जो तूं अग्नीला होता म्हणून वरले आहेस, म्हणजे नियोजित केले आहेस, असे जर होता म्हणेल, तर त्याने जणू काय त्या यजमानाला अग्नीकडून दोहोबाजूंनी घेरून टाकल्यासारखे होईल आणि तो मरेल. यासाठी शाखांतरांत पठित असलेल्या 'योऽग्निं होतारमवृथाः' ह्या पाठाचा होत्याने आदर करू नये.

'जुहू' नांवाची स्रुची यजमानदेवात्मक असून 'उपभृत' ही भ्रातृव्य-देवतात्मक आहे. यजन करण्याकरता वेदीपलीकडे आहवनीयाच्या दक्षिणेस जातांना अध्वर्यूने जुहू व उपभृत ह्या दोन्ही स्रुचा उचलून घ्यावयाच्या असतात. यास्तव, दोन्ही स्रुचांना उद्देशून 'घृतवत्यौ स्रुचौ' अशाप्रकारे द्विवचनान्त शब्दप्रयोग करून जर होत्याने निगद मंत्र म्हटला तर त्याने यजमानाला

शत्रू उत्पन्न केल्या सारखे होईल. दोन्ही स्रुचा उचलावयाच्या असल्या तरी यजनकार्य फक्त जुहूनेच करावयाचे असते. म्हणून 'घृतवतीमध्वर्यो स्रुचमास्यस्व' म्हणजे, हे अध्वर्यो घृताने भरलेली जुहू नांवाची स्रुची उचलून घे, असेच होत्याने म्हणावे. म्हणजें भ्रातृव्यदेवतात्मक उपभृत स्रुचीचे महत्त्व न वाढविता जुहूचेच महत्त्व वाढविल्यासारखे होते. असे केल्याने त्याने यजमानाला महत्त्व देऊन वाढविल्यासारखे होते.

'देवायुवम्' म्हणजे देवांच्या जवळ जाऊन त्यांच्यात मिसळणाऱ्या व त्यांचे रक्षण करणाऱ्या जुहूला, असे होत्याने म्हणावे. कारण जुहू हीच देवांचे रक्षण करणारी आहे. 'विश्ववाराम्' म्हणजे सर्व विघ्नांचे निवारण करून सर्व विश्वाचे रक्षण करणाऱ्या जुहूला उचलून घे, असे होत्याने म्हणावे. कारण जुहू हीच सर्व विघ्नांचे निवारण करून विश्वाचे रक्षण करणारी आहे. 'ईडामहै देवान् ईडेन्यान्यमस्याम नमस्यान् यजाम यज्ञियान्' असे म्हणून होत्याने निगदमंत्राने समापन करावे. 'स्तुती करण्याला पात्र असतील त्यांची आम्ही स्तुती करीत आहोत, नमस्कारार्ह असतील त्यांना नमस्कार करीत आहोत, व यजनयोग्य असतील त्यांचे यजनही करीत आहोत', असा त्या निगदशेषाचा अर्थ आहे. मनुष्य हे स्तवनयोग्य, पितर हे नमस्कारार्ह आणि देव हे यजनयोग्य असतात. सारांश, पूर्वोक्त निगदशेष होत्याने म्हटला असता, त्या योगाने त्याने ज्यांना ज्यांना जो जो भाग द्यावयाचा तो तो देऊन त्या त्या देवतादिकांचे यजन केल्यासारखे होते. (अनुवाक ९)

तीन ऋचांचा जो समुदाय असतो, त्याला 'तृच' अशी संज्ञा आहे. सामिधेनी संज्ञक ऋचांच्या पठणप्रसंगी क्षत्रिय यजमानाच्या यज्ञात होत्याने तीन 'तृचे' पठण करावीत. त्या योगाने त्याने जणू काय क्षत्रियापासून भिन्न असे जे ब्राह्मण, वैश्य व शूद्र या तीन वर्णांतील पुरुष, त्या तिघांनाही आपल्या यजमानाला अनुकूल केल्यासारखे होते. हा एक पक्ष आहे. दुसरा पक्ष असा की, क्षत्रिय यजमानासाठी होत्याने पंध्रा 'सामिधेनी' ऋचा पठण कराव्यात. कारण प्रजापतीच्या बाहूपासून उत्पन्न झालेल्या 'पंचदश' स्तोमाबरोबरच क्षत्रियाची उत्पत्ती झाली असल्यामुळे तो पंचदशस्तोमसंबध्द आहे. अर्थात्, त्या स्तोमाशी संख्यासाम्य असलेल्या पंध्रा ऋचा होत्याने पठण केल्या असता त्याने आपल्या यजमानाला स्वकीय अशा स्तोमाच्या ठिकाणी प्रतिष्ठित केल्याप्रमाणे

होते. 'त्रिष्टुप्' छंदात्मक ऋचेने सामिधेनीसंज्ञक ऋचांचे परिधान म्हणजे समापन करावे. कारण त्रिष्टुप् छंद हा इंद्रियरूप आहे. इंद्रियसामर्थ्य प्राप्त होण्याच्या इच्छेने प्रेरित होऊनच क्षत्रिय यजन करीत असतो. यासाठी 'त्रिष्टुप्' छंदातील ऋचेने सामिधेनीचे समापन केले असता त्या छंदाच्या प्रभावाने होत्याने आपल्या यजमानासाठी इंद्रियसामर्थ्याचा परिग्रह म्हणजे संपादन केल्यासारखे होते. 'यजमानाला ब्रह्मवर्चस् प्राप्त होवो', अशी जर होता इच्छा करीत असेल तर त्याने गायत्री छंदातील ऋचेने सामिधेनींचे परिधान करावे. गायत्री छंद हा ब्रह्मवर्चसरूप आहे. यास्तव त्या छंदातील ऋचेने समापन केले असता यजमानाला ब्रह्मवर्चस् प्राप्त होते. वैश्य यजमानाच्या घरी होणाऱ्या यज्ञात होत्याने सत्रा सामिधेनी म्हणाव्यात. कारण, प्रजापतीपासून 'सप्तदश' स्तोमाबरोबर वैश्य उत्पन्न झाला असल्यामुळे तो सप्तदशस्तोमसंबध्द आहे. यास्तव, सतरा सामिधेनी म्हटल्या असता होत्याने आपल्या यजमानाला सप्तदश स्तोमाच्या ठिकाणी प्रतिष्ठित केल्यासारखे होते. जगती छंदातील ऋचेने सामिधेनीचे परिधान म्हणजे समाप्ती करावी. जगती छंदाने पशूंचे संपादन केले असल्यामुळे पशू हे जगतीछंदात्मक आहेत. वैश्य जातीचा यजमान पशूच्या प्राप्तीच्या इच्छेने प्रेरित होऊनच यजन करीत असतो. यास्तव, जगती छंदातील ऋचा शेवटी म्हणून सामिधेनीचे समापन केले असता होत्याने जगती छंदाकडून आपल्या यजमानासाठी पशूंचा परिग्रह केल्याप्रमाणे होते. आपल्याला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी अशी इच्छा करणाऱ्या यजमानाच्या होत्याने एकवीस सामिधेनी ऋचांचे पठण करावे. कारण, 'एकविंश' स्तोम हा सर्व स्तोमांची 'प्रतिष्ठा' आहे. ह्या स्तोमात इतर स्तोम अंतर्भूत होत असतात. यास्तव होत्याने केलेले एकवीस सामिधेनींचे पठण यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते. ब्रह्मवर्चसाची कामना धारण करणाऱ्या यजमानाच्या यज्ञात होत्याने चोवीस सामिधेनी म्हणाव्यात. कारण, गायत्री ही चोवीसअक्षरी आहे व गायत्री छंद हा ब्रह्मवर्चसरूप आहे. यास्तव, गायत्री छंदाशी स्वरूपसाम्य असलेल्या चोवीस सामिधेनींचे पठण यजमानाला ब्रह्मवर्चस् प्राप्त करून देते. अन्नप्राप्तीची इच्छा करणाऱ्या यजमानाच्या होत्याने तीस सामिधेनी पठण कराव्यात. 'विराट्' छंद हा तीस अक्षरांचा असतो. यास्तव, त्या छंदाशी समानरूप अशा तीस सामिधेनींच्या पठणाने होता जणू काय विराट् छंदाच्या द्वारा यजमानाला सर्व ठिकाणी यजमानाला सेवनीय असे अन्न प्राप्त करून देतो.

आपल्याला सर्व ठिकाणी प्रतिष्ठा प्राप्त व्हावी अशी इच्छा करणारा जो यजमान असेल त्याच्या यज्ञात होत्याने बत्तीस सामिधेनींचे पठण करावे. अनुष्टुभ् छंद हा बत्तीस अक्षरांचा असतो, व हा छंद इतर सर्व छंदांच्या प्रतिष्ठेचे स्थान आहे. यास्तव बत्तीस सामिधेनींचे पठण यजमानाच्या प्रतिष्ठेला उपयुक्त होते.

पशुप्राप्तीची कामना करणाऱ्या होत्याने छत्तीस सामिधेनी म्हणाव्यात. 'बृहती' छंद हा छत्तीसअक्षरी असतो. बृहती छंदाच्या अनुष्ठानाने पशू प्राप्त होत असल्यामुळे पशू हे बृहतीछंदाधीन आहेत. यास्तव, छत्तीस सामिधेनींचे पठण त्या यजमानाला बृहती छंदाच्या द्वारा पशूंची प्राप्ती करून देते.

इंद्रियसामर्थ्य संपादन करण्याची इच्छा करणाऱ्या यजमानाच्या यज्ञानुष्ठानात चव्वेचाळीस सामिधेनी म्हणाव्यात. 'त्रिष्टुप्' छंद चव्वेचाळीस अक्षरांचाच असतो. त्रिष्टुप् छंद हा इंद्रियस्वरूप आहे. यास्तव, चव्वेचाळीस सामिधेनींच्या पठणाने त्रिष्टुप् छंदाच्या द्वारा होत्याने त्या यजमानाला इंद्रियसामर्थ्य प्राप्त करून दिल्यासारखे होते.

पशुप्राप्तीची इच्छा करणाऱ्या यजमानाच्या होत्याने अठ्ठेचाळीस सामिधेनी ऋचा म्हणाव्यात. जगती छंद हा अठ्ठेचाळीस अक्षरांचा असतो. पशू हे जगतीछंदात्मकच आहेत. यास्तव, जगती छंदाशी समानरूप अशा अठ्ठेचाळीस ऋचांचे पठण केल्याच्या योगाने जणू काय जगती छंदाच्या द्वारा होत्याने त्या यजमानाला पशूंची प्राप्ती करून दिल्यासारखे होते.

सोमयागामध्ये, पुष्कळ इष्टी, पुष्कळ पशू व पुष्कळ सोमग्रह यांच्या योगाने यजन होत असल्यामुळे 'सोमयाजी' म्हणजे सोमयाग केलेल्या यजमानास 'बहुयाजी' अशी संज्ञा आहे. बहुयाजी अशा यजमानाच्या यागात होत्याने सर्व छंदांचे पठण करावे. कारण जो बहुयाजी असतो त्या बहुयाजी यजमानाला सर्वच छंदांची प्राप्ती झालेली असते.

या अनुवाकात 'तीन तृचांचे पठण करावे' येथपासून 'अठ्ठेचाळीस सामिधेनी पठण कराव्यात 'अशा प्रकारचे जे अनेक पक्ष सांगितले आहेत ते सर्व ऐच्छिक आहेत. त्यांविषयी वाचनिक नियम नाही. यास्तव, अपरिमित म्हणजे यजमानाच्या इच्छेनुरूप वाटतील तितक्या सामिधेनी होत्याने पठण

कराव्यात ते पठण यजमानाला अपरिमित म्हणजे अगणित फल देण्याला समर्थ होते. (अनुवाक १०).

दोन्ही खांद्यांवरून पोटावर रुळत ठेवलेले म्हणजे माळेप्रमाणे गळ्यात धारण केलेले जे वस्त्र किंवा जानवे, ते 'निवीत' होय. हे मनुष्याच्या कार्याविषयी प्रशस्त असून उजव्या खांद्यावरून डाव्या खांकेत लोंबते घातलेले वस्त्र अथवा जानवे ते 'प्राचीनावीत' किंवा अपसव्य होय. हे पितरांच्या कर्माविषयी प्रशस्त आहे. याच्या उलट डाव्या खांद्यावरून उजव्या खांखेत लोंबते ठेवलेले वस्त्र किंवा जानवे ते 'उपवीत' म्हणजे सव्य होय. हे देवांच्या कर्माविषयी प्रशस्त म्हटले आहे. यासाठीच ऋषींचे तर्पण 'निवीत' असताना, पितरांचे तर्पण, पिंडदान वगैरे 'प्राचीनावीत' असताना आणि देवांचे तर्पण, होमहवन वगैरे कार्य 'उपवीत' असताना करण्याची शिष्टांची पध्दती आहे. यास्तव, देवांच्यासाठी यज्ञकर्म करणारे ऋत्विज व यजमान या सर्वांनी 'उपवीत' पध्दतीने जानवे धारण करावे. म्हणजे त्यांनी देवांचे चिन्हच धारण केल्यासारखे होते.

होत्याने उभे राहून 'सामिधेनी'संज्ञक ऋचा म्हणाव्यात. आसमंतात ऐकू जाईल असे बोलावयाचे असल्यास मनुष्य उभे राहून बोलतो हे प्रसिध्दच आहे. जाग्यावरून उठून उभे राहिलेल्या माणसाला स्वर्गलोक जवळ पडतो. अर्थात् स्वर्गलोकाची प्राप्ती व्हावी म्हणून होत्याने उभे राहूनच सामिधेनींचे पठण करावे. आसनावर बसून होत्याने यजन करावे. म्हणजे 'याज्या' म्हणावी. त्या योगाने तो या लोकी प्रतिष्ठेला प्राप्त होतो. क्रौंच पक्षी उच्च स्वरात ओरडतो. सामिधेनीचे पठण जर त्याप्रमाणे उच्च ध्वनीने केले तर ते असुरांना प्रिय होईल. मंद्र म्हणजे हलक्या स्वरात केले तर ते मानुष्य म्हणजे मनुष्याने सामान्य भाषण केल्यासारखे होईल. आणि जर 'अंतरा' म्हणजे मध्यम स्वरात केले तर ते 'सदेव' (चांगलेच) म्हणजे देवांना प्रिय असे होईल. यास्तव, सामिधेनींचे पठण देवांना प्रिय होईल असे मध्यम स्वरात नित्य करावे.

एखादा अजाण होता वेदीच्या बाहेर दोन्ही पाय ठेवून उभे राहून सामिधेनींचे पठण जेव्हा करतो तेव्हा त्याला मार्ग स्पष्ट दिसेनासा होतो. दुसरा एखादा अडाणी होता दोन्ही पाय वेदीत ठेवून उभा राहतो आणि सामिधेनी म्हणतो त्याला मार्ग कोठे आहे, हेच समजत नाही. हे दोन्ही

दोष जाणणारे असे जे प्राचीन काळचे यज्ञकर्मकुशल 'होते' होऊन गेले ते आपला उजवा पाय वेदीच्या बाहेर ठेवीत नसत. आणि डावा पाय वेदीच्या आत ठेवीत नसत. फक्त उजवा पाय वेदीबाहेर ठेवून उभे राहत आणि सामिधेनींचे पठण करीत. त्यामुळे त्यांचे मार्ग त्यांना विस्तीर्णपणे धारण करीत. कोणत्याही मार्गांनी त्या विद्वान होत्यांना आपणापासून भ्रष्ट केले नाही. यास्तव, मार्गाचे विस्तीर्णपणे धारण व्हावे म्हणून आणि मार्गांच्याविषयी मोह उत्पन्न होऊ नये म्हणून होत्याने आपला एक पाय वेदीत व एक पाय बाहेर ठेवून उभे रहावे आणि नंतर सामिधेनींच्या पठणाला प्रारंभ करावा. शिवाय, अशाप्रकारे परस्परविलक्षण म्हणजे उजवा पाय वेदीच्या आत व डावा पाय वेदीच्या बाहेर ठेवून उभे राहणारा होता, भूत व भविष्य यांचे ज्ञान संपादन करतो. परिमित म्हणजे मोजके काय? व अपरिमित म्हणजे मोजता न येण्याजोगे काय? ह्याविषयीचे ज्ञान संपादन करतो. ग्राम्य व आरण्य असे दोन्ही प्रकारचे पशू तो मिळवितो. इतकेच नव्हे तर याशिवाय, देवलोक व मनुष्यलोक हे दोन्हीही लोक तो निश्चयाने जिंकतो. म्हणजे दोन्ही लोकात विजयी होतो.

पूर्वी देवांनी सामिधेनीच पठण केल्या. पण त्या पठण करतांना जे नियम पाळावयाचे असतात ते पाळण्यात त्यांचे चित्त गढून गेल्यामुळे ते भांबावले ! आता पुढे यज्ञसंबंधी कोणते कर्म करावयाचे हे त्यांना दिसेनासे झाले. तेव्हा प्रजापतीने कोणताही मंत्र न म्हणता मुकाट्याने 'आघार' संज्ञक एक आज्याहुती घातली. तेवढ्या कालावधीत सामिधेनीत गुंतलेले देवांचे चित्त जाग्यावर आले आणि त्यांना पुढे अनुष्ठान काय करावयाचे, हे स्पष्ट दिसू लागले ! त्यांना पुढच्या सर्व गोष्टी आठवल्या. यास्तव, अध्वर्यूने पहिली जी 'आघार' संज्ञक आहुती घालावयाची ती मंत्र न म्हणता, तूष्णीं म्हणजे मुकाट्याने घालावी म्हणजे ती पुढच्या यज्ञकर्माचे स्मरण करून देण्याला कारणभूत हाते. शिवाय, सामिधेनींचे पठण होता करीत असतांना क्रमाक्रमाने जी 'इध्म' संज्ञक काष्ठे अग्नीवर दिली जातात त्यांनाही आज्याने 'अभ्यंजन' करून त्यांच्या ठिकाणचा रूक्षपणा नाहीसा केल्यासारखे होते. अभ्यंजनाचे हे महत्त्व जो जाणतो तो अध्वर्यू रूक्षतारहित व स्नेहार्द्र असा होतो. आणि त्याने मुकाट्याने दिलेल्या 'आघार'संज्ञक आहुतीच्या योगाने सामिधेनीच्या अभिमानीनी देवतांना तृप्त केल्यासारखे होते. जर एकाच ऋचेने

म्हणजे एकच ऋचा म्हणून 'आघार' संज्ञक आहुती दिली, तर एक सामिधेनीची देवता तृप्त होईल. दोन ऋचांनी दिली तर दोनच सामिधेनींच्या देवता तृप्त होतील. तीन ऋचांनी अथवा त्यापेक्षा अधिक ऋचांचे पठण करून जर आधाराहुती दिली, तर तो 'आघार' इतर सर्व कर्मांच्या पेक्षा अधिकत्वाला प्राप्त होईल. यास्तव, अशा प्रकारचा कोणताही दोष उत्पन्न होऊ नये म्हणून मनानेच आघारविषयक आहुती द्यावी. कारण वाणीच्या अगर इतर साधनांच्या योगाने जे प्राप्त होत नाही, ते मनाने प्राप्त होत असते. अग्नीत दिलेल्या 'इध्म'संबंधी समिधांपैकी कोणत्याही समिधेचे वैयर्थ्य न होता सर्व समिधांना आज्याहुतीचा स्पर्श व्हावा यासाठी दक्षिणेकडून आरंभ करून उत्तर दिशेस समाप्ती होईल अशा प्रकारे आडव्या रेषेने अखंड धार पडेल अशी आघारसंज्ञक आहुती द्यावी. म्हणजे कोणत्याच समिधेचे वैयर्थ्य होत नाही.

स्वतःच्या मोठेपणाबद्दल वाणी आणि मन या दोघांनाही तीव्र इच्छा झाली व त्याबद्दल दोघांमध्ये वाद उत्पन्न झाला. वाणी म्हणाली, मी देवांच्यासाठी हविर्द्रव्ये वाहून नेत असते, मन म्हणाले, मी देवांच्याकरता हविर्द्रव्ये वाहत असतो. शेवटी दोघांच्यामध्ये चाललेल्या वादाचा निर्णय व्हावयासाठी प्रश्न करण्याकरिता दोघेही प्रजापतीकडे गेले आणि आपआपले म्हणणे त्यांनी त्याच्या कानावर घातले. तेव्हा प्रजापती म्हणाला, हे वाणी तू मनाची दूती आहेस म्हणजे त्याच्या आज्ञेने चालणाऱ्या दासीसारखीच आहेस, स्वतंत्र नाहीस. त्या बरोबर क्रुध्द झालेली ती वाणी प्रजापतीला म्हणाली की, हे प्रजापते, खरोखरच जर मी मनाची 'दूती' असेन तर आजपासून कोणीही तुझ्यासाठी वाचेने यजन न करो. यास्तव प्रजापतीसाठी जी आघारसंज्ञक पहिली आहुती द्यावयाची, ती मनानेच द्यावी. मन हेच प्रजापतिरूप आहे. अर्थात् मनाने दिलेली आहुती प्रजापतीला पोचण्याला कारणभूत होते. कारण कोणताही पुरुष प्रथम मनाने जे ध्यातो, म्हणजे ठरवितो तेच वाणीने बोलतो. अर्थात् वाणी ही मनाची आज्ञाधारक आहे.

इध्माला बांधलेल्या दर्भांच्या अग्रांनी तिन्ही परिधींना 'संमार्ग' करावा म्हणजे मूलापासून अग्रापर्यंत परिधी झाडून स्वच्छ करावेत. असे केल्याने त्यांना पवित्र केल्याप्रमाणे होते. मधल्या परिधीला तीन वेळा संमार्जन करावे. कारण प्राण, अपान व व्यान हे तीन प्राण मुख्य आहेत. यास्तव, तीन

वेळा संमार्जन केले असता आग्नीध्र जणू काय तीनही प्राणांना जिंकतो म्हणजे सर्वतोपरी आपल्या स्वाधीन करतो. दक्षिण बाजूस घातलेल्या परिधीला तीन वेळा 'संमार्ग' करावा. पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु हे तीन लोक आहेत. तीनदां दक्षिणेकडील परिधींना संमार्ग करून अग्नीध्र जणू काय तिन्ही लोकांना जिंकतो. उत्तरबाजूस घातलेल्या परिधीलाही तीन वेळा संमार्जन करावे. कारण, स्वर्गलोक, यमलोक व ब्रह्मलोक या तीन लोकांना जाणारे तीन मार्ग आहेत. उत्तरेकडील परिधीला त्रिवार संमार्जन केले असता जणू काय ते तिन्ही मार्ग जिंकल्यासारखे होते. यमलोकमार्गाचा त्याग हा त्या लोकावरील जय असून इतर दोन लोकांच्या मार्गांचा अवलंब हा त्यांच्यावरील जय होय.

अध्वर्यू वेदाने अग्नीला तीन वेळ 'उपवाजन' करतो म्हणजे तो जणू काय तीन लोकांनाच जिंकतो. आग्नीध्राने तीन परिधींना व अग्नीला प्रत्येकी तीन तीन वेळा संमार्जन केल्याची एकंदर संख्या बारा होते. संवत्सराचे महिने बाराच असतात. अर्थात् बारा वेळ संमार्जन करून बारा महिन्यांनी पूर्ण होणाऱ्या संवत्सरालाच जणू काय त्याने संतुष्ट केल्यासारखे होते. शिवाय, संवत्सरात्मक काळही यजमानाकरीता जवळ केल्यासारखे होते. आणि असे करणे यजमानाच्या स्वर्गप्राप्तीला कारणभूत होते.

प्राङ्‌मुख उभा राहिलेल्या यजमानाने जर वर स्वर्गलोकाकडे नजर टाकली तर त्याला तो दक्षिणोत्तर विस्तारलेला दिसेल. यास्तव, दक्षिणोत्तर अशा आडव्या रेषेत जर आधारसंबंधी आहुती घातली. तर अध्वर्यूने जणू काय यजमानाला स्वर्गलोकच प्रकाशित केल्याप्रमाणे होते. आघार संबंधी आहुतीची धार किंचितही वाकडी न होऊ देता, अगदी सरळ पाडावी. कारण प्राणवायू हा सरळ रेषेत संचार करीत असतो. त्याचप्रमाणे धार कोठेही खंड न पडू देता एकसारखी अखंड पाडावी. म्हणजे त्या योगाने प्राण व सेवनीय अन्न अखंडितपणे यजमानाला संपादन करून दिल्यासारखे होऊन, शिवाय राक्षसांना हांकून लावण्यालाही तो सरळ व अखंड आघार कारणभूत होतो.

जो अध्वर्यू यजमान मरावा असे इच्छित असेल, त्याने यजमानाच्या अग्नीवर आघारसंज्ञक आहुती सरळ रेषेत न देता वाकड्या तिकड्या रेषेत द्यावी. म्हणजे त्याने जणू काय यजमानाच्या प्राणाची गती वाकडी तिकडी केल्यासारखे होते. म्हणजे त्याचा प्राण डाव्या उजव्या नाडीमधून प्रवेश करून

वक्रगतीने संचार करू लागतो. आणि त्यामुळे त्याच्या श्वासोच्छ्वासाचा अवरोध होऊन तो यजमान मरतो.

आघार हा जणू काय यज्ञाचे मस्तक असून ध्रुवा ही जणू काय त्याचा आत्मा म्हणजे शरीर आहे. यास्तव, आधारसंज्ञक आहुती दिल्यानंतर जुहूत उरलेल्या आज्यातील अंश ध्रुवेत पाडवावा म्हणजे अध्वर्यूने जणू काय यजमानाच्या शरीरावर मस्तक स्थापन केल्यासारखे होते.

भूलोकावर असलेला अग्नी हा 'मानुष' म्हणजे मनुष्यांच्या हवनादि कर्मांचे साधन व देवांचा हविर्द्रव्य वाहणारा दूत असून द्युलोकातील अग्नी हा असुरांचा दूत होता. आपणा दोघांपैकी दूताचे काम करणे हे कोणाला योग्य आहे? असा प्रश्न विचारण्यासाठी ते दोघे अग्नी प्रजापतीकडे गेले. वेदविहित कर्म साधून देण्याला प्रवृत्त होत असल्यामुळे मानुष अग्नी हा ब्राह्मण होय. असुरांच्या कर्मांचा साधक असलेला द्युलोकातील अग्नी हा असुर होय. प्रजापती ब्राह्मण अग्नीला म्हणाला, 'हे मानुष अग्ने, तूच दूताचे काम करण्यास योग्य आहेस, यास्तव, 'आश्रावय' म्हणजे 'हे देवहो' हे यजमानसंबंधी हविर्दान तुम्ही ऐका, असे आश्रावणवाक्य अध्वर्यू तुला अनुलक्षून उच्चारील तेव्हा होत्याने 'आज्या' इत्यादींचे पठण करावयाचे असते, ते तूंच करीत जा, याज्यापुरोनुवाक्या तूच म्हणत जा.' एवं च, प्रजापतीने 'होता' म्हणून ब्राह्मण अग्नीची ज्या अर्थी निवडणूक केली त्या अर्थी देवांनी त्या ब्राह्मण अग्नीलाच आपला 'होता' म्हणून नियुक्त केला. त्यामुळे देव उन्नतीला प्राप्त झाले व असुर पराभव पावले. हे जाणणाऱ्या ज्या यजमानाचा अध्वर्यू यजमानाच्या प्रवराचा उच्चार करून होत्याचे 'प्रवरण' म्हणजे नियोजन करतो तो यजमान स्वात्म प्रयत्नाने उन्नतीला प्राप्त होतो. आणि त्याचा भाऊबंद किंवा शत्रू असेल तो पराभूत होतो.

ब्राह्मण व अब्राह्मण या दोहोमध्ये 'मी तुझ्याहून श्रेष्ठ आहे, मी तुझ्याहून श्रेष्ठ आहे,' असा वाद जेव्हा उत्पन्न होईल आणि या वादाच्या निर्णयासाठी ते दोघेही एखाद्या तिऱ्हाईताकडे येऊन प्रश्न विचारतील, तेव्हा निर्णय करणाऱ्या अभिज्ञ तिऱ्हाइताने ब्राह्मण श्रेष्ठ आहे, असाच निर्णय द्यावा म्हणजे त्याने स्वत:ला श्रेष्ठत्व मिळविल्यासारखे होते. ब्राह्मण हा पराभूत म्हणजे अब्राह्मणाहून कमी योग्यतेचा आहे, असा निर्णय दिल्याने तो निर्णय

देणाऱ्या तिऱ्हाइताने स्वतःचाच पराभव बोलून दाखविल्याप्रमाणे होते. यास्तव, ब्राह्मण हा अब्राह्मणापेक्षा कमी योग्यतेचा आहे, असे कधीही बोलू नये. (अनुवाक ११).

१ हे यजमान, श्रेष्ठ असा हा अग्नी तुला संपूर्ण आयुष्य देवो. अपमृत्यूने घेरलेला तुझा प्राण या अग्नीच्या अनुग्रहाने पुनः तुझ्या देहात परत येवो. तुला झालेल्या रोगाचा मी नाश करतो. २ हविर्द्रव्याचे जो सेवन करतो, घृतानेच ज्याच्या हवनाचा उपक्रम व समाप्ती केली जाते आणि घृतामध्येच जो जन्म पावतो, अशा हे अग्निदेवा, तू यजमानाला आयुष्यप्रद होऊन ये. मधुर व सुंदर असे गाईचे तूप पिऊन पिता जसे पुत्राचे रक्षण करतो त्याप्रमाणे तू या यजमानाचे सर्वतोपरीने रक्षण कर. ३ हे सोमदेवा, तू सर्व बाजूंनी वाढत रहा. विश्वातील भूतमात्राची उत्पत्ती करण्यात समर्थ असे वीर्य तुझ्याकडे चालून येवो. निरनिराळ्या प्रकारचे अन्न आमच्यासाठी एकत्र जमविण्याला तू कारणभूत हो. ४ हे सोमा पिण्याला योग्य असे दुग्धादि सर्व रस तुझ्याजवळ येवोत. त्याचप्रमाणे सर्व प्रकारची अन्ने व सर्वप्रकारच्या प्रजोत्पादनशक्तीही तुजकडे चालत येवोत. हे सोमा शत्रूंचा पराभव करणारा तू अन्न, रस व प्रजोत्पादनशक्ती यांच्या योगाने वृध्दिंगत होऊन यजमानाला देवत्व प्राप्त होण्यासाठी द्युलोकाचे ठिकाणी श्रवणमनोहर आणि विविध प्रकारची उत्कृष्ट अन्ने संपादन करून ठेव. ५ हे वरुणदेवा, तुझ्यासंबंधी आमच्या कडून घडणारे पाप आम्ही तुला घातलेल्या नमस्कारांनी शमन करू. त्याचप्रमाणे तुला अर्पण केलेल्या यज्ञसंबंधी हविर्द्रव्यांच्या योगाने शमन करू. शत्रुनिवारणसमर्थ हे वरुणदेवा, उल्लसित चित्ताने शोभून राहणाऱ्या हे वरुणराजा, आमच्यावर अनुग्रह करण्यासाठी येथे राहून आम्हाकडून केली जाणारी पातके शिथिल कर. ६ हे वरुणा आमच्या मस्तकाला जो तू फास घातला आहेस, तो वरच्यावरच काढून घे. खाली पायांना जो फास घातला आहेस, तो खालच्या खालीच मोकळा कर. आणि मध्ये कमरेला जो फास घातला आहेस, तो तेथल्यातेथेच अगदी सैल करून टाक. नंतर हे सूर्यसदृश वरुणदेवा आम्ही निष्पाप होऊन तुझ्या आराधनरूप व्रताच्या ठिकाणी अखंड तत्पर राहण्याला योग्य होऊ. ७ अन्नप्रद अशी सरस्वती देवी अन्नांच्या योगाने आमचे पूर्णपणे रक्षण करो. ८ यजनीय अशी सरस्वती देवी आमच्या यज्ञाला द्युलोकातून खाली उतरून येवो. मेरुसारख्या अत्यंत

उंच व विस्तीर्ण अशा पर्वतावरून उतरून येतो. आमच्या निमंत्रणास मान देणारी व घृताचे सेवन करणारी अशी आमच्या यज्ञाला आलेली ती सरस्वती देवी सुख प्राप्त करणारी अशी आमची स्तुतिरूपी वाणी मनापासून श्रवण करो. ९ हे अग्नाविष्णू हो, सर्व यजमानांच्या घरोघर घृताची जी आज्य, सर्पी इत्यादि गृह्य अशी नांवे, निरनिराळ्या मंत्रांतून उच्चारिली जात असतात ती तुम्ही ऐकता. हे तुमचे माहात्म्य खरोखर मोठेच आहे. रत्नाप्रमाणे चमकणाऱ्या सात ज्वाला धारण करणारी तुमची जिव्हा प्रत्येक घृताजवळ जाऊन त्याचे पूर्णपणे भक्षण करो. १० हे अग्नाविष्णू हो, तुमचे अत्यंत आवडते असे यज्ञशालारूपी स्थान मोठे पूजनीय आहे. यजमानांच्या घरोघरी आपली स्तुती वृद्धिंगत करणारे तुम्ही घृताचे सार सेवन करून पुरोडाशादि भक्षण करता. तुमची जिव्हा प्रत्येक घृताहुतीच्या सन्निध जाऊन तिचे उत्कृष्ट रीतीने भक्षण करो. ११ हे वरुणदेवा, माझे हे आव्हान म्हणजे निमंत्रण तू ऐक आणि आज आम्हाला सुखी कर. तुझ्याकडून माझ्या पालनाची इच्छा धारण करणारा मी तुझी गोड शब्दांनी दीर्घकाळ प्रार्थना करीत आहे. १२ हे वरुणदेवा, मला अपेक्षित असे रक्षण तुजकडून मिळण्याकरिता मंत्रपूर्वक नमस्कार करीतच मी तुझ्या सन्निध येत आहे. हा यजमान हविर्द्रव्याने तुझे आराधन करून अवश्य ते रक्षण मिळण्याकरिता तुजजवळ याचना करीत आहे. हे वरुणदेवा, क्रोधरहित होऊन तू या यज्ञामध्ये आम्ही करीत असलेली विज्ञापना नीट लक्षात घे. पुष्कळांच्या कडून स्तविल्या जाणाऱ्या हे वरुणदेवा आमचे आयुष्य कमी करू नको. १३ सर्व जगाला सूर्य दृष्टीस पडावा म्हणूनच किरणरूपी घोडे त्या स्थावरजंगमात्मक सर्व जातमात्राचा ज्ञानी अशा देदीप्यमान सूर्याला अत्यंत उंच अशा उदयाचलावर वाहून आणीत असतात. १४ मित्र, वरुण व अग्नी यांचा अर्थात् उपलक्षणाने त्रैलोक्यातील प्राणिमात्राचा जणू नेत्रच आणि अत्यंत आश्चर्यकारक, अनेक रंगांनी युक्त व जणू काय किरणाचे एकत्र झालेले सैन्यच असे हे आदित्यमंडळ उदयास आले आहे. या मंडळाच्या ठिकाणी असणारा भगवान् सूर्यनारायण स्थावर व जंगम अशा सर्व जगाचा आत्माच असून त्याने द्युलोक, पृथ्वी व अंतरिक्ष व्यापून टाकले आहे. १५ वक्रगतीने वाहणाऱ्या उदकांच्यावर भोवऱ्याच्या रूपाने असणारा, विद्युद्रूपी वस्त्र पांघरलेला, 'अपांनपात्' नामक उदकसंरक्षक देव आपल्या बसावयाच्या ठिकाणी येतो. आणि म्हणूनच सुवर्णाप्रमाणे चमकणारी व महनीय अशी उदके

आपला स्वामी असलेल्या त्या 'अपांनपात्' देवाचे थोर माहात्म्य प्रकट करीतच त्यांच्या भोवती फिरत असतात. १६ काही उदके एकमेकात मिसळून प्रवाहरूपाने वाहत असतात तर काही एकाच ठिकाणी एकमेकात मिसळून राहिलेली असतात. केव्हाही कमी जास्ती न होता समान स्थितीत असणाऱ्या समुद्राला नद्या आपल्या प्रवेशाने संतोषवीत असतात. सर्वांना पवित्र करणाऱ्या देदीप्यमान आणि उदकसंरक्षक अशा त्याच समुद्राला उदके सर्वतोपरी व्यापून राहिलेली असतात. १७ विडंबनरूपाने केव्हाही न हसणारी, सर्वदा तारुण्याने युक्त, व ज्यांच्या ज्यांच्याशी संयोग पावतील त्यांना त्यांना शुद्ध करणारी उदके त्या अपांनपात् देवाला सर्व बाजूंनी व्यापून राहिलेली असतात. शुद्ध अशा प्रकाशाने युक्त, धनवान् व घृताचे पूर्णपणे शोधन करणारा तो 'अपांनपात्' अग्री प्रज्वलित होण्यासाठी त्यावर घालाव्या लागणाऱ्या काष्ठांनी रहित असा असतानाही उदकांच्या ठिकाणी प्रक्षिप्त होत असतो. १८ स्वतःच्या तेजाने उत्कृष्ट प्रकारे चमकणाऱ्या इंद्रावरुणांच्या पासून मी आमच्या रक्षणाची याचना सर्वदा करीत असतो. ते इंद्र व वरुणदेव हे दोघेही देव अशाच प्रकारच्या आमच्या रक्षणाविषयी प्रवृत्त होऊन आम्हाला सर्वदा सुख देवोत. १९ हे इंद्रावरुण हो, तुम्ही आमच्या यज्ञाची निर्विघ्नपणे सिद्धी व्हावी, आमच्या प्रजेला आणि त्याचप्रमाणे आमच्या परिवारातील लोकांनाही समृध्दी प्राप्त व्हावी म्हणून आम्हाला महनीय असे आपन्निवारणरूप सुख द्या. जो पातकी दीर्घकाळ पर्यंत चालू राहणाऱ्या यागाचे अतिक्रमण करून आम्हाला पीडा देतो, त्या पापी शत्रूला आम्ही तुमच्या अनुग्रहाने त्या पीडांच्या संबंधी विशेषसा त्रास न होणारे होऊन जिंकू. २० हे मित्रावरुण हो, आमच्या गाईंच्या कळपावर चोहोंबाजूंनी पर्जन्योदकाचे खूप सिंचन करा. हे सत्कर्म करणाऱ्या मित्रावरुण हो, आमच्या जमिनींतील रजःकणांना मधुर अशा पर्जन्योदकाने भिजवून चिंब करा. २१ हे मित्रावरुण हो, आमच्या संरक्षणासाठी धनांनी पूर्ण अशा हातांनी आमच्याजवळ या. व आल्यानंतर आमच्या गाईंच्या कळपावर पर्जन्योदकाने वर्षाव करा. परस्परांशी संलग्न असणारे तुम्ही दोघेही ब्राह्मणादि जनसमुदायात आम्हाला प्रख्यातीस आणा. हे मित्रावरुण हो, माझे हे आव्हान म्हणजे तुम्हाला करीत असलेले निमंत्रण लक्षपूर्वक ऐका. २२ हे अग्निदेवा, यागाचा निष्पादक, देवांची हविर्द्रव्ये अत्यंत निष्ठेने वाहून नेणारा व अत्यंत देदीप्यमान असा तू आमची तुझ्याविषयीची भक्ती जाणून आमच्यावर असलेला वरुणदेवाचा

क्रोध पूर्णपणे नष्ट कर. त्याचप्रमाणे विरोधकांनी आमच्याविषयी केलेली द्वेषमूलक सर्व कृत्ये आमच्यापासून दूर कर. २३ हे अग्निदेवा, हा उषःकाल उलटल्यावर लागलीच होणाऱ्या प्रातःकाली आमच्याजवळ येणारा तू आपल्या रक्षणसामर्थ्यांने आमचे रक्षण करणारा हो, वरुणाकडून केले जाणारे जितके त्रास आहेत, ते सर्व नाहीसे कर. आमच्या यज्ञशाळेत रममाण होऊन सुखाचे साधनच असे आमचे हविर्द्रव्य भक्षण कर आणि नंतर सुखाने बोलावणे करण्याला तू शक्य हो. २४ हा अग्निदेव त्याला हविद्रव्याने पुष्ट करणाऱ्या मज यजमानाचे निमंत्रण मनःपूर्वक ऐको. जो सूर्याप्रमाणे भासमान होऊन अत्यंत विशेषत्वाने प्रकाशतो आणि जो रणसंग्रामांच्या ठिकाणी आपल्या उपासकांना सर्वतोपरी जय प्राप्त करून देतो, तो देवांचा हितकारी व परममंगलभूत अग्निदेव आमचा अतिथी होऊन आमच्या ह्या यज्ञगृहात येवो. २५ हे अग्निदेवा, तुझ्या प्रीत्यर्थ मी अंतःकरणपूर्वक यजन करीत असतो. ज्या प्रकारे तू आमच्या यज्ञांमध्ये वंदनीय होशील त्याप्रकारे तुझ्या अनुग्रहकारी मनाला मी विशेषत्वाने व्यापून राहिलेला असतो. म्हणजे तुझ्या अनुग्रहाकडे माझे सर्वदा लक्ष असते. अत्यंत पुरातन आणि देदीप्यमान अशा हे अग्निदेवा, तू तुझे यजन करू इच्छिणाऱ्या व तुला हविर्द्रव्य पुरविणाऱ्या यजमानाला जे प्रिय असेल, ते देण्याविषयी जणू काय, मारवाडसारख्या निर्जल प्रदेशात एखाद्या दयाळू गृहस्थाने तृषितांना पिण्यासाठी थंड पाणी भरून ठेवलेली पाणपोईच आहेस. २६ हे अग्निदेवा विस्तृत अशा बलाने प्रज्वलित झालेला तू आमच्याशी शत्रुत्व करणाऱ्या राक्षसांचा आणि विशेषतः आम्हाला पीडा देणाऱ्या रोगांचा परिहार कर. उत्कृष्ट व पुष्कळ सुख देणाऱ्या व सुखाने बोलाविण्यास शक्य अशा तुला अग्निदेवाच्या सेवेत राहिल्याने जे सुख मिळत असते त्या सुखाच्या ठिकाणी मी सर्वदा निमग्न होऊन राहीन. २७ हा अग्नी मोठ्या प्रकाशाने तळपतो. सर्व प्रकारच्या माहात्म्यांनी युक्त होऊन प्रकट होतो. आसुरी व दुस्तर अशा मायांचा नाश करतो. राक्षसांचा नाश करण्याकरिता तो आपली ज्वालारूपी दोन शिंगे तीक्ष्ण करतो. २८ हे अग्निदेवा, आमच्या विस्तीर्ण अशा यज्ञगृहात प्रदीप्त होणारा असा तू यज्ञकर्माचा आम्ही नुसता प्रारंभ केल्याबरोबरच राक्षसजातीतील प्रत्येकाला दहन कर. २९ अग्नीचे माहात्म्य काय आहे, हे जरी आम्ही पूर्णपणे जाणत नाही, तथापि आमच्यावर अनुग्रह करण्याविषयीच्या चिन्हाने युक्त, कल्याणदृष्टीने आमच्याकडे पाहणारा, आमच्या

यज्ञकर्मामध्ये उत्तम रीतीने येणारा आणि भक्तांची मनोवृत्ती जाणण्यात अत्यंत कुशल अशा ह्या अग्निदेवाच्या जवळ आम्ही येऊन पोचलो आहो. आतापर्यंत वर्णन केलेला असा हा अग्निदेव यजन करू इच्छिणाऱ्या यजमानाच्या मनातील सर्व अभिप्राय जाणणारा असल्यामुळे आमच्या हविर्द्रव्याची देवांच्या ठिकाणी मुक्तकंठाने प्रशंसा करो. ३० तुझी स्तुती करणारे आम्ही वणव्याने दग्ध झालेल्या भूप्रदेशावर पर्जन्यवृष्टी करणाऱ्या तुलाच संतोषित करावे, अशा प्रकारची एकनिष्ठ मनीषा बाळगून आहोत. हे इंद्रा या हविर्द्रव्याचा स्वीकार कर. यजमानाचे मनोरथ तुझ्या कृपेने सफल होवोत. ३१ ज्या बुध्दीमध्ये इंद्राने आम्हाला पापापासून तारले अशी भावना आहे, ती बुध्दी माझ्या ठिकाणी जेव्हा प्रादुर्भूत झाली, तेव्हापासून मी सुबुध्द झालो आहे. आणि म्हणूनच ज्या दिवशी मला मरण येईल त्या दिवसापर्यंत इंद्रदेवालाच मी स्तुतींनी आळवीत राहीन. ज्याप्रमाणे नावेत बसून फिरणाऱ्या नावाड्याला नदीच्या दोनही तीरावरचे लोक, आम्हाला घेऊन चल, आम्हाला घेऊन चल, अशाप्रकारे हांका मारत असतात त्याप्रमाणे पापापासून मुक्त झालेल्या आम्हाला संसृतिरूपी नदीच्या दोन्ही तीरावरचे लोक, आम्हालाही तुमच्या मार्गाने घेऊन चला, अशाप्रकारे हांका मारीत असतात. ३२ हे इंद्रा, आमच्या शत्रूंना विशेषत्वाने मारून टाक. आमचा नाश करण्याकरता सैन्य जमा करण्याच्या नादात असलेल्या शत्रूंना अधोगतीला नेऊन त्यांना पश्चात्ताप होईल असे कर. आमचा घात करण्याला आणखी जो कोणी शत्रू टपला असेल, त्यालाही आमच्या पाया पडावयास लाव. ३३ हे इंद्रदेवा, अभिलषणीय, दु:खापासून रक्षण करू शकणारे असे आमचे बल आमच्या ठिकाणी संपादन करण्यासाठी तू उत्पन्न झाला आहेस. मनुष्यांच्यापेक्षा वरिष्ठ असणाऱ्या हे इंद्रदेवा, तू इच्छित फलांचा वर्षाव करणारा आहेस. आमच्याशी शत्रुत्व करण्याची इच्छा असलेल्या मनुष्याला तू दूर केले आहेस. देवांना हविर्द्रव्य संपादन करणाऱ्या यजमानांच्यासाठी विस्तीर्ण असे उपभोगस्थान तू निर्माण करून ठेवले आहेस. ३४ शंभर अश्वमेध करणाऱ्या हे इंद्रदेवा, निषादांसह ब्राह्मणादि पांच वर्णांच्या लोकांच्या ठिकाणी तुझ्या कृपेनेच जी सामर्थ्ये आहेत, ती सर्व सामर्थ्ये, हे इंद्रा, तुझ्या कृपेने मी आपल्याजवळ ग्रहण करतो. ३५ यजनीय अशा इंद्रदेवा, सर्वांच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ असलेल्या तुला, तुझ्या ठिकाणी असलेल्या वृत्रासुरवध, क्षत्रियजातीचा अभिमान, अपरिमित बल, वैऱ्याचा तिरस्कार करण्याचा स्वभाव इत्यादि गुणांना

अनुसरून म्हणजे ते गुण लक्षात घेऊन यज्ञ करणारे यजमान सत्ररूप यज्ञामध्ये सर्व हविर्द्रव्ये अग्न्यादि देवांच्या बरोबर यथानुक्रमे तुला पुन्हा पुन्हा देत असतात. (अनुवाक १२).

प्रपाठक ६

'समित्' इत्यादि पांच देवतांना उद्देशून केल्या जाणाऱ्या यजनाला म्हणजे दिल्या जाणाऱ्या आहुतींना 'प्रयाज' अशी संज्ञा आहे. 'समित्' संज्ञक प्रथम प्रयाज देवतेचे यजन करावे. त्या योगाने जणू काय पांच ऋतूंपैकी वसंत ऋतूचा अवरोध केल्यासारखे होते. म्हणजे वसंत ऋतूला आपल्याकडे आकर्षण केल्याप्रमाणे, अर्थात् ओढून घेतल्याप्रमाणे होते. कारण पांच 'प्रयाज' हे जणू ऋतुरूपच आहेत. 'तनूनपात्' नामक द्वितीय प्रयाज देवतेचे यजन करावे. त्या योगाने ग्रीष्म ऋतूलाच आपल्याकडे आकर्षित करून घेतल्यासारखे होते. आकर्षित करून घेणे म्हणजे आपल्याला अनुकूल करून घेणे होय हे सांगावयासच नको. नंतर 'इट्' नांवाच्या तृतीय प्रयाज देवतांचे यजन करावे. त्यायोगाने वर्षा ऋतूचाच अवरोध केल्यासारखे अर्थात् त्याला अनुकूल करून घेतल्यासारखे होते. नंतर 'बर्ही' नामक चतुर्थ प्रयाज देवतेचे यजन करावे. म्हणजे शरद ऋतूचा अवरोध करून त्याला आपल्याला अनुकूल असा करून घेतल्यासारखे होते. शेवटी 'स्वाहाकार' संज्ञक प्रयाज देवतेचे यजन करावे. त्या योगाने 'हेमंत' ऋतूचा अवरोध करून म्हणजे त्याला अडवून धरून आपल्याला अनुकूल करून घेतल्यासारखे होते. ज्या अर्थी 'स्वाहा' असे म्हणून अग्नीमध्ये प्रक्षिप्त केलेल्या समिधा ज्याप्रमाणे अग्नीच्या दहन शक्तीने पीडित होतात त्याप्रमाणे हेमंत ऋतूत थंडीच्या कडाक्याने पशू हे पीडित होत असतात, त्या अर्थी हेमंत ऋतुस्वरूप अशा 'स्वाहाकार'संज्ञक पांचव्या किंवा शेवटच्या प्रयाज देवतेचे यजन केल्याच्या योगाने उग्र असा हेमंत ऋतू शांत अर्थात् अनुकूल होतो व पशूंना पीडा करीत नाही.

'समित्' शब्द हा स्तुतिसूचक आहे. अर्थात् 'समित्' संज्ञक प्रथम प्रयाज देवतांना जी आहुती दिली जाते, त्या योगाने देवतांच्या पैकी उष:कालाभिमानी देवतांना आपल्याकडे आकर्षित करून घेतल्यासारखे होते. 'तनूनपात्' या शब्दामध्ये 'अविनाश' सूचित होत आहे. अर्थात् नाश न होऊ देणाऱ्या 'तनूनपात्' संज्ञक दुसऱ्या प्रयाज देवतेला उद्देशून जी आहुती दिली जाते,

तिच्या योगाने अविनाशी, अखंड, अर्थात् संपूर्ण अशा यज्ञाचा अवरोध करून, अर्थात् त्याला आपल्याकडे आकर्षित म्हणजे अनुकूल करून घेतल्यासारखे होते. 'इट्' शब्दामध्ये क्षीरादि रसांची इच्छा सूचित होते. अर्थात् 'इट्' संज्ञक तृतीय प्रयाज देवतांना उद्देशून जी आहुती दिली जाते, तिच्या योगाने क्षीरादि रस देणाऱ्या गोमहिष्यादि पशूंचा अवरोध करून त्यांना आपल्याला अनुकूल असे करून घेतल्याप्रमाणे होते. 'बर्हि' जणू काय प्रजारूपच आहे, असे एक श्रुतिवचन आहे. अर्थात् 'बर्हि' संज्ञक चतुर्थ प्रयाज देवतेचे यजन केले जाते त्या योगाने प्रजेचा अवरोध करून त्यांना आपल्याकडे आकर्षित केल्याप्रमाणे होते. चौथ्या प्रयाज देवतेची आहुती देतांना 'उपभृत' नामक सुचीतील अर्धे आज्य 'जुहू' नामक सुचीमध्ये नीटपणे ओतून घेऊन मग आहुती द्यावी. कारण 'आज्य' हे तेजोरूप असून 'बर्हि' प्रजारूप आहेत. यास्तव 'उपभृत' मधून आज्य घेऊन 'बर्हि' संज्ञक प्रयाजाची आहुती दिली असता प्रजांच्या ठिकाणी तेजाचे स्थापन केल्यासारखे होते. शेवटी 'स्वाहाकार' संज्ञक पांचव्या प्रयाज देवतांना जी आहुती दिली जाते, तिच्या योगाने वाणीचा अर्थात् वाग्देवतेचा अवरोध करून तिला अनुकूल करून घेतल्यासारखे होते. या पांचव्या प्रयाज मंत्रात 'स्वाहा' शब्दाचा अनेकवार उच्चार होत असतो. अर्थात् विशिष्ट अशा वाणीचा म्हणजे शब्दांचा उच्चार होत असलेल्या प्रयाजाहुतीने वाग्देवतेचे अनुकूल होणे युक्तच आहे. पूर्वी सांगितलेल्या वसंतादि पांच व आता सांगितलेल्या उष:कालाभिमानी देवता इत्यादि पांच मिळून दहा देवतांचे त्यांना आहुती देऊन संपादन केल्यासारखे होते. 'विराट्' छंद चरणाक्षरसंख्येने दशाक्षरी असतो. अन्न हे 'विराट्'छंदरूपच आहे. अर्थात् पूर्वोक्त दहा देवतांना आहुती दिल्याच्या योगाने संख्यासाम्य असलेल्या 'विराट्' छंदाच्या द्वारा सेवनीय अशा अन्नाचा चरणाक्षरसंख्येच्या दृष्टीने त्यांच्याशी अवरोध केल्यासारखे अर्थात् अन्नाला प्राप्त करून घेतल्यासारखे होते.

'समित्' नामक प्रथम प्रयाजाचे यजन केले जाते, त्या योगाने प्रथमचाच असलेल्या या भूलोकाच्या ठिकाणी यज्ञकर्ता यजमान प्रतिष्ठित होतो. 'तनूनपात्' संज्ञक द्वितीय प्रयाजाचे जे यजन केले जाते, त्या योगाने दुसऱ्या अर्थात् अंतरिक्ष लोकाच्याच ठिकाणी यज्ञ प्रतिष्ठित होतो. 'बर्हि'नामक तृतीय प्रयाजाचे यजन केले जाते, त्या योगाने देव ज्या मार्गाने जातात येतात असे जे 'देवयान' संज्ञक मार्ग आहेत त्या मार्गांच्याच ठिकाणी यज्ञकर्ता यजमान

प्रतिष्ठित होतो. 'इट्' नामक चतुर्थ प्रयाजाचे जे यजन केले जाते त्या योगाने पशूंच्या ठिकाणी यजमान प्रतिष्ठित होतो. 'स्वाहाकार' संज्ञक पंचम प्रयाजाचे यजन केले जाते, त्या योगाने स्वर्ग लोकाच्याच ठिकाणी यज्ञकर्ता यजमान प्रतिष्ठित होतो. सारांश, पांच प्रयाजांचे यजन केल्याच्या योगाने भूलोकापासून स्वर्गलोकापर्यंत असलेले जे देवलोक, त्या सर्व लोकांचे ठिकाणी यजमान अनुक्रमे प्रतिष्ठित होतो.

भूलोकापासून स्वर्गलोकापर्यंतचे सर्व लोक आपल्या सत्तेखाली असावेत अशाविषयी देव व असुर यांच्यामध्ये स्पर्धा उत्पन्न झाली तेव्हा देवांनी 'प्रयाज' संज्ञक यागांच्या योगाने पूर्वोक्त 'भू' इत्यादि लोकापासून असुरांना दूर हाकून लावले. विरोधकांना दूर हांकून लावणे हेच 'प्रयाज' संज्ञक यागाचे, अर्थात् आहुतींचे 'प्रयाजत्व' म्हणजे स्वभावगुण होय. हे जाणणाऱ्या ज्या यजमानाच्या यज्ञात प्रयाजाचे यजन केले जाते, तो आपल्या शत्रूंना भूरादि लोकांपासून दूर हाकून लावतो. शत्रूवर सर्वतोपरी जय मिळावा अशी इच्छा करणाऱ्या यजमानाच्या अध्वर्यूने प्रथम प्रयाजाहुती दिल्यानंतर एक पाऊल पुढे टाकून दुसरी प्रयाजाहुती द्यावी. याप्रमाणे प्रत्येक प्रयाजाहुती देताना एक एक पाऊल पुढे टाकावे.

जो कोणी यजमान प्रयाजांच्या मध्ये असलेल्या स्त्रीपुरुषांचे मिथुन म्हणजे जोडपे जाणतो तो कालांतराने प्रभूत अशा प्रजा व पशू यांच्या जोडप्यांनी समृध्द असा निपजतो. 'समिध:' अशा बहुवचननान्त शब्दाने प्रथम प्रयाजाचे यजन केले जाते, म्हणजे जणू काय अनेक स्त्रीदेवतांच्या उद्देशानेच यजन केल्यासारखे होते. 'तनूनपात्' संज्ञक द्वितीय प्रयाजाहुती दिली जाते, ती एकाच पुरूषदेवतेला उद्देशून दिली जाते. एका पुरुषाला अनेक स्त्रिया असतात असा लोकव्यवहार आहे. अर्थात् 'समिध:' ह्या अनेक स्त्रीदेवता व 'तनूनपात्' ही एक पुरुषदेवता यांचे एक मिथुन म्हणजे दांपत्य किंवा जोडपे समजावे. त्याचप्रमाणे 'इड:' या अनेकवचनी शब्दाने तिसऱ्या प्रयाजाचे जे यजन केले जाते, ते म्हणजे जणू काय अनेक स्त्रीदेवतांचेच यजन केले जाते. आणि चौथ्या प्रयाजाहुतीने 'बर्हि' ह्या एका पुरुषदेवतेचे यजन केल्याप्रमाणे होते. अर्थात् 'इड:' ह्या अनेक स्त्री देवता व 'बर्हि' ही एक पुरुष देवता यांचे एक मिथुन म्हणजे दांपत्य समजावे. सारांश,

आता दर्शविले हेच प्रयाजामध्ये असलेले 'मिथुन' म्हणजे दांपत्यभाव होय. अशा प्रकारचा प्रयाजांमधील दांपत्यभाव जो जाणतो तो प्रभूत अशा प्रजा व पशू यांच्या जोडप्यांनी समृध्द असा निपजतो.

पूर्वी देवांचा यज्ञ चालू असतांना 'आज्यभाग' इत्यादि देवतांचे यजन केले गेले नव्हते, अशा संधीस असुर त्या ठिकाणी येऊन देवांच्या यज्ञाचा नाश करण्याची इच्छा करू लागले. तेव्हा असुरांचा प्रतिकार करण्याकरितां व यज्ञसंरक्षणासाठी देवांनी असा उपाय केला की त्यांनी गायत्री छंदाच्या अष्टाक्षरी चरणामध्ये दोन व्यूह रचले. म्हणजे एक पांच अक्षरांचा व एक तीन अक्षरांचा अशा दोन गटांची विशिष्ट रचना केली. पंचाक्षरी 'व्यूह' किंवा विशिष्ट रचनेने केलेला गट यज्ञांतील प्रधानभूत अशा अनुष्ठानाच्या पूर्वभागाचा संरक्षक व त्र्यक्षरी 'व्यूह' प्रधानभूत अनुष्ठानानंतरच्या अर्थात् उत्तर भागाचा संरक्षक म्हणून नियोजित केला. अर्थात् हे व्यूहद्वय म्हणजे यज्ञ व यजमान या दोघांचे संरक्षण करणारी अशी जणू कवचेच निर्माण झाली. यास्तव, गायत्री छंदाच्या अष्टाक्षरी चरणांपैकी पहिल्या पांच अक्षरांच्या रूपत्वाने प्रधान यागानंतर तीन अनुयाजांचे जे यजन केले जाते, त्या योगाने जणू काय यज्ञ व यजमान यांच्या संरक्षणासाठी कवचच निर्माण केले जाते. अशा प्रकारचे कवच यज्ञविरोधी शत्रूंचा पराभव करण्याला कारणभूत होते.

शत्रूवर चाल करून जाणाऱ्या सैन्यामध्ये शत्रूला भय उत्पन्न व्हावे म्हणून आघाडीला पुष्कळ सैनिक ठेवले जातात व पिछाडीला थोडे सैनिक ठेवले जातात, असा ज्या अर्थी लोकव्यवहार आहे त्या अर्थी यज्ञसंरक्षणासाठी प्रधान यागापूर्वी पंचाक्षरांच्या रूपाने बहुसंख्याक अशा पांच प्रयाजांची व प्रधान यागानंतर त्र्यक्षरांच्या रूपाने अल्पसंख्याक अशा तीन अनुयाजांची जी योजना केली जाते ती युक्तच आहे.

पूर्वी एकदा देव यज्ञ करीत असतांना यज्ञविघाती राक्षसांची धाड येण्यापूर्वी प्रयाजांपैकी शेवटच्या 'स्वाहाकार' संज्ञक प्रयाजानेच आपला यज्ञ समाप्त करून ठेवावा, म्हणजे पंच प्रयाजांत अनुष्ठात झाल्यावर त्या ठिकाणीच यज्ञाची समाप्ती करावी, असे देवांनी आपल्या विवेकदृष्टीने पाहिले, अर्थात् तसे करण्याचे आपल्या मनाशी ठरविले. आणि त्याप्रमाणे प्रयाजांपैकी शेवटच्या 'स्वाहाकार' संज्ञक प्रयाजाने आरंभिलेल्या त्या यज्ञाची त्यांनी समाप्ती केली.

परंतु, देवांनी हे बरे केले नाही. कारण, प्रयाजांपैकी 'स्वाहाकार' संज्ञक प्रयाजाच्या आहुतीने जे कोणी आपल्या यज्ञाची समाप्ती करतात ते आपल्या यज्ञाचा जणू विच्छेदच करतात, म्हणजे त्यांचा यज्ञ विच्छिन्न अर्थात् खंडित होतो असे स्पष्ट समजावे. यास्तव, अशाप्रकारे, यज्ञाचा विच्छेद होऊ नये म्हणून प्रयाजांचे यजन झाल्यावर 'जुहू' नामक स्रुचीमध्ये उरलेल्या आज्याने वेदीमध्ये आसादित करून ठेवलेल्या हवींच्या ठिकाणी अभिघारण करावे. असे केले असता, ते यज्ञाची अनुष्ठानपरंपरा अखंड राहण्याला कारणभूत होते. शिवाय त्या अभिघारणाने पुरोडाशादि द्रव्यांचे ठिकाणी हविष्ट्व म्हणजे हवनयोग्यत्व उत्पन्न केल्याप्रमाणे होते. इतकेच नव्हे तर प्रयाजांचे अनुष्ठान जसे निर्विघ्न करता आले त्याचप्रमाणे पुढचे आज्यभागादि सर्व अनुष्ठान निर्विघ्नपणे शेवटास जाते. प्रयाज हे जणू पिता असून अनुयाज हे जणू त्याची प्रजा म्हणजे पुत्र आहेत. यास्तव, प्रयाजांचे यजन झाल्यावर जेव्हा जुहूतील आज्याने पुरोडाशादि हविर्द्रव्यांचे ठिकाणी जेव्हा अभिघारण केले जाईल तेव्हाच 'उपभृत' नामक स्रुचीमध्ये अनुयाजासाठी घेऊन ठेवलेल्या आज्याचे ठिकाणीही अभिघारण करावे. असे केल्याच्या योगाने पितृस्थानीय अशा प्रयाजांचे यजन करून शेष राहिलेले आज्यद्रव्य पुत्रस्थानीय अशा अनुयाजांच्या ठिकाणी संपादन केल्याप्रमाणे होते.

जो वेदाध्ययन करतो तो प्रयाज आणि अनुयाज यांसंबंधी अभिज्ञ असतो. प्रयाजात योजलेले आज्य हे साधारण असते, कारण तदवशिष्ट अंशाने अनुयाजातही हवन केले जाऊ शकते; उलट अनुयाजातील आज्य मात्र असाधारण असते म्हणजे त्यांच्यापुरतेच असते; कारण त्यातील अवशिष्ट अंशाचा अन्यत्र विनियोग होऊ शकत नाही; हे त्या वेदज्ञाला विदित असते. आणि त्याच्या आधाराने तो हेही निर्णायक रीतीने सांगू शकतो की एखादा पुत्र जे द्रव्य अर्जित करतो ते त्याचेच असते. त्याच्या पित्यासाठी व बांधवांसाठी नसते; उलट पिता जे द्रव्य अर्जित करतो ते मात्र ज्येष्ठ पुत्राचे व त्याच्या बांधवांचे देखील म्हणजे साधारण असते. पित्याप्रमाणे त्याचे पुत्रही त्याचा विनियोग करू शकतात.

यागासाठी योजावयाचे हविर्द्रव्य त्या विशिष्ट यागापूर्वी अन्यत्र प्रयुक्त होणे म्हणजे ते स्कन्न होणे, त्याचा नाश होणेच होय. परंतु, अपेक्षित

प्रयाजात त्याचे हविर्द्रव्य अर्पण केल्यानंतर त्याचा अवशिष्ट अंश नंतरच्या अनुयागात अर्पण केला जात असल्याने ते मात्र स्कन्न म्हणजे विनष्ट ठरत नाही.

प्रयाज म्हणजे पंचाक्षररूप गायत्री आणि अनुयाज म्हणजे त्र्यक्षररूप गायत्री. या प्रयाज व अनुयाज या दोघांच्या मध्ये जो आज्याचा अभिघार केला जातो त्याच्या योगाने प्रयाजानुयाजरूपी गायत्री एकप्रकारे स्वत:च्या उदरात गर्भच धारण करते. आणि अशी ती गायत्री नंतर यजमानासाठी प्रजा व पशू यांचे उत्पादन करते. (अनुवाक १).

अग्री व सोम या दोन देवतांच्या उद्देशाने अनुक्रमे ज्या दोन आज्याहुती दिल्या जातात त्यांना 'आज्यभाग' अशी संज्ञा आहे. दोन आज्यभाग म्हणजे जणू काय यज्ञरूपी पुरुषाचे दोन चक्षू म्हणजे नेत्रच होत. यास्तव, या दोन आज्यभागांचे जर यजन केले तर यज्ञरूपी पुरुषाच्या ठिकाणी दोन नेत्रांचेच जणू धारण केल्यासारखे होते. ज्या अर्थी मस्तकाच्या पूर्वार्धाच्या ठिकाणी म्हणजे पुढच्या बाजूसच नेत्र असतात त्या अर्थी 'आहवनीय' अग्रीच्या पूवार्धाचे ठिकाणी नेत्रस्थानीय अशा दोन आज्यभागांचे यजन करावे. दोन डोळे समांतर रेषेत असतात त्या अर्थी आज्यभागसंज्ञक दोन आहुती दक्षिणोत्तर समांतर रेषेत समोरासमोर द्याव्यात. अशा अग्रीच्या अनुग्रहाने यजमान देवलोकाला अवलोकन करतो व सोमाच्या अनुग्रहाने पितृलोकाला अवलोकन करतो. यास्तव, आहवनीयाग्रीच्या उत्तरार्धाचे ठिकाणी अग्रीचे यजन करावे आणि दक्षिणार्धाचे ठिकाणी सोमाचे यजन करावे. आहवनीयाचा उत्तरार्ध हा जणू देवलोक असून दक्षिणार्ध हा जणू पितृलोक आहे. यास्तव, आता सांगितल्याप्रमाणे अग्री व सोम यांना उद्देशून यजन करावे म्हणजे देवलोक व पितृलोक या दोन्ही लोकांचे यथार्थ ज्ञान होण्याला ते कारणभूत होते. अग्री व सोम हे जे दोन देव आहेत, ते देवसमुदायातील दोन राजेच आहेत. यास्तव, अग्री व सोम यांना दिलेल्या दोन आहुतींच्या मध्यांतराच्या स्थलात प्रधान देवतांचे यजन केले असता ते सर्व प्रधान देवतांच्या विशेषत्वाने धारणाला कारणभूत होते आणि असे आहे म्हणूनच लोकव्यवहारात देखील राजाकडून सर्व मनुष्यप्राणी धारण केले जातात.

कोणी ब्रह्मवादी असे विचारतात की, ज्या योगाने ज्यांच्या मुखा-

मध्ये फक्त खालच्या बाजूस दांत असतात असे गाई वगैरे पशू, त्याचप्रमाणे ज्यांच्या मुखांमध्ये खाली व वर दोन्ही बाजूस दात असतात असे घोडे इत्यादि पशू प्राप्त होतील असे कोणते यज्ञांग यजमान करीत असतो? ब्रह्मवाद्यांच्या या शंकेचे समाधान असे की, आज्यभागाचे यजन करते वेळी होत्याकडून 'पुरोनुवाक्या' संज्ञक एका ऋचेचे पठण केले जाते आणि नंतर 'जुषाण:' इत्यादि यजुमंत्र होत्याने म्हटला म्हणजे अध्वर्यू आहुती देतो. अर्थात् अधोभागी म्हणजे आहुती देण्यापूर्वी पुरोनुवाक्यांरूप संपूर्ण ऋचा पठण केली जात असल्याने त्या योगे अधोभागी म्हणजे ज्याच्या मुखात खालच्या बाजूसच फक्त दांत असतात अशा गाई इत्यादि पशूंचे संपादन यजमान करतो. प्रधानभूत अशा हवींचे म्हणजे अग्नि इत्यादि देवतांच्या यजन प्रसंगी! अधोभागी म्हणजे आहुती देण्यापूर्वी पुरोनुवाक्यासंज्ञक ऋचा पठण केली जाते, त्याचप्रमाणे ऊर्ध्वभागी म्हणजे आहुती देतांना देखील 'आज्या' संज्ञक ऋचा पठण केली जाते. अर्थात् अधोर्ध्वभागी म्हणजे आहुती देण्यापूर्वी व देतांना दोन्ही वेळ ऋचांचे पठण होऊन यजन केले जाते, त्या योगाने ज्यांच्या मुखात खाली व वर दोन्ही बाजूस दांत असतात अशा अश्वादि पशूंचे संपादन यजमान करतो. प्रधानभूत अशा हवींचे म्हणजे अग्नि इत्यादि देवतांच्या यजन प्रसंगी अधोभागी म्हणजे आहुती देण्यापूर्वी पुरोनुवाक्या संज्ञक ऋचा पठण केली जाते त्याचप्रमाणे ऊर्ध्वभागी म्हणजे आहुती देतांना देखील 'याज्या' संज्ञक ऋचा पठण केली जाते. अर्थात् अधोर्ध्वभागी म्हणजे आहुती देण्यापूर्वी व देतांना दोन्ही वेळा ऋचांचे पठण होऊन यजन केले जाते, त्या योगाने ज्यांच्या मुखात खाली व वर दोन्ही बाजूस दांत असतात अशा अश्वादि पशूंचे यजमान संपादन करतो.

प्रधान देवतांपैकी 'अग्नी' देवतेच्या यजनाचे वेळी होत्याने 'मूर्धन्वती' म्हणजे ज्या ऋचेमध्ये 'मूर्ध' शब्द आहे अशी 'अग्निर्मूर्धा दिव:' ही ऋचा 'पुरोनुवाक्या', म्हणून पठण करावी. असे केल्याने होत्याने जणू काय यजमानाला त्याच्या बरोबरीच्या लोकांमध्ये मस्तकाप्रमाणे उन्नतीला प्राप्त केल्याप्रमाणे होते. त्याचप्रमाणे अग्निदेवतेचे यजन करतांना 'नियुत्वती' म्हणजे ज्या ऋचेमध्ये 'नियुत्' शब्द आहे अशी 'भुवो यज्ञस्य' ही 'याज्या' म्हणून होत्याने यजन करावे. म्हणजे त्याने जणू काय यजमानाच्या शत्रूचे पशू यजमानाच्या ठिकाणी नियोजित केल्यासारखे, अर्थात् यजमानाच्या शत्रूचे पशू यजमानाला मिळवून

दिल्याप्रमाणे होते.

'दर्भ' नामक कोणा ऋषीच्या 'केशी' नामक पुत्राला 'सत्यकाम' नामक एका ऋषीचा 'केशी' नांवाचाच असलेला पुत्र असे म्हणाला की, हे दार्भ्या (दर्भपुत्रा) जिच्या सामर्थ्याने पूर्वी उत्पन्न झालेल्या शत्रूंचे यजमान निराकरण करू शकतो, त्याचप्रमाणे पुढे उत्पन्न होणाऱ्या शत्रूंचा प्रतिबंध करू शकतो, म्हणजे शत्रू उत्पन्नच होऊ देत नाही, शिवाय जिच्या सामर्थ्याने यजमान भूलोक व स्वर्गलोक या दोन्ही लोकांच्या ठिकाणी उज्वलतेला धारण करतो, इतकेच नव्हे तर जिच्या पूर्वार्धाच्या सामर्थ्याने बैल आपल्या पूर्वभागाने म्हणजे खांद्याने नांगर ओढून अथवा गाडा ओढून आपल्या धन्याचे संरक्षण करतो, आणि जिच्या पश्चार्धाच्या सामर्थ्याने गाय आपल्या अपर भागात (पश्चार्धांत) असलेल्या दुग्धपूर्ण कांसेने आपल्या धन्याचे संरक्षण करते, म्हणजे आपल्या यजमानाला दुग्धादि रस देऊन त्याचे पोषण करते, अशा प्रकारच्या सप्तचरणात्मक 'शक्करी' छंदातील ऋचेचा तू उद्या करणार असलेल्या यज्ञामध्ये प्रयोग करणार आहेस. म्हणजे उद्याच्या 'आग्नेय' किंवा अग्निदेवतेला उद्देशून करावयाच्या यागाचे वेळी सात चरण असलेल्या 'शक्करी' छंदात्मक ऋचेचा तू उपयोग करणार आहेस. 'अग्निर्मूर्धा' या ऋचेचे तीन चरण व 'भुवो यज्ञस्य' या ऋचेचे चार चरण मिळून सात चरण होतात. अर्थात्, आता सांगितलेल्या दोन ऋचांच्या चरणांचे एकत्रीकरण केले असता, सात चरणांची 'शक्करी' छंदातील ऋचा तयार होते. या सप्तचरणात्मक शक्करी छंदात्मक ऋचेचा 'अग्निर्मूर्धा' इत्यादि तीन चरण हा पूर्वार्ध असून 'भुवो यज्ञस्य' इत्यादि चार चरण हा उत्तरार्ध किंवा अपरभाग होय, हे उघड आहे. कोणत्याही देवतेचे यजन करावयाच्या प्रसंगी 'पुरस्ताल्लक्ष्मा' म्हणजे जिच्या पूर्वार्धात देवतेचे नांव ग्रथित झालेले आहे, अशी ऋचा 'पुरोनुवाक्या' म्हणून होत्याने पठण करावी. अर्थात् 'अग्निर्मूर्धा दिव:' या ऋचेच्या पूर्वार्धात 'अग्नि' हे देवतानाम ग्रथित झाले असल्याने अग्निदेवतेच्या यजनप्रसंगी या ऋचेचेच पुरोनुवाक्या म्हणून पठण करावे. असे केले असता यजमानाला उत्पन्न झालेल्या शत्रूंचे होत्याने जणू निराकरण केल्यासारखे होते. ज्या देवतेचे यजन करावयाचे तिचे नांव जिच्या उत्तरार्धात आहे ती ऋचा 'याज्या' म्हणून होत्याने पठण करावी. अशा ऋचेस 'उपरिष्टाल्लक्ष्मा' अशी संज्ञा आहे. 'भुवो यज्ञस्य' या ऋचेच्या उत्तरार्धात 'जिव्हामग्ने च कृषे हव्यवाहम्' अशा प्रकारे देवतानाम

ग्रथित झाले असल्याने अग्निदेवतेच्या यजनप्रसंगी या ऋचेचेच पुरोनुवाक्य म्हणून पठण करावे. असे केले असता यजमानाला उत्पन्न झालेल्या शत्रूंचे होत्याने जणू निराकरण केल्यासारखे होते. ज्या देवतेचे यजन करावयाचे तिचे नांव जिच्या उत्तरार्धात आहे ती ऋचा 'याज्या' म्हणून होत्याने पठण करावी. अशा ऋचेस 'उपरिष्टाल्लक्ष्मा' अशी संज्ञा आहे. 'भुवो यज्ञस्य' या ऋचेच्या उत्तरार्धात 'जिव्हामग्ने च कृषे हव्यवाहम्' अशा प्रकारे देवतानाम ग्रथित झाले असल्यामुळे अग्निदेवतेच्या यजन प्रसंगी 'उपरिष्टाल्लक्ष्मा' संज्ञेत पात्र असलेल्या या ऋचेचे याज्या म्हणून पठण करावे. म्हणजे त्या योगाने होत्याने जणू काय यजमानाला उत्पन्न होणाऱ्या शत्रूंचा प्रतिबंध केल्याप्रमाणे होते. 'पुरस्ताल्लक्ष्मा' अशा प्रकारच्या ऋचेची पुरोनुवाक्या पठण करावी. म्हणजे यजमान इहलोकी प्रकाश धारण करतो. अर्थात् प्रसिध्दीस येतो. 'उपरिष्टाल्लक्ष्मा' असलेली ऋचा देवतेचे यजन करतांना 'याज्या' म्हणून पठित करावी. असे केल्याने यजमान स्वर्गलोकाच्या ठिकाणी प्रकाशित होतो. सारांश, आता सांगितल्याप्रमाणे पुरोनुवाक्या व याज्या यांची योजना जो जाणतो त्या यजमानाला भू व स्वर्ग हे दोन्ही लोक प्रकाशमान होतात. 'पुरस्ताल्लक्ष्मा' ऋचेची 'पुरोनुवाक्या' म्हणून योजना केली जाते, म्हणूनच पाळलेला बैल आपल्या पूर्वार्धाने, अर्थात् खांद्याने गाड्याचे जू वाहून यजमानाचे रक्षण करतो, आणि 'उपरिष्टालक्ष्मा' ऋचेचा 'याज्या' म्हणून उपयोग केला जातो म्हणूनच पाळलेली गाय आपल्या जघनार्धाने म्हणजे पश्चात्भागी असलेल्या दुग्धपूर्ण कासेने यजमानाचे संरक्षण करते, अर्थात् आपल्या कांसेतून यजमानाला भरपूर दूध देते. सारांश, अशाप्रकारे याज्यापुरोनुवाक्यांची योजना जो जाणतो त्याने पाळलेला बैल व गाय ही दोघेही आपआपल्या उपकाराने त्याचे पालन करतात.

'आज्य' हे वज्ररूप आहे. 'आज्यभाग' हे वज्ररूप आहेत व 'याज्ये' च्या शेवटी म्हटला जाणारा 'वौषट्' हा 'वषट्कार'ही वज्ररूपच आहे. सारांश, आज्य, आज्यभाग व वषट्कार असे तिहेरी वज्र संपादन करून यजमान जणू आपल्या शत्रूंवर प्रहार करतो, व तो त्याचा प्रहार व्यर्थ जात नाही. उच्च असा ध्वनी करून 'वषट्कार' करावा म्हणजे 'वौषट्' असे म्हणावे. अशाप्रकारे उच्च स्वरात केलेला वषट्कार शत्रूची हिंसा करण्याला समर्थ होतो.

प्रधान देवतांपैकी 'अग्नी' या देवतेच्या यजनप्रसंगी 'अग्निर्मूर्धा' ही

गायत्रीछंदात्मक 'पुरोनुवाक्या' उपयोगात आणली जात असून 'भुवो यज्ञस्य' ही त्रिष्टुप्छंदात्मक याज्या उपयोगात आणली जाते. गायत्री छंद ब्राह्मणासह उत्पन्न झालेला असल्यामुळे त्या छंदातील पुरोनुवाक्या ही ब्राह्मणरूप आहे. त्याचप्रमाणे त्रिष्टुप् छंद हा क्षत्रियासह उत्पन्न झाला असल्यामुळे त्या छंदातील याज्या ही क्षत्रियरूप आहे. ब्राह्मणरूप गायत्री छंदातील पुरोनुवाक्येचा प्रथम उपयोग केला जातो व त्याच्या मागूनच क्षत्रियरूप त्रिष्टुप् छंदातील याज्या पठण केली जाते. ब्राह्मणाच्या मागून क्षत्रियाचे प्रवर्तन होणे हे क्रमप्राप्त आहे. एवं च, ब्राह्मण हा प्रथम उत्पन्न झाला असल्यामुळे मानवसमाजामध्ये तो मुख्य अर्थात् प्रमुख समजला जातो. आता सांगितलेले याज्यापुरोनुवाक्यांचे स्वरूप व महत्त्व जो जाणतो तो यजमान सर्व समाजात प्रमुख होतो.

पुरोनुवाक्येच्या पठणाने हविर्द्रव्याचे दान करणाऱ्या यजमानाला जणू काय देवतांच्या अग्रभागी घोषित केले जाते; याज्येच्या पठणाने त्या यजमानाला योग्य अशा मार्गाने देवतांच्याकडे नेल्याप्रमाणे होते. आणि 'वषट्कार' मंत्राच्या पठणाने यजमानाला देवतांच्या जवळ नेऊन पोचविल्यासारखे होते. त्याचप्रमाणे, पुरोनुवाक्येच्या पठणाने यजमानाला हाती धरल्याप्रमाणे होत असून याज्येच्या पठणाने त्याला देवांच्या स्वाधीन केल्यासारखे होते. आणि वषट्काराच्या पठणाने त्या यजमानाला देवतांच्या सन्निध बसविल्यासारखे होते. त्रिपदा म्हणजे तीन चरण असलेली ऋचा पुरोनुवाक्या म्हणून पठण केली जाते. भू, अंतरिक्ष, व द्यु किंवा स्वर्ग असे हे तीन लोक आहेत. अर्थात् तीन चरण असलेली पुरोनुवाक्या पठण केल्याने यजमान ह्या तीन लोकांच्या ठिकाणी प्रतिष्ठेला प्राप्त होतो. चार चरण असणारी ऋचा 'याज्या' म्हणून पठण केली जाते, त्या योगाने यजमान चतुष्पाद अशा पशूंचाच अवरोध करतो, म्हणजे आपल्याला अनुकूल करून घेतो. दोनअक्षरी असलेला 'वषट्कार' मंत्र पठण केला जातो, त्या योगाने जणू काय पशूंची प्राप्ती झाल्यानंतर त्यांच्या पासून प्राप्त होणाऱ्या दुग्धादि रसाचे दान करण्यासाठी यजमान ब्राह्मणांच्या पंक्तीत दोन पायावर स्थिर उभा राहतो. पुरोनुवाक्या, ही गायत्रीछंदात्मक असते व याज्या, ही त्रिष्टुप्छंदात्मक असते. पुरोनुवाक्या व याज्या एकमेकीस जोडल्यामुळे जी एक ऋचा तयार होते, तीच सात चरण असलेली 'शक्वरी' छंदातील ऋचा होय. या शक्वरी ऋचेच्याच प्रभावाने देवांनी जे जे कार्य करावयास समर्थ होण्याची इच्छा केली ते ते कार्य करण्यास ते समर्थ झाले. अशाप्रकारे

'शक्करी' छंदात्मक ऋचेचे महत्त्व जो यजमान जाणतो तो जे जे कार्य करण्यास आपण समर्थ व्हावे अशी इच्छा करतो, ते ते कार्य करण्यास तो समर्थ होतो. (अनुवाक २).

यज्ञ करण्यास साधनभूत असलेली द्रव्ये प्रजापतीने देवांना वाटून दिली. आणि 'आज्य' हे स्वत:साठी ठेवले तेव्हा देव प्रजापतीला म्हणाले की, 'हे जे आज्य आहे हेच खरोखर मूर्तिमंत यज्ञ आहे म्हणजे यज्ञसाधनभूत अशा सर्व द्रव्यांत सारभूत असे हे 'आज्य' द्रव्य आहे. यास्तव, या आज्यरूप द्रव्यामध्ये आम्हालाही काही भाग असावा'. तेव्हा, प्रजापती म्हणाला, 'हे देवहो, यज्ञकर्ते यजमान तुमच्या उद्देशाने आज्यभागांचे यजन करोत. आणि शिवाय प्रधान देवतांना देण्यासाठी स्रुचीमध्ये हविर्द्रव्य भरून घेण्यापूर्वी तिच्या ठिकाणी आज्याचे उपस्तरण आणि हविर्द्रव्य भरून घेतल्यानंतर त्याचे ठिकाणी आज्यानेच अभिघारण करोत'. यास्तव, आज्य द्रव्याने आज्यभागाचे यजन करीत असतात आणि हविर्द्रव्य भरून घेण्यापूर्वी स्रुचीचे ठिकाणी आज्याचे उपस्तरण व हविर्द्रव्य भरून घेतल्यावर त्याचे ठिकाणी अभिघारण करीत असतात.

कोणी ब्रह्मवादी असे म्हणतात की, पुरोडाश, चरू इत्यादि दुसरी द्रव्ये दोन तीन दिवसांनी शिळी होतात, त्यांच्यातील सार नष्ट होते, त्यांच्या ठिकाणचा स्वादिष्टपणा नाहीसा होतो, आणि 'आज्य' हे मात्र ताजेच राहते, त्याच्यातील सार कमी होत नाही, किंवा त्याच्या ठिकाणचा स्वादही कमी होत नाही याचे कारण काय?. यावर अभिज्ञ असा दुसरा ब्रह्मवादी असे समाधान करतो की, अहो, 'आज्य' द्रव्य हे 'प्राजापत्य' म्हणजे प्रजापतीने अनुग्रह केलेले हविर्द्रव्य आहे. कारण इंद्र, अग्नी इत्यादि देवता प्रत्येक कल्पामध्ये नाहीशा होत असल्यामुळे त्या 'यातयाम' म्हणजे शिळ्या होतात. अर्थात् त्यांच्यामधील सार अर्थात् देवतात्व नष्ट होत असते. परंतु प्रजापती हा जगदीश्वर असल्यामुळे इंद्र, अग्नी अशा सारख्या देवांना उत्पन्न करून व नाहीसे करून स्वत: जसाच्या तसाच असतो, त्याच्या ठिकाणचे सार म्हणजे देवतात्व केव्हाच कमी होत नाही. अर्थात्, प्रजापती जसा सर्वदा ताजातवाना व सारसंपन्न असतो त्याप्रमाणे त्याने अनुग्रहीत केलेले 'आज्य' हे द्रव्य सर्वदा ताजे व सारसंपन्न असते.

हविर्भागांचे सेवन करणाऱ्या देवांच्यापासून पुरोनुवाक्यादि मंत्ररूपाने व्यक्त होणाऱ्या गायत्री आदि छंदांच्या अभिमानिनी देवता दूर निघून गेल्या. 'आम्ही' हविर्भागरहित झालो आहो, त्या अर्थी तुमच्या हविर्भागासंबंधी आम्ही एक शब्दही बोलणार नाही, असे म्हणत त्या छंदोभिमानी देवता, हविर्भाग सेवन करणाऱ्या देवतांच्याकडे पाठ फिरवून चालत्या झाल्या ! तेव्हा हविर्भाग सेवन करणाऱ्या देवांनी त्या देवतांची समजूत करून त्यांना 'चतुरवत्त' संज्ञक देणगी दिली. 'जुहू' नामक स्रुचीमध्ये आज्याने केले जाणारे उपस्तरण, नंतर दोन वेळ हविर्द्रव्याचे ग्रहण आणि नंतर त्या हविर्द्रव्यावर आज्याने केले जाणारे अभिघारण ह्या चार क्रियांच्या समवायास 'चतुरवत्त' अशी संज्ञा आहे. चतुरवत्तात असलेल्या चार क्रियारूप अंशांची पुरोनुवाक्या, याज्या, देवता व वषट्कार या शब्दांनी व्यक्त होणाऱ्या चार प्रकारच्या छंदोभिमानिनी देवतांपैकी अनुक्रमे एक एक देवतेस एक एक अंश देवांनी दिला. यासाठी प्रत्येक प्रधान देवतेचे यजन 'चतुरवत्त' पध्दतीने करावे. म्हणजे ते छंदोभिमानी देवतांना संतुष्ट करते. आणि अशा प्रकारे संतुष्ट झालेल्या छंदोभिमानिनी देवता हविर्भागसेवन करणाऱ्या देवांच्या करता हविर्द्रव्य वाहून नेतात.

'अंगिरा' नामक ऋषी या भूलोकापासून त्वरेने निघाले ते स्वर्गलोकाला जाऊन पोचले. स्वर्गलोकी येतांना त्यांनी जेथे यज्ञ केला होता ते यज्ञाचे ठिकाण सर्व बाजूंनी न्याहाळीतच ते आले. त्या यज्ञभूमीचे ठिकाणी कोणी पुरोडाशाभिमानी देव कासवाचे स्वरूप धारण करून पळत असतांना त्यांनी पाहिला. तेव्हा आंगिरस ऋषी त्याला म्हणाले, ' इंद्राला किंवा बृहस्पतीला किंवा विश्वेदेवांना तुला आम्ही देऊन टाकू. तू थांब, पळू नकोस'. तथापि, पुरोडाशाभिमानी तो कूर्मरूपधारी देव थांबला नाही. 'अरे, अग्नीकरता तरी उभा रहा', असे जेव्हा ऋषी पुन्हा म्हणाले, तेव्हा मात्र तो थांबला. यासाठी अमावास्या व पूर्णिमा या दोन्ही पर्वांच्या इष्टीचे दिवशी अग्निदेवतेसाठी अष्टकपालात्मक अर्थात् आठ कपालांच्या गटावर पुरोडाश तयार करून त्याचे यजन करावे. म्हणजे ते यजमानाला स्वर्गलोक जिंकण्याला अर्थात् स्वर्गलोकाचा उपभोग प्राप्त होण्याला कारणभूत होते.

अंगिरा ऋषी त्या पुरोडाशाभिमानी देवाला म्हणाले की, यज्ञभूमी सोडून तू कशाकरिता जात होतास? तेव्हा तो म्हणाला, 'मी अलंकरणरहित

झालो आहे, म्हणजे माझ्या खालच्या वरच्या बाजूस आज्य चोपडले गेले नाही. म्हणून मी यज्ञभूमी सोडून जात होतो. गाड्याच्या कण्याला अंजन म्हणजे वंगण केले नाही तर तो गाडा जसा निखळून पडतो, तसा मी अलंकरणाच्या अभावी निकामी होऊन गेलो आहे'. यासाठी, पुरोडाशाच्या वर व खाली आज्याचे अलंकरण करीत जावे. म्हणजे ते यजमानाला स्वर्गलोकाची संपूर्णतेने प्राप्ती होण्याला कारणीभूत होते.

देवतांना अर्पण करण्याचे पुरोडाश ज्या कपालांवर भाजले जातात, त्या कपालांवर ते पुरोडाश हाताने सर्व बाजूंनी चांगले पसरवून थापून नंतर त्यांचे भर्जन करावे. सर्वच कपालांच्या बाबतीत असे करावे. जितके पुरोडाश अशा रीतीने कपालांवर पसरवून भाजले जातील तितक्या पुरोडाशांची त्या यजमानाला सुखरूपात स्वर्गलोकी प्राप्ती होते.

'दिग्ध' म्हणजे काही ठिकाणी कच्चा व काही ठिकाणी पक्का असा अर्धवट भाजलेला जो पुरोडाश असतो, तो नैर्ऋत्य म्हणजे राक्षसांना प्रिय असतो. जो कच्चा राहिलेला असतो तो रुद्राला प्रिय असतो आणि जो उत्कृष्ट रीतीने पक्का भाजला जातो, तो पुरोडाश देवांना प्रिय असतो. यास्तव, कोणत्याही प्रकारचा दोष न राहील व पूर्णपणे परिपक्व होईल अशा रीतीने पुरोडाश भाजावा म्हणजे तो देवांना प्रिय होतो. अस्थींच्या म्हणजे हाडांच्या वर मांसाचे आच्छादन असते, त्याप्रमाणे पक्वपणामुळे कठिण झालेल्या पुरोडाशावर चोहीकडून भस्माने आच्छादन करावे. म्हणजे वेदाने अर्थात् दर्भमुष्टीने अंगारा सहित असलेले भस्म पुरोडाशावर सर्वतोपरी वेष्टित करावे. केसांच्या योगाने मस्तक झांकलेले असते, तद्वत् भस्माने आच्छादित करीत असतांना वेदांमध्ये असलेल्या दर्भाच्या काडयांचा पुरोडाशाला स्पर्श होत असल्याने पुरोडाशाचे मस्तक जणू काय वेदगत दर्भरूपी केसांनी झांकून टाकल्यासारखे होते.

पुरोडाश, चरू इत्यादि हविर्द्रव्याचा मंत्राने पाक झाला, म्हणजे मंत्रपूर्वक ते हविर्द्रव्य शिजविले गेले म्हणजे त्याचे लौकिकत्व नष्ट होते व त्यामुळे ते हविर्द्रव्य इहलोकापासून च्युत होते. आणि अशाप्रकारे शिजलेले हविर्द्रव्य जर अनभिघारित राहिले, म्हणजे त्यावर आज्याने अभिघारण केले गेले नाही म्हणजे त्याच्या ठिकाणी पूर्णपणे शास्त्रीयत्वही उत्पन्न होत नाही. अर्थात्, अशा प्रकारचे शास्त्रीय संस्कार पूर्ण न झालेले हविर्द्रव्य देवलोकाला म्हणजे

स्वर्गलोकाला जाऊन पोचत नाही. यास्तव, अशा प्रकारचे हविर्द्रव्य कपालांवरून उचलण्यापूर्वी अथवा अग्नीवरून खाली उतरण्यापूर्वी त्यावर आज्याचे अभिघारण करावे. म्हणजे त्या हविर्द्रव्याचे ठिकाणी पूर्ण शास्त्रीयत्व निर्माण होणे आणि ते हविर्द्रव्य देवांच्या ठिकाणी प्राप्त केल्यासारखे होते.

पुरोडाश भाजण्यासाठी मांडलेल्या कपालांपैकी जर एक कपाल नष्ट झाले तर संवत्सराचा एक महिना कमी होतो, आणि त्यामुळे यजमान मरतो. जर दोन कपाले नष्ट झाली तर संवत्सराचे दोन महिने कमी होतात आणि त्यामुळे यजमान मरतो. यास्तव, यजमानाचे रक्षण व्हावे म्हणून मांडलेली सर्व कपाले मोजावीत आणि नंतर त्यांचे उद्वासन करावे. म्हणजे ती उचलावीत. काही प्रमादामुळे जर एखादे कपाल नष्ट झाले तर उभयता अश्विनीकुमारांच्या उद्देशाने द्विकपालात्मक पुरोडाशाचे, आणि द्यावापृथिवींच्या उद्देशाने एककपालात्मक पुरोडाशाचे निर्वपण करावे. आणि त्या त्या देवतांचा याग करावा. अश्विनीकुमार हे देवांमधील वैद्य आहेत. यास्तव, त्यांना हविर्भाग देऊन तृप्त केल्याने यजमानाने जणू काय त्यांच्याकडून कपाल नष्ट झाल्यामुळे उत्पन्न होणाऱ्या दोषावर औषधी इलाज केल्याप्रमाणे होते. द्यावापृथिवींच्यासाठी एककपालात्मक पुरोडाशाचे यजन केले जाते. अर्थात् द्यावापृथिवींच्या अवकृपेने कपाल नष्ट झाल्यामुळे जे यज्ञफळ नष्ट झालेले असते, तेच त्यांच्या कृपेने यजमानाला पुन: प्राप्त होते आणि शिवाय अशा प्रकारचे केलेले अनुष्ठान यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते. (अनुवाक ३).

यज्ञानुष्ठान करण्याकडे मन नीट प्रोत्साहित व्हावे म्हणून अध्वर्यूने 'देवस्य त्वा सवितु: प्रसवे' (सर्वप्रेरक अशा सविता देवाच्या प्रेरणेने तुला.) या मंत्राने 'स्फ्य' उचलून घ्यावा. पूर्वोक्त मंत्रामध्ये 'अश्विनोर्बाहुभ्यां' (अश्विनीकुमारांच्या बाहूंनी) असा जो अंश आहे तो पठण करावा. कारण अश्विनीकुमार हे दोघे देवांचे अध्वर्यू आहेत. नंतर यज्ञानुष्ठानाविषयी प्रयत्न करण्याकडे मनाची प्रवृत्ती व्हावी म्हणून 'पूष्णोर्हस्ताभ्यां' (पूषा देवाच्या हातांनी) हा मंत्रांश पठण करावा. 'हे स्फ्य, तू शेकडो शत्रूंना एकदम भाजून काढणारा, व कणखर अशा लाकडाचा बनविलेला आणि द्वेष करणाऱ्या वैऱ्यांच्या वधाला कारणभूत होणारा आहेस,' अशा अर्थाचा 'शतभृष्टि वध:' हा मंत्र म्हणावा म्हणजे 'स्फ्य' रूपी वज्राचा शत्रूंवर प्रहार करावयाचे वेळी ते पाजळून

तीक्ष्ण केल्यासारखे होते.

वेदी मधून मातीच्या कणांसह जो दर्भाचा तुकडा मंत्राने वेदीबाहेर टाकावयाचा असतो त्यास 'स्तंबयजु' असे म्हणतात. अध्वर्यूने स्तंबयजूचे हरण करावे. म्हणजे 'स्तंबयजु' वेदीबाहेर टाकावा. जेवढी वेदी आहे तेवढीच यज्ञोपयोगी पृथिवी समजावी. तिच्या मर्यादेत असलेल्या प्रदेशातून 'स्तंबयजुचे' हरण केले असता, यजमानाच्या शत्रूलाच जणू बाहेर काढून टाकल्यासारखे होते. ज्या अर्थी जो, भागाची इच्छा करतो तोच बाहेर घालविला जातो, त्या अर्थी ज्याला भागाची अभिलाषा नसते त्याला कोणी बाहेर घालवीत नाहीत. पृथ्वी, अंतरिक्ष व द्यु असे हे तीन लोक आहेत. अर्थात् तीन वेळ स्तंबयजुर्हरण केले असता ह्या तिन्ही लोकांतून भागेच्छू शत्रूला बाहेर हाकून लावल्यासारखे होते. मंत्र न म्हणता चौथ्या वेळी स्तंबयजुर्हरण करावे. म्हणजे त्रैलोक्याबाहेर असलेल्या सर्व प्रदेशातून शत्रूला बाहेर काढून लावल्यासारखे होते. वेदीच्या ठिकाणची वरवरची माती 'स्फ्य'ने खणून बाहेर काढून टाकावी. असे केल्याच्या योगाने वेदीच्या ठिकाणी असलेला अमेध्य अर्थात् अपवित्र असलेला अंश टाकल्यासारखे होते. वेदीच्या वरील भागाला उच्छिष्टादिकांचा स्पर्श होत असल्यामुळे त्या भागाला अपवित्रता येते व म्हणूनच तेथील वरवरची माती काढून टाकली जाते. त्या योगाने वेदीच्या ठिकाणची अपवित्रताच जणू काढून टाकली जाते. माती बाहेर काढून टाकली जाते, त्यामुळे त्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या तृणादिक ओषधी नाहीशा होतात. अशा प्रकारच्या ओषधीचे कोठे कोठे मूळ राहिलेले असते. ते ते मूळ ही 'स्फ्य'ने छाटून टाकावे. कारण अशाप्रकारे राहिलेली मुळे वेदीमध्ये बर्ही पसरणे, पुरोडाशादि हवी ठेवणे इत्यादि गोष्टींना शत्रू प्रमाणे अडचण करणारी असतात. यास्तव, ती छाटून टाकणेच युक्त आहे. असे केल्याने यजमानाच्या शत्रूचे जणू मूळ छाटून टाकल्यासारखे होते.

वेदी प्रमाणापेक्षा अधिक खोल खणली गेली तर ती पितृदेवतात्मक होते. यासाठी प्रजापतिस्वरूप अशा यज्ञकर्त्या यजमानाच्या मुखाच्या प्रमाणाशी जुळेल इतकी खोल वेदी खणावी. यज्ञानुष्ठान करणाराचे, अर्थात् यजमानाचे जे मुख ते यज्ञमुख होय. यज्ञमुख हे यागद्वारा प्रजांचे पालन करीत असल्यामुळे ते प्रजापतिस्वरूप समजावयाचे. यजमानाच्या मुखाचे हनुवटीपासून केसापर्यंतचे

प्रमाण सामान्यतः टीचभर असते. यास्तव, वेदीमधील जमीन टीचभर खोल खणली म्हणजे ती यज्ञमुखसंमित म्हणजे यजमानाच्या मुखाच्या प्रमाणा इतकी होते. फार प्रयास न करता जे मृत्कण काढता येणे शक्य असते त्यांना 'अप्रतिष्ठ' अशी संज्ञा असून त्यांच्या खाली असलेल्या दृढ म्हणजे घट्ट जमिनीस 'प्रतिष्ठा' असे नांव आहे. यास्तव, वेदी खणावयाची ती प्रतिष्ठेपर्यंत म्हणजे खालच्या घट्ट जमिनीपर्यंत खोल खणावी. असे केल्याने यजमानाला प्रतिष्ठेला प्राप्त केल्यासारखे होते. वेदीच्या दक्षिणेकडील भाग थोडा उंच करावा. असे केल्याने देवयजनाचे म्हणजे देवांचे यजन करण्यास योग्य अशा स्थलाचेच जणू स्वरूप तयार केल्या सारखे होते. ज्या जमीनीमध्ये मनुष्ये व पशू यांचा अत्यंत संचार होत असतो त्या जमीनीतील धुळीस 'पुरीष' असे नांव आहे. प्रजा व पशू हे जणू पुरीषरूपच होत. सारांश, वेदी खणून झाल्यावर तिच्या ठिकाणी 'पुरीष' म्हणजे बारीक व मऊ अशी धूळ पसरावी. असे केल्याने प्रजा व पशू यांच्या योगाने यजमानाला पुरीषवान् केल्यासारखे होते. वेदी निर्माण करण्यापूर्वी तिच्या चारी बाजूच्या सीगांची जी स्फ्यने समंत्रक आखणी किंवा मापणी केली जाते तिला 'पूर्वपरिग्रह' असे म्हणतात, व वेदी निर्माण केल्यानंतर पुन्हा जी समंत्रक मापणी केली जाते तिला 'उत्तरपरिग्रह' अशी संज्ञा आहे. वेदीच्या ठिकाणी बारीक माती म्हणजे धूळ पसरल्यानंतर तिचा 'उत्तरपरिग्रह' करावा. वेदी म्हणून जेवढे क्षेत्र आखून घेतले आहे, तेवढीच यज्ञानुष्ठानोपयोगी भूमी होय. अर्थात्, आखून घेतलेल्या तेवढ्या क्षेत्रातून पूर्वी सांगितल्याप्रमाणे स्तंबयजुर्हरण करून यजमानाच्या शत्रूला वेदीबाहेर काढल्यानंतर त्या वेदीच्या ठिकाणी यजमानाचे स्वकीयत्व सिध्द होण्याकरता 'उत्तरपरिग्रह' करावा, हे युक्तच आहे. जमीन खणून वेदी तयार केली जाते, व खणण्यामुळे जमिनीचे ठिकाणी कोठे उंच तर कोठे खोलगटपणा उत्पन्न होतो. अर्थात् वेदीची जमीन खणणे हे एक प्रकारे क्रूरपणाचेच काम केले जाते. यास्तव, वेदीरूपी जमीनीचे ठिकाणी शांतता उत्पन्न व्हावी म्हणून 'हे वेदे, तू धारण करणारी आहेस, तू स्वकीय अशा 'बर्हि' इत्यादिकांचे धारण करणारी आहेस असा अर्थ असलेल्या 'धा असि.' इत्यादि मंत्र म्हणत असताना खणलेली जमीन स्फ्यने सारखी करावी. इध्म, वेदी इत्यादिकांचे प्रोक्षण करण्याकरिता स्रुचीमध्ये जी उदके भरून ठेवली जातात त्यांना 'प्रोक्षणीः' अशी संज्ञा आहे. 'प्रोक्षणी' संज्ञक उदकाने भरलेली

स्रुची वेदीमध्ये ठेवावी कारण उदके ही राक्षसांचा नाश करणारी आहेत. यास्तव, प्रोक्षणी संज्ञक उदके स्रुचीत भरून वेदीत ठेवली असता ती राक्षसांचा नाश करण्याला कारणभूत होतात. उदक भरलेली स्रुची वेदीत ठेवण्यापूर्वी वेदीमध्ये स्फ्यने दक्षिणोत्तर अशी एक अखंड रेषा काढावी आणि त्या रेषेवर स्रुची ठेवावी. 'स्फ्य'ने ओढलेली रेषा अखंड असल्यामुळे तिच्यावर उदकपूर्ण स्रुची ठेवली जावी, हे यज्ञाच्या ठिकाणी अखंडत्व संपादन करण्याला कारणभूत होते. (अनुवाक ४).

कोणी ब्रह्मवादी असे म्हणतात की, 'हे अध्वर्यो, हविर्द्रव्यांचे तू उदकांनी प्रोक्षण केलेस हे ठीक आहे. पण त्या उदकांचे प्रोक्षण तू कशाने केलेस? यावर 'मंत्राने केले' असे अध्वर्यूने उत्तर द्यावे. कारण, हविर्द्रव्यांचे प्रोक्षण उदकांनी केले जाते व उदकांचे प्रोक्षण 'प्रोक्षिताः स्थ' (तुम्ही प्रोक्षण केलेलीच आहात) या मंत्राने केले जाते, हे स्पष्टच आहे. इध्म व बर्हि यांचे प्रोक्षण करावे. त्या योगाने इध्म व बर्हि यांना यज्ञयोग्य अर्थात् शुध्द केल्यासारखे होते. अलोमक म्हणजे तृणादिकांनी रहित, अर्थात् रखरखीत असलेली वेदी ही अमेध्य म्हणजे यज्ञाला अयोग्य होय. यासाठी वेदीचे समंत्रक प्रोक्षण करावे. असे केल्याने वेदीला यज्ञयोग्य केल्याप्रमाणे होते. 'बर्हि' संज्ञक दर्भमुष्टिसमूह वेदीमध्ये उभे ठेवावेत आणि त्यांच्या मूल, मध्य व अग्र या तीन ठिकाणी अनुक्रमे १ दिवे त्वा (द्युलोकाकरिता तुला प्रोक्षण करतो) २ अंतरिक्षाय त्वा (अंतरिक्षलोकाच्या संतोषाकरता तुला प्रोक्षण करतो) ३ पृथिव्यै त्वा (भूलोकाकरिता तुला प्रोक्षण करतो) या तीन मंत्रांनी उदकाने प्रोक्षण करावे. असे केले असता, भू इत्यादि तीन्ही लोकांच्या संतोषासाठी बर्हीचे प्रोक्षण केल्यासारखे होते. वेदीचे खनन करणे हे एक प्रकारचे क्रूर कर्मच केल्यासारखे होत असते. यास्तव, बर्हीचे प्रोक्षण करून स्रुचीत उरलेले उदक वेदीच्या पश्चिम सीमेवर दक्षिणेकडील कोपऱ्यापासून उत्तरेकडील कोपऱ्यापर्यंत संतत धारेने ओतावे. म्हणजे ते वेदीच्या ठिकाणी शांतता उत्पन्न करते. वेदीच्या पूर्वबाजूस ब्रह्म्याने किंवा यजमानाने 'प्रस्तर' नांवाची दर्भमुष्टी हाती धरून बसावे. असे केल्याने प्रस्तराला मुख्यत्व दिल्यासारखे होते. प्रजापतीचे जणू स्वरूपच अशा यजमानाच्या मुखाइतक्या उंचीवर प्रस्तर उचलून धरावा. 'बर्हि' संज्ञक दर्भांचे वेदीमध्ये आस्तरण करावे. म्हणजे वेदीत दर्भ आंथरावेत. 'बर्हि' हे प्रजारूप असून वेदी पृथ्वीरूप आहे. अर्थात् वेदीच्या ठिकाणी

बर्ही अंथरले असता पृथ्वीच्या ठिकाणी यजमानाच्या प्रजेला प्रतिष्ठित केल्यासारखे होते. वेदीची जमीन दृष्टीला फारशी पडणार नाही अशा रीतीने बर्ही दाट पसरावेत. असे केले असता प्रजा व पशू यांच्या योगाने सर्वतोपरी वेष्टित झालेला यजमान लोकांच्या फारसा दृष्टीस न पडेल असे केल्यासारखे होते. आंथरलेल्या बर्हीवर प्रस्तरसंज्ञक दर्भमुष्टी ठेवावी कारण बर्ही हे प्रजारूप असून प्रस्तर हा यजमानरूप आहे. यास्तव, आंथरलेल्या बर्हीवर प्रस्तर ठेवल्याच्या योगाने 'अयजमान' म्हणजे यजमानरूप नसलेल्या बर्हीवर अर्थात् उच्चस्थानी यजमानरूपी प्रस्तराला ठेवल्याप्रमाणे होते. आणि म्हणूनच यजमान नसलेल्या लोकांच्याहून उच्च जागी यजमान बसण्याची लौकिकात प्रथा पडली आहे. बर्ही व प्रस्तर हे परस्परांपासून अलग राहण्यासाठी आंथरलेल्या बर्हीवर प्रस्तर ठेवण्यापूर्वी त्याच्या खाली 'विशो यंत्रे स्थः' (तुम्ही प्रजांचे नियंते आहात) या मंत्राने दोन दर्भ दक्षिणोत्तर ठेवावेत आणि त्यावर प्रस्तर ठेवावा. 'प्रस्तर'संज्ञक दर्भमुष्टी स्रुचीतील आज्यात स्पृष्ट करून नंतर तो प्रस्तर आहवनीय अग्नीच्या ज्वालेवर प्रज्वलित करावा. म्हणजे, त्या प्रस्तराला जणू अभक्षणीय अशा हविर्द्रव्याचे स्वरूप प्राप्त करून देऊन जणू स्वर्गलोकाला पोचविल्यासारखे होते. जुहूमध्ये अग्र, उपभृतमध्ये मध्य आणि ध्रुवेमध्ये मूळ, अशाप्रकारे प्रस्तर तीन वेळ स्रुच्यामध्ये बुडवावा, कारण भूमी, अंतरिक्ष व द्युलोक किंवा स्वर्ग असे हे तीन लोक आहेत, यास्तव, आता सांगितल्याप्रमाणे तीन स्रुच्यामध्ये तीन वेळ प्रस्तर बूडवला म्हणजे तो तिन्ही लोकांच्या तृप्तीसाठीच बुडवल्याप्रमाणे होते.

अग्नीच्या निखाऱ्यात प्रस्तर खुपसून प्रज्वलित करू नये. तसे केले तर यजमानाचे भावी कल्याण 'अनूर्ध्व' होते, म्हणजे खालावते. अर्थात् स्वर्गप्राप्तीचे साधनच अधोगतीस जाते. यास्तव, उंच धरलेल्या हातात घेतलेला प्रस्तर अग्नीच्या ज्वालेवर धरून प्रज्वलित करावा. कारण स्वर्गलोक उंच आहे. अर्थात् उंच केलेल्या हातात धरून अग्नीवर प्रहरण केलेला प्रस्तर स्वर्गप्राप्तीचे साधन म्हणून उपयुक्त होतो. पालथ्या अर्थात् अधोमुख केलेल्या हातात प्रस्तर धरून अग्नीवर प्रहरण करावा. असे केल्याच्या योगाने यजमानाकरता अधोमुख अर्थात् आकाशातून खाली जमिनीवर पर्जन्यवृष्टीच जणू केल्यासारखे होते.

प्रस्तरसंज्ञक दर्भमुष्टीचे अग्राकडून आहवनीय अग्नीचे अत्यग्रप्रहरण म्हणजे

अतिक्रमण होऊ नये. अर्थात् प्रस्तराग्र आहवनीय अग्रीच्या उत्तरभागी राहील अशारीतीनेच त्याचे प्रहरण म्हणजे प्रज्वलन करावे. अत्यग्रप्रहरणाने होणारी अत्यासारिणी वृष्टी अध्वर्यूच्या विनाशाला कारण होते. जलादिकांचा अतिशय वर्षाव हेच अतिसारण. त्या योगाने पिकांची नासाडी होते. हाच अध्वर्यूचा नाश. अथवा एखाद्या रोगानेही त्याला मरण येते. अर्थात् पर्जन्यवृष्टीचे प्रतीक असलेले दर्भमुष्टीचे म्हणजे प्रस्तराचे आहवनीय अग्रीवर केले जाणारे प्रहरण अत्यग्र नसावे.

पूर्वेस मूळ व पश्चिमेस अग्र करून प्रस्तराचे अग्रीवर प्रहरण (प्रज्वलन) करू नये. पश्चिमाग्र अशा प्रस्तराचे जर प्रहरण केले गेले तर स्वर्गलोकातून यजमानाला दूर केल्याप्रमाणे होईल. यास्तव, प्रागग्र अर्थात्, पूर्वेस अग्र केलेल्या प्रस्तराचे प्रहरण करावे. म्हणजे त्या योगाने यजमानाला स्वर्गलोकालाच जणू प्राप्त केल्यासारखे होते. प्रस्तरातील दर्भांची अग्रे विसकटून निरनिराळ्या दिशेस जातील अशा प्रकारे अग्नीचे ठिकाणी प्रस्तराचे प्रहरण करू नये. जर प्रस्तराची अग्रे विसकटून निरनिराळ्या दिशेस गेली तर यजमानाला स्त्रीरूप अपत्यांचीच प्रजा होईल. प्रस्तरांची अग्रे एकमेकांपासून दूर न होता एकत्र जुळून राहतील अशा रीतीने वर करून प्रस्तर दंडा सारखा उभा धरावा. कारण, पुरुषाचे व्यंजक असे जे चिन्ह म्हणजे शिस्न ते उभेच असते. यास्तव, दंडाप्रमाणे उर्ध्वाग्र असा प्रस्तर धरून त्याचे अग्रीचे ठिकाणी प्रहरण केले असता, यजमानाला पुरुषरूप संततीच प्राप्त होते. चांगल्याप्रकारे दहन होण्यासाठी स्फ्यने, किंवा उपवेषाने जर प्रस्तर वर उचलून धरला, तर ती यजमानाची जणू हिंसाच होय. यास्तव, यजमानाचे रक्षण व्हावे म्हणून हातानेच प्रस्तर वर उचलावा.

काही ब्रह्मवादी असे म्हणतात की, यज्ञाचे यजमानस्थानीय असे कोणते अंग असते? यावर, बुद्धिवान् पुरुषाने 'प्रस्तर' हे यज्ञाचे यजमान-स्थानीय अंग असते, असे उत्तर द्यावे. त्या प्रस्तररूप यजमानाचा स्वर्ग-लोक कोणता? असा ब्रह्मवादी दुसरा प्रश्न करतात. त्यावर, आहवनीयाग्नी हाच त्या प्रस्तररूप यजमानाचा स्वर्गलोक होय असे उत्तर द्यावे. सारांश, प्रस्तराचे आहवनीयाग्नीवर प्रहरण करावे. असे केले असता यजमानाला स्वर्गलोकाला पोचविल्यासारखे होते.

प्रस्तराचे म्हणजे दर्भमुष्टीचे उत्क्षेपण मुळाकडून करण्यात येत असल्याने त्या दर्भमुष्टीच्या कोपामुळे यजमान अल्पायू किंवा एखाद्या रोगाने कृश होण्याची शक्यता असते. हे सम्यक्तया जाणल्यामुळे, सुचीत दर्भमुष्टीचे अंजन करून त्या दर्भमुष्टीतील एका दर्भाच्या काडीला अलग करून त्या दर्भाच्या काडीचे आहवनीयावर मागून प्रहरण म्हणजे प्रज्वलन केले जाते. त्यायोगे दर्भांचा कोप शांत केल्यासारखे होते. व यजमानाच्या ठिकाणी संभवणारी अल्पायुता किंवा रोगजनित कृशता दूर केल्यासारखी होते.

प्रस्तराचे प्रहरण केल्यानंतर अर्थात् प्रस्तररूप यजमान स्वर्गलोकी जाऊन पोचल्यावर अध्वर्यू निराधार झाल्यासारखा होतो. पालन करणारा धनी न उरल्यामुळे भयभीत होऊन तो सर्वदा कापूं लागण्यास पात्र होतो. यास्तव, 'ध्रुवाऽसि' (तु अचल आहेस) असे म्हणून त्याने भूमीला स्पर्श करावा. कारण ही पृथ्वी अचल म्हणजे स्थिर आहे. अर्थात् तिला समंत्रक स्पर्श केल्याच्या योगाने अध्वर्यू या पृथ्वीवर स्थैर्याने प्रतिष्ठित होतो. भयाने कांपत नाही. 'अगात् अग्नि इत् ह' (हे आग्रीध्र, यजमान स्वर्गलोकाला गेला काय?) असा अध्वर्यूने प्रश्न विचारला असता 'अगन्नग्नि:' असे जर आग्रीध्र उत्तर देईल, तर 'अग्नी स्वर्गाला गेला' असा त्या उत्तराचा अर्थ होईल. पण तो बरोबर नाही कारण अशा अर्थाच्या ग्रहणाने आहवनीयाग्नीरूप स्वर्गलोकाच्या ठिकाणी त्याच अग्नीला पोचविल्याप्रमाणे होते. आणि यजमानाला स्वर्गलोकातून दूर केल्यासारखे होते. यास्तव, 'अगन्नग्नि:' यापैकी 'अग्नि:' हे पद कमी करून आग्रीधाने नुसते 'अगन्' (स्वर्गलोकाला गेला) येवढेच उत्तर द्यावे. म्हणजे त्या योगाने 'यजमान स्वर्गलोकाला गेला' असा अर्थ निष्पन्न होतो. आणि त्याप्रमाणे यजमानालाच स्वर्गलोकाचे ठिकाणी प्राप्त केल्यासारखे होते. (अनुवाक ५).

अग्नीचे तीन वडील भाऊ होते. ते देवांच्यासाठी हविर्द्रव्ये वाहून नेता नेता थकून गेले. तेव्हा अग्नी भ्याला. माझ्या भावांप्रमाणे माझीही वाट लागेल, माझ्यावरही मरणाचे संकट ओढवेल. सारांश, जो हविर्द्रव्याचे ओझे वाहील तो मरावयाचाच, असे अग्नीला वाटल्यामुळे तो देवांना थांग न लागेल अशा ठिकाणी गेला. आणि पाण्यात बुडून बसला. तेव्हा त्या अग्नीला शोधून काढण्याची देवांना इच्छा झाली. त्याचा त्यांनी अगदी बारकाईने शोध सुरु

केला. तेव्हा पाण्यात राहणाऱ्या माशाने 'अग्नी ह्या पाण्यात दडून बसला आहे' असे देवांना सांगितले. तेव्हा त्या अग्नीने माशाला शाप दिला की, 'ज्या अर्थी मी येथे दडून बसल्याची खबर देवांना देऊन तू माझ्याशी चहाडखोरपणा केला आहेस, त्या अर्थी जाळे खांद्यावर टाकून जाणारे कोळी त्यांना जेव्हा जेव्हा बुध्दी होईल तेव्हा तेव्हा ते तुला जाळ्यात पकडून तुझा वध करोत'. अशा प्रकारे अग्नीने माशाला शाप दिल्यामुळे कोळी लोक त्यांना वाटेल तेव्हा, रात्री किंवा दिवसा पाण्यात जाळे टाकून मासे मारीत असतात. असो. माशाकडून खबर मिळाल्याप्रमाणे देवांनी अग्नीला हुडकून काढले व ते त्याला म्हणाले की, तू आमच्याकडे चल आणि आमची हविर्द्रव्ये वाहून आणण्याचे काम कर. तेव्हा अग्नी म्हणाला, 'हे देवहो, स्रुचीमध्ये भरून घेतलेल्या हविर्द्रव्यापैकी होम करण्यापूर्वी जो अंश परिधींच्या म्हणजे अग्नीकुंडाच्या तीन बाजूस स्थापन केलेल्या दंडाकार काष्ठांच्या बाहेर सांडला जाईल, तो अंश माझ्या भावांचा असो'. तेव्हा देवांनी त्या प्रमाणे भाग देण्याचे अग्नीला कबूल केले. यास्तव, हवनापूर्वी स्रुचीत घेतलेल्या हविर्द्रव्याचा जो अंश परिधींच्या बाहेर सांडेल त्या अंशाने यजमानाने जणू काय अग्नीच्या भावांना संतुष्ट केल्याप्रमाणे होते. परिधींच्या बाहेरचा प्रदेश अग्नीच्या भावांना उपयुक्त असल्यामुळे पूर्व खेरीज करून अग्नीच्या कुंडाभोवती तीन दिशांना परिधी घालावेत. म्हणजे दंडाकार काष्ठे स्थापन करावीत. म्हणजे ती अग्नी-कुंडाजवळ येणाऱ्या राक्षसांचा नाश करण्याला कारणभूत होतात. यासाठी, राक्षसांचा प्रवेश होण्याइतकी फट राहू नये म्हणून पश्चिम दिशेस घातलेल्या परिधीस अगदी चिकटून दक्षिण व उत्तर बाजू कडील परिधी घालावेत. अग्निकुंडाच्या पूर्वबाजूस परिधी घालू नये. कारण, पूर्व दिशेस सूर्योदय झाल्यानेच राक्षस नष्ट होतात. अग्निकुंडाच्या आग्नेय व ईशान्य कोपऱ्यात अनुक्रमे दोन समिधा उभ्या खोचून ठेवाव्यात. असे केले असता चारी दिशांच्या प्रमाणे ऊर्ध्व दिशेकडून येणारे राक्षसही नष्ट होतात. त्या दोन समिधांमध्ये 'मिथुनत्व' म्हणजे स्त्रीपुरुषरूप दांपत्यभाव उत्पन्न व्हावा म्हणून आग्नेय कोपऱ्यातील समिधा 'वीतिहोत्रं त्वा.' हा मंत्र म्हणून खोचावी आणि ईशान्य कोपऱ्यातील समिधा 'तूष्णीं' म्हणजे मंत्र न म्हणताच खोचावी. सारांश, दोन कोपऱ्यात दोन समिधा खोचून उभ्या कराव्यात. म्हणजे दोन पाय असलेला यजमान या भूलोकावर प्रतिष्ठित करण्याला त्या कारणभूत होतात. हवन करण्यापूर्वी

हविर्द्रव्य जर जमिनीवर सांडले तर यज्ञाचा विनाश होतो. अर्थात् त्या योगाने यजमानही विनाशाभिमुख होतो. यास्तव, त्या विनाशाचा परिहार होऊन तो यजमान यथासांग केलेल्या यज्ञाच्या फलरूपी धनाने कसा संपन्न होईल? असा काही ब्रह्मवादी प्रश्न करतात, त्यावर बुध्दिमान पुरुषाने असे उत्तर द्यावे की, भूपतये स्वाहा (भूलोकपालकाला हे अर्पण असो), भुवनपतये स्वाहा (अंतरिक्ष लोकपालकाला हे अर्पण असो), भूतानां पतये स्वाहा (भूतामात्रांच्या पालकाला हे अर्पण असो), हे तीन मंत्र म्हणून सांडलेल्या हविर्द्रव्याचे अभिमंत्रण करावे. असे केल्याच्या योगाने यज्ञाच्या विनाशामुळे विनाशमुख झालेला यजमान सांग झालेल्या यज्ञाच्या फलरूपी धनाने संपन्न होतो. कारण, त्याने 'भूपति' इत्यादि बहुत देवतांना संतुष्ट केलेले असते. अर्थात्, त्या देवतांच्या अनुग्रहाने यजमान यज्ञाच्या यथार्थ अशा फलरूपी धनाने संपन्न होणे युक्तच आहे.

अग्नी व अग्नीषोम या दोन देवतांच्यासाठी अनुक्रमे जो पुरोडाशयाग केला जातो, त्या योगाने यज्ञानुष्ठानाचे कामी आळशीपणा केल्यासारखे होत असते. यासाठी या दोन यागांच्या मध्ये आज्यद्रव्याने 'उपांशु' संज्ञक याग करावा. म्हणजे त्या योगाने यज्ञानुष्ठानाचे कामी आळशीपणा केल्याचा दोष उत्पन्न होत नाही. शिवाय एक पुरोडाश याग व दुसरा आज्य द्रव्याचा याग, अशा प्रकारे या यागांमध्ये 'मिथुनत्व' म्हणजे दांपत्यभावही उत्पन्न होतो.

पूर्वी एकदा अग्नी स्वर्गलोकात व यम भूलोकात राहत होता. अर्थात्, अग्नीच्या अभावी मनुष्यांची स्वयंपाक वगैरे कार्ये बंद पडली व यमाच्या अभावी पितरांना राजा नाहीसा झाला. तेव्हा देवांनी एकमेकांना जवळ बोलावून अग्नी व यम यांची अदलाबदल करण्याची इच्छा प्रदर्शित केली. सेवनीय अशा हविर्द्रव्यरूपी अन्नाच्या आमिषाने देवांनी अग्नीला भूलोकी येण्याचा लोभ उत्पन्न केला आणि पितरांनी राज्याचे आमिष दाखवून यमाला स्वर्गलोकी जाण्याचा लोभ उत्पन्न केला. असे असल्यामुळे सर्व देवांमध्ये अग्नी हा पुष्कळ अन्न भक्षण करणारा झाला आणि यम पितरांचा राजा होऊन बसला. अग्नी व यम यांचा हा वृत्तांत जो जाणतो, तो उत्कृष्ट असे राज्य व सेवनीय असे अन्न संपादन करतो. सारांश, त्या अग्नीला देवांनी भाग दिला.

पण तो भाग कोणता? अशी जी शंका उत्पन्न होते, तिचे समाधान असे की, 'स्विष्टकृत्' संज्ञक आहुती देण्याकरिता ज्या हविर्भागाचे अवदान घेत असतात, तो देवांनी अग्नीला दिलेला भाग होय. यासाठी, 'स्विष्टकृत्' अग्नीच्या उद्देशाने हविर्द्रव्याचे अवदान घ्यावे आणि त्याचे यजन करावे. म्हणजे त्या योगाने देवांनी दिलेल्या भागाने क्रूर अशा अग्नीला समृध्द अर्थात् संतुष्ट केल्यासारखे होते. पुरोडाश वगैरे जितकी म्हणून हविर्द्रव्ये असतील त्या सर्वांमधील प्रत्येकाचे एक एकच वेळ स्रुचीमध्ये अवदान घ्यावे. कारण अग्नीरूपी रुद्र एकच असल्यासारखा आहे. हविर्द्रव्यातील अवदान घ्यावयाचे ते त्याच्या उत्तरार्धातून घ्यावे. कारण, उत्तरार्धात असलेली 'ईशान्य' हीच रुद्राची दिशा होय. यास्तव, उत्तरार्धातून अवदान घेतले असता स्वकीय अशा दिशेच्या ठिकाणी अग्निरूपी रुद्राला निःशेष, अर्थात् पूर्णत्वाने संतुष्ट केल्यासारखे होते. स्रुचीत अवदान घेतल्यावर त्याचे ठिकाणी आज्याने दोनदा 'अभिघारण' करावे. म्हणजे ते 'चतुरवत्त' (चार वेळ अवदान घेतल्याची क्रिया) पूर्णपणे संपादन करण्याला कारणभूत होते.

पशू ज्याप्रमाणे इच्छित असे दुग्धादि रस देतात त्याचप्रमाणे पूर्वी दिलेल्या पुरोडाशादि द्रव्यांच्या आहुती इष्ट असे फळ देणाऱ्या असल्यामुळे त्या जणू काय पशुरूपच होत. आणि अग्नी हा तर क्रूर स्वभावामुळे रुद्रस्वरूप होय. यासाठी, पूर्वी दिलेल्या पुरोडाशादि द्रव्यांच्या आहुतीवरच जर 'स्विष्टकृत्' संज्ञक आहुती दिली तर पशूंना घातक अशा रूद्रदेवतेला देऊन टाकल्यासारखे होईल. आणि त्यामुळे यजमान पशुसंपत्तिरहित होईल. यास्तव, पशूंचे रक्षण व्हावे म्हणून पूर्वी दिलेल्या पुरोडाशादिकांच्या आहुतीचे स्थळ ओलांडून पुढच्या स्थळात 'स्विष्टकृत्' संज्ञक आहुती द्यावी. (अनुवाक ६).

पृथ्वीवर यज्ञामध्ये उपयोगात आणावयास योग्य असे कोणते 'द्रव्य' म्हणजे वस्तू आहे, या विषयी मनूने सर्व ठिकाणी शोध केला. तेव्हा भूमीवर काही गाईंची पावले उमटलेली असून त्यांच्या ठिकाणी घृत म्हणजे तूप सांडलेले आहे, असे त्याला आढळून आले. तेव्हा मनू देवांना म्हणाला, या भूमीवर उमटलेल्या गाईंच्या पावलांचे ठिकाणी सांडलेल्या घृताचा ज्याप्रमाणे भोजनादि लोकव्यवहारात उपयोग केला जातो, त्याप्रमाणे या घृताचा यज्ञामध्ये उपयोग करण्याला कोण समर्थ आहे? मनूचा हा प्रश्न ऐकून तेथे असलेले

'मित्रावरुण' अर्थात् मित्र व वरुण हे दोघे त्याला म्हणाले की, गाईच्या या घृताचा उपयोग यज्ञात करण्यात काय मोठेसे आहे? तो उपयोग करता येईलच. पण घृत उत्पन्न करणाऱ्या गाईचाच यज्ञामधील एक अंग म्हणून उपयोग करण्यास आम्ही उभयता समर्थ आहोत. नंतर त्या मित्रावरुणांनी इडारूपी गाय भूमीवर आणली. त्या इडारूपी गाईने भूमीवर जेथे जेथे पाऊल ठेवले, त्या त्या गोपादांकित भूप्रदेशाचे ठिकाणी घृत सांडलेले असल्याचे दिसून आले. इडारूपी गाईच्या पावलांपासून घृत निष्पन्न झाल्याचे जेव्हा आढळले तेव्हापासून ती 'घृतपदी' म्हणून प्रसिध्दीस आली. याप्रमाणे इडारूपी गाईचा यज्ञभूमीचे ठिकाणी जन्म झाला.

'पृथ्वीसहवर्तमान' रथंतर सामाला मी 'आव्हान' केले, म्हणजे जवळ बोलावले', अशा अर्थाचा 'उपहूतं रथंतरं सह पृथिव्या' हा मंत्रभाग होत्याने पठण करावा. ही पृथ्वीच जणू रथंतरसामरूप आहे. 'पृष्ठ' संज्ञक सहा 'स्तोत्रांमध्ये (सामांमध्ये) 'रथंतर' हे साम आद्य किंवा प्रथमस्थानापन्न आहे, त्याचप्रमाणे तीन लोकांमध्ये भूमी ही आद्य, अर्थात् प्रथमस्थानापन्न आहे. पूर्वोक्त मंत्रभागातील 'पृथ्वी' हा शब्द तिच्यापासून उत्पन्न होणाऱ्या सेवनीय अशा अन्नाचा उपलक्षक आहे. अर्थात्, पूर्वोक्त मंत्रभागाचे पठण केल्याच्या योगाने होत्याने जणू काय सेवनीय अशा अन्नासह पृथ्वीलाच जवळ बोलावल्यासारखे होते. 'अंतरिक्षासह' वामदेव्य सामाला मी आपल्या जवळ बोलाविले अशा अर्थाचा 'उपहूतं वामदेव्यं सहांतरिक्षेण' हा मंत्रभाग होत्याने म्हणावा. 'वामदेव्य' सामाच्या योगाने पशूंची प्राप्ती होत असल्याने पशू हेच जणू 'वामदेव्य' सामरूप आहेत. यास्तव, पूर्वोक्त मंत्रभाग पठण केला असता, होत्याने जणू काय अंतरिक्षासहवर्तमान पशूंनाच आपल्याजवळ बोलावल्यासारखे होते. 'द्युलोकासह 'बृहत्' सामाला मी आपल्याजवळ बोलावले' असा अर्थ असलेला 'उपहूतं बृहत्सह दिवा' हा मंत्रभाग पठण करावा. 'इरा' म्हणजे पर्जन्यवृष्टी. 'बृहत्' साम हे पर्जन्यवृष्टीला प्राप्त करून देणारे असल्याने, तेच जणू वृष्टिरूप आहे. अर्थात्, पूर्वोक्त मंत्रभाग पठण केला म्हणजे होत्याने जणू काय द्युलोकासह पर्जन्यवृष्टीलाच जवळ बोलावल्यासारखे होते. 'सप्त होते मी आपल्याजवळ बोलावले', अशा अर्थाचा 'उपहूताः सप्त होत्राः' हा मंत्रभाग पठण करावा म्हणजे होत्याने होता, प्रशास्ता (मैत्रावरूण), ब्राम्हणाच्छंसी, पोता, नेष्टा, आग्नीध्र व अच्छावाक या सात होत्रांना म्हणजे होत्रकांनाच जणू काय जवळ

बोलावल्यासारखे होते. 'ऋषभासह धेनू मी आपल्या जवळ बोलावली' असा अर्थ व्यक्त करणारा 'उपहूता धेनुः सहर्षभा' हा मंत्रभाग म्हणावा म्हणजे होत्याने 'गाय व बैल' यांच्या जोडप्यालाच जणू काय आपल्याजवळ बोलावल्यासारखे होते. 'मित्राप्रमाणे उपकारक अशा सोमपानरूपी भक्षाला मी जवळ बोलावले' अशा अर्थाचा 'उपहूतो भक्षः सखा' हा मंत्रभाग पठण करावा. त्या योगाने 'सोमपानाला'च जणू काय होत्याने आपल्याजवळ बोलावल्यासारखे होते. 'उपहूतां हो' हा मंत्रभाग पठण करावा. म्हणजे होत्याने जणू काय आपल्या आत्म्यालाच जवळ बोलावल्यासारखे होते. आतापर्यंत रथंतर, पृथ्वी इत्यादि ज्यांना ज्यांना आव्हान केले, ते ते आत्म्याच्या आधीन असल्यामुळे ह्या सर्वांमध्ये आत्मा हाच वसिष्ठ, अर्थात्, श्रेष्ठ आहे. यास्तव, होत्याने त्याचे, म्हणजे स्वतःच्या आत्म्याचे 'आव्हान' करणे, त्याला जवळ बोलावणे युक्तच आहे. 'इडा' म्हणजे गोशरीरधारिणी देवता होय. ह्या गोरूपधारी इडेचे 'इडोपहूता' (इडेला जवळ बोलाविली) इत्यादि मंत्राने 'उपाव्हान' करावे. म्हणजे तिला जवळ बोलवावी. इडा ही जणू काय पशुरूप आहे. अर्थात्, तिला जवळ बोलाविली असता पशूंनाच जवळ बोलावल्यासारखे होते. 'इडोपहूता, उपहूतेडा,' ह्या उलट सुलट पदे असलेल्या दोन वाक्यांचा दोन वेळ उच्चार केला असता चार वेळ इडेचे उपाव्हान केल्यासारखे होते. पशू हे चतुष्पाद असतात. यास्तव, पशुरूप असलेल्या इडेचे उपाव्हान केल्याने चतुष्पाद अशा पशूंना उपाव्हान केल्याप्रमाणे होणे युक्तच आहे. इडेला 'मानवी' असे होत्याकडून म्हटले जाते. कारण, मनूनेच या इडेला प्रथम पाहिली. हिला 'घृतपदी' असेही म्हटले जात असते. ज्या अर्थी या इडारूप गाईच्या पावलापासून घृताचा स्राव झालेला आढळला, म्हणजे हिची पावले उमटलेली होती तेथे घृत सांडले होते, त्या अर्थी 'घृतपदी' असे इडेला उद्देशून होत्याने म्हणावे हे योग्यच आहे. मित्र व वरुण या दोघा देवांनी पूर्वी हिला उपाव्हान करून जवळ बोलावली असल्याने 'मैत्रावरुणी' असे म्हटले जाते, तेही बरोबर आहे. होता 'ब्रह्म देवकृतं उपहूतं' म्हणजे देवांनी केलेल्या परमश्रेष्ठ अशा इडोपाव्हानरूप कर्माला जवळ बोलावले', असे म्हणतो. त्या योगाने जणू काय देवांनी पूर्वी केलेल्या ब्रह्माचे, अर्थात् इडोपाव्हानरूप कर्माचेच 'उपाव्हान' केल्यासारखे होते. ''देवांमधील अध्वर्यू असलेल्या उभयता अश्विनीकुमारांना जवळ बोलावले, त्याचप्रमाणे मनुष्यांमधील अध्वर्यूंनाही 'उपाव्हान'

केले.' असा अर्थ असलेल्या 'दैव्या अध्वर्यव उपहूता उपहूता मनुष्या:' असा जो मंत्रभाग होता नांवाचा ऋत्विज् पठण करतो, त्या योगाने त्याने देव व मनुष्य या दोहोमधील अध्वर्यूंना उपाव्हान करून जवळ बोलावल्याप्रमाणे होते. 'जे या यज्ञाचे संरक्षण करतात आणि जे यजमानाचे संवर्धन करतात, त्यांना जवळ बोलावले' असा अर्थ असलेला 'य इमं यज्ञमवाम् ये यज्ञपतिं वर्धान्' हा मंत्रभागात म्हटला जातो, त्या योगाने यज्ञ व यजमान या दोघांच्यासाठी मंत्रभाग व्यक्त झालेल्या आशीर्वादाची प्रार्थना केल्यासारखे होते. 'द्यावापृथिवींना, म्हणजे द्युलोक व पृथ्वी यांना जवळ बोलावले,' ह्या अर्थाचा 'उपहूते द्यावापृथिवी' हा मंत्रभाग होता हा ऋत्विज् पठण करतो, त्या योगाने त्याने द्युलोक व पृथ्वी ह्या दोघांना उपाव्हान केल्याप्रमाणे होते. 'पूर्वजे ऋतावरी' असे होता म्हणत असतो. कारण देव, मनुष्ये इत्यादि सर्वांच्या अगोदर 'द्यावापृथिवी' म्हणजे द्युलोक व पृथ्वी ही दोघे उत्पन्न झाली असून या दोघांच्या पासूनच ऋतशब्दवाच्य अशा यज्ञाचे अस्तित्व असल्यामुळे त्यांना अनुलक्षून 'ऋतावरी' असे पद पूर्वोक्त मंत्रभागात आले आहे. 'देवी देवपुत्रे' असे होता म्हणत असतो. कारण ही दोघे दिव्यरूप असून देव हे या उभयतांचेच पुत्र असल्यामुळे त्यांना 'देवपुत्रे' या शब्दाने उल्लेखिले आहे. 'हा यजमानही जवळ बोलावला, म्हणजे यजमानालाही जवळ बोलावले', असा अर्थ असलेला 'उपहूतोऽयं यजमान:' असा मंत्रभाग होत्याकडून म्हटला जातो. त्या योगाने त्याने यजमानाचेच 'उपाव्हान' केल्यासारखे होते. 'उत्तरस्यां देवयज्यायामुपहूतो भूयसि हविष्करण उपहूतो दिव्ये धामन्नुपहूत:' असा मंत्रभाग होत्याने म्हणावा. कारण, प्रजा ह्या 'उत्तरदेवयज्या' म्हणजे पुढे देवयजन करणाऱ्या, पशू हेच पुष्कळ हविर्द्रव्य निर्माण करण्याचे साधन आणि स्वर्गलोक हेच दिव्य असे धाम म्हणजे स्थान होय. 'इदमसीदमसि' असे होत्याने म्हणावयाचे असते. त्या योगाने तू हे निरूढपशुबंधरूप कर्म करण्याची इच्छा करणारे आहेस, तू हे सोमयागरूप कर्म करण्याची इच्छा करणारे आहेस, अशा प्रकारे स्तुती करून यज्ञाच्या प्रिय अशा स्थानालाच जणू काय यजमानाने होत्याच्या द्वारा आपल्याजवळ बोलावल्यासारखे होते. 'विश्वमस्य प्रियमुपहूतं' म्हणजे 'यजमानाला आणखी जे जे काय प्रिय असेल त्या त्या सर्वाला मी उपाव्हान केले आहे, असे होत्याने म्हणावे. त्या योगाने यज्ञानुष्ठान जेणे करून व्यर्थ न होता, यथासांग व फलद्रूप होईल अशा

प्रकारे होत्याने यजमानाचेच जणू उपाव्हान करून त्याला जवळ बोलावल्या-सारखे होते. (अनुवाक ७).

गोरूप 'इडा' म्हणजेच जणू काय पशू होत. पशुरूप अशा त्या इडेचा काही भाग होता स्वतःच उचलून घेतो म्हणजे तो जणू काय पशूंच्या पैकी आपल्या मनाने हवा असेल तेवढ्याच भागाचा स्वीकार करतो. होत्याखेरीज दुसरा कोणीही पशूंच्या पैकी अभिलषित असा भाग देण्याला समर्थ होत नाही. 'इडोपाव्हानरूपी वाणीचा पालक असलेल्या जीवात्म्याला समर्पण केलेल्या हे पुरोडाशा, तुला मी भक्षण करतो,' अशा अर्थाचा 'वाचस्पतये त्वा हुतं प्राश्नामि' असा मंत्र होत्याने इडेचा भाग भक्षण करतांना म्हणावा. म्हणजे त्या योगाने उचित असा भाग देऊन त्याने जणू काय वाग्देवतेला संतुष्ट केल्यासारखे होते. 'यज्ञसभेचा पालक असलेल्या जीवात्म्याला अर्पण केलेल्या तुज पुरोडाशाला मी भक्षण करतो,' अशा अर्थाला व्यक्त करणारा 'सदसस्पतये त्वा हुतं प्राश्नामि' असा मंत्र म्हणावा. म्हणजे होत्याने त्या पुरोडाशाला स्वतःच्या उदरात समाविष्ट केल्याप्रमाणे होते. होत्याच्या हातावर इडेचा भाग द्यावयाचा तो अध्वर्यूने 'चतुरवत्त' संज्ञक पध्दतीने द्यावा. प्रथम उपसारण, दोनदा अवदान व पुन्हा उपसारण अशी 'चतुरवत्त अवदान देण्याची पध्दत आहे. देवतांना अर्पण करण्यात येणारा हविर्भाग जसा 'चतुरवत्त' पध्दतीने द्यावयाचा, तसाच होत्याला अर्पण करण्यात येणारा इडारूपी हविर्भागही 'चतुरवत्त' पध्दतीनेच देणे योग्य आहे. चार पायांनी युक्त असलेले पशू हे देखील चार या संख्येच्या दृष्टीने हविर्भागाशी समानरूप असल्याने होत्याच्या हातावर दिला जाणारा इडारूप हविर्भाग हा देखील पशूस्वरूपच समजावा.

देवतारूप इडेचे जर होता भक्षण करील तर तो मरण पावेल. आणि भक्षण न करता त्या भागाचा जर होता अग्नीमध्ये होम करील तर इडारूप असलेल्या गाई इत्यादि पशूंना त्याने जणू काय अग्निस्वरूप अशा क्रूर रुद्राला अर्पण केल्यासारखे होईल. आणि त्यामुळे यजमान पशुरहित होईल. यास्तव, 'वाचस्पतये त्वा हुतं प्राश्नामि' असे प्रथम म्हणून मग होत्याने इडाभाग भक्षण केला असता साक्षात् अग्नीचे ठिकाणी त्याचा होम केल्यासारखे होत नाही, व रुद्राला पशूंचे समर्पण केल्यासारखे होत नाही. शिवाय वाचस्पती देवतेला मध्ये ठेऊन अप्रत्यक्ष रीतीने त्या इडारूप हविर्भागाचे यजन केले गेल्यामुळे होत्याला प्रत्यक्ष इडाभक्षण केल्याचा दोष लागत नाही व तो

मरतही नाही. भक्षण केलेल्या हविर्भागाचे स्वात्मगतत्वाने स्थापन व्हावयासाठी 'सदसस्पतये त्वा हुतं प्राश्नामि' हा मंत्र होत्याने म्हणावा.

यज्ञभूमी ही जणू काय दु:खोत्तरण करणारे असे तीर्थ म्हणजे पवित्र स्थलच आहे. यज्ञभूमीचे ठिकाणी यजमानासह चारही ऋत्विज इडा भक्षण करतात म्हणजे ते जणू काय तीर्थसार अशा पवित्र स्थलीच भक्षण करतात. ऋत्विजांनी इडा भागाचे प्राशन केले म्हणजे त्यांना यजमान दक्षिणा देतो, ती देखील तीर्थसमान यज्ञभूमीच्याच ठिकाणी देतो, हे युक्तच आहे.

यज्ञानुष्ठान संपल्याखेरीज मध्यंतरी जर ऋत्विज व यजमान इडा भक्षण करतील तर त्यांनी जणू काय यज्ञाला छिन्नविच्छिन्न केल्यासारखे होते. म्हणून इडा भक्षण केल्यानंतर त्या सर्वांनी उदकाने मार्जन करावे. उदके ही सर्वदेवतात्मक आहेत. यास्तव, उदकाने मार्जन केल्याच्या योगाने देवतांच्याकडून छिन्नविछिन्न झालेल्या यज्ञाला त्यांनी पुन: उत्तम प्रकारे सुसंघटित केल्यासारखे होते.

पूर्वी देवांनी जेव्हा प्रथमच यज्ञ केला तेव्हा ते स्विष्टकृत् अग्निरूपी रुद्राला अंतरले! म्हणजे 'स्विष्टकृत्'संज्ञक आहुती देण्याचे विसरले. त्यामुळे क्रोधाविष्ट झालेल्या रुद्राने त्यांचा यज्ञ विकल करून टाकला. तेव्हा देव त्या रुद्रासमोर गेले आणि, 'आमचे हे यज्ञानुष्ठान संपूर्णतेला प्राप्त होवो' अशी त्या रुद्राची त्यांनी प्रार्थना केली. या वेळी काही बुध्दिवंत देव इतर देवांना म्हणाले की, जर आम्ही ह्या रुद्राला हवी प्रदान करून म्हणजे हविर्भाग समर्पण करून त्याची आराधना करू तर आमचे हे यज्ञानुष्ठानरूप कर्म 'स्विष्ट' म्हणजे यथासांग व उत्तम प्रकारे इष्टफलदायी होईल. नंतर त्याप्रमाणे देवांनी हविर्द्रव्यार्पणाने रुद्राची आराधना करून आपले यज्ञकर्म 'स्विष्ट' अर्थात् इष्टफलदायी असे केल्यामुळे, रुद्ररूप अशा अग्नीला 'स्विष्टकृत्' ही संज्ञा प्राप्त झाली. यज्ञरूपी कर्म उत्तम प्रकारे इष्टफलदायी करणे, हेच त्या 'स्विष्टकृत्'संज्ञक रुद्ररूपी अग्नीचे 'स्विष्टकृत्त्व' होय. देवांनी पूर्वोक्त प्रकाराने रुद्ररूप अग्नीची आराधना केल्यानंतर अवदान घेतल्यामुळे पुरोडाशाच्या ज्या भागाला 'क्षत' पडले होते त्यातूनच 'यव'मात्र म्हणजे एका सातूच्या दाण्या इतका अंश 'प्राशित्र' भाग म्हणून चिमटीने तोडून घेतला. यास्तव, 'प्राशित्रभाग' जो घ्यावयाचा तो 'यव' मात्रच घ्यावा. जर अधिक भाग घेतला तर यज्ञाचे

ते अंग मोहित केल्याप्रमाणे होईल. म्हणजे यज्ञप्रयोगात भ्रांती उत्पन्न होईल. प्राशित्रपात्राचे ठिकाणी प्रथम उपस्तरण करून, अवदान घेतल्यावर पुन्हा अभिघारण केले गेले तर घेतलेल्या त्या पुरोडाशभागाच्या दोन्ही बाजूला सूज आणल्यासारखे होईल. यास्तव, प्राशित्रपात्राचे ठिकाणी उपस्तरण न करता पुरोडाशाचे अवदान तेवढे घेऊन त्यावर अभिघारण करावे. म्हणजे उपस्तरण व अवदान मिळून 'दोन' ही संख्या होते आणि ती द्विपाद अशा यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते. अध्वर्यूने स्वतःच्या जागेवरून आपला हात लांब तिरपा करून जर दक्षिण बाजूस बसलेल्या ब्रह्म्याला 'प्राशित्रपात्र' दिले तर यज्ञाचे जे अंग रुद्राने छिन्नविच्छिन्न केले नसेल ते देखील छिन्नविच्छिन्न केल्याप्रमाणे होईल. यासाठी अध्वर्यूने पूर्वेस जाऊन आहवनीयाच्या पुढच्या बाजूने दक्षिणेस ब्रह्म्यासमीप जावे व त्यास प्राशित्रपात्र द्यावे. असे केल्याच्या योगाने योग्य अशा मार्गाने ब्रह्म्याला प्राशित्र नेऊन दिल्यासारखे होते.

पूर्वी एकदा देवांनी 'प्राशित्र' भाग पूषालाच अर्पण केला. पूषाने तो भाग मंत्र न म्हणताच तोंडात टाकला व तो आपल्या दातांनी चावून खाल्ला. त्या योगाने त्याने आपले दांत मात्र पाडून घेतले! तेव्हापासून पूषा हा दंतविहीन झाला. आणि बारिक केलेल्या पिठाचाच तयार केलेला हविर्भाग सेवन करण्याचा तो अधिकारी होऊन बसला. यास्तव, पूषा देवतेसाठी केव्हाही जरी चरू शिजवावयाचा असला तरी बारीक पीठ केलेल्या तांदुळाचाच शिजवावा.

देव आपापसात असे म्हणाले की, हा पूषा दंतविहीन झाल्याने समृद्धिरहित झाला आहे. यास्तव, प्राशित्रभाग देण्याला आता हा योग्य नाही. याप्रमाणे देवांनी एकविचार केला आणि त्यांनी प्राशित्रभाग बृहस्पतीला दिला. तेव्हा बृहस्पतीच्या मनात अशी भीती उत्पन्न झाली की, प्राशित्रभागाचे भक्षण केल्यामुळे पूषावर जसे दांत पडण्याचे संकट कोसळले त्याप्रमाणे माझ्यासारखा दुसरा जो कोणी 'प्राशित्रभाग' भक्षण करील तोही तशाच प्रकारे संकटात पडणार नाही ना? नंतर त्या बृहस्पतीने 'हे प्राशित्रभागा, सूर्याच्या नेत्राने मी तुला पाहतो' अशा अर्थाचा 'सूर्यस्य त्वा चक्षुषा प्रतिपश्यामि ' हा मंत्र आपल्या विवेकदृष्टीने पाहिला व तो म्हणून त्याने प्राशित्रभागाचे अवलोकन केले. मनुष्याचे नेत्र एखाद्या रोगाने पीडित होतील, पण आरोग्यप्रद अशा भगवान सूर्याच्या नेत्रांना कोणाकडूनही पीडा होणे शक्य नाही. हा प्राशित्रभाग

मज प्रतिग्रह करणाराला मारील की काय? असे मनात येऊन बृहस्पती भ्याला. मग, त्याने 'सविता देवाच्या प्रेरणेने, अश्विनीकुमारांच्या बाहूंनी व पूषा देवाच्या हातांनी मी तुझा प्रतिग्रह करतो', अशा अर्थाचा 'देवस्य त्वा...प्रतिगृह्णामि' या मंत्राचा उच्चार करून प्राशित्रभागाचा प्रतिग्रह म्हणजे स्वीकार केला. अर्थात् सविता देवाच्या प्रेरणेने युक्त होऊन पठण केलेल्या मंत्राने बृहस्पतीने प्राशित्र भागाचा स्वीकार केल्यामुळे मंत्रोक्त देवतांच्या कृपेने त्याला काही पीडा झाली नाही. यास्तव, ब्रह्म्याने पूर्वोक्त मंत्राने प्राशित्र भागाचा स्वीकार करावा. प्राशन करीत असलेल्या मला हा प्राशित्रभाग मारील की काय? अशी शंका घेऊन बृहस्पती भ्याला व त्याने 'अग्नेस्त्वाऽऽस्येन प्राश्नामि' म्हणजे अग्नीच्या मुखाने मी तुला प्राशन करतो', असा मंत्र म्हणून त्या भागाचे प्राशन केले. अग्नीच्या मुखाला कोणाकडूनही पीडा होऊ शकत नाही, हे उघडच आहे. यास्तव, ब्रह्म्याने 'अग्नेस्त्वा' हा मंत्र म्हणून प्राशित्रभाग भक्षण करावा. प्राशन केलेल्या मला तो प्राशित्रभाग मारील की काय? असे वाटून बृहस्पती भ्याला आणि 'ब्राह्मणस्योदरेण' म्हणजे ब्राह्मणाच्या उदराने मी तुझे प्राशन केले आहे, असा मंत्र त्याने म्हटला. ब्राह्मणाचे उदर कोणत्याही प्रत्यवायाने हिंसित होत नाही, हे स्पष्टच आहे. यासाठी प्राशित्रभागाचे प्राशन केल्यावर ब्रह्म्याने 'ब्राम्हणस्योदरेण' हा मंत्र म्हणावा. या शिवाय 'बृहस्पतेर्ब्रह्मणा' म्हणजे 'बृहस्पतीच्या मंत्राने' याही मंत्राने ब्रह्म्याने पठण करावे. कारण, बृहस्पती हा ब्रह्मष्ठ म्हणजे श्रेष्ठ असा ब्रह्मवेत्ता आहे. जो प्राशित्रभक्षण करतो त्याचे प्राण त्याला सोडून जातात. प्राण हे अमृतस्वरूप होत. अर्थात् प्राशित्रभक्षणाने मरण संभवते. असे न व्हावे म्हणून प्राशित्र भक्षणापूर्वी आपांनी म्हणजे पाण्याने प्राशित्रावर मार्जन करावे. आप म्हणजे पाणी हे अमृतस्वरूप असून प्राण हे अमृतरूप असल्याने पाण्याचे मार्जन प्राशित्रावर केल्याच्या योगाने प्राशित्रभक्षण करणाऱ्याचे प्राण यथास्थानी ठेवल्यासारखे होते. (अनुवाक ८).

चतुर्धाकरण पात्रात ठेवलेला व यजमानाने निर्दिष्ट केलेला आग्नीध्राचा भाग अध्वर्यूने प्रथम आग्नीध्राला द्यावा. असे केल्याने अग्निप्रमुख अशा सहा ऋतूंना संतुष्ट केल्यासारखे होते. ब्रह्माने अनुज्ञा दिल्यावर आग्नीध्राने 'एषा ते अग्ने समित्' हा मंत्र म्हणून आहवनीयाग्नीवर एक समिधा द्यावी. ती पुढे दिल्या जाणाऱ्या 'अनूयाज' संज्ञक आहुतींच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते. शिवाय, समिधा दिलेल्या अग्नीवर 'अनुयाज' संज्ञक आहुतींचे यजन केल्यासारखे

होते. नंतर आग्नीध्राने इध्माला बांधलेल्या दर्भांच्या शुल्बाने (दोरीने) परिधींचा संमार्ग करावा. असे केल्याने परिधींना शुद्ध केल्यासारखे होते. एकएका परिधीला एकएकवेळच संमार्ग करावा. कारण आता यज्ञ मागे फिरल्यासारखा असतो. तीन परिधींना तीन वेळ व अग्नीचा एक वेळ मिळून संमार्गाची संख्या चार होते. पशू हे चतुष्पाद असतात, अर्थात् चार वेळ संमार्ग केल्याच्या योगाने चतुष्पाद अशा पशूंचे अवरोधन करून त्यांना अनुकूल करून घेतल्यासारखे होते. अध्वर्यूने ब्रह्माची अनुज्ञा मिळण्याकरिता 'ब्रह्मन्प्रस्थास्याम:' हा प्रैष मंत्र म्हणावा. आहवनीयाग्नीच्या दक्षिण दिशेस जेथे ब्रह्मा बसलेला असतो तेथेच यज्ञही आश्रय करून राहिलेला असतो. यास्तव, पूर्वोक्त 'प्रैष' देऊन ब्रह्म्याची अनुज्ञा मिळविली म्हणजे ज्या ठिकाणी यज्ञ आश्रय करून राहिलेला असतो तेथूनच यज्ञाचा प्रारंभ केल्यासारखे होते. ब्रह्म्याने जर हाताने खूण करून अनुज्ञा दिली, तर त्याच्या शरीराला वातादि रोगाने कंप उत्पन्न होईल, जर मान हलवून अनुज्ञा दिली तर त्याच्या मस्तकाचे ठिकाणी व्याधी उत्पन्न होईल. जर अनुज्ञा न देता गप्प बसून राहील, तर यज्ञाचे कार्य बरोबर चालणार नाही. यास्तव, 'ॐ प्रतिष्ठा' असे म्हणून ब्रह्म्याने अनुज्ञा द्यावी. कारण मंत्ररूप वाणीच्या ठिकाणी यज्ञ आश्रय करून राहत असतो. अर्थात्, आता सांगितलेल्या 'मंत्ररूप' वाणीचा उच्चार करून अनुज्ञा दिल्याच्या योगाने जेथे यज्ञ राहतो तेथूनच तो यज्ञ अध्वर्यूच्या स्वाधीन केल्याप्रमाणे होते. अनुज्ञा देण्यापूर्वी ब्रह्म्याने 'देव सवितर् एतत् ते प्राह.' इत्यादि मंत्राचा जप करावा. या मंत्रामध्ये 'देव सवितरेतत्ते प्राह' (सर्वप्रेरक अशा हे सवित्या, हे देवा, हे तुला सांगतो) असे जे म्हटले जाते त्या योगे जणू काय यज्ञाविषयी प्रेरणाच केल्यासारखे होते. 'बृहस्पतिर्ब्रह्मा' (बृहस्पती हा ब्रह्मा आहे.) असे जे म्हटले जाते, त्यामध्ये 'तो बृहस्पतीच ब्रह्मिष्ठ म्हणजे सर्वज्ञ ब्रह्मभावाचे ठिकाणी स्थिर असणारा आहे असा अर्थ व्यक्त केला जातो. 'स यज्ञं पाहि स यज्ञपतिं पाहि स मां पाहि' (तो यज्ञाचे रक्षण करो, तो यजमानाचे रक्षण करो, तो माझे रक्षण करो) असे जे म्हटले जाते, त्या योगाने यज्ञ, यजमान आणि स्वत:,या सर्वांच्याच कल्याणाविषयी आशीर्वाद मागीतल्यासारखा होतो. आणि शिवाय यज्ञाचे कामी कसलेही संकट येत नाही. 'आ श्रावय' असे म्हणून अध्वर्यूने 'आश्रावण' करावे. आणि 'देवान् यज' (देवांचे यजन कर) असा होत्याला 'प्रैष' (सूचना) द्यावा.

कोणी ब्रह्मवादी असे म्हणतात की, ज्या देवतांचे यजन करावयाचे ते केले, आता अध्वर्यू ज्यांचे यजन करणार आहे, त्या कोणत्या देवता? यावर 'छंदांसि' (छंद ह्याच देवता) असे उत्तर द्यावे. गायत्री, त्रिष्टुप् व जगती याच त्या छंदोरूप तीन देवता होत. कोणी विद्वान म्हणतात की, 'छंदांचे अध्ययन ब्राह्मणांनी करावयाचे असल्यामुळे ब्राह्मण हेच खरोखर छंदोरूप आहेत व त्यांचेच अध्वर्यू यजन करीत असतो.

पूर्वी देवांनी जेव्हा याग केला तेव्हा त्यामध्ये अग्नी, प्रजापती इत्यादि प्रधान देवतांचे यजन झाल्यानंतर अग्नी विझून गेला. तो प्रज्वलित होईना. तेव्हा देवांनी 'अनूयाजां'चे ठिकाणी प्रवेश करून अग्नीचा छडा लावला आणि 'अनूयाज'संज्ञक आहुती देऊन त्याला पुन्हा संपादन केले. यास्तव, अनूयाजांचे यजन करावे, म्हणजे त्या योगाने अग्नीलाच जणू प्रज्वलित केल्याप्रमाणे होते.

'एतदु' नांवाचा प्रसिध्द असा एक असुर होता. तो एकदा कोणा एकाच्या यज्ञामध्ये आला. आणि 'आयुराशास्ते'. इत्यादि मंत्रात यजमानाला उद्देशून व्यक्त होणारा आशीर्वाद यजमानाला मिळू न देता स्वत:लाच मिळवून बसला. यासाठी, होत्याने 'सूक्तवाक' संज्ञक मंत्रविशेषांचा आरंभ करताना जर 'एतदु द्यावापृथिवी भद्रमभूत्' असे म्हणून आरंभ केला तर आशीर्वादाची प्राप्ती 'एतदु'संज्ञक असुरालाच करून दिल्यासारखे होईल. यास्तव 'इदं द्यावापृथिवी भद्रमभूत्' असेच होत्याने म्हणावे म्हणजे त्या मंत्रातील आशीर्वाद यजमानाला प्राप्त करून दिल्याप्रमाणे होईल.

'आर्ध्म सूक्तवाकमुत नमोवाकम्' असे जे होत्याकडून म्हटले जाते, त्या योगाने, 'सूक्तवाक' आणि 'नमोवाक' ही दोन्ही जशी समृध्द आहेत त्याचप्रमाणे आम्हीही समृध्दीला प्राप्त झालो आहो; असेच म्हटल्यासारखे होते. 'उपश्रितो दिव: पृथिव्यो:' असे जे म्हटले जाते, त्या योगाने द्युलोक व पृथ्वी यांच्या ठिकाणीच यज्ञ आश्रय करून राहत असल्याचा भाव व्यक्त होतो. 'ओमन्वती तेऽस्मिन् यज्ञे यजमान द्यावापृथिवी स्ताम्' (हे यजमान या यज्ञामध्ये द्युलोक व पृथ्वी हीच दोघे तुझे संरक्षण करणारी आहेत) असे जे म्हटले जाते, त्या योगाने त्या मंत्रांशात व्यक्त होणाऱ्या आशीर्वादाचीच याचना यजमानासाठी केल्यासारखे होते. 'सूपावसाना च स्वध्यवसाना च'

असे जर म्हटले गेले तर यजमान मरण पावेल. कारण, जेव्हा कोणी मरू लागतो तेव्हाच त्याला त्याच्या शय्येवरून भूमीवर काढतात. यास्तव, तसे न म्हणता 'सूपचरणा च स्वधिचरणा च' असे म्हणावे. त्या योगाने विस्तीर्ण अशी गोचरभूमी म्हणजे गाईच्या प्रचरणाला पुरेशी अशी भूमी यजमानासाठी मागितल्यासारखे होते. व यजमान मरत नाही. 'तयोराविद्यग्निरिदं हविरजुषत' (अग्नीने हे हविर्द्रव्य सेवन केले) असे जे म्हटले जाते, त्या योगाने ज्या देवतांचे आम्ही यजन केले, त्या देवता जेणे करून समृध्द होतील ते आम्ही केले, असेच म्हटल्याप्रमाणे होते. 'सूक्तवाक'संज्ञक मंत्रकांडामधील 'आ शास्तेऽयं यजमानः' येथपर्यंत पठण झाल्यावर यजमानाच्या नांवाचा होत्याने निर्देश करावा. तसे न केले तर मंत्रांमध्ये व्यक्त होणारा आशीर्वाद यजमानाला न मिळता यज्ञशाळेत येऊन बसलेल्या कोणातरी दुसऱ्या पुरुषासच मिळेल. यास्तव 'आशास्तेऽयं यजमानः' असे म्हणून यजमानाच्या नांवाचा निर्देश करावा. म्हणजे जणू काय यजमानालाच स्वर्गलोक प्राप्त करून दिल्यासारखे होते. 'आयुराशास्ते सुप्रजास्त्वमाशास्ते' (आयुष्याची याचना करतो, सुप्रजास्त्त्व म्हणजे उत्कृष्ट अशा प्रजेच्या प्राप्तीची याचना करतो) असे जे म्हटले जाते, त्या योगाने मंत्रात व्यक्त केलेल्या आशीर्वादाची मागणीच यजमानासाठी केल्यासारखे होते. 'सजातवनस्यामा शास्ते' असे जे म्हटले जाते त्या योगाने, प्राण व इतर सेवक यांचा व यजमानाचा वियोग न केल्यासारखे होते. 'तदग्निर्देवो देवेभ्यो वनते वयमग्नेर्मानुषाः' असे जे म्हटले जाते, त्या योगाने अग्नी देवांना आणि मनुष्यांना फलभोग देतो', असेच म्हटल्याप्रमाणे होते. 'इहगतिर्वामस्येदं च नमो देवेभ्यः (ज्याचे येथे यजन केले जात नाही व ज्याचे केले जाते त्या दोनही प्रकारच्या देवतांना हे नमन असो) असे जे म्हटले जाते त्या योगाने ज्या देवतांचे यजन केले जाते व ज्यांचे यजन केले जात नाही अशा दोन्ही प्रकारच्या देवतांना नमस्कार केल्याप्रमाणे होते. अर्थात् उभयविध देवतांच्या अनुग्रहाने आपल्यावर कसल्याही प्रकारचे संकट येत नाही. (अनुवाक ९).

ज्या देवतेसाठी जे हविर्द्रव्य तयार केले, त्या हविर्द्रव्याचा भाग बिनचूकपणे त्या त्या देवतेच्या स्वाधीन करणे याला 'स्वगाकरण' अशी संज्ञा असून हे कार्य जो करतो त्यास 'स्वगाकर्ता' असे म्हणतात. देवांना ते करीत असलेल्या यज्ञाचे 'स्वगाकरण' अर्थात्, ज्या देवतेचे हविर्द्रव्य,

त्या देवतेच्या स्वाधीन करण्याचे कार्य करणारा 'स्वगाकर्ता' कोणी मिळेना. तेव्हा देव बृहस्पतीच्या 'शंयु' नामक पुत्राला म्हणाले की, आमचा यज्ञ म्हणजे आमच्या यज्ञातील 'हवी' ज्याचा त्याला देण्याचे काम तू कर. तेव्हा तो म्हणाला,' मला अपेक्षित असलेला 'वर' तुम्ही मला द्या. म्हणजे मी तुमचे कार्य करीन. जो कोणी यज्ञविधिविधायक अशा ब्राह्मण ग्रंथात सांगितलेला नाही अशा प्रकारचा, अर्थात् स्वेच्छेला वाटेल तसा यज्ञ करील, त्याचप्रमाणे दुसरा कोणी अश्रध्देने करील अशा प्रकारच्या दोन्ही यज्ञांचे फळ मला असो'. यासाठी, ब्राह्मण ग्रंथात न सांगितलेला आणि अश्रध्देने केलेला असा जो यज्ञ केला जाईल त्या यज्ञाचे फल बृहस्पतिपुत्र शंयू-लाच मिळत असते. 'शंयु' पुन्हा म्हणाला, 'हे देवहो, दोन प्रकारच्या यज्ञाचे फल मला प्राप्त झाले. परंतु माझ्या पुत्रपौत्रादि प्रजेला तुम्ही काय देणार?' देव म्हणाले, 'ब्राह्मणाला ताडन करण्याचा प्रयत्न करणे वगैरे अपराधाबद्दल जी शिक्षा करावयाची असते, ती करावयाचा अधिकार तुझ्या पुत्रपौत्रादि प्रजेला असो.' जो पुरुष ब्राह्मणाला ताडन करण्याचा प्रयत्न करील त्याला शंभर 'निष्क' दंड देण्याची शिक्षा द्यावी. जो ब्राह्मणाला ताडन करील त्याला हजार 'निष्क' दंडाची शिक्षा द्यावी. जो कोणी ब्राह्मणाला ताडन करून त्याच्या शरीराचे रक्त काढील त्याला त्या ब्राह्मणाचे रक्त भूमीवर पडल्यावर त्या रक्ताने भूमीचे जितके म्हणून कण भिजतील तितकी वर्षे भरली जाईतोपर्यंत पितृलोकाची प्राप्ती न होता यमयातना भोगावी लागेल, हे शासन युक्त होय. सारांश, अशा प्रकारचा शासनाधिकार तुझ्या पुत्रपौत्रादि प्रजेला असो'. यास्तव, कोणीही ब्राह्मणाला मारण्याचा प्रयत्न करू नये, मारू नये, त्याच्या अंगाचे रक्त काढू नये. जर कोणी तसे करील तर तो पूर्वोक्त पापाने युक्त होऊन ती ती शिक्षा भोगण्याला पात्र होईल.

'तच्छंयोरावृणीमहे' (ते प्रशस्त फल शंयूपासून आम्ही प्रार्थित आहो) असे म्हणावे, म्हणजे तो यज्ञ बिनचूक देवांच्या स्वाधीन केल्याप्रमाणे होते. 'तच्छंयोरावृणीमहे' असे म्हणावे, म्हणजे त्या योगाने बृहस्पतिपुत्र शंयूलाच त्याचा भाग देऊन संतुष्ट केल्यासारखे होते. 'गातुं यज्ञाय गातुं यज्ञपतये' (यज्ञाला गावयाकरिता, यज्ञपतीला गावयाकरिता) असे म्हणावे, म्हणजे या मंत्रपठणामुळे प्राप्त होणारे फळ मिळण्याविषयी प्रार्थना केल्यासारखे होते. 'सोम' संज्ञक पत्नीसंयाज देवतेचे यजन करावे. त्या योगे पत्नीच्या ठिकाणी

रेताचे धारण केल्यासारखे होते. 'त्वष्टा' देवतेचे यजन करावे. त्या योगाने धारण केलेल्या रेताच्या ठिकाणी त्वष्टा देव स्त्री-पुरुष स्वरूपे निर्माण करतो. 'देवानां पत्नीः' (देवांच्या स्त्रिया) संज्ञक देवतांचे यजन करावे. त्या योगाने रेताच्या ठिकाणी 'मिथुनत्व' म्हणजे 'दांपत्यभाव' उत्पन्न केल्याप्रमाणे होते. अग्नी गृहपती म्हणजे गृहपतिसंज्ञक अग्निदेवतेचे यजन करावे. ते प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याला कारणभूत होते.

आज्य द्रव्याने प्रयाजांचे यजन केले जाते आणि आज्यानेच पत्नीसंयाजांचे यजन केले जाते. असे करणे म्हणजे यज्ञाचे कामी थोडे आळशीपणानेच काम केल्यासारखे होते. यास्तव, यज्ञाचे कामी आळशीपणा होऊ नये, अग्नीशिवाय प्रयाज आणि पत्नीसंयाज यांच्यामध्ये मिथुनत्व म्हणजे स्त्रीपुरुषात्मक दांपत्यभाव उत्पन्न व्हावा म्हणून यजुर्मंत्रांनी प्रयाजांचे यजन झाल्यानंतर पत्नी -संयाजांच्या यजनप्रसंगी प्रथम पुरोनुवाक्या आणि आहुती देतांना याज्या अशा प्रकारे दोन ऋचांच्या पठणाने चारही पत्नीसंयाजांचे यजन करावे.

'पांच' या संख्येला 'पंक्ति' अशी संज्ञा आहे. 'प्रायण' शब्दाचा अर्थ 'प्रारंभ' असून 'उदयन' शब्दाचा अर्थ 'समाप्ती' असा आहे. 'दर्शपूर्णमास' संज्ञक इष्टी किंवा यज्ञ 'पंक्तिप्रायण' म्हणजे पंक्तीने आरंभ होणारा व 'पंक्त्युदयन' म्हणजे पंक्तीनेच समाप्त होणारा आहे. कारण दर्शपूर्णमासेष्टीमध्ये प्रारंभी म्हणजे प्रधान देवतांच्या यजनापूर्वी पांच प्रयाजांचे यजन केले जात असून समाप्तीचे वेळी म्हणजे प्रधान देवतांचे यजन संपल्यानंतर चार 'पत्नीसंयाज' व पांचवा 'समिष्टयजु' यांचे यजन केले जाते. अर्थात् या योगाने पांच प्रयाज हे पंक्तीलाच अनुलक्षून दर्शपूर्णमास यज्ञाचा प्रारंभ करतात व समिष्टयजूसह चार 'पत्नीसंयाज' हेही पंक्तीलाच अनुलक्षून दर्शपूर्णमास यज्ञाची समाप्ती करतात हेच स्पष्ट होते. (अनुवाक १०).

१ हे अग्निदेवा, रथात बसणारा वीर आपल्या रथाला ज्याप्रमाणे घोडे नियोजित करतो, त्याप्रमाणे तू देवांना आव्हान करणाऱ्या देवांना नियोजित कर. आणि पुरातन असा होमकर्ता ऋत्विज होऊन तू या यज्ञस्थलामध्ये बसून रहा. २ आणि हे अग्निदेवा, आमच्या मनातील अभिप्राय उत्कृष्ट प्रकारे जाणणारा तू देवांच्या समोर जाऊन 'यजमान तुम्हाला हविर्द्रव्य अर्पण करीत आहे' असे बोल. सर्व प्रकारची आम्हाला अभिप्रेत असलेली कार्ये विश्वसनीय

होतील असे कर. ३ हे उत्तम तरुणा, अग्निदेवा, हे बलपुत्रा, हे देवांना आव्हान करणाऱ्या, तू ज्या अर्थी सत्यसंपन्न आहेस त्या अर्थी यज्ञाला साधनीभूत हो. ४ प्रज्वलित करण्यात येत असलेला हा अग्नी शेकडो, हजारो प्रकारच्या अन्नांचा पालक आहे. आणि म्हणूनच मस्तकाप्रमाणे सदैव उन्नत व विद्वान असलेला तो आम्हाला धन देणारा होवो. ५ हे सुंदरांगा, अग्निदेवा, सर्व देवांना बरोबरच आव्हान करणाऱ्या ऋत्विजांच्यासह असलेला तू तो यज्ञ आमच्या सन्निध आणून आम्हाला वश होईल असे कर. ६ विविध रूपाने युक्त अशा हे अग्निदेवा, सर्व बाजूंना प्रकाशित होणाऱ्या व अभिप्रेत फळाची वृष्टी करणाऱ्या त्या देवाला नित्य अशा वैदिक मंत्ररूप वाणीने आम्ही करणार असलेली उत्कृष्ट स्तुती सर्वतोपरी कथन कर. ७ सर्व प्रकारचे भरपूर ज्ञान असलेल्या अग्नीच्या परिचारक जनांशी गाई इत्यादि द्रव्यासंबंधी कोणता म्हणून व्यवहार आम्ही लपवून ठेवणार? अग्नीच्या सान्निध्यात असलेल्या त्याच्या परिचारक जनांची वंचना करून आम्ही कोणताही व्यवहार करू शकत नाही. ८ पान्हावलेल्या व निष्पाप अशा गाई आपल्या अल्पवयस्क वासराला टाकीत नाहीत त्याप्रमाणे देवसमुदायातील वाणिज्य करणाऱ्या प्रजा आम्हाला केव्हाही टाकीत नाहीत. ९ नदीमधून चाललेल्या नावेचा तिच्याच पाण्यात उत्पन्न झालेली लाट नाश करीत नाही त्याचप्रमाणे आमच्या बरोबरीच्या पैकीच परंतु आमच्याशी सदा वैर करणाऱ्या दुर्बुध्दी शत्रूचा आम्हावर केला जाणारा द्रोह आमचा नाश करू शकत नाही. १० हे देदीप्यमान अग्ने, सर्व मनुष्ये तुझ्या बळाला 'नमः' असे म्हणून वंदन करीत असतात. यास्तव, तू नानाप्रकारच्या रोगांनी आमच्या शत्रूला ठार कर. ११ गाईंच्यासह इष्टी आमच्या हातून व्हावी, याकरिता तू आमचे धन जेणे करून वाढत जाईल अशा उत्कृष्ट रीतीने आमच्या जवळ साठवून ठेव. वस्तूंची अभिवृध्दी करणारा तू आमच्या कर्मफलाची अभिवृध्दी कर. १२ ओझे वाहणारा बैल ज्याप्रमाणे आपल्या पाठीवर लादलेली कोणतीही वस्तू खाली पाडून नष्ट करीत नाही त्याप्रमाणे तूच आम्हास दिलेल्या ह्या भरपूर धनापैकी काहीही अंश नष्ट करू नकोस. आणि आम्हाला द्यावयाच्या धनराशीत पुनःपुनः भर घालून जितके होईल तितके प्रभूत धन आम्हाला दे. १३ हे अग्निदेवा, ही रोगदारिद्र्यादि अनेक रूपाने असलेली पीडा आमच्या खेरीज इतर कोणा वैऱ्याला त्याला भय वाटावे म्हणून बाधा करो. ज्या पीडेच्या योगाने वैरी भिऊन पळेल

अशी पीडा त्याला प्राप्त होऊ दे. वैऱ्यांचा रोग वाढत राहतो त्याप्रमाणे आमचे बल सदैव वाढीव. १४ ज्याचा यज्ञ कोणतेही अंग विकल होऊ न देता यथासांग झाला असेल आणि देवतांना भक्तिपुरःसर जो नमस्कार करीत असेल त्या यजमानाची सुखकर अशी आहुती अग्नी सेवन करतो. उत्तमप्रकारे यज्ञ अनुष्ठित करणाऱ्या व देवतांना भक्तिपुरःसर नमस्कार करणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या यजमानाला हा अग्निदेव त्याच्या धनाची वाढ करून रक्षण करतो. १५ अत्यंत उत्कृष्ट अशा या इष्टीचे अधिष्ठान निकृष्ट अशा आमच्या संमुख आण आणि आमची दुःखे नष्ट कर. ज्या ठिकाणी मी राहत आहे त्या ठिकाणच्या माझ्या बंधूंचे रक्षण कर. १६ हे अग्ने पूर्वकाली लोकव्यवहारात ज्याप्रमाणे पुत्राचे पालन करणे हे सर्वजण पित्याचे कर्तव्य समजत असत, त्याप्रमाणे ज्या अर्थी आम्ही आमचे रक्षण करणे हे तुझे कर्तव्य जाणले आहे, त्या अर्थी तू संपादन केलेले सुख आम्ही संपादन केले आहे. १७ हे अग्निदेवा, तू राजाप्रमाणे हिंसक अशा शत्रूंचा नाश करणारा आहेस, त्याचप्रमाणे तीक्ष्ण शिंगांनी युक्त अशा हरिणाप्रमाणे वणव्याचे रूप धारण करून अरण्यात प्रवेश करणारा असा तू शत्रूंची नगरे दूषित केली आहेस. १८ परस्परांमध्ये मित्रभाव असलेल्या हे ऋत्विग्यजमानहो, तुमचा उत्कृष्ट असा इष्टार्थ हा अग्निदेव संपादन करो आणि तुम्हीही वस्ती करून राहणाऱ्यांमध्ये अत्यंत पुरातन, बलाचा केव्हाही नाश न होऊ देणाऱ्या व अत्यंत बलवान अशा अग्निदेवाच्या संतोषासाठी स्तवनात्मक काव्य संपादन करा. १९ अभिमत फलांचा वर्षाव करणाऱ्या हे अग्निदेवा, सर्व प्रकारची फले एकत्र जुळवून ती तू यजमानाशी मिश्र करतोस. म्हणजे यजमानाला देतोस. ईश्वर असलेला तू आमच्याकडे येऊन पृथ्वीरूप असलेल्या वेदीच्या ठिकाणी प्रज्वलित होतोस. अशा प्रकारचा महानुभाव असा तू आम्हाला धने आणून दे. २० हे प्रजापते या जगात उत्पन्न झालेल्या या ज्या वस्तू आहेत त्या सर्व वस्तू निर्माण करणारा तुझ्याखेरीज दुसरा कोणीही झाला नाही. आम्ही ज्या फलाची इच्छा धरून तुझे यजन करीत आहोत, ते फल आम्हाला प्राप्त होवो. तुझ्या अनुग्रहाने आम्ही सर्व प्रकारच्या धनांचे पालक होऊ. २१ द्युलोक व पृथ्वी यांचा तो पुत्र म्हणजे प्रजापती आपल्या पित्याला म्हणजे द्युलोकाला जाणतो. तो आपल्या मातेला म्हणजे पृथ्वीला जाणतो. अभिज्ञ असा तो प्रजापती आपल्या मातापितरांचा पुत्र होतो. तो

यजमानाला वरचेवर द्यावे लागणाऱ्या धनाने युक्त होतो. आणि तो प्रजापती सर्वव्यापी असे विराट् रूप धारण करून वरचा द्युलोक आच्छादित करता झाला. त्याचप्रमाणे त्याने अंतरिक्ष आणि स्वर्गलोक देखील व्यापून टाकला. इतकेच काय पण इहलोकापासूनचे सर्व लोक व्यापून टाकले. आणि तो चतुर्मुख अशा प्रकारचे स्वरूप धारण करून सत्यलोकी मर्यादित होऊन राहिला. २२ हे सोमा, हे पूषन्, धनांची उत्पत्ती करणारे, द्युलोकाला निर्माण करणारे व पृथ्वीला उत्पन्न करणारे तुम्ही दोघेही जन्मापासूनच सर्व त्रैलोक्याचे पालन करणारे झाला आहात. हे देवहो, अमृताप्रमाणे अविनाशी अशा यज्ञकर्माच्या फलाचे बंधन तुम्ही आमच्या ठिकाणी निर्माण केले आहे. २३ देव यज्ञमंडपात प्रादुर्भूत होणाऱ्या सोम व पूषा या नांवाच्या दोघा देवांचीच सेवा करतात. हे दोघे देव आमच्या ठिकाणी प्रादुर्भूत होणारी आम्हास अप्रिय अशी बुध्दिमांद्ये नष्ट करोत. इंद्रदेव या सोम व पूषा नांवाच्या दोघां देवांकडून तरुण अशा गाईंच्या कासेत परिपक्व दूध निर्माण करवितो. (अनुवाक ११).

१ हे अग्निदेवा, पितरांची इच्छा करणारे आम्ही तुला बोलावीत आहो. पितरांची इच्छा करणारे आम्हीच तुला प्रज्वलित करीत आहो, तू देखील यजमानाची इच्छा करणारा हो आणि हविर्द्रव्य सेवन करण्याकरता यजमानाच्या पितरांना बोलावून आण. २ हे सोमा, तू आपल्या बुध्दीच्या योगाने पुष्कळच प्रसिध्द आहेस. आणि तू अन्न व उदक यांच्या परिपूर्तीमुळे मनोरंजक वाटणाऱ्या मार्गावर न सांगताच नेऊन पोचवितोस. हे इन्दो, तुझ्या सेवेच्या योगाने आमचे पितर देवसमुदायात राहून स्थिरचित्त होत्साने रमणीय असे हविर्द्रव्य सेवन करतात. ३ अशुध्द वस्तूंना शुध्द करणाऱ्या हे सोमा ज्या अर्थी आमचे पूर्वीचे पितर तुझ्या अनुग्रहाला पात्र होऊन कर्मे करिते झाले आणि गत जन्मांचे स्मरण करून स्थिरचित्त होऊन राहिले, त्या अर्थी तू देखील वायूची अपेक्षा न करता आपल्या ज्वलनशक्तिरूपी मुखाने हविर्द्रव्य भक्षण करून युध्दकुशल अशा अश्वांच्या साहाय्याने परिधींच्याप्रमाणे चारी बाजूंनी घेरून बसलेल्या प्रतिबंधकांना दूर कर. त्याचप्रमाणे आमच्याकरिता, अर्थात् आम्हाला धन देण्याकरता, तू धनवान् हो. ४ हे सोमा, तू पितरांच्याशी सहमत होऊन अनुक्रमाने द्युलोक व पृथ्वी यांना व्यापून टाकले आहेस. हे इन्दो, अशा प्रकारच्या तुज थोर देवाची हविर्द्रव्याच्या योगाने आम्ही सेवा करतो. तुझ्या प्रसादाने आम्ही धनांचे पालक होऊ. ५ ज्यांची आम्ही

सेवा केली आहे, आणि जे यज्ञ न करता केवळ गृहस्थधर्माचे पालन करून पितृलोकाला गेले, अशा हे पितरांनो, या यज्ञकर्मांचे ठिकाणी तुम्ही या, आणि आपआपल्या स्थानावर बसा. या यज्ञात प्रयत्नाने तयार केलेली हविर्द्रव्ये सेवन करा. आणि नंतर धन आणि सर्व वैदिक कर्मात निष्णात असा पुत्र आमच्या ठिकाणी संपादन करा. ६ यज्ञ करून पितृलोकाला गेलेल्या व यज्ञामध्ये येऊन बसणाऱ्या हे पितरांनो, अर्वाचीन, अर्थात् अलीकडच्या काळात उत्पन्न झालेल्या आमचे रक्षण तुम्ही करावयास पाहिजे. तुमच्यासाठी ही हविर्द्रव्ये आम्ही तयार केली आहेत. ती भक्षण करा. नंतर हविर्द्रव्यांचे सेवन केलेले तुम्ही सुखतम अशा संरक्षक धनासह आमचे रक्षण करण्याकरता येथे या. आणि आम्हाला प्रारंभापासून शेवटपर्यंत सुख, दुःखवियोग आणि पापराहित्य द्या. ७ मी माझी भक्ती उत्तमप्रकारे जाणणाऱ्या पितरांना रांमुखत्वाने संपादन केले आहे. व्यापनशील अशा यज्ञाचा विनाशाभाव व विशेषत्वाने प्रवृत्ती या दोहोंचेही संपादन केले आहे. जे यज्ञामध्ये येऊन बसणारे आहेत, ते या यज्ञकर्माचे ठिकाणी अगत्याने आलेले आहेत. आदरपूर्वक आलेले ते पितर कुटून तयार केलेल्या सोमरससरूपी हविर्द्रव्याच्या आस्वादाने प्रसन्नतेला प्राप्त होवोत. ८ आमच्यावर अनुग्रह करणारे पितर यज्ञयोग्य, तृप्तिकर आणि द्रव्यनिधीप्रमाणे प्रिय अशा हविर्द्रव्यांच्या सेवनाची निमित्ते उत्पन्न झाली असता, आम्हाकडून बोलावले जाणारच. आमच्या बोलावण्याप्रमाणे ते येवोत. ते या यज्ञकर्मात आमच्याकडून केल्या जाणाऱ्या स्तुती ऐकोत. ते 'हा यजमान फार चांगला आहे' असे आदराने म्हणोत. आणि आमचे संरक्षण करोत. ९ निकृष्ट असलेले पितर उत्कृष्ट हविर्द्रव्य संपादन करोत. उत्तम असे पितर उत्कृष्ट हवी सेवन करोत. त्याचप्रमाणे मध्यम असलेले पितर उत्कृष्ट हविर्भाग सेवन करोत. निकृष्टापासून उत्तमापर्यंतचे ते सर्व पितर आम्हाविषयी अनुग्रहपर असोत. जे हिंसा न करणारे व आम्ही अनुष्ठित केलेल्या यज्ञाला जाणणारे पितर आमच्या प्राणरक्षणासाठी येथे येऊन पोचले आहेत, ते आमच्या आव्हानाविषयी संतुष्ट होऊन आमचे संरक्षण करोत. १० यजमानाच्या जन्मापूर्वी उत्पन्न झालेले पिता, पितामह, वडीलबंधू इत्यादि जे पितर पितृलोकाला प्राप्त झाले, त्याचप्रमाणे जे यजमानाच्या जन्मानंतर धाकटे बंधू, पुत्र इत्यादि पितृलोकी गेले, याशिवाय, जे पृथ्वीच्या रजोगुणाचेच कार्य असलेल्या या यज्ञकर्मामध्ये आणून ठेवलेल्या हविर्द्रव्याचा स्वीकार करण्याकरता येथे येऊन बसले आहेत,

अथवा जे आणखी बंधुवर्गरूपाने असणारे पितर, दरिद्रता दूर करणाऱ्या व कल्याणकारक अशा धनसमृध्दीने युक्त होऊन श्राध्दादि कर्माविषयी तत्पर राहणाऱ्या भाऊबंदरूपी प्रजांमध्ये श्राद्धादिकांचा स्वीकार करण्याकरिता येऊन बसले आहेत, त्या सर्व पितरांना या यज्ञकर्मामध्ये आहुतिप्रदानपूर्वक नमस्कार असो. ११ हे अग्निदेवा, गतकालामध्ये जे आमच्याहून उत्कृष्ट असे पितृपितामह इत्यादि, त्याचप्रमाणे त्यांच्याही पूर्वी होऊन गेलेले जे आमचे पितर यज्ञाचा उपभोग करून अत्यंत शुध्द अशा स्थानाला जसे प्राप्त झाले, त्याचप्रमाणे देदीप्यमान अशा पितृरूप देवतेला उद्देशून 'शस्त्र' संज्ञक मंत्रसमुदायाने स्तवन करणारे आम्ही देखील उच्चस्थानालाच प्राप्त झालो आहो. आणि आमचा क्षय होण्याला कारणभूत अशा क्षुधेच्या पीडेचा हविर्द्रव्यरूपी अन्नाने नाश करून तेजोरूप देवतेच्या सन्निध प्राप्त झालो आहो, व यज्ञफळाला प्रतिबंधक असे पाप आमच्यापासून आम्ही दूर केले आहे. १२ पितरांच्यासाठी 'कव्य' संज्ञक हविर्द्रव्ये वाहून नेणाऱ्या हे अग्निदेवा, ज्या अर्थी यज्ञकर्माची वाढ करणाऱ्या पितरांचे तू यजन करतोस, त्याच अर्थी तू देव आणि पितर यांना पुनःपुन्हा हविर्द्रव्ये नेऊन पोचवीत असतोस. १३ सर्व जगाला जाणणाऱ्या हे अग्निदेवा, तू यजमानाने स्तवन केले म्हणजे त्याची हविर्द्रव्ये सुगंधित करून देवतांच्याकडे वाहून नेली आहेस. आणि पितरांना पोचविली आहेस. ते पितर यजमानाने 'स्वधा' असे म्हणून दिलेले हविर्द्रव्यरूपी अन्न सेवन करोत. हे अग्निदेवा, तू देखील प्रयत्नाने संपादन केलेली ही हविर्द्रव्ये भक्षण कर. १४ मातली नांवाचा ज्याचा सारथी आहे असा इंद्र 'कव्य'संज्ञक हविर्द्रव्य सेवन करणाऱ्या पितरांच्यासह वृध्दिंगत होत असतो. यम 'अंगिरा' नामक विशिष्ट अशा पितरांसहवर्तमान, आणि बृहस्पती ऋग्मंत्रांनी प्रतिपाद्य अशा विशिष्ट पितरांच्यासह वृध्दिंगत होत असतो. ज्या 'कव्य' संज्ञक 'हवि' सेवन करणाऱ्या निरनिराळ्या पितरांना देव वृध्दिंगत करतात, आणि जे कव्यभागभक्षक पितर इंद्रादि देवांना वृध्दिंगत करतात, त्यांमध्ये इंद्रादि देव 'स्वाहा' असे म्हटल्याने तृप्त होतात व दुसरे कव्यभागभक्षक पितर 'स्वधा' या मंत्राच्या योगाने तृप्त होत असतात. १५ हे यमराजा, 'अंगिरा' नामक पितरांच्याशी एकमत होऊन तू ह्या प्रकर्षपूर्वक विस्तारलेल्या यज्ञाचे ठिकाणी येऊन बैस. कारण, विद्वान् अशा ऋत्विजांनी प्रयुक्त केलेले मंत्र तुला बोलावोत. हे राजा, या हविर्द्रव्यांच्या सेवनाने संतुष्ट हो आणि यजमानाला हर्षित कर.

१६ हे यमराजा, 'वैरूप' नामक सामाची आवड असणाऱ्या व यज्ञयोग्य अशा 'अंगिरा' नामक पितरांच्यासह ये. आणि ह्या यज्ञामध्ये यजमानाला हर्षित कर. जो तुझा पिता आहे, त्या विवस्वानाला या यज्ञात मी बोलावतो. तो यज्ञाचे ठिकाणी येवो आणि येथे बसून यजमानाला हर्षित करो. १७ अंगिरा, अथर्व आणि भृगु या नांवाचे आमचे पितर कधी नव्हेत ते येथे आले आहेत व त्यामुळेच ते नव्याने प्रीतिजनक झाले आहेत. ते सोमपानाला योग्यच आहेत. यज्ञयोग्य अशा त्या पितरांच्या आमच्याविषयी असलेल्या अनुग्रहबुध्दीचे ठिकाणी आम्ही सर्वदा विश्वस्त राहू आणि मनाला आनंद देणाऱ्या कल्याणरूपी फळाच्या ठिकाणी सर्वदा निगडित होऊ. (अनुवाक १२).

****